# मॉडर्न



२००२-२००३

B++




नॅक समिती आणि पदाधिकारी



नॅक समितीला मानवंदना करताना

॥ ज्ञानमयो भव ॥

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे

## मॉडर्न महाविद्यालय, पुणे - ४११ ००५

# 'मॉडर्न' नियतकालिक

# २००२-२००३

**संपादन समिती**

**अध्यक्ष**

प्राचार्य अ. गो. गोसावी

**संपादिका**

डॉ. स्नेहल तावरे

**नियतकालिक समिती सदस्य**

प्रा. सुरेखा परब

प्रा. डब्ल्यू. आर. अहिरराव

प्रा. संजीवनी राहणे

डॉ. के. एस. काळे

प्रा. आर. व्ही. कुलकर्णी

डॉ. स्वाती कर्वे

प्रा. आशा परुळेकर

श्री. व्ही. एस. खोले (कार्यालयीन कर्मचारी)

**Form IV**

Statement about ownership and other particulars about
'MODERN' - COLLEGE MAGAZINE
PROGRESSIVE EDUCATION SOCIETY'S

**MODERN COLLEGE OF ARTS, SCIENCE AND COMMERCE**
**PUNE - 411 005**


| | | | |
|---|---|---|---|
| 1. | Place of Publication | : | Pune |
| 2. | Periodicity of its publication | : | Annual |
| 3. | Printer's Name | : | Shivani Printers,<br>Dhole Patil Road,<br>Pune - 411 001.<br>Tel. : 6124581 |
| 4. | Publisher's name (whether Citizen of India) if foreigner state country of origin | : | Prin. A. G. Gosavi<br>Modern College of Arts, Science and Commerce, Pune - 411 005 (India) |
| 5. | Editor's Name (Whether Citizen of India) if foreigner state country of origin | : | Prin. A. G. Gosavi,<br>Modern College of Arts, Science and Commerce, Pune-411 005 (India) |
| 6. | Name and address of individuals, who own the paper and partners or shareholders holding more than one per cent of the total capital | : | Not applicable |

I, A. G. Gosavi, hereby declare that the particulars given above are true to the best of my knowledge and belief.

**Prin. A. G. Gosavi**
Signature of Publisher

| | | |
|---|---|---|
| **प्रकाशक** | : | प्राचार्य अ. गो. गोसावी,<br>मॉडर्न महाविद्यालय,<br>शिवाजीनगर, पुणे - ४११ ००५ |
| **मुद्रक** | : | शिवानी प्रिंटर्स, ढोले पाटील रोड, पुणे-१ |
| **मुखपृष्ठ पारदर्शिका** | : | राजेंद्र गिरधारी |


या नियतकालिकातील लेखांमध्ये व्यक्त झालेल्या मतांशी महाविद्यालयाचे प्राचार्य, संपादिका, नियतकालिक समितीचे सदस्य हे सहमत असतीलच असे नाही.

NATIONAL ASSESSMENT AND ACCREDITATION COUNCIL

NAAC

EXCELLENCE · CREDIBILITY · RELEVANCE

# NAAC

*for Quality and Excellence in Higher Education*



## *Certificate of Accreditation*

राष्ट्रीय मूल्यांकन एवं प्रत्यायन परिषद्
विश्वविद्यालय अनुदान आयोग का स्वायत्त संस्थान

**NATIONAL ASSESSMENT AND ACCREDITATION COUNCIL**

*An Autonomous Institution of the University Grants Commission*

# Certificate of Accreditation

The Executive Committee of the
National Assessment and Accreditation Council
on the recommendation of the duly appointed
Peer Team is pleased to declare the

**P. E. Society's Modern College of
Arts, Science & Commerce**

*Pune, affiliated to University of Pune, Maharashtra as*

**Accredited**[1]

at the $B^{++}$ level[2].

(among the Affiliated / Constituent Colleges)

Date : March 21, 2003

NAAC

Director

1. This certification is valid for a period of *Five* years with effect from the academic year 2002 - 2003.
2. An institutional score (%) in the range of 55-60 denotes C grade, 60-65 - $C^{+}$ grade, 65-70 - $C^{++}$ grade, 70-75 - B grade, 75-80 - $B^{+}$ grade, 80-85 - $B^{++}$ grade, 85-90 - A grade, 90-95 - $A^{+}$ grade, 95-100 - $A^{++}$ grade (upper limits exclusive)



मॉडर्न महाविद्यालयाच्या स्थापनेत
ज्यांचा सिंहाचा वाटा आहे,
त्या
**गुरुवर्य वि. त्र्यं. ताटके**
यांच्या जन्मशताब्दीनिमित्त
सविनय अर्पण !

मॉडर्न महाविद्यालय




कलामंडळ वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ प्रसंगी सुप्रसिद्ध अभिनेते श्री. राहुल सोलापूरकर यांच्या हस्ते बक्षीस स्वीकारताना विद्यार्थिनी.




मॉडर्न करंडक आंतरमहाविद्यालयीन द्वंद्वगीत स्पर्धा सुप्रसिद्ध गायक श्री. श्रीकांत पारगावकर यांच्या हस्ते करंडक स्वीकारताना, सोबत प्रा. चिंचोरे, उपप्राचार्य लिमये, प्रा. जोर्वेकर.




भारत विकास परिषद २८ वी राष्ट्रीय समूहगान स्पर्धा, अंबाला (हरियाणा) येथील सहभागी संघ.



शैक्षणिक गुणवत्ता-दिन समारंभ, सर्वोत्तम पदवीधर मानचिन्ह डॉ. योगेश वाडदेकर यांच्याकडून स्वीकारताना माधवी थेटे, सोबत प्राचार्य गोसावी, कार्याध्यक्ष डॉ. सुषमा जोग.



स्नेहसंमेलनात सेवानिवृत्तांच्या मेळाव्यात भाषण करताना प्राचार्य अ. गो. गोसावी.



शास्त्र संघटना



वाणिज्य संघटना



नियोजन मंडळ



कला मंडळ



क्रीडा मंडळ



आंतर महाविद्यालयीन
व्हॉलीबॉल विजेता संघ



नॅक समिती सदस्य



छात्रसेना



'पंचतारांकित' मॉडर्नच्या
स्नेहभोजन प्रसंगी
माजी प्राचार्य डॉ. परांजपे,
माजी प्राचार्य गंभीर,
प्राचार्य अ. गो. गोसावी.

## ऑलिंपियाड परीक्षेचे यशस्वी मानकरी
## ५ व्या राष्ट्रीय विज्ञान ऑलिंपियाड स्पर्धा परीक्षा सहभाग



**क्षितिजा देशपांडे**
१२ वी



**ओंकार दलाल**
१२ वी



**रोहन जोशी**
११ वी

## अभिनंदनीय यशाचे मानकरी



**प्रसाद पसरनीकर**
'सर्वोत्कृष्ट विद्यार्थी' पारितोषिक
कनिष्ठ विभाग



**स्मिता करीवडेकर**
'सर्वोत्कृष्ट विद्यार्थी' पारितोषिक
वरिष्ठ विभाग, आय.सी.एस.आर,
हॉकी स्पर्धेत सहभाग



**तुषार सुतार**
आय.सी.एस.आर



**मधुरा जोशी**
विद्यापीठ प्रतिनिधी



**स्नेहल गोरे**
एन.एस.एस. आदर्श विद्यार्थी
कनिष्ठ विभाग

## क्रीडा विभाग – स्पृहणीय यशाचे मानकरी



प्राजक्ता हरपळे

- ९ वी नॅशनल किक बॉक्सिंग चॅम्पियनशिप-वेस्ट बंगाल-२००२-रौप्यपदक
- ७ वी ऑल इंडिया कराटे चॅम्पियनशिप-२००१
  अहमदनगर ज्युदो कराटे मार्शल आर्ट असो. कै. धनराजजी बोरा स्मृती करंडक-कास्यपदक
- २१ वी नॅशनल कराटे चॅम्पियनशिप - १९९७, विदर्भ स्पोर्टस् असोसिएशन - खामगाव-कास्यपदक
- ७ वी महाराष्ट्र स्टेट कराटे चॅम्पियनशिप - २००२
  कोब्रा (कराटे) मार्शल आर्ट - चिंचवड - पुणे-रौप्यपदक
- स्टार स्पोर्टस् असोसिएशन -सांगवी-पुणे - २००२
  मा. शरद पवार विचारमंच - स्टेट लेव्हल कराटे टूर्नामिन्ट-रौप्यपदक
- शितो-रिओ कराटे असोसिएशन ऑफ महाराष्ट्र-२०००
  पिंपरी-चिंचवड महापौर चषक-स्टेट लेव्हल-कराटे चॅम्पियनशिप-कास्यपदक
- ९ वी पिंपरी-चिंचवड किक बॉक्सिंग चॅम्पियनशिप- २००२ -रौप्यपदक



प्रियांका थोरात

- ९ वी नॅशनल किक बॉक्सिंग चॅम्पियनशिप-वेस्ट बंगाल-२००२, रौप्यपदक
- ऑल इंडिया कराटे टुर्नामेंटस्-१९९८ इंडियन तायकांदो अँड किक् बॉक्सिंग असोसिएशन, इंडिया लातूर-सुवर्णपदक
- नॅशनल मार्शल आर्टस् ॲकॅड्मी १ ली एन. एम. ए. ए. कराटे अँड
  किक बॉक्सिंग-सन १९९८, नॅशनल लेव्हल ओपन चॅम्पियनशिप
  नागोटणे - रौप्यपदक
- ५ वी, महाराष्ट्र स्टेट कराटे चॅम्पियनशिप, सन १९९८, मंगळवेढा,
  जि. सोलापूर-रौप्यपदक
- २ री ऑल महाराष्ट्र मार्शल आर्ट ओपन चॅम्पियनशिप-२०००, भोसरी,
  पुणे-३९ - सुवर्णपदक
- ९ वी, महाराष्ट्र स्टेट लेव्हल किक बॉक्सिंग चॅम्पियन शिप २००२, पिंपरी चिंचवड रौप्यपदक
- स्टार्स स्पोर्टस् असोसिएशन, सांगवी, पुणे २००२
  मा. शरद पवार विचारमंच, स्टेट लेव्हल कराटे टुर्नामेंटस् - रौप्यपदक



**संग्राम चौगुले**
मॉडर्न श्री २००२-२००३



हॉकी महिला विजेता संघ
वरिष्ठ महाविद्यालय

## राष्ट्रीय छात्र सेना



**स्नेहल प्रधान**
आंतरराज्य क्रिकेट
संघात निवड



**सचिन शिंदे**
विद्यापीठ व्हॉलीबॉल
स्पर्धेत सहभाग



**मोहनकुमार खोत**
विद्यापीठ व्हॉलीबॉल,
स्पर्धेत सहभाग



**सचिन गायकवाड**
विद्यापीठ व्हॉलीबॉल,
स्पर्धेत सहभाग



**विजया मोगल**
विद्यापीठ हॉकी
स्पर्धेत सहभाग



**भाग्यश्री निंबाळकर**
विद्यापीठ हॉकी स्पर्धेत सहभाग
राष्ट्रीय स्पर्धेत रौप्यपदक



**दीपाली सनमुख**
विद्यापीठ रोईंग
स्पर्धेत कास्यपदक



**राहुल माळवे**
विद्यापीठ मैदानी
स्पर्धा सुवर्णपदक



**प्रफुल्ल गुरव**
विद्यापीठ मैदानी
स्पर्धा सहभाग



**राम पायाळ**
राष्ट्रीय किक बॉक्सिंग
स्पर्धा सुवर्णपदक

## राष्ट्रीय छात्र सेना



S.U.O.
विकास नायकवडी
NIC, अहमदाबाद



C.D.T.
आरती कांबळे
NIC, भुसावळ



S.U.O.
गोपालसिंग पतियाल
IMA, डेहराडून



C.D.T.
स्नेहा कांबळे
NIC, चित्तोडगड



J.U.O.
अमोल पवार
TSC-,I कॅम्प सिनियर

# विशेष अभिनंदन !

**प्रा. भालचंद्र भोमे**
**प्रा. जयंत जोर्वेकर**
**प्रा. आशा परुळेकर**
**महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक**
**अभ्यास मंडळाच्या सदस्यपदी नियुक्ती**

## पुणे महानगरपालिका - आदर्श शिक्षक पुरस्कार



प्रा. श्रीराम आढाव



प्रा. सुधीर उजळंबकर

## प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी आदर्श शिक्षक पुरस्कार



प्रा. रेखा आगाशे



प्रा. अरुण देशपांडे

## प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी आदर्श सेवक पुरस्कार



श्री. शशिकांत कामठे

## प्राध्यापकांचे यश



**प्रा. प्रकाश दीक्षित**
प्रो. ए. सोसायटी
उपकार्यवाहपदी नियुक्ती.



**डॉ. टी. डी. निकम**
को-ऑर्डिनेटर
यू.जी.सी.व्होकेशनल बायोटेक्नॉलॉजी कोर्स



**प्रा. द. ता. लिमये**
मॉडर्न हायस्कूल, निगडी पुणे-४४
या शाळेचे प्र. मुख्याध्यापकपदी नियुक्ती



**संजीवनी कुवळेकर**
जर्मन, फ्रेंच, रशियनच्या
बोर्ड ऑफ स्टडीजच्या
चेअरमनपदी नियुक्ती

## पदोन्नती



**श्री. गुट्टे बी. डी.**
ग्रंथालय लेखनिकपदी
पदोन्नती



**श्री. दिलीप खोपकर**
रजिस्टार (प्रबंधक) पदावर
पदोन्नती



**श्री. कवडे एस. बी.**
सहायक ग्रंथपालपदी
पदोन्नती



नॅक समिती विद्यार्थ्यांबरोबर चर्चा करताना सोबत
वनस्पतिशास्त्र विभागप्रमुख प्रा. बनसोडे, डॉ. निकम, प्रा. बारमुख




नॅक समिती आणि कार्यालयीन कर्मचारी

# विनम्र श्रद्धांजली



**डॉ. एल. एच. गाडगीळ (माजी प्राचार्य)**

जन्म ६-१२-१९२५, मृत्यू २६-३-२००३

डॉ. गाडगीळ हे रसायनशास्त्र विषयाचे एक नामवंत प्राध्यापक होते. तीस वर्षांहून अधिक काळ त्यांनी रसायनशास्त्र विषयाच्या पदवी व पदव्युत्तर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी रसायनशास्त्रावर अनेक पुस्तके लिहिली.

डॉ. गाडगीळ यांनी रसायनशास्त्र विभागप्रमुख व उपप्राचार्य म्हणून जून १९७० ते डिसेंबर १९८५ पर्यंत काम केले. तसेच २७ ऑक्टोबर १९७८ ते ३० एप्रिल १९७९ पर्यंत प्राचार्यपदाची धुरा यशस्वीरित्या सांभाळली. ते संस्थेचे आजीव सदस्य होते.

मॉडर्न महाविद्यालयाच्या पहिल्या दिवसापासून त्यांनी कार्यरत राहून सर्व महत्त्वाच्या जबाबदाऱ्या समर्थपणे सांभाळल्या. एक उत्तम प्राध्यापक व प्रशासक म्हणून त्यांचा लौकिक होता. मॉडर्न महाविद्यालयाच्या प्रगतीमध्ये त्यांचा फार मोठा वाटा आहे. प्रो. ए. सोसायटीचे आजीव सदस्य या नात्याने त्यांनी संस्थेच्या इतर शाखांच्या प्रगतीमध्येही महत्त्वाचे योगदान केले.

मॉडर्न महाविद्यालयाला नॅकचा पंचतारांकित दर्जा मिळण्यास एक संस्थापक, सदस्य, प्राध्यापक व प्रशासक म्हणून त्यांचा मोलाचा वाटा आहे. महाविद्यालयाची ही प्रगती पाहण्यास सर आमच्यात नाहीत याची सर्वांनाच हळहळ वाटते.

प्राचार्य डॉ. गाडगीळ यांना मॉडर्न महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि संस्थाचालक यांच्यातर्फे विनम्र श्रद्धांजली.

---



**प्रीतम कटारिया**

(एस. वाय. बी. सी. एस.)

मृत्यू १९-१२-२००२

महाविद्यालयातील एक हुशार विद्यार्थी प्रीतम कटारिया, (एस. वाय. बी. सी. एस.) याचे १९ डिसेंबर २००२ रोजी अपघाती दुःखद निधन झाले. त्याच्या कुटुंबीयांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत.

# संपादकीय

महाविद्यालयीन विश्वात खळबळ निर्माण करणारे, सर्वांना एकजुटीने कामाला लावणारे, स्वयंसेवी संघटना कार्यरत करणारे आणि प्रत्येकाला स्वतःचे मूल्यमापन करायला लावणाऱ्या 'नॅक' ची ओळख सर्वांनाच आता झालेली आहे. मॉडर्न महाविद्यालयाने दोन वर्षांपासून जाणीवपूर्वक अथक् परिश्रम करून प्राचार्य अ. गो. गोसावी सरांच्या मार्गदर्शनाखाली 'नॅक' ची विजयश्री, खेचून आणली. नॅक समितीने मॉडर्न महाविद्यालयाला 'पंचतारांकित' दर्जा दिला, हे अभिमानाने नमूद करावेसे वाटते.

पुणे शहरात आणि जिल्ह्यात कला-वाणिज्य-शास्त्र असे तीनही विभाग असलेल्या महाविद्यालयांमधून मॉडर्न महाविद्यालयाने बाजी मारली आणि 'नॅक' ची सर्व तयारी पूर्ण करून पंचतारांकित दर्जा प्रथमतः मिळविलेला आहे. प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन संस्थेच्या दृष्टीने ही एक गौरवास्पद कामगिरी आहे. या कामगिरीमागे संस्थेचे कुशल कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे आहेत. त्यांनी वेळोवेळी विभागप्रमुख आणि प्राध्यापक यांच्या बैठका घेऊन सर्वांमध्ये स्फुल्लिंग चेतविण्याचे कार्य केले. त्यांच्या स्फूर्तिदायी व्याख्यानांमुळे महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी सर्वच जण एक दिलाने कामाला लागले. महाविद्यालयाचा परिसर, सर्व विभाग, ग्रंथालय, प्रयोगशाळा आणि कार्यालय 'नॅक' समितीचे स्वागत करण्यास सज्ज झाले. अखेर डिसेंबरमध्ये 'नॅक' चे सदस्य पाहणीसाठी तीन दिवस महाविद्यालयात आले. त्यांनी सर्व विभागांना भेटी दिल्या. प्राध्यापक, विद्यार्थी यांच्याशी संवाद साधला आणि शुभेच्छा देऊन ते गेले. निकालाची प्रतीक्षा करण्याची पाळी सर्वांवर आली. जसे जसे दिवस जात होते तसे तसे प्राचार्य गोसावीसरांकडे सातत्याने विचारणा होऊ लागली. निकाल काय लागणार? गुण किती मिळणार? प्रत्येक जण तर्क लढवित होता. प्राचार्यांना प्रचंड आत्मविश्वास होता की काही झाले तरी चांगले गुण मिळणारच आणि शेवटी त्यांचा आणि संस्थाप्रमुखांचा आत्मविश्वास खरा ठरला. २१ मार्च २००३ च्या पत्राने नॅक कमिटीने मॉडर्न महाविद्यालयाला पंचतारांकित दर्जा (B++, गुण ८० ते ८५% दरम्यान) प्रदान केला. अतिशय आनंदी वातावरण या निकालामुळे निर्माण झाले.

'मॉडर्न' हे 'मॉडर्न' आणि 'प्रोग्रेसिव्ह' आहे हे पुन्हा एकवार सिद्ध झाले. आज महाविद्यालयातील प्रत्येक जण अभिमानाने सांगतो की आम्ही 'पंचतारांकित' आहोत. विश्वविद्यालयातील अनुदान आयोग स्वायत्त संस्थानच्या राष्ट्रीय मूल्यांकन एवं प्रत्यायन परिषदेकडून मिळालेल्या B++ दर्जाबद्दल संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे, प्राचार्य अ. गो. गोसावी, उपप्राचार्य डॉ. वाघमारे, उपप्राचार्य प्रा. लिमये, डॉ. सुलभा देऊस्कर, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी या सर्वांचे मनःपूर्वक अभिनंदन.

गुरुवर्य ताटके यांनी रुजविलेल्या रोपट्याचे वटवृक्षात रूपांतर झालेले आहे. त्यांनी घालून दिलेल्या तत्त्वांच्या, उद्देश्यांच्या, निष्ठेच्या मार्गावरून गेलेल्यांनी हा दर्जा राखला आहे. म्हणूनच ताटकेसरांच्या जन्मशताब्दीनिमित्ताने

*'मॉडर्न २००२-२००३' चे वार्षिक नियतकालिक त्यांच्या पवित्र स्मृतीस अर्पण केलेले आहे.*

*गुरुवर्य ताटके यांच्या जन्मशताब्दीनिमित्ताने डॉ. सुलभा देऊस्कर यांनी पुणे विद्यापीठाच्या सहकार्याने राष्ट्रीय विज्ञान परिषद आयोजित केलेली होती. या चर्चासत्राला चांगला प्रतिसाद मिळाला. यातच त्याचे यश आहे.*

*वस्तुतः या वर्षी अनेक नामवंत, ख्यातनाम व्यक्ती हे जग सोडून गेल्या. अपार हानी करणारे वर्ष असेच या दृष्टीने म्हणावेसे वाटेल. ज्ञानव्रती दुर्गाबाई भागवत, उत्साही लेखिका शान्ता शेळके, मराठी काव्य जगतावर आपला वेगळा ठसा उमटविणारे वसंत बापट, ऐतिहासिक कादंबरीकार ना. सं. इनामदार, वगनाट्यकार वसंत सबनीस, अनुवादकार श्रीपाद जोशी, डॉ. शरदिनी डहाणूकर, डॉ. गं. ब. ग्रामोपाध्ये, चिंतामणी लागू, थोर गायक-संगीतकार सुधीर फडके यांच्या जाण्याने मराठीची हानी झालीच पण अकाली आणि आकस्मिकरीत्या शिवाजी सावंत आणि गौरी देशपांडे यांच्या निधनाने मराठी साहित्याला जबरदस्त हादरा दिला. रिलायन्सच्या धीरूभाई अंबानी यांच्या निधनाने औद्योगिक क्षेत्राची अपरिमित हानी झाली. या सर्वांपेक्षाही वंशाने भारतीय असलेल्या अंतराळवीर कल्पना चावला यांचे 'कोलंबिया' हे अंतराळ यान पृथ्वीवर उतरण्याच्या काही मिनिटे आधी स्फोट होऊन या भारतीय अंतराळवीर कन्येच्या मृत्यू झाला. या घटनेने सारे जग हादरले. मॉडर्न महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. एल. एच. गाडगीळसर यांचे दुःखद निधन झाले. महाविद्यालयाचा एक हुषार विद्यार्थी प्रीतम कटारिया याचे अपघाती निधन सर्वांच्याच हृदयाला चटका लावून गेले. या सर्वांना विनम्र श्रद्धांजली.*

*उल्लेखनीय कामगिरीत बंगळूरमध्ये काम करणाऱ्या डॉ. ज्योती घोष या भारतीय डॉक्टरांना, मधुमेहामुळे होणारे विविध आजार आणि मृत्यूचे प्रमाण कमी करण्यासाठी एक संयुक्त उपचार पद्धती निर्माण केल्याबद्दल अमेरिकेचा पाच लाख डॉलर्सचा पुरस्कार जाहीर झाला. वैद्यकशास्त्रात हा पुरस्कार नोबेल पारितोषिकाखालोखाल समजला जातो. ही घटना प्रत्येक भारतीयाची मान उंचावणारी आहे.*

*हे नियतकालिक प्रकाशित करताना अनेकांची मदत झालेली आहे. नियतकालिक समितीच्या सर्व सदस्यांनी वेळोवेळी सहकार्य केले. प्राचार्यांनी वेळात वेळ काढून सातत्याने नियतकालिकाच्या कामाचा पाठपुरावा केला. त्यांचे मार्गदर्शन, सल्ला अतिशय मोलाचा लाभला याबद्दल मी त्यांचे कृतज्ञतापूर्वक आभार मानते.*

*नियतकालिकाचे मुद्रण कमीतकमी वेळात करून दिल्याबद्दल शिवानी प्रिंटर्सचे श्री. दीपक ढोले यांचे आणि आकर्षक मुखपृष्ठाबद्दल श्री. राजेंद्र गिरधारी यांचेही आभार.*

*नियतकालिकाचे कामकाज अतिशय घाई गडबडीत झालेले आहे ,त्यामुळे काही त्रुटी राहिल्या असल्यास संपादकांकडे उदार दृष्टिकोणाने पाहून अंकाचे स्वागत सर्वजण करतील अशी आशा आहे.*

**डॉ. स्नेहल तावरे**

# अनुक्रमणिका

## मराठी


| | |
|---|---|
| १) **भारताचा कोहिनूर : डॉ. अब्दुल कलाम** - ईश्वरी नांदेडकर, प्रथम वर्ष कला | ८ |
| २) **प्रवासिनी, ज्ञानव्रती दुर्गाबाई** - सुनीता मरळे, एम.ए., मराठी | १० |
| ३) **मुस्लीम जगतातील एक द्रष्टा : केमालपाशा** - स्मिता पाटील, तृतीय वर्ष कला | १३ |
| ४) **आदर्श व्यक्तिमत्त्वाची माझी कल्पना** - गजानन नेरकर, प्रथम वर्ष वाणिज्य | १६ |
| ५) **भारतीय ध्वजसंहिता** - दिनेश मुळे, द्वितीय वर्ष कला | १८ |
| ६) **हुतात्मा विष्णू गणेश पिंगळे** - रोहित आल्हाट, द्वितीय वर्ष कला | २० |
| ७) **एडस्-जगापुढील एक गंभीर समस्या** - मनीषा रासकर, द्वितीय वर्ष कला | २३ |
| ८) **'दहावी फ' परीक्षण** - रोशनी सुतार, प्रथम वर्ष कला | ३१ |
| ९) **असा हा 'प्रतिभा संगम'** - अर्चना देशपांडे, एम.ए., मराठी | ३३ |
| १०) **लोकशाही आणि महाविद्यालयातील तरुण** - संदीप गवते, द्वितीय वर्ष कला | ३५ |
| ११) **आजची मराठी भाषा आणि लेखन** - ज्योत्स्ना दरंदळे, एम. ए., मराठी | ३६ |
| १२) **छंद हवा जीवनात !** - मनीषा गांधी, १२ वी, कला | ३८ |
| १३) **महिलांनी महिलांसाठी चालविलेला उद्योग** - कांचन शिनगारे, द्वितीय वर्ष कला | ३९ |
| १४) **माझा आवडता साहित्यिक** - अश्विनी जाधव, प्रथम वर्ष कला | ४१ |
| १५) **सन २००२ : चमत्कारांचे वर्ष** - मिलिंद कांबळे, तृतीय वर्ष कला | ४३ |
| १६) **एक फास्ट मुलाखत** - मुग्धा लेले, प्रथम वर्ष कला | ४४ |
| १७) **मैत्री** - ज्योत्स्ना देडगे, प्रथम वर्ष कला | ४६ |
| १८) **विद्यार्थ्यांची गरज** - अश्विनी जाधव, प्रथम वर्ष कला | ४८ |
| १९) **पेराल तेच उगवेल** - दत्तात्रय आव्हाड, प्रथम वर्ष कला | ४९ |
| २०) **दिवा** - अर्चना मनगुळकर, प्रथम वर्ष शास्त्र | ४९ |
| २१) **दहा दिवस शिबिराचे** - हेमलता बलकवडे, द्वितीय वर्ष कला | ५० |

२२) **व्हॅलेंटाईन डे कशासाठी?** - सुनीता कांबळे, एम. ए., मराठी ५३
२३) **मी संतप्त का आहे?** - संगीता पवार, एम. ए. मराठी ५४
२४) **कलावंताचा आनंद** - मुग्धा लेले, प्रथम वर्ष कला ५६
२५) **दिवस असे की...** - आकाश राणे, तृतीय वर्ष कला ५७
२६) **रांझेगावची - एक शैक्षणिक सहल** - गौरी नेरकर व प्राची गुधाटे, द्वितीय वर्ष शास्त्र ६०
२७) **जीवन जगण्याची कला** - प्रा. एस. आर. आढाव, रसायनशास्त्र विभाग ६३
२८) **कै. वि. त्र्यं. ताटके - सव्यसाची संस्थाचालक** - प. स. चिरपुटकर, माजी प्राचार्य, मॉडर्न महाविद्यालय, पुणे-५ ६६

## काव्य

१) **जीवन** - लतिका चव्हाण, द्वितीय वर्ष शास्त्र ९
२) **रसायन** - लतिका मनोहर चव्हाण, द्वितीय वर्ष शास्त्र १२
३) **बाजूला सरक** - सचिन सोनटक्के, द्वितीय वर्ष कला १२
४) **स्वातंत्र्य** - नीलम कुलकर्णी, द्वितीय वर्ष शास्त्र १५
५) **आजचे समाजसेवक** - संजय चव्हाण, एम. ए., मराठी १७
६) **मैत्री - एक कोडं** - लतिका मनोहर चव्हाण, द्वितीय वर्ष शास्त्र १७
७) **अर्थ** - कांचन कुलकर्णी, प्रथम वर्ष वाणिज्य १९
८) **चारोळ्या** - लतिका मनोहर चव्हाण, द्वितीय वर्ष शास्त्र १९
९) **चारोळ्या** - आकाश राणे, तृतीय वर्ष साहित्य २२
१०) **तुझ्या मेमरीत डोकावताना** - राम पायाळ, तृतीय वर्ष कला २२
११) **राणी झाशीची** - संजय चव्हाण, एम. ए., मराठी २४
१२) **गमतीचे पत्र** - लतिका मनोहर चव्हाण, द्वितीय वर्ष शास्त्र ३२
१३) **गणित** - हेमांगी जावळे, द्वितीय वर्ष शास्त्र ३७
१४) **नवोदित लेखक** - सारिका कांबळे, प्रथम वर्ष कला ४०
१५) **तुझं माझं प्रेम** - मधुरा जोशी, तृतीय वर्ष वाणिज्य ४२
१६) **कातर वेळी** - अश्विनी मते, द्वितीय वर्ष वाणिज्य ४७

१७) **नाती** - स्मिता मिश्रा, एम. ए., इंग्रजी ५२
१८) **कसं करावं प्रेम** - अपर्णा जाधव, द्वितीय वर्ष शास्त्र ५३
१९) **अनुत्तरीत प्रश्न** - अर्चना देशपांडे, एम. ए., मराठी ५४
२०) **न तुटणारी मैत्री** - दीप्ती सांडभोर, प्रथम वर्ष वाणिज्य ५५
२१) **जीवनमंत्र दुःख हेच** - सुनीता कांबळे, एम. ए., मराठी ५६
२२) **विरह** - किरण माळशिकारे, एम. ए., मराठी ५७
२३) **मन** - वर्षा पवार, द्वितीय वर्ष वाणिज्य ५९

## हिन्दी

१) **शायरी** - सोनल खिंवसरा, तृतीय वर्ष वाणिज्य ३४
२) **राम नाम सत्य है ।** - अहमद बेग, प्रथम वर्ष वाणिज्य ५९

## English

1) Ethics in Scientific Experiments - Gauri Nerkar, S. Y. B. Sc. 24
2) What is a Life? - Hemangi Jawale, S. Y. B. Sc. 35
3) Behind My Compound - Smita K. Mishra, M. A. (Engg.) 40
4) What Is Friend? - Latika Chavan, S. Y. B. Sc. (A) 42
5) True Friendship - Latika Chavan, S. Y. B. Sc. (A) 47
6) Make Hay While the Sun Shines - Amrita Maitra, XI C 71
7) 'The Polar Star' And 'The Native of Universe' Kalpana Chawla - Richa U. Kale, F. Y. B. Sc. 71
8) The Legand of Dhirubhai Ambani - Gajanan Nerkar, F. Y. B. Com 73
9) Bill Gate - Varsha Jagtap, F. Y. B. Sc. 70
- **२००२-२००३ मधील कामगिरी** - गजानन नेरकर, प्रथम वर्ष वाणिज्य ७४
- **मॉडर्नच्या माजी विद्यार्थ्यांचे यश** ७५
- **वार्षिक अहवाल २००२-२००३** ७७
- **पदोन्नती** १५३
- **रौप्य महोत्सवी सेवा** १५३
- **सेवानिवृत्ती** १५३

# भारताचा कोहिनूर : डॉ. अब्दुल कलाम

ईश्वरी नांदेडकर, प्रथम वर्ष कला

**''कोण आहेस तू?**
**त्याच्या अस्तित्वाच्या**
**पहिल्याच दिवशी सूर्यानं त्याला प्रश्न केला.**
**त्यानं काहीच उत्तर दिलं नाही.**
**अतीव आत्मविश्वासानं तो चालत राहिला.**
**त्याच्या अस्तित्वाच्या अखेरीस पुन्हा**
**सूर्यानं त्याला तोच प्रश्न केला.**
**ठाम विश्वासानं तो उत्तरला,**
**मी स्वयंप्रकाशी, स्वयंभू आहे...**
**तुझ्याच सारखा !**
**सूर्यानं आपली सारी शस्त्रं खाली ठेवली**
**आणि तो त्याला शरण गेला...**
**मानवानं केलेला हा त्याचा**
**आणखी एक पराभव होता...'' (मैत्र)**

डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्यावर 'मैत्र' मध्ये आलेली ही कविता वाचून पुन्हा एकवार त्यांच्या उंचीची कल्पना आली. यापूर्वी त्यांचे 'अग्निपंख' हे आत्मचरित्र वाचल्यावरही अवकाश तंत्रज्ञान आणि संरक्षण क्षेत्रातील त्यांचे स्थान पाहून मी थक्क झाले होते.

तामिळनाडूमधील रामेश्वरम् या छोट्याशा धार्मिक गावात, एका अशिक्षित नावाड्याच्या पोटी सन १९३१ मध्ये जन्मलेला हा काळा-सावळा, लहान चणीचा मुलगा भारताचा भविष्यकाळ घडवेल असे कधी कोणाला वाटलेही नव्हते. पण त्याच्या जन्माच्या सामान्यतेपासून; तो मोठा होऊन आपल्या बुद्धीच्या तेजानं आणि कर्तृत्वाच्या प्रकाशानं संपूर्ण समाजाला दिपवतो, आकाशाला गवसणी घालतो; इथपर्यंतचा त्याचा जीवन इतिहास हा आजच्या गोंधळलेल्या, वाट चुकलेल्या, बावरलेल्या पिढीसाठी एक आव्हान तर आहेच पण त्याहीपेक्षा तो एक आदर्श आहे. ताणाखाली गेलेले बालपण, शाळेतील दिवस, फी भरण्यासाठी केलेली लहानसहान कामे या सर्व गोष्टी एका कथेप्रमाणे वाटल्या तरी याच कष्टांमुळे तर ते सामान्यत्वाकडून असामान्यत्वापर्यंत पोहोचू शकले. 'आयुष्यात यशस्वी होण्यासाठी व्यक्तीने इच्छा, तिचा ध्यास आणि ती पूर्ण होईल असा दृढविश्वास या तीन गोष्टींचा अवलंब केला पाहिजे.' हा त्यांच्या गुरूंचा कानमंत्र लक्षात ठेवूनच त्यांनी आपल्या ध्येयाच्या दिशेने वाटचाल केली.

एखाद्या सामान्य मुलाप्रमाणेच त्यांचे शिक्षण झाले. पण त्यांची जिज्ञासू वृत्ती, प्रत्येक गोष्टीकडे पाहण्याचा सकारात्मक दृष्टिकोण, आपल्या देशासाठी काहीतरी करण्याविषयीची तळमळ या सर्व गोष्टी त्यांना एका श्रेष्ठ पदावर घेऊन गेल्या. डॉ. अब्दुल कलामांनी स्व-कल्पकतेने बनवलेले 'नंदी' हे पहिले हॉवरक्राफ्ट होते. त्यानंतर त्यांनी SLU - 1,2,3, अग्नी, आकाश, पृथ्वी, त्रिशूल, नाग अशा जगप्रसिद्ध क्षेपणास्त्रांची जडणघडण केली. यात त्यांना अपयश आलेच नाही असे नाही, पण अपयशाबाबत त्यांचे मत होते की, ''चुकांमुळे, अपयशामुळेच आपण अधिक परिपूर्णतेकडे जाऊ शकतो.'' त्यांच्या कर्तृत्वाची पावती म्हणून पद्मभूषण, भारतरत्न यांसारख्या श्रेष्ठ पुरस्कारांबरोबरच २००२ साली त्यांना जगातील सर्वांत मोठी लोकशाही असणाऱ्या राष्ट्राचे राष्ट्रपती होण्याचा बहुमान मिळाला.

परंतु डॉ. अब्दुल कलामांचे कार्य हे या सर्वांपलीकडचे आहे. भारतीय बांधवांना जगात उच्च स्थान मिळताना पाहणे हेच त्यांच्या कार्याचे फलित असेल.

डॉ. कलामांचे विज्ञानविषयक विचार फार उद्‌बोधक आहेत. त्यांच्या मते, "वेळ आणि पैशांच्या मर्यादेत काही निर्माण करायचं असले तर पाय जमिनीवर ठेवावे लागतात." एकमेकांशी संवाद साधत जाणे हा तर त्यांचा मूलमंत्रच होता आणि म्हणूनच आपल्या प्रत्येक सहकाऱ्याच्या सूचनेचा ते आदर करत. आजच्या युवापिढीसाठी त्यांच्या डायरीतील पुढील ओळी फार उद्‌बोधक ठरतील-

"काळाच्या किनाऱ्यावर
आपल्या पाऊलखुणा उमटवायच्या असतील
तर फरफटत चालू नका..."

डॉ. अब्दुल कलामांची उंची फार मोठी आहे. परंतु ते अजूनही रामेश्वरम्‌मधीलच त्यांच्या सवंगड्यांत, वाळूतील शंख-शिंपल्यांच्या नक्षीमध्ये रमणारे आहेत. 'अग्निपंख' मध्ये ते म्हणतात,

"कामाने माझे दिवस व्यापले, रात्री मागितल्या. तरीही रामेश्वरम्‌च्या किनाऱ्याच्या स्मृती अजून माझ्या स्वप्नदृष्टीला झपाटून टाकताहेत!"

हे उद्‌गार वाचले की, या शिखर-व्यक्तिमत्त्वातील एका हळुवार माणसाचे अस्तित्व जाणवते. आणि मग अथर्ववेदातील त्या ओळी येथे खऱ्या झाल्यासारख्या वाटतात.

"ही पृथ्वी देवाची आहे.
हे अफाट, असीम आकाश त्याचेच आहे.
दोन्ही अमर्याद समुद्र त्याच्याच हृदयात शांत होतात
आणि तरीही, लहानश्या तळ्यातही तो असतो!"

★★

## जीवन

लतिका मनोहर चव्हाण, द्वितीय वर्ष शास्त्र

जीवन हे एक आव्हान आहे
सामोरे जाऊया.
जीवन हे एक साहस आहे
धाडस करूया.
जीवन हे एक ध्येय आहे
साध्य करूया.
जीवन हे एक दुःख आहे
विजय मिळवूया.
जीवन ही एक यात्रा आहे
पूर्ण करूया.
जीवन ही एक संधी आहे
साधूया.
जीवन ही एक देणगी आहे
स्वीकार करूया.
जीवन हा एक संघर्ष आहे
मात करूया.
जीवन हे एक गीत आहे
ते गात राहूया.
जीवन हे एक रहस्य आहे
ते उलगडूया.
जीवन हे एक कर्तव्य आहे
ते पार पाडूया.
जीवन हे एक कर्तव्य आहे
त्याची पूर्तता करूया.
जीवन हे एक सौंदर्य आहे
त्याची जोपासना करूया.

★★

# प्रवासिनी, ज्ञानव्रती दुर्गाबाई

**सुनीता अनिल मरळे,** एम.ए. मराठी (प्रथम वर्ष)

जीवनाकडे अपार कुतूहलाने पाहणाऱ्या दुर्गाबाई भागवत हे जग सोडून गेल्या. जीवनाविषयीच्या कुतूहलामुळेच त्यांची विविध रूपे आपल्यासमोर येत गेली होती. अनेकविध विषयांचा व्यासंग असलेली विदूषी, निसर्ग व मानवी संस्कृती यांच्यातील सुसंवादित्व व सौंदर्यदर्शन घडवू इच्छिणारी ललित लेखिका, आणीबाणीच्या अंधारलेल्या सामाजिक परिस्थितीत प्रकाशाचा दिवा बनलेल्या कणखर नागरिक, ही त्यांची सारीच रूपे लोभवणारी आहेत.

मानववंशशास्त्र, समाजशास्त्र, लोकसाहित्य, बौद्धसाहित्य, आदिवासी जीवनाच्या अभ्यासक, मानवी संस्कृतीच्या भाष्यकार, रेखीव व लालित्यपूर्ण शैलीच्या चौफेर व उदंड लेखन करणाऱ्या लेखिका, दीर्घ व्यासंगी, प्रवासिनी, ज्ञानव्रती, लोकशाहीच्या खंद्या पुरस्कर्त्या, विचारवंत, बहुभाषाकोविद, निर्भीड व्याख्यात्या अशा दुर्गा भागवत म्हणजे मराठी साहित्य विश्वातील एक स्वतंत्र, बाणेदार पण स्नेहमय व सहृद व्यक्तिमत्त्व.

साहित्यप्रेमी, तत्त्वनिष्ठ आणि निःस्पृह समजल्या जाणाऱ्या प्रसिद्ध भागवत घराण्यात त्यांचा जन्म १० फेब्रुवारी १९१० रोजी इंदूर येथे झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण मुंबईत झाले. नंतरचे शिक्षण नगर, नाशिक, धारवाड, पुणे येथे झाले. १९२७ मध्ये त्या मॅट्रिक झाल्या. मुंबईच्या सेंट झेवियर्स कॉलेजातून १९३२ मध्ये संस्कृत व इंग्रजी हे विषय घेऊन प्रथम वर्गात उत्तीर्ण झाल्या. मधले एक वर्ष राष्ट्रीय चळवळीत भाग घेतल्याने शिक्षण बाजूला ठेवले होते. त्यांनी बी.ए. चा पेपर संस्कृत भाषेतून लिहिला होता. एम.ए. साठी त्यांना अभ्यासवृत्तीही मिळाली होती. अध्ययनासाठी मुद्दामहून रूक्ष विषय निवडले होते. तर सुंदर म्हटल्या जाणाऱ्या विषयांत काहीतरी करता येईल या हेतूने एम.ए. साठी 'अर्ली बुद्धिस्ट ज्यूरिस्प्रूडन्स' हा विषय निवडला. पुढे १९३५ मध्ये डॉ. घुर्ये यांच्या मार्गदर्शनाखाली 'सिंथेसिस ऑफ हिंदू ट्रायबल कल्चर्स ऑफ सेंट्रल प्रॉव्हिन्सेस ऑफ इंडिया' हा प्रबंध लिहिला.

'साहित्य सहकार' चे १९५७ मध्ये संपादन व १९५८ ते ६० मध्ये 'गोखले इन्स्टिटयूट ऑफ इकॉनॉमिक्स अॅण्ड पॉलिटिक्स' या संस्थेत समाजशास्त्र विभागाच्या प्रमुख म्हणून केलेले काम वगळता दुर्गाबाई भागवतांची संपूर्ण कारकीर्द स्वतंत्रपणे, अविरत, संशोधनमग्न होऊन भ्रमंती करून केलेले लेखन यांनीच व्यापलेली आहे.

आदिवासी जीवनाच्या अभ्यासासाठी मध्य प्रदेश, विंध्य, सातपुडा या प्रदेशातून त्यांनी १९४० पासून पाच-सहा वर्षे भ्रमंती केली. १९४६ मध्ये एक विषारी सुरण कापल्याच्या निमित्ताने त्यांनी दीर्घकाळ रुग्णशय्येवर पडून राहावे लागले. त्या रुग्णशय्येवरच त्यांना ललितलेखन स्फुरले. निसर्गाच्या सगळ्या छटा बिछान्यावर पडून निरखता आल्या. रोज सृष्टीचा अभ्यास करता येऊ लागला आणि 'ऋतुचक्र' सारखे पुस्तक त्यातून निर्माण झाले. निसर्गाच्या प्रत्येक चरणावर इतके सूक्ष्म, अभ्यासपूर्ण आणि ललितरम्य लेखन असणारे 'ऋतुचक्र' हे पुस्तक म्हणजे मराठी साहित्यातील एक नितांत सुंदर रागमालिका म्हणावी लागेल.

दुर्गाबाईंच्या लेखनाचे अभ्यासू व ललित असे जे दोन भाग पडतात. त्या दोन्हींची सुरुवात त्यांच्या याच

आजारपणात झाली. डॉ. केतकरांच्या ग्रंथाचे 'हिंदुइझम ॲण्ड इटस् प्लेस इन द न्यू वर्ल्ड' या नावाने त्यांनी १९४७ मध्ये इंग्रजीत भाषांतर केले.

सानेगुरुजींच्या आग्रहावरून 'साधने' साठी 'वाळूतली पाऊले' हा लेख लिहिला होता. त्यांनी लिहिलेली गोड जीवनावरची नवालिका 'महानदीच्या तीरावर' त्यातील आकर्षक शब्दकलेसाठी प्रसिद्ध आहे.

१९३८ ते १९५३ या पहिल्या कालखंडात इंग्रजी, प्राचीन बौद्ध वाङ्मयाविषयी शुद्ध, शास्त्रीय लेखन त्यांनी केल्याचे आढळते. १९४० मध्ये त्यांनी लिहिलेले 'अे डायजेस्ट ऑफ कम्परेटिव्ह फिलॉसॉफी' हे भाषाशास्त्रावरील पुस्तक अद्वितीय आहे. मॅक्समुल्लर, गुणे, भांडारकर यांच्या भाषाशास्त्रातील कामगिरीचा आढावा घेणारे शहाऐंशी पानी पुस्तक आजही महत्त्वाचे आहे.

प्रसिद्ध विद्याव्रती व वडिलांचे चुलतमामा राजारामशास्त्री भागवत यांच्या लेखनाचे त्यांनी संपादित केलेले पाच खंड म्हणजे वैचारिक मेजवानी म्हणता येईल. १९५३ च्या नोव्हेंबर महिन्यात मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या गजेंद्र गडकर व्याख्यानमालेत लोकसाहित्यावर त्यांनी चार व्याख्याने दिली होती.

'ओल्ड डेक्कन डेज्' हा मेरी फ्रियर यांच्या पुस्तकाचा अनुवाद हा भारतीय साहित्याचा मोठा ठेवा मानला जातो.

दुसऱ्या टप्प्यात दुर्गाबाई ललितलेखनाकडे वळाल्या. अनुभव जसा घेतला तसाच आविष्कृत करायचा हे त्यांच्या लेखनाचे मुख्य सूत्र. सृष्टीच्या, मानवी संस्कृतीच्या आदिमतेशी जाऊन भिडणारे लेखन त्यांनी केले. सत्याबद्दलचा आग्रह व नवीन विषयांचा सातत्याने धांडोळा घेण्याची वृत्ती यामुळे त्यांचे लेखनही वैशिष्ट्यपूर्ण ठरत गेले. 'व्यासपर्व', 'भावमुद्रा', 'पैस', 'अस्वल', 'कदंब' ही त्यांच्या काही पुस्तकांची नावे सांगता येतील. पाश्चात्त्य साहित्यक्षेत्रातील दृक्प्रत्ययवादाची वैशिष्ट्ये दुर्गाबाईंच्या लेखनात दिसतात. काही अपारंपरिक व काही दैनंदिन अशा अनुभवांना त्या चैतन्यरूप देतात. मराठी लेखिकांच्या इतिहासात अशा लेखनाचा प्रवाह त्यांनीच प्रथम आणला. 'केतकरी कादंबरी', 'रूपरंग' ही सुद्धा त्यांची वैशिष्ट्यपूर्ण पुस्तके होत. प्रवास, भ्रमण, सूक्ष्म निरीक्षण, मानवतेवर नितांत श्रद्धा यांच्या जोडीला रेखीव समर्थ शैली ही दुर्गाबाईंची वैशिष्ट्ये म्हणता येतील.

बॉम्बे सेंट्रल व ग्रँट रोड स्टेशनच्या मध्ये असलेल्या गिल्डरलेनमधल्या जुन्या घरात वास्तव्य असलेल्या व नियमितपणे 'रॉयल एशियाटिक' च्या ग्रंथालयात जाऊन वाचन करणाऱ्या, साधी सुती साडी नेसणाऱ्या दुर्गाबाई अविवाहित होत्या. पाककला, शिवणकाम, भरतकाम यांचा नुसता छंद नव्हे, तर त्या अभ्यासक होत्या.

१९७५ च्या डिसेंबर महिन्यात कऱ्हाडला झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या त्या दुसऱ्या महिला अध्यक्षा होत्या. (पहिल्या कुसुमावती देशपांडे) त्या वेळी आणीबाणीची स्फोटक परिस्थिती असताना या शांत सरस्वतीने रणरागिणीचे रूप धारण केले होते. आणीबाणीच्या वेळी दुर्गाबाईंना अटक झाली होती. त्यांनी सात खंडांत लिहिलेल्या जातक कथांचे काही लेखन तुरूंगवासात केले. हा प्रकल्प करण्यास एक लाख रूपये खर्च आला व तो सरकारी अनुदानाशिवाय पुरा केला आहे. यात पूर्वजन्माच्या पाचशे अठ्ठेचाळीस कथांचा मूळ पाली भाषेतून अनुवाद केला आहे.

दुर्गाबाईंनी, विद्याव्यासंग केला. टिपण काढण्याची त्यांची खास पद्धत होती. चाळीस वर्षे सतत

अस्वलांवरील नोंदी त्या जमा करीत होत्या. प्राण्यांपासून माणसाने पाककलेची संथा घेतली, असा त्यांचा निष्कर्ष आहे. कदंबाच्या फुलापासून, भरतकामाच्या देशोदेशीच्या टाक्यांपर्यंत, अजिंठ्यातील चित्रापासून केतकरी कादंबरीपर्यंत विपुल चिंतनपर लेखन करणाऱ्या दुर्गाबाई भागवत म्हणतात,

"माझं स्वातंत्र्य म्हणजे माझ्या निर्माणशील दृष्टीचे स्वातंत्र्य. माझ्या जीवनसृष्टीचे स्वातंत्र्य." गांधीवादी तत्त्वज्ञानाच्या विशाल पार्श्वभूमीवर एकाकी वाटचाल करणाऱ्या दुर्गाबाईंच्या सतत संशोधनमग्न, विद्याव्यासंगाचे कंकण हाती बांधलेल्या, संस्कृतीचा शोध घेणाऱ्या आणि मानवतावादी भूमिकेशी एकनिष्ठ असणाऱ्या प्रदीर्घ जीवनाला भारतीय साहित्यसृष्टीत मोठ्या मानाचे स्थान आहे.

★★

## रसायन

**लतिका मनोहर चव्हाण**, द्वितीय वर्ष शास्त्र (अ)

प्रिय रसायन,

तुझ्या आठवणींनी माझे हृदय पाण्यात टाकलेल्या चुण्याप्रमाणे खदखदते आहे. प्रत्येक वेळी $O_2$ आत घेताना व $CO_2$ बाहेर टाकताना मला फक्त तुझीच आठवण येते. तुला हातात ठेवण्याचा कितीही प्रयत्न केला तरी तू हवेत उघड्या ठेवलेल्या Napthalene प्रमाणे उडून जातोस. तुझ्या विरहाने माझे हृदय Yellow Phosporous झाले आहे.

तुझीच

रसायनी

★★

## बाजूला सरक

**सचिन सोनटक्के**, द्वितीय वर्ष कला (अ)

एके दिवशी माझा मित्र
फारच खुशीत घरी आला
सारं घर डोक्यावर
घेऊन तो नाचू लागला
मी विचारले, काय झाले रे
तू एवढा खूश का झालास?
असे काय घडले की
तू नाचू लागलास
अनामिक हर्षाने
तो उद्‌गारला,
काय सांगू मित्रा !
मला आज ती बोलली
कॉलेज क्वीन बोलली
स्वतःहून बोलली
मी आश्चर्याचं प्रश्नचिन्ह
तोंडावर घेऊन विचारलं
ती बोलली खरं
पण काय बोलली?
थोडासा रडका चेहरा करून
हसरा ठेवायचा प्रयत्न करून
तरीसुद्धा आनंदातच म्हणाला,
"रस्त्यातनं बाजूला सरक" म्हणाली...

★★

# मुस्लीम जगतातील एक द्रष्टा - केमालपाशा

**स्मिता पाटील**, तृतीय वर्ष कला

पृथ्वीतलावर प्रत्येक मानव जीव जन्म घेतो तो कुठल्यातरी वंशात, धर्मात, देशात. त्यामुळे प्रत्येकाला आपापल्या धर्माचा अभिमान वाटतो. पण 'माणूस' म्हणून 'माणुसकी' या धर्माचा आपण कधीतरी अभिमान बाळगतो का? देशात हिंदू-मुस्लीम या दोन समूहांत तेढ आहे हे सर्वांना माहीत आहे. पण कोणत्याही गोष्टीचा अतिरेक होऊ न देणे हेच योग्य आहे. धर्माच्या नावाखाली शस्त्रे हातात घेऊन त्यात सांगितलेल्या गोष्टींचा अतिरेक करून आत्मघातकी पथके, दहशतवादी कारवाया अशा प्रकारची समाजविघातक कृत्ये घडून समाजाचा, देशाचा उत्कर्ष होण्याऐवजी या कारवायांमध्ये देशातील तरुण पिढी नाहीशी होत चालली आहे.

या तरुण पिढीला गरज आहे एका नेत्याची, जो त्यांना नवी दिशा देईल. त्यांच्यातील कल्पनाशक्ती, बुद्धिमत्ता यांच्या जोरावर राष्ट्राचा उत्कर्ष करून त्यांना योग्य मार्गदर्शन करेल. अशा प्रकारे वैज्ञानिक दृष्टिकोण देऊन सदसद्विवेक बुद्धीने मुस्लीम जगतातील तुर्कस्थानमधील नैराश्याच्या दरीत कोसळलेल्या जनतेला नवजीवन प्राप्त करून देणारा नेता म्हणून केमालपाशा ओळखला जातो. तुर्कस्थानचे पुनरुज्जीवन करून जुनाट, मागासलेल्या देशाचे अल्पकाळात एका आधुनिक व प्रगत राष्ट्रात परिवर्तन घडवून आणणाऱ्या या असामान्य कर्तृत्वाच्या नेत्याचा जन्म सन १८८१ मध्ये मध्यमवर्गीय कुटुंबात सॅलोनिका येथे झाला. वडील त्याच्या लहानपणीच वारल्यामुळे ते कुटुंब आर्थिक संकटाच्या भोवऱ्यात सापडले. तरीही लष्करी शिक्षणाची प्रथमपासून आवड असल्याने मुस्तफाने लष्करी शिक्षण घेतले. विद्यालयीन जीवनात त्याची प्रखर बुद्धिमत्ता, विशेषतः त्याचे गणित विषयातील वाखणण्याजोगे प्रावीण्य पाहून त्यांच्या प्राध्यापकाने त्यांना 'केमाल' (पूर्णत्व) ही पदवी दिली होती.

सन १९०३ मध्ये लष्करी शिक्षणानंतर त्याची तुर्की लष्करात कॅप्टनच्या पदावर नेमणूक झाली. अनेक नामवंत विचारवंतांच्या क्रांतिकारक गोष्टींनी युक्त असलेल्या वाङ्मयाची त्याला विशेष गोडी होती. देशभक्तीने भारलेल्या त्याच्या मनासमोर ध्येय होते ते परकीय वर्चस्वापासून मुक्त झालेल्या घटनात्मक शासन व्यवस्थेच्या व आंतरराष्ट्रीय क्षेत्रात प्रतिष्ठा प्राप्त झालेल्या तुर्कस्थानच्या निर्मितीचे. मुस्लीम जगतामध्ये वैज्ञानिक दृष्टिकोण ठेवून पुरोगामी सुधारणा करणारा एक प्रशासक म्हणून मुस्तफा केमालपाशा एक महत्त्वपूर्ण व्यक्ती ठरला होता.

सन १९१० मध्ये लष्करी व्यूहरचना, डावपेच व तंत्र यांचे शिक्षण घेण्याकरिता तो फ्रान्सला गेला. पॅरिसमधील मुक्कामात तेथील राजकीय हक्क, व्यक्तिस्वातंत्र्य, आर्थिक प्रगती इ. गोष्टींमुळे पाश्चात्त्य व पौर्वात्य जीवनातील तफावत त्याला विशेष प्रकर्षाने जाणवली. तुर्कस्थानमध्ये असलेल्या सुलतानशाहीविरुद्ध त्याच्या मनात मनस्वी चीड होती. सुलतानाने आपल्या अनियंत्रित सत्तेचा गैरवापर करून संपूर्ण तुर्कस्थानला आर्थिक, राजकीय व सामाजिकदृष्ट्या डबघाईस आणले होते.

सन १९२० मध्ये सेव्हर्सच्या तहाद्वारे दोस्त राष्ट्रांनी

तुर्कस्थानावर जाचक व अपमानास्पद अटी लादल्या. या तहाविरुध्द लोकमत निर्माण करण्याचे काम केमालपाशाने केले. त्याने 'तरुण तुर्क' क्रांती घडवून आणून तुर्क राष्ट्रवाद व अतिरेकी मुस्लीम धर्मप्रेम व निष्ठा या भावनांना आवाहन करून तुर्की जनतेत आत्मविश्वास व स्फुर्ती निर्माण केली. त्याच्या प्रयत्नांमुळे एका मध्यमयुगीन, मागासलेल्या, क्षमताशून्य व शक्तिहीन राष्ट्रातून तुर्कस्थानचे रूपांतर एका आधुनिक, सुसंघटित व प्रगत राष्ट्रात झाले. अंकारा येथे झालेल्या राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनामध्ये केमालपाशाने नवे सरकार स्थापन केले. याच वेळी त्याची राष्ट्राचा पहिला अध्यक्ष व लष्कराचा सरसेनापती म्हणून निवड झाली.

नव तुर्कस्थानच्या जीवनात जे विलक्षण आर्थिक, राजकीय व सामाजिक परिवर्तन घडून आले त्याचे बहुतांश श्रेय मुस्तफा केमालपाशाच्या गुणांना व दृढ निश्चयाला द्यावे लागेल. अत्यंत धैर्यशाली, कणखर मनोवृत्तीचा, ध्येयवादी, द्रष्टा परंतु त्याचबरोबर अत्यंत वास्तववादी असा तो नेता होता. तडजोडीच्या मार्गाने क्रांती किंवा परिवर्तन अल्प काळात घडून येत नाही हे सत्य लेनिनप्रमाणे त्यानेही जाणले होते. केमालने हुकूमशाही राबवली असा आरोप त्याच्यावर केला जातो पण ती हुकूमशाही लोककल्याणकारी होती. जणूकाही ती काळाची गरजच होती. राष्ट्राच्या पुनरुत्थानाकरिता हुकूमशाही पद्धतीचे मार्ग व यंत्रणा आणि मर्यादीत स्वरूपाची नियंत्रित भांडवलशाही उपयुक्त ठरेल अशी मुस्तफा केमालची खात्री होती म्हणून लोकशाही व्यवस्था हुकूमशाही मार्गाने अमलात आणण्याचे त्याने ठरवले.

झपाट्याने औद्योगिकरण घडवून आणून राष्ट्राला स्वावलंबी करणे हे कमालचे आर्थिक क्षेत्रातील प्रमुख ध्येय होते कारण आर्थिक स्वयंपूर्णतेशिवाय राजकीय स्वातंत्र्याला खरा अर्थ उरणार नाही किंवा ते पूर्णांशाने टिकवून धरता येणार नाही हे तो जाणून होता. वाढती चलनवृद्धी, बेकारांच्या संख्येतील वाढ, कारखान्यात मंदावलेले उत्पादन या प्रश्नातून मार्ग काढण्यासाठी त्याने शेती सुधारणांवर भर दिला. शेतकऱ्यांना आवश्यक स्वरूपाचा कर्जपुरवठा सरकारमार्फत करण्यात आला. त्याने बँकेचे जाळे सर्वत्र निर्माण केले. सन १९३२ पासून पंचवार्षिक योजना औद्योगिक विकासासाठी आखण्यात आल्या. या उपायांमुळे तुर्कस्थानच्या कृषी व औद्योगिक क्षेत्रात परिवर्तन घडून आर्थिक पाया मजबूत झाला.

युरोपच्या शतकानुशतकाच्या दुखणाईत माणसाला आरोग्यसंपन्न व शक्तिशाली करावयाचेअसेल तर त्याकरिता केवळ राजकीय व आर्थिक प्रगती पुरेशी ठरणार नाही तर त्याकरिता बौद्धिक प्रगती व मानसिक पुनरुत्थान हेही अत्यावश्यक असल्याची जाणीव केमालला झाली. कमकुवत राज्यकर्त्यालाच केवळ धर्माचा आश्रय घ्यावा लागतो असे त्याचे मत असल्याने तुर्कस्थानवरील इस्लाम धर्माचे परंपरागत वर्चस्व नाहीसे करण्याचा त्याने निश्चय केला होता.

इतर मागासलेल्या राष्ट्रांप्रमाणे तुर्कस्थानातही स्त्रीला समाजात स्वतंत्र अस्तित्वच नव्हते. पुरुषांच्या व समाजबंधनाच्या गुलामगिरीतच तिला खितपत पडावे लागे, परंतु केमालच्या प्रभावी व कणखर नेतृत्वाखाली तुर्की स्त्रीजीवन उजळून निघाले. जीवनाची सर्व दारे तिच्याकरिता खुली झाली. स्त्रीला निवडणूक लढविण्याचा, घटस्फोटासंबंधी, वारसा हक्कासंबधी आधिकार देण्यात आले. तुर्की स्त्रीच्या दास्यत्वाचे प्रतीक असलेली पडदा पद्धत बंद करण्यात आली. सर्व स्त्री-पुरुषांना पाश्चात्त्य पद्धतीचा पेहराव सक्तीचा करण्यात आला.

सामाजिक क्षेत्राबरोबरच शिक्षण क्षेत्रातही त्याने परिवर्तन घडवून आणले. राज्याची सूत्रे हाती आल्यावर शिक्षण संस्थांवरील उलेमाचे (मुस्लीम धर्मगुरूचे) वर्चस्व कमी केले. पाश्चात्त्य शिक्षण पद्धतीवर आधारित शाळा सुरू करण्यात आल्या. प्राथमिक शिक्षण सर्व मुलामुलींकरिता सक्तीचे करण्यात आले. तांत्रिक व वैज्ञानिक शिक्षण देण्यासाठी परदेशातून शिक्षणतज्ज्ञ आणले. त्याचबरोबर सुलतानाच्या काळात भ्रष्ट झालेली सरकारी यंत्रणा बंद करून भ्रष्ट अधिकाऱ्यांना नोकरीवरून काढून टाकण्यात आले.

अशा प्रकारे केमालच्या नेतृत्वाखाली एका साम्राज्याचा अंत होऊन त्याऐवजी एक नवे राष्ट्र जन्माला आले. त्याने आपल्या शेजारी राष्ट्रांशी सलोख्याचे व मित्रत्वाचे संबध प्रस्थापित करून आंतरराष्ट्रीय क्षेत्रात आपली स्थिती बळकट केली. त्याच्या या महान कार्यामुळे व सुधारणेमुळे तुर्कस्थानच्या राष्ट्रीय सभेने त्याला 'अतातुर्क' ही सन्मानाची पदवी बहाल केली. असा हा 'तुर्कांचा पिता' म्हणून ओळखला जाणारा नेता १० नोव्हेंबर १९३२ रोजी कालवश झाला.

अशा प्रकारे मुस्लीम जगतातील एक महान द्रष्ट्याचा अंत झाला. पण त्याचे कार्य मात्र काळाच्या पुढे ठरले. त्याच्या मृत्यूनंतर मुस्लीम धर्मांधतेने पुन्हा तेथे प्रवेश केला. पण त्याने केलेल्या सुधारणांमुळे तुर्कस्थानची झालेली प्रगती नजरेआड करता येणार नाही. त्याचे उदाहरण अन्य राष्ट्रांनी डोळ्यांसमोर ठेवले तर खऱ्या अर्थाने जग 'हे विश्वची माझे घर' निर्माण होऊ शकेल.

★★

# स्वातंत्र्य

नीलम बा. कुलकर्णी, द्वितीय वर्ष शास्त्र (अ)

इंग्रजांची गुलामगिरी करता करता
हात थकून गेले
देशाच्या स्वातंत्र्यासाठी
प्राणास मुकून गेले
स्वातंत्र्यवीर आले,
तेही गेले
महात्मा गांधींनी
चळवळीस पुढे नेले
शेवटी सर्वांच्या प्रयत्नाने
भारताला स्वातंत्र्य मिळाले
परंतु स्वातंत्र्यानंतरही,
गरीब दरिद्रीच राहिले
भ्रष्टाचाराच्या त्रासातून
एकाने सटकू पाहिले
पाहून त्या दुर्दैवाचे,
खालच्यांनी पाय ओढले
अशा या समाजाची
काय सांगावी गाथा
स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही,
गरीब पिटतो माथा
पुढे इंग्रजांच्या अधिकारावर
आपलेच नेते आले
याच नेत्यांच्या अधिपत्याखाली
गरीब पुन्हा अडकले
अशी सत्ताधिकाऱ्याची
बदलली जागा
पण गुलामगिरी करणाऱ्याची
नाही बदलली जागा
स्वातंत्र्याची खरी व्याख्या
विसरले सारे
स्वातंत्र्यातही पारतंत्र्य
भोगत आहेत बिचारे

★★

# आदर्श व्यक्तिमत्त्वाची माझी कल्पना

गजानन अरविंद नेरकर, प्रथम वर्ष वाणिज्य

व्यक्तिमत्त्व म्हटले की सुंदर रंगरूपाचा विचार मनामध्ये येतो. परंतु बाह्यरंगापेक्षा अंतरंगाने व्यक्तिमत्त्व खुलते. म्हणून चांगल्या दिसण्याबरोबर चांगले असणे महत्त्वाचे ठरते. व्यक्तिमत्त्वामध्ये सद्गुण, सदाचार हे आदर्श निर्माण होतात. आदर्श व्यक्तिमत्त्व म्हणजे सर्वगुणसंपन्न व्यक्तिमत्त्व होय.

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात की, 'इवलेसे रोप लावियेले द्वारी । तयाचा वेलू गेला गगनावरी । मला असे वाटते की,माणसाचे व्यक्तिमत्त्व हे देखील एक इवलेसे रोपच आहे. ज्याप्रमाणे एखादे रोप पाणी व माती मिळाल्याने खुलत आणि बहरत जाते त्याप्रमाणेच माणसाचे व्यक्तिमत्त्व आयुष्यातील सुखद व दुःखद प्रसंगांना सामोरे जात असताना सुगंधित होत जाते.

'अहम् ब्रह्मास्मी' अर्थात मी ब्रह्म आहे असे फक्त भगवान श्रीकृष्णच म्हणू शकतात असे मला वाटते. एखादा सामान्य माणूस असे कधीच म्हणू शकणार नाही. कारण माणसाचे व्यक्तिमत्त्व केवळ सद्गुणांनीच नव्हे तर दुर्गुणांनीसुद्धा भरलेले असते.

आपण आदर्श व्यक्तिमत्त्वाचा विचार करतो तेव्हा आपल्यासमोर एक प्रामाणिक, सुशील, चारित्र्यवान आणि कर्तव्यनिष्ठ व्यक्ती येते. आदर्श व्यक्ती कधीच कोणाला फसवत नाही. शील व चारित्र्य या गुणांची जोपासना करत असताना ती व्यक्ती आपल्या कर्तव्याप्रती निष्ठा बाळगते.

आदर्श व अभ्यासू व्यक्तीला मात्र 'ज्ञानाचे व्यसन' असते. ती व्यक्ती अतिशय प्रेमळ असते व कोणावरही राग धरत नाही. ती नेहमी सत्याबद्दल नितांत श्रद्धा बाळगून सन्मार्गावर चालते.

आदर्श व्यक्ती ही मितभाषी असते, पण मुखदुर्बल मुळीच नाही. ती ठामपणे आपले मत मांडते. एखाद्या आदर्श व्यक्तीला शारीरिकच नव्हे तर मानसिक सौंदर्याचे तितकेच महत्त्व वाटते. आदर्श व्यक्तीमधील सद्गुणांचे तसेच इतर कलांचे दर्शन आपल्याला नित्य घडत असते.

आदर्श व्यक्तीमध्ये अपरंपार ज्ञान असल्याने अनुभव नेहमी वाढतच जातो व विचारांमध्ये, आचारांमध्ये प्रगल्भता येते. तिच्या संगती व सवयी चांगल्या असतात. अशा प्रकारे आदर्श व्यक्ती ही केवळ एक चांगला वक्ताच नसून एक चांगला श्रोतादेखील असते.

'जन्मा येणे दैवा हाती। करणी मग हासवी ॥' माणसाचा जन्म हा दैवाच्या हाती असतो. पण आदर्श व्यक्तिमत्त्व हे केवळ त्या माणसाच्या सत्कर्मांनी तसेच सद्गुणांनीच घडते. म्हणूनच एकाच आदर्श व्यक्तिमत्त्वात आपल्याला अनेक चांगल्या गोष्टींची प्रचिती येते.

आदर्श व्यक्ती ही कामाच्या दर्जाला नाही तर काम करण्याला महत्त्व देते. तिच्या पोशाखात साधेपणा असल्यामुळे विचारसरणी उच्च असते. धैर्य व परमेश्वरावर विश्वास आणि श्रद्धा असल्यामुळे कोणत्याही कठीण प्रसंगाला ती समर्थपणे तोंड देते.

आदर्श व्यक्तिमत्त्वाला आपल्या ज्ञानाचा अभिमान असतो पण अहंकार कदापि नसतो. 'मान हा मागून मिळत नसतो तो मिळवावा लागतो'. एखादे आदर्श व्यक्तिमत्त्व धनाने श्रीमंत नसेल पण बुद्धी व चातुर्याने नक्कीच श्रीमंत असते.

दिसण्यापेक्षा असण्याला जास्त महत्त्व असते. म्हणूनच एखादी अष्टपैलू किंवा आदर्श व्यक्ती सर्वांमध्ये उठून दिसते. माणूस शिकला तर तो 'शिक्षित' होतो पण संस्कारांनी तो 'सुशिक्षित' होतो याची प्रचिती आपल्याला फक्त आदर्श व्यक्तीमध्येच येते.

सोप्या शब्दांत सांगायचे झाले तर 'मुळातच असलेल्या गुणांचा आविष्कार घडवणे म्हणजेच आदर्श व्यक्तिमत्त्व.'

माणूस 'किती' जगला यापेक्षा तो कसा 'जगला' याला जास्त महत्त्व आहे.

आदर्श व्यक्तीसुद्धा आपल्या आचार, विचार व उच्चारांनी सर्वांचे जीवन सुगंधित करीत असते. 'आदर्श व्यक्तिमत्त्व' हे अतिविशाल हिमालयाचे शिखर आहे. ते प्रत्येकाला गाठणे शक्य नाही.

★★

## आजचे समाजसेवक

**संजय चव्हाण, एम.ए.(मराठी)**

समाजाविषयीची होती कळकळ यांना
टिळक, आगरकर, फुले आदिंना
फिरतात आजचे समाजसेवक वातानुकूलित गाडीतून
संरक्षण मिळते त्यांना पोलिसांकडून
असतात यांचे अंगरक्षक बंदूकधारी
तुमचा आमचा मात्र बॉम्बस्फोटाला बळी
स्वतंत्र भारताचा स्वतंत्र नागरिक
म्हणण्यास वाटते मला लाज
कधी काय घडेल ते सांगता येणार नाही आज.

★★

## मैत्री - एक कोडं

**लतिका मनोहर चव्हाण, द्वितीय वर्ष शास्त्र (अ)**

मैत्री कोणाशी होते?
का होते?
हे सांगता येत नाही.
मैत्री म्हणजे काय असते?
हे ही सांगता येत नाही.
मैत्री असावी अथांग
सागरासारखी.
नसावी फेसाळ लाटेप्रमाणे,
विरुन जाणारी
मैत्री असावी निर्मळ
द्रवासारखी
नसावा तिला स्वार्थाचा लवलेश
मैत्री असावी मंदिराच्या
गाभाऱ्यासारखी
नसावी एखाद्या
धर्मशाळेसारखी
मैत्री असावी अमृतासारखी
जिने आपली जिणे अमर होईल
मैत्री असावी मैत्रीसारखी
नसावी आज एकाबरोबर
उद्या दुसऱ्याबरोबर

★★

# भारतीय ध्वजसंहिता

दिनेश दिलीप मुळे, द्वितीय वर्ष कला

स्वातंत्र्यदिन, प्रजासत्ताक दिन अशा राष्ट्रीय उत्सवांच्या प्रसंगी राष्ट्रध्वज ठिकठिकाणी लावले जातात. परंतु दुर्दैवाने असे आढळते की, राष्ट्रध्वजाचा मान कसा राखायचा हे अनेकांना माहीत नसते. त्यामुळे अनाहूतपणे राष्ट्रध्वजाचा अवमान होण्याची शक्यता असते.

असे होऊ नये म्हणून या संबंधी संकलित केलेली माहिती या लेखात मुद्दाम देत आहे. वाचकांनी या माहितीचा उपयोग करावा ही विनंती.

सामान्य भारतीय नागरिकांच्या माहितीसाठी भारत सरकारच्या गृहमंत्रालयाच्या ध्वजसंहितेतील निवडक माहिती दिलेली आहे.

राष्ट्रध्वज हे राष्ट्राचे मानचिन्ह आहे. त्याचा मान राखणे हे राष्ट्राच्या प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे.

**ध्वज लावण्याची पध्दत :-**

१. ध्वज उच्च स्थळी व स्पष्टपणे दिसेल अशा रीतीने लावावा.
२. ध्वज सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत लावावा.
३. ध्वजारोहणाच्या वेळी ध्वज झर्रकन (पटकन) वर चढवावा. उतरवताना मात्र विधीपूर्वक उतरवण्यात यावा.
४. ध्वजाची केशरी बाजू काठीच्या टोकाकडे असावी. वरच्या टोकावर फुले किंवा हार लावू नये.

**ध्वजाचा प्रमाणित आकार :**

६,३०० मि. मी. x ४,२०० मि. मी.
३,६०० मि. मी. x २,४०० मि.मी.
२,७०० मि. मी. x १,८०० मि. मी.
१,८०० मि. मी. x १,२०० मि. मी.
१,३५० मि. मी. x ९०० मि. मी.
९०० मि. मी. x ६०० मि. मी.
४५० मि. मी. x ३०० मि. मी.
२२५ मि. मी. x १५० मि. मी.
१५० मि. मी. x १०० मि. मी.

थोडक्यात, ध्वजाचा प्रमाणित आकार ३:२ असा आहे.

**देशभर खालील दिवशी राष्ट्रीय ध्वज उभारता येतो:-**

१) प्रजासत्ताक दिन
२) राष्ट्रीय सप्ताह : ६ एप्रिल ते १३ एप्रिल; जालियनवाला बागेतील हुतात्म्यांच्या स्मरणार्थ
३) स्वातंत्र्य दिन
४) गांधी जयंती
५) तसेच, राज्याच्या वर्धापन दिनी राज्यात राष्ट्रध्वज उभारण्यास कोणतेही बंधने नसतील. (महाराष्ट्र दिन - १ मे)

**ध्वजाचा असा वापर करू नये :-**

१) फाटलेला अथवा चुरगाळलेला ध्वज लावू नये.
२) दुसरा कोणताही ध्वज राष्ट्रध्वजाच्या वरच्या बाजूस, राष्ट्रध्वजावर अथवा राष्ट्रध्वजापुढे लावू नये.
३) तोरण, गुच्छ किंवा पताका म्हणून किंवा शोभेसाठी ध्वजाचा कोणत्याही प्रकारे उपयोग करू नये.
४) ध्वजाचा आच्छादन, पिशवी, पडदा म्हणून वापर करू नये. क्रिकेट मॅचमध्ये आच्छादन म्हणून याचा वापर करतात हे चुकीचे आहे.
५) ध्वजाचा स्पर्श जमिनीस होऊ देऊ नये अथवा तो पाण्यावरून फरफटत नेऊ नये.
६) ध्वज फाटेल अशा प्रकारे फडकवू नये किंवा बांधू नये.

७) पोशाखाचा भाग म्हणून तसेच हातरुमाल म्हणून वापरू नये.

८) ध्वजावर कोणत्याही प्रकारची अक्षरे लिहू नयेत.

९) जाहिरातीच्या कोणत्याही स्वरूपात ध्वजाचा वापर करू नये किंवा ध्वज स्तंभाचा जाहिरात लावण्यासाठी म्हणूनही वापर करू नये.

१०) ध्वज फाटला असता अथवा खराब झाल्यास तो कोठेही फेकून न देता किंवा त्याचा अवमान होईल अशा रीतीनें विल्हेवाट लावू नये.

खाजगीरित्या (वैयक्तिक) एकतर जाळून किंवा त्याचा मान राखला जाईल अशा प्रकारे संपूर्ण नष्ट करावा.

'अशोक चक्रांकित ध्वज ही राष्ट्राची देवता.'

माहितीसाठी आधार : भारतीय ध्वजसंहिता, उतिष्ठत जाग्रत ही पुस्तके.

★★

## अर्थ

कांचन कुलकर्णी, प्रथम वर्ष वाणिज्य (क)

या जीवनामध्ये
या जगामध्ये

प्रत्येक गोष्टीचा
प्रत्येक कृतीचा

शोधतो मानव हा अर्थ
परंतु, त्याचा शोधच व्यर्थ

काही वेळेस सापडतो त्यास अर्थ
पण मग आड येतो त्याचा स्वार्थ

★★

## चारोळ्या

लतिका चव्हाण, द्वितीय वर्ष शास्त्र

तिलाही काही सांगायचे असते,
त्यालाही काही बोलायचे असते,
शब्द मिळतात तोपर्यंत
रिसेस संपून गेलेली असते.

अचानक दोघे समोरासमोर आले,
नजरेला नजर भिडली,
त्याच वेळी त्याची नजर,
तिच्या गळ्यातील 'मंगळसूत्रावर' पडली.

त्याने तिला पाहिली मात्र,
स्वारी तिच्यावर फिदा झाली.
त्याच दिवशी त्याच्या हाती,
तिच्या लग्नाची पत्रिका आली.

'व्हॅलेण्टाइन डे' नंतर 'मदर डे' आहे,
'मदर डे' नंतर 'फॅमिली डे' आहे.
थोडक्यात 'डे टू डे' लाईफमध्ये,
'डे' चे महत्त्व वाढत आहे.

'रोझ डे' ला गुलाब घेऊन तो,
मोठ्या उत्साहात कॉलेजला आला,
त्या दिवशी ती आलीच नाही,
गुलाब हातातच सुकून गेला.

ती वर्गात शिरता क्षणी
त्याने जोरदार शिटी मारली
दुसऱ्याच क्षणी तिने
त्याच्या कानाखाली मारली.

★★

# हुतात्मा विष्णू गणेश पिंगळे

**रोहित आल्हाट, द्वितीय वर्ष कला (क)**

आपल्यापैकी फारच थोडे लोक स्वातंत्र्यासाठी बलिदान दिलेल्या क्रांतिकारकांविषयी माहिती ठेवतात. ही अतिशय दुर्दैवाची गोष्ट आहे.

भगतसिंगांसारख्या थोर क्रांतिकारकाने ज्या पिंगळे यांच्या हौतात्म्यातून क्रांतिकार्याची प्रेरणा घेतली ते हेच महाराष्ट्रातील थोर क्रांतिकारक 'हुतात्मा विष्णू गणेश पिंगळे.' पण इतर क्रांतिकारकांप्रमाणे आज त्यांचे स्मरण होत नाही ही एक लज्जास्पद बाब म्हणावी लागेल.

सुभाषचंद्र बोस यांच्या 'आझाद हिंद सेनेच्या' अंतिम प्रयत्नाचे मूळ हे हुतात्मा विष्णू गणेश पिंगळ्यांच्या सशस्त्र बंडाच्या प्रयत्नात होते. अशा या राष्ट्रभक्ताविषयी ऐकाल तेवढे थोडेच आहे.

विष्णू गणेश ऊर्फ बाबुराव यांचा जन्म २ जानेवारी १८८९ साली शिरूर तालुक्यातील तळेगाव ढमढेरे या गावी झाला. चौथीपर्यंतचे शिक्षण त्यांनी तेथेच राहून घेतले. त्यांच्या वडिलांचे नाव गणेशपंत तर आईचे नाव सरस्वती होते. या व्यतिरिक्त दोन बहिणी व दोन मोठे भाऊदेखील होते. छोट्या विष्णूवर घरातील प्रत्येकाचे अतोनात प्रेम होते. त्यामुळे कोणत्याही क्षणी आईवडिलांना तो आपल्या नजरेपासून दूर नको होता. अशातच विष्णूला उच्च शिक्षणासाठी अमेरिकेला जाण्याची तीव्र इच्छा होती. शिक्षणानिमित्त सन १९११ साली तो 'तोसोमारू' या जहाजाने अमेरिकेस गेला.

आपल्या राष्ट्राविषयी त्याला कळकळ वाटे. आपला हिंदुस्थान स्वतंत्र व्हावा, विज्ञाननिष्ठ व्हावा असे त्याला वाटे. अमेरिकेत शिक्षणासाठी लागणारा पैसा तो पडेल ते काम करून जमा करीत असे. अशा वेळी तेथील रहिवाशांची दुष्ट वागणूकही त्याला सहन करावी लागली. 'ब्लडी इंडियन्स' हा शब्द दिवसातून कित्येक वेळा त्याच्या कानी पडे. असे अपशब्द ऐकून तो चवताळून उठे पण अजून त्याला आपले शिक्षण पूर्ण करायचे होते. अशा वातावरणातच त्याच्या मनात देशाच्या स्वातंत्र्याविषयी लालसा उत्पन्न झाली. याच काळात त्याने सदाशिव खानखोजे, सुरेंद्रमोहन बोस, पं. काशिराम कोषाध्यक्ष, हरदयाळ अशा अनेक क्रांतिकारी मंडळींशी जवळीक साधली. या सर्वांनी मिळून 'वॉशिंग्टन' येथे 'इंडियन इंडिपेंडन्स लीग' म्हणजेच 'गदर' संघटना स्थापन केली. अशा प्रकारे शिक्षणासाठी आलेला विष्णू देशासाठी सर्वस्वाची आहुती देण्याची शपथ खाऊ लागला. क्रांतीसाठी आवश्यक असलेल्या शिक्षणास सुरुवात झाली. या संघटनेचे गुप्त व्यवहार महाराष्ट्रातील क्रांतिकारी संघटनांशी चालू लागले.

विष्णू स्फोटकांच्या निर्मितीत रस घेऊ लागला. तसेच यंत्रशाळा, वाहतूक व्यवस्था, संदेशवहन, खंदक खोदणे, पूल व इमारती सुरूंगाने उडविणे याचेही शिक्षण घेत गेला. या संघटनेला अरविंद घोषांची चांगलीच मदत मिळाली. विष्णू आपल्या तिखट लेखणीतून इंग्रजांविषयीचा क्रोध वृत्तपत्रांमार्फत अमेरिकेतील हिंदू जनतेत पसरवू लागला.

**पाहिजेत !**

हिंदुस्थानात बंड पसरविण्यासाठी निर्भय, धैर्यसंपन्न सैनिक पाहिजेत !

वेतन -मृत्यू

पारितोषिक -हौतात्म्य व स्वातंत्र्य

स्थळ - हिंदुस्थानचे रणक्षेत्र

अशा रक्त उसळविणाऱ्या जाहिराती बनवून तो क्रांतीसाठी तरुणवर्ग जमवू लागला. विष्णूच्या या कार्याने प्रभावित होऊन 'गदर' संघटनेत विष्णूला महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले होते.

स्वातंत्र्य कार्यात विष्णू इतका मग्न झाला होता की आपल्या घरच्या लोकांची दखल घेण्यास तो कसाबसा वेळ काढून पत्र पाठवत असे. विष्णूच्या पत्रांबरोबरच काही गुप्त खबरी व शस्त्रास्त्रेही हिंदुस्थानात जाऊ लागली होती. आता विष्णू हिंदुस्थानात जाऊन ब्रिटिशांना हादरवून सोडण्यास उत्सुक झाला होता. २० नोव्हेंबर १९१४ रोजी विष्णू गुप्त मार्गाने हिंदुस्थानात येऊन रासबिहारी बोस यांना भेटला. बंगालमधील क्रांतीची सूत्रे आपल्या हाती घेतली. निर्भीड विष्णू हिंदुस्थानात सर्वत्र वेषांतर करून हिंडत होता. त्याला हिंदी, इंग्रजी, मराठी, पंजाबी, बंगाली, गुजराती अशा विविध भाषा अवगत होत्या. हिंदुस्थानात आल्यानंतर त्याने अनेक ठिकाणी स्फोट घडवून आणले. आता क्रांतिकारी संघटनांना स्फोटकांचा मोठ्या प्रमाणावर पुरवठा होऊ लागला. ब्रिटिश सरकारला विष्णू पिंगळे या क्रांतिकारकाने चांगलाच धसका दिला होता. अशा विविध घटना घडूनही विष्णू ब्रिटिशांच्या हाती लागत नव्हता. वेषांतर करून येणारा हा बहुरूपी अचानक समोर येऊन ब्रिटिश अधिकाऱ्यांचे मुडदे पाडत असे. आता क्रांतिकारकांच्या कारवाया विष्णूच्या योजनेनुसार होऊ लागल्या. त्याच्या योजनांनुसार क्रांतिकारकांनी अनेक यशस्वी मोहिमा घडवून आणल्या.

एका फितुराच्या सांगण्यावरून मीरत येथील घोडदळाच्या सैनिकी वसाहतीत विष्णू लपून बसला. अखेर २३ मार्च १९१५ रोजी 'श्यामलाल' नाव धारण करून राहिलेल्या विष्णूला ब्रिटिशांनी पकडले. तेव्हा विष्णूजवळील झडतीत अठरा मोठे बॉम्ब, पिस्तुले, स्फोटके बनविण्याची द्रव्ये अशा अनेक स्फोटक वस्तू मिळाल्या. त्यांच्या अटकेला एका सोबत्याची फितुरी कारणीभूत ठरली. त्या छावणीत विष्णूला भेटायला येणाऱ्या साथीदारांनाही अटक झाली. त्यांच्या अटकेची बातमी कळताच क्रांतिकारी संघटनांमध्ये खळबळ माजली. कारण क्रांतिकारी मैफलीतील महत्त्वाचा वजीर इंग्रजांच्या हाती लागला होता. क्रांतिकारी संघटनांची सर्व माहिती असतानाही विष्णूने एक अक्षरही ब्रिटिशांना सांगितले नाही. हेच कारण त्याच्या फाशीला कारणीभूत ठरले. त्याचे काही सोबती माफीचे साक्षीदार झाले.

विष्णूला फाशी होणार ही बातमी चोहूकडे पसरली. फाशी देण्यापेक्षा त्याला जन्मठेप अथवा काळ्यापाण्याची शिक्षा देणे योग्य होते. पण विष्णूला फाशी देऊन इतर क्रांतिकारकांवर वचक बसवण्याचा ब्रिटिश सरकारचा उद्देश होता.

मंगळवार दि. १६ नोव्हेंबर १९१५ च्या पहाटे विष्णू पिंगळ्यांना फाशी देण्यात आले. क्रांतीचे सूर्यतेज मावळले. त्या वेळी शेवटची इच्छा म्हणून त्याने देवाजवळ प्रार्थना केली की, "हे देवा, मी या देशासाठी केलेल्या पवित्र कार्यामध्ये तू मला जी मदत केली आहेस त्याबद्दल मी तुझा शतशः आभारी आहे. मी माझ्या प्राणांचे बलिदान करीत आहे. त्या बदल्यात माझ्या मातृभूमीला स्वातंत्र्य मिळवून देण्याचे कार्य तुझ्या हाती सोपवत आहे. ते तू नक्की करशील असा माझा विश्वास आहे. या माझ्या चैतन्यमयी जीवनाचा तुला अखेरचा प्रणाम !" असे म्हणून विष्णूने फास हसत हसत आपल्या गळ्यात घातला. आणि 'वंदे मातरम !', ' भारत माता की जय !' असा जयघोष करीत आपला देह मृत्यूच्या खोल दरीत झोकावून दिला. विष्णू हुतात्मा झाला.

हुतात्मा विष्णू पिंगळ्यांची फाशी साधारण फाशी

नव्हती तर जीव हातावर घेऊन ब्रिटिश सरकारला मातीत मिळविणाऱ्या एका धाडसी रणसिंहाची फाशी होती.

क्रांतिक्षेत्रात झुंज देऊन ब्रिटिश सत्तेला हादरा देणारे असे विष्णू गणेश पिंगळे हे स्वातंत्र्यवीर सावरकरांनंतर महाराष्ट्रात झालेले एकमेव 'क्रांतिरत्न' होते. स्वातंत्र्य हाच त्यांचा ध्यास होता. स्वातंत्र्य हाच त्यांचा श्वास होता. हुतात्मा होण्याअगोदर उर्वरित क्रांतिकार्य आपल्या साथीदारांवर सोपवून हे सूर्यतेज अनंतात विलीन झाले. कृष्णदेखील विष्णूचाच अवतार होता पण विष्णू पिंगळ्यांना मिळालेले अमरत्व हे त्यांनी स्वातंत्र्यासाठी पत्करलेल्या हौतात्म्यातून प्राप्त झाले होते. आजही त्यांचा वारसा जपून असलेल्या तळेगाव ढमढेरे या गावी गेल्यावर तरुणाईत अफाट शौर्य गाजविणारी व्यक्ती आपले बालपण कसे जगली असेल? असा प्रश्न मनात आल्याखेरीज राहत नाही.

अशा या थोर क्रांतिसूर्याचे जीवन म्हणजे एक क्रांतियुद्धच होते असे म्हणायला काही हरकत नाही.

★★

## चारोळ्या

**आकाश राणे,** तृतीय वर्ष कला

रोज क्षितिजावर जाऊन मी
उतरणारा सूर्य पाहतो
त्याच्यापासून दूर असणारा मी
त्याच्यापर्यंत पोहोचण्याची इच्छा बाळगतो

माझ्या प्रेमाची व्याख्या
तू कधीच करू नाही दिलीस
मुठीत पकडलेल्या वाळूप्रमाणे
लगेच का ओसरून चाललीस

★★

## तुझ्या मेमरीत डोकावताना

**राम श्रीपती पायाळ,** तृतीय वर्ष कला

माझ्या मेंदूच्या Computer वरील
Dynamic Ram ला जेव्हा
मी Recharge करतो
तेव्हा तुझीच स्मृती
माझ्या Hard disk वर Copy होते.
तुझ्या प्रत्येक आठवणीच्या
Graph Paper वर
माझ्या डोळ्याचा Arrow
दाही दिशांना फिरतो.
माझ्या जीवनरूपी बागेत
तुझ्या भावनांचं Software
मग Load झालेलं आठवतं.
माझ्या मनाला त्याच वाटेवर
Click करून ठेवावसं वाटतं
तू कुठेही रहा
Flopy रूपी हृदयाच्या label वर
तुझे नाव सदा कोरलेले राहील.
तुझ्या Catalogue वर
माझ्या भावनांचा Data
नीट Save करून ठेव.
एकच इच्छा आहे
आपल्या प्रेमकहाणीचा Powerpoint
जगरूपी Monitor Screen वर
आदर्श म्हणून Display होऊ दे
(त्याला Mouse म्हणून फेकून देऊ नकोस.)

★★

# एडस्-जगापुढील एक गंभीर समस्या

**मनिषा द. रासकर,** द्वितीय वर्ष कला

प्रत्येक क्षेत्रात मानवाने आपली प्रगती दाखवली आहे. ही प्रगती सध्याही चालूच आहे. कारण आपण पाहतोच की, मानवाने सुरुवातीला क्लोनिंग तंत्र वापरून मेंढी तयार केली होती. आता तर मानवाने मानवाचेच क्लोन तयार केलेले आहे. परंतु मानवाला मानवनिर्मित 'एडस्' या रोगावर अजूनही योग्य उपाय सापडले नाहीत.

१९८१ मध्ये जगातील पहिला एडस्ग्रस्त व्यक्ती अमेरिकेत सापडला. 'एडस्' या रोगाचे पूर्ण नाव 'ॲक्वायर्ड इम्यूनो डेफिशियन्सी सिन्ड्रोम' असे आहे. १९८६ मध्ये या महाभयानक रोगाने भारतात प्रवेश केला. इतर देशांच्या तुलनेत भारतामध्ये 'एडस्' चे हे जाळे पसरतच चालले आहे. हॉवर्ड विद्यापीठातील एका संशोधन अहवालानुसार सध्या जगात एडस्ग्रस्तांची संख्या सव्वा कोटीच्या पुढे गेलेली आहे. महाराष्ट्रात देखील 'एडस्' चे रुग्ण जास्त आहेत.

'एडस्' हा एक असाध्य असा रोग आहे. रक्तात असलेल्या पांढऱ्या पेशी आपल्या शरीराची बाह्य जंतूंपासून संरक्षण करणाऱ्या सैनिक आहेत. 'एडस्' रोगाचा विषाणू आपल्या शरीरातील रोगप्रतिबंधक यंत्रणा पूर्णपणे विस्कळीत करतो. म्हणजेच हा विषाणू त्या पांढऱ्या पेशींवर हल्ला करतो. शरीराची प्रतिकारक्षमता कमी होते. या विषाणूला 'एच. आय. व्ही.' म्हणतात. एडस् झालेल्या रुग्णांना साथीच्या रोगाची लागण लवकर होते. शरीराची प्रतिकारक्षमता कमी झाल्याने वेगवेगळ्या जंतूंमुळे व्याधी निर्माण होतात. त्याला इम्यूनो डेफिशियन्सी सिंड्रोम म्हणतात.

विषाणूंचे संक्रमण झालेल्या पेशी शरीरातील सर्व अवयवांमध्ये सापडतात व रक्तात प्रतिद्रव्ये तयार होतात. अशी प्रतिद्रव्ये जर एखाद्याच्या रक्तात सापडली तर त्याला एच. आय. व्ही. चे संक्रमण झाले असे समजले जाते.

**एडस् होण्याची प्रमुख कारणे :**

i) दूषित सुईद्वारे इंजेक्शन.
ii) एडस् झालेल्या रोग्याचे रक्तदान स्वीकारल्यास.
iii) परस्त्रीशी किंवा परपुरुषाशी असुरक्षित लैंगिक संबंध ठेवल्यास.
iv) एडस् झालेल्या रोग्याचे ब्लेड, इ. वस्तू वापरल्यास.
v) नवरा अगर बायको यांपैकी एकाकडून दुसऱ्याला त्याचप्रमाणे आईकडून मुलाला एडस् होऊ शकतो.
vi) एडस् रोग्याकडून घेतलेली किडनी, रक्तापासून बनलेले इतर घटक स्वीकारल्यास एडस् होऊ शकतो.

**एडस्ची लक्षणे :**

i) एडस् झालेल्या रुग्णाची प्रतिकारशक्ती हळूहळू कमी होते.
ii) गळ्याभोवती, तोंडात गाठी येतात.
iii) एडस् विकसित होऊन मृत्यू येतो.

**रोग्याच्या तक्रारी :**

i) ताप येणे,
ii) वजन कमी होणे,
iii) घाम येणे,
iv) अतिसार, उलट्या होणे,
v) अशक्तपणा, भूक न लागणे, शरीरामध्ये कणकण असल्याची जाणीव.

## एडस्‌चे निदान :

i) 'रालिझा' नावाच्या चाचणीने निदान करता येते.

ग्रामीण भागातील लोकांना अजूनही एडस्‌बद्दल अज्ञान आहे. ग्रामीण भागातदेखील एडस्‌ची लागण होऊ लागली आहे. अज्ञान, गरिबी, अंधश्रद्धा, निरक्षरता यामुळे एडस्‌बद्दल गैरसमजुती पसरल्या आहेत.

एडस् झालेल्या व्यक्तींना क्रूरपणे वागवले जात आहे. असे न करता त्यांच्याशी सामोपचाराने वागायला हवे. एडस् झालेल्या व्यक्तीस जगण्याची प्रबळ इच्छा आणि समाजाकडून चांगली वागणूक मिळाली तर तोही सामान्य जीवन जगून आनंद उपभोगू शकतो.

★★

# राणी झाशीची

**संजय चव्हाण**, एम.ए.(मराठी)

माझ्या आयाबहिणींनो
रक्षण करा स्वतःच स्वतःचे
सारखेच दिसतात डोळे सगळ्यांचे
दृष्टी न दिसे सारखी
फाडू पाहता वस्त्रे तुमची
फाडून टाका कातडी त्यांची
वापर करा तीक्ष्ण नखांचा
चिंधड्या करा त्यांच्या आतड्यांच्या
करू नका आत्महत्या
करून टाका त्यांची हत्या
नका करू अपेक्षा मदतीची
लक्षात ठेवा राणी झाशीची

★★

## Essay Contest - 1st Prize Winner

# 'ETHICS IN SCIENTIFIC EXPERIMENTS'

Gauri Nerkar, S.Y.B.Sc.

The word Ethics means 'the moral principles' or 'the science of morals in human conduct.' Life is meaningless without moral principles. According to Swami Vivekananda, 'A man should be moral & pure because this strengthens his will & everything that strengthens the will by revealing the real nature is moral.'

When we talk about ethics, the question of human happiness comes which in turn leads us to think about science. It is said that science is the religion of the modern age. This is so because science has revolutionized the modern life; & exposed the centuries, old beliefs & superstitions. Science is the modern God of reason that abhors blind faith. Science has lead to the improvement of mankind; at the same time it has lead to the destruction of mankind & demolished the ethical values. It should however be noted that it is not science but the misconduct in science which is responsible for all this. Even scientists conducting the most fundamental research should be aware that their work can ultimately have a great impact on society. **Some of the ethically criticized experiments are : misuse of atomic bomb, misuse of sex determination test, human cloning, etc.** Let us consider these & some in detail.

**Dolly : The First Cloned Mammal :** Fiction writers in the past have created stories in which one person was cloned to create memorous copies. The themes of these stories have varied from the cloning of Adolph Hitler to the cloning of a very busy man to help him fulfil all his daily obligations. The possibilities of those senarios came a bit closer to reality in February of 1997 when a group of scientists from a Roslin institute & PPL there peutics, both in Edinburgh, Scotland reported in 'Nature' magazine that they had successfully cloned a sheep. The cloned lamb was named as 'Dolly'.

The word 'Clone' comes from the greek word 'Klon', which means 'tucing' or 'slip' as in plants. **Clone is defined as an exact genetic replica of a specific gene or an entire organism derived asexually.** Cloning in simple terms, is the production of multiple & identical copies. In other words, it is an asexuel method of reproduction where the fertilization of ovum with the sperm is not required. All that is required in cloning is a female egg or ovum. In this process, the nucleus of this egg cell is removed artificially by scientists & replaced by the donor's nucleus. The egg cell is to be placed in an appropriate medium to provide the proper environment for cell multiplication. From then onwards, it will follow the unusual process of growth & develop into a new independent being, exactly like the donor of the nucleus.

There are numerous ramifications of the success of this work. First, cloning of mammals could become a routine procedure. This would allow the study of development & for the replication of genetically identical individuals, particularly, transgenic animals that would have particular genomes of value. Aging can also be studied since an 'old' nucleus is initiating the development of a new organism. Also of interest is the interaction of a particular genome with a particular cytoplasm, since the cytoplasm contains not only the material needed for early development but also cell organelles, of which the mitochondria have their even genetic material. Thus the interaction of the nucleus & cytoplasm can be studied. Cloning coupled with genetic engineering will add new strength to medical science in it's fight against cancer especially to find it's origin in many other incurable diseases. It might even help in bringing about organ transplantation, in treating hereditory diseases like cystic fibrosis, muscular dystrophy, other genetic diseases & delay the process of aging. Cloning is widely used in plantcultivation because many plants can be grown from parts such as leaves or sections of the stem.

**Human Cloning : Is It Ethically Right?**

After learning about the enormous benefits of cloning, science & technology now are able to effect what is internal & essential to humans. Until now, they had a say on what humans are or can be.

In today's hi-tech world of internet, microchips, Dolly & Polly, it is easy to forget the importance of human connection & existence in our daily life activities.

Ever since the arrival of Dolly, the cloned sheep, in 1997, there has been an intense speculation about the timing of the next big news - announcement of successful human cloning. However, most of the countries do not allow the research on human cloning for the purpose of reproduction - fear of rows upon rows of Hitler or Osama Bin Laden being generated would be reason enough for the ban. Moreover, human cloning exposes a host of serious ethical problems; not only to a person, but also to families & the whole of humanity in which we exist.

One of the most important problems is the identity of being cloned. Whose child is this new being? Of the one supplying the nucleus; or of the one giving egg cell; or of both? Each child has the right to have real parents & to be conceived as the fruit of the marital love between husband & wife. This essential right of children is denied by cloning. **Knowing the identity of parents & experiencing the parental love are the fundamental rights of the early years of a child.**

Another important problem is that human cloning would **dehumanise** the human dignity, because humans would be generated in a biotechnical method of reproduction. Humans are not just products we can manufacture to our specifications & satisfaction. Is the new being a human person or an object which we can buy from the shop? Humans are subjects, not objects.

Generally & normally we understand that it is the soul that makes a person. Every person has a spiritual or non-material dimension which constitutes human person & distinguishes him or her from other beings. It is good to ask whether the cloned being has it's spiritual dimension, it's personhood or at least it's essential aspect, is denied.

**Human cloning will undermine the preciousness & uniqueness of life.** Human life will become cheap, if it can be mass produced. In such a society, killing & getting killed will not matter much. People will not be afraid to die because an exact duplicate of their's can be produced easily & so death will invalue no serious loss. Such an attitude will create serious law & order problems.

The ill-effects of cloning will affect families also. **It violates the dignity of marriage & family relationship.** The family is built on close interpersonal relationships based on deep genuine love. The bond between spouses is kept alive by love, sexual union & generation of a person need not involve mutual union of love & sex. All this may result in the weaking of the bond between the husband & wife, parents & children. Surely, destablisation of the family will be the natural consequence.

The process of cloning will be

forbiddingly expensive for ordinary people, Yendering it a monopoly of the super rich. By this technique, the super rich will be able to selectively produce offspring with the best & most desirable qualities, who can excel the energy field. **The new law of nature will not be the survival of the fittest but the survival of the richest !** The nature's principle of unity through diversity will fall. This asexual nature of cloning is unnatural & against the principle of nature. Are all these ethical problems justifiable & accpetable?

Dr. Hiroshi Nakajima, Director General of the World Health Organisation (WHO), said, "**WHO considers the use of cloning for replication of human individuals to be ethically unacceptable as it would violate some of the basic principles which govern medically assisted procreation. These include respect for the dignity of human being.**"

Considering all these ethical & sociological problems all seem to ask : could we attempt cloning in humans? Do we really need it? How will these clones fare in the real world?

Finally, science is a human-made enterprize. Scientific methods cannot be used against human; they can never be allowed to become tools of dehumanisation. Human life is unique & divine, & therefore, must be protected, preserved & promoted, throughout the life.

**Ethics In Genetics**

When it comes to 'Genetics', there are several ethical problems to be accounted for.

New genetic knowledge seems to be destined to bring genetic tests that will collide with a growing movement for disability rights. The bettleground is likely to be prenatal genetic testing. Abortion of a prospective child destine to a short life filled with pain & inability to respond to the world is to most, a morally acceptable if tragic choice. Prenatal diagnosis may perhaps enable treatment before birth or soon after, or may yield information about what to expect. To women for whom abortion is morally acceptable, the choices are more difficult to sort out. Aborting a foetus with genetic disease is ogonizing & painful, like the death of a wanted child. The charge that medical genetics is a potentially threatening eugenic programme begins with the observation that much of medical genetics aims to combat disease not by healing anyone but by preventing the conception of birth of afflicted individuals by picking and choosing amongst the potential people who might be conceived & born.

**Philosophers Wikler & Palmer have drawn a distinction between choices about imagined future children as opposed to loving those children actually born, with or without disability.** They argue - "A prospective parent is in a quite different context of moral choice than the parent of an actual child... Before the child comes into being, we favour one list of attributes - the healtheir ones - over another, if we get to make that choice. This is quite common. But

it is unusual to find a parent who wishes that some other parent's child were his, eventhough each of us knows children in other families who are superior in some respect or the other to our own. Thus before the fact we hope for a healthy child, but after the fact we do not regret having the children we do."

Now-a-days, the major problem is of **sex determination tests.** Though this technique is useful in detecting diseases in the early stages of the child to be born, the greatest disadvantage offerd by it is that in some remote areas of the country, due to uneducated people, many abortions have taken place on learning that the future child is a female. This has seriously affected the population of females.

Next is the problem of **genetic manipulation**. Howard Kaye, a sociologist at Franklin & Marshall college, has observed, "As our latest attempt at dropping some moral anchor, biology may prove as ambiguous & unsuccessful as previous scientific moralities & perhaps even more harmful. Our current infatuation with biology, unlike that of a century ago, is occuring at a time when the humanities & social sciences have declared moral bankruptcy, thus depriving us of a vital part of the collecture memory we need to regulate & resist our increased capacity for genetic manipulation."

The next serious problem is that of the **determination of the gene sequence.** Some feel that it should be the part of the general information about a person & the contradictory statements support the idea that by this the right to privacy, which is a fundamental right of a person, is lost. For instance, a compact disk containing the DNA sequence of President **Abraham Lincoln's genome** would tell us very little about The President that we would really want to know. Whether or not, he suffered from **Marfan's syndrome,** a genetic disorder not yet described in his time, would be a minor embellishment in his biography. It is of interest to historians of medicine & human genetics, and might have been of interest to Lincoln himself while choosing whether & how to have children, but the DNA sequence can contribute only a small increment to our understanding of his political ascent & the conduct of his presidency. Blanket generalisations about the worth & danger of genetic information, robbed of their specific social context render then almost meaningless. And that was the whole point in genome debate.

Highly publicized senate hearings between February & July 1973, before senator Edward. Kennedy, uncovered incentrovessible evidence of research abuse- **Juskeegee syphilis trials that left a cohort of four hundred pees black males untreated for decades; hepatitis experiments that inoculated young mentally infirm residents of the willouebrook facility with live virus; injection of cancer cells into senile patients at the Fewish Chronic Disease Hospital; use of prisoners to test drugs; whole-body radiation experiments sponsored by the Department of Defence; testing of harmone analogues among welfare mothers & Mexican American women.**

The above discussion also reminds us about an article published in 'The Indian Express' on 1st August, 2001. It is said that the regional cancer centre (RCC) in Thiruvananthapuram **used poor cancer patients as guinea pigs to test a 'banned' drug named M4N or tetra-o-methyl nordihydroguoiosectic acid, without the patients knowledge.**

The above mentioned examples are very shocking & are an abuse to the entire specific community.

In 1983, Rifkin published a book named 'Algeny', a book against gene theropy. After that, he forwarded a resolution to congress, alongwith a 'Theological letter concering the Mord Arguments Against Genetic Engineering of the Human Germlin Cells.' The 'Theological letter' was adapted from the sections of Rifkin's book & argued that **once any form of gene therapy began, society would be unable to stop it.** Gene theropy for a serious genetic disease today, genetic enhancement of intelligence & athletic ability tomorrow.

Few years ago, when the foetal tissue research was in progress abroad, various questions were raised, one of which was - **"Does the use of foetal tissue in research encourage women to have an abortion they might otherwise not undertake?"** This proved to be an unanswerable question.

When we think about 'Ethics in scientific experiments', we are reminded of the major aspect to be considered - **'The Nuclear tests'.** The unforgettable incident, which proved to be an abuse to humanity, occured in Hiroshima & Nagasaki cities of Japan, where for the first time nuclear bombs were dropped. The ill-effects faced by the innocent people were unbearable. Some people stood stucked-up in the position they were, just before the blast, fully burnt. People who tried to rescue themselves by jumping into river, found themselves burnt by the boiling water of the river because the temperature of the earth surface had unexpectantly increased. The pressure on the earth's surface had also crossed it's highest limit, ultimately resulting into the bursting of the veins in the body of some people who were little away from the site of blast. Innocent people became homeless within no time.

"My God, look at that son of a bitch go!" With these words, Robert Lewis, the co-pilot of EnolaGay - the B-29 aircraft that dropped the first atomic bomb on Hiroshima - swung away to escape the cloud mushrooming upwards. After seeing the death & destruction, Lewis revised his reaction to : "My God, what have we done?" **The Director of Manhattan project tests, Kenneth, Bainbridge was emphatic : "We're all sons of bitches now."**

In an article published an 8th June 1998, in the weekly newsmagazine - 'Outlook', Krishna Prasad has rightly said :

**"Behind the tit-for-tat tests, religious schisms & fragile egos, lies the real danger : The End"** The question is, why do we misuse the nuclear power if it can be used safely, proving to be the unending source of energy.

While considering all these ethical problems, it is but natural to think : why a particular experiment, before it's acceptance in the society, needs to obey some ethical codes? The only answer to this question is : due to the misconduct in science. Some scientists believe that : "Attaching public bioethics to the scientific research programme was a new anharmonic in democracy." Some also believe that bioethics has proved to be an obstacle in the progress of scientific research. But, when it is a humanmade enterprize, as stated earlier, therefore must not be used against humans. **Genetic engineers are, however now, well aware that their science is frightening to a lot of people.** Mostly, behind the closed doors, they have been exploring evidence that human genes can be manipulated to make us latter, heat their, more or less intelligent or more less likely to commit crimes ... Yet secretive as the genetic researchers try to be, some of their findings are finding their may into the public media...

**The new technology of genetic problem has led us to the cause of muscular & promises to lead us to cure.**

**Ethics is largely a matter of each person's independent judgement, because morality is largely defined by religion.** Many religions have similar standards, but nevertheless, we have a pluralistic society with many religions. Thus, it is going to be difficult for the society to decide what is absolutely morally right & wrong. Science has never been more powerful than it is today, & in the future it is going to be able to do a lot more things than it is going to be allowed to do. However, in almost every case, the ethically serious problems, are easily handled by the society's decisions.

Lastly, these scientists are changing out lives, not just a little bit, by inventing a television set you can turn on & off, but by changing moral values as well. Scientists must learn to assume responsibility for discribing the ramifications & the society must decide how far we should go. **We do not went to stop the knowledge, but we want to consider the applications & their effects.** Let us hope that scientists understand our intention & we never get a chance to consider the ethical problems created by scientific experiments.

★★

## References


1) Articles from Newspapers.
2) Information from Internet.
3) 'Ethics, Behavior & Values in Society.' Edited By : Frederic B. Rudolaph & Larry V. Meimtire
4) 'The Gene Wars' : Science, Politics & the Human Genome By : Robert Cook-Deegan
5) Outlook (The Weekly Newsmagazine) (June 8, 1998)
6) Principles of Genetics ($6^{th}$ edition) [International Edition] By : Robert H. Jamarin
7) Science Reporter Magazine (March 5, 2002)


★★

# १० वी फ

**रोशनी सुतार,** प्रथम वर्ष कला

गेल्या दहा ते पंधरा वर्षांत मराठी चित्रपटांची संख्या रोडावलेली दिसते. त्यातही आजच्या युगात मराठी चित्रपट काढणे ही खरे तर धैर्याची बाब म्हणावी लागेल. चित्रपटाची कथा ही खरे पाहता चर्चेचा विषय असतो. '१० वी फ' हा एक चांगला चित्रपट आहे. दिग्दर्शकाने अतिशय उत्तम प्रयत्न केलेला दिसतो. तीच तीच कथा किंवा 'कॉमेडी' दिसत नाही. वेगळाच विषय हाताळलेला आहे.

'१० वी फ' या चित्रपटात पंचवीस मुलांचा एक वर्ग आहे. त्या वर्गाचे / तुकडीचे नाव आहे 'फ'. सगळ्या शिक्षकांचा या तुकडीविषयी थोडासा रागच असतो. कारण या वर्गातील मुले म्हणजे उद्धट, भांडखोर, ढ, आळशी वगैरे वगैरे आहेत असा सर्वांचा समज असतो.

एके दिवशी 'जोशी' नावाचा विद्यार्थी उगाचच भांडण काढतो आणि '१० वी फ' तुकडीतील विद्यार्थी त्याच्यावर तुटून पडतात. यावर शाळेचे मुख्याध्यापक कठोर शिक्षा करतात. आई-वडिलांच्या चिठ्ठीशिवाय शाळेत प्रवेश नाकारतात आणि त्यातच सर्व विद्यार्थ्यांचे प्रगतिपुस्तक मिळालेले असते. वर्गातील तीन विद्यार्थी सोडून कोणीही सर्व विषयांत पास नसते. या सर्व प्रकरणामुळे चिडून जाऊन '१० वी फ' मधील विद्यार्थी रात्री येऊन शाळेचे मोठ्या प्रमाणावर नुकसान करतात. काचा फोडणे, महत्त्वाचे अभ्यासाचे तक्ते लपवणे, प्रयोगशाळेतील उपकरणांची मोडतोड करणे, टी. व्ही. फोडणे, ट्युबलाईटस्, दिवे, फॅन इ. ची. तोडफोड करणे असे उपद्व्याप करतात.

या घटनेमुळे सर्व शिक्षक वर्ग हादरून जातो. प्रकरण पोलिसांपर्यंत जाते. पण त्यांचे विज्ञानाचे शिक्षक प्रा. गणेश कुलकर्णी सर्व काही सावरतात. मुलांना योग्य मार्गदर्शन करतात. मुले योग्य मार्गावर येतात. शाळेतील सर्व नुकसान काबाडकष्ट करून भरून काढतात. त्याचबरोबर अभ्यासही करतात. शेवटी त्यांची 'फत्ते' होती.

या सर्व कथेत प्रेक्षक कुठेच कंटाळत नाही. उलट चित्रपटातील गाणी मनोरंजनात भरच घालतात. कथा ऐकायला सर्वसामान्य वाटते पण 'दिग्दर्शन' अतिशय उत्तम आहे. गाणी बोलीभाषेतील असल्यामुळे प्रभावी ठरतात. ती मनाला स्पर्श करतात. उदा. शीर्षक गीत.

'बुद्धी दे, शक्ती दे, हे दयाघना,' 'खुशी चेहऱ्यावर माझ्या का नाही येणार?' इत्यादी.

ज्या वेळी कुलकर्णीसर विद्यार्थ्यांना शाळेत पुन्हा दुरुस्ती करण्याविषयी सुचवितात. तेव्हा मुले 'आम्ही दंड भरू' असे सांगतात. तो पैसा आपल्याच आईवडिलांच्या खिशातून भरला जाणार, याची जेव्हा मुलांना जाणीव होते, तेव्हा ती शरमतात. स्वतःच्या घामाच्या कष्टातून पैसा मिळवणार, अशी शपथ घेतात. हे आताच्या पिढीसाठी उपदेशपर ठरते.

सिद्धार्थच्या आईचा व कुलकर्णीसरांचा संवाद रंगतो. सिद्धार्थच्या आईचे पुनःपुन्हा 'ते टकलेमास्तर' म्हणणे विनोद निर्मिती करते. गरीब कुटुंबांतील विद्यार्थी आणि सुखवस्तू घरांतील विद्यार्थी यांच्या जीवनातील तफावत त्यातून दिसते. 'तुमच्या त्या टकले (गोसावीसर) मास्तरांना एकदा उपाशी राहून बघा म्हणजे समजेल?' असे सिद्धार्थच्या आईचे सांगणे विचार करावयास भाग पाडते.

कुलकर्णीसर कॉलेजात असताना 'फी' वाढीबद्दल

त्यांनी केलेला संप व त्या संपामुळे त्यांच्या आवडत्या शिक्षकांचे उद्ध्वस्त झालेले जीवनमान मनाला दुःखी करते. "जे प्रश्न चर्चेतून सुटू शकतात, त्यासाठी केवळ डोक्यात राग घालून मोडतोड करणे कितपत बरोबर आहे?" हे विधान अत्यंत सार्थ आहे.

कुलकर्णी आणि शाळेचे मुख्याध्यापक गोसावी सर यांच्यातील संभाषणातून चांगली निष्पत्ती हाती येते. 'शाळेतील 'अ' पासून ते 'फ' पर्यंतची उतरंड काढून टाकावी. केवळ परीक्षेतील मार्कांच्या आधारावर विद्यार्थ्यांचे गुणावगुण तपासणे योग्य नाही. जे विद्यार्थी कष्ट करून नोकरी करून शाळा शिकतात त्यांचा सत्कार केला जावा, गरीब विद्यार्थ्यांसाठी काही वर्ग सुरू केले जावेत, विद्यार्थ्यांना केवळ लिहिणारे कारकून न बनवता त्यांना जीवनात उपयुक्त पडणारे शिक्षण द्यावे." हे कुलकर्णीसरांचे विचार लक्षात ठेवण्यासारखे आहेत. आजच्या शिक्षण व्यवस्थेवरच जणू त्यांनी टीका केली आहे.

"शाळेत शिकवताना शिक्षकांनी जीव ओतला काय किंवा नाही? काय फरक पडतोय? नाहीतरी विद्यार्थी बाहेर 'प्रायव्हेट कोचिंग क्लासला जातातच ना?" हे एका शिक्षकाचे संवाद महत्त्वपूर्ण आहेत. सद्य परिस्थितीचे दर्शन त्यातून घडते.

'१० वी फ' मधील विद्यार्थी एकंदर गरीब घरांतील आहेत. पण ते कर्तबगार आहेत. आपली शपथ ते पूर्ण करतात. शाळेचे नुकसान भरून काढतात.

दिग्दर्शकाने उत्तम कलावंतांची निवड केली आहे. सिद्धार्थच्या चेहऱ्यावरील भाव म्हणजे शंभर सशांचे मन प्रतिबिंबित झाले आहे, असे वाटते. शिक्षक म्हणून अतुल कुलकर्णी योग्य वाटतात. टांगेवाले काका, पी. टी. चे शिक्षक आपापली भूमिका चांगली पार पाडतात. मिलिंद इंगळे यांची छोटीशीच भूमिका साजेशी आहे. कचरा गोळा करणारा परंतु स्वतःची 'सिकंदर' म्हणून ओळख करून देणारा प्रेक्षकांना भावतो. पुण्यातील चित्रीकरण चित्रपटात असल्यामुळे प्रेक्षकाला ते 'आपले' वाटते, 'जवळचे' वाटते. जसे : सारसबाग, पेशवे पार्क, फर्ग्युसन कॉलेज, मार्केट यार्ड, धोबीघाट इ.

'१० वी फ' या चित्रपटात मुलांप्रमाणे पालकांनीही खूप काही शिकण्यासारखे आहे. केवळ आपल्याच विश्वात गुरफटून राहणाऱ्या सुखवस्तू घरातील मुलांसाठी हा नक्कीच एक वेगळा अनुभव ठरेल.

★★

## गमतीचे पत्र

**लतिका मनोहर चव्हाण,** द्वितीय वर्ष शास्त्र (अ)

॥ भूमिती प्रसन्न ॥

श्री. संगतराव दास कोने
मु. पो...
ता. लंबांतर, जि. परिमिती

**प्रिय वर्तुळ महाशय यांना,**

स.न.वि.वि.

कालच बहुभुजाकृतीचे पत्र आले. इकडे वर्तुळबाई बऱ्या आहेत. काळजी नसावी. चार दिवसांपूर्वीच विषमभूज चौकोनाचे नातू लघुकोन येऊन गेले.

चौरसाकडून कळले की, समभूज चौकोनाची प्रकृती बिघडली आहे. त्यासाठी डॉ. त्रिकोणे यांना बोलावून उपचार करणे. चौकोनेंचा निरोप आहे की, शून्याचा रस काढून रोज पिण्यास द्यावा. याने निश्चित गुण येईल. बरे असो. बाकी सर्व ठीक.

..X यांना आशीर्वाद. छोट्या त्रिज्येला गोड पापा. कळावे.

तुमचा
**परिघदादा**

★★

# असा हा 'प्रतिभा संगम'

अर्चना शिरीष देशपांडे, एम.ए., मराठी

'प्रतिभा संगम'- अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने राबवलेला अतिशय स्तुत्य उपक्रम. प्रसन्नता, ओसंडून वाहणारा उत्साह, विविध साहित्यिक, कवी, लेखक, तसेच ठिकठिकाणांहून आलेले तरुण साहित्यिक विद्यार्थी यांनी भारलेला सुंदर संगम. ज्यांनी कार्यक्रमाला हे नाव दिले त्यांचे खरोखरच कौतुक करावे वाटते.

२७, २८, २९ सप्टेंबर २००२ रोजी संभाजीनगर येथील संत एकनाथ मंदिरात हा 'प्रतिभा संगम' सोहळा अतिशय खेळीमेळीत पार पडला. या कार्यक्रमाबद्दल सांगणे केवळ अवर्णनीयचं ! खूप वर्ष 'प्रतिभा संगम' बद्दल ऐकत होते. परंतु प्रत्यक्ष जाण्याचा योग प्रथमच आला आणि गेली पाच वर्षे आपण या सुंदर अनुभवांना मुकलो याची मनापासून खंत वाटली.

'प्रतिभा संगम' च्या कार्यक्रमांचे नियोजन, आखणी, व्यवस्था थक्क करण्याजोगीच ! संपूर्ण महाराष्ट्रातून विविध महाविद्यालयांतून प्रचंड संख्येने उपस्थित असलेल्या विद्यार्थ्यांची व्यवस्था, कार्यक्रम पाहून भारावून गेले. सकाळी नऊपासून ते रात्री बारापर्यंतच्या सर्व कार्यक्रमांची आखणी अतिशय नियोजनबद्ध होती. विविध परिसंवाद, चर्चासत्रे यांनी रोजचा दिवस नटलेला. विद्यार्थ्यांप्रमाणेच ठिकठिकाणांहून येणारे साहित्यिक हे कार्यक्रमांचे आणखी एक वैशिष्ट्य.

तरुणांच्या कलेला प्रोत्साहन मिळावे, त्यांच्यातील सुप्त कलागुणांना व्यासपीठ मिळावे. त्यांच्या लेखनाला, विचारांना एक वेगळी दिशा मिळावी हा 'प्रतिभा संगम' चा उदात्त हेतू अतिशय वाखाणण्याजोगा आहे.

२७ सप्टेंबरला संध्याकाळी चार वाजता डॉ. विनया राजाध्यक्ष यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन झाले आणि कार्यक्रमांना सुरुवात झाली. पाहुण्यांच्या औपचारिक भाषणानंतर प्रख्यात कवयित्री शांता शेळके यांच्या आठवणींना उजाळा देणारा, त्यांच्या पवित्र स्मृतीला वंदनीय असा त्यांच्या कवितांवर आधारित अपर्णा संत यांनी सादर केलेल्या कार्यक्रमाने वातावरणात बहार आणली. रात्री एक वाजेपर्यंत चाललेल्या या कार्यक्रमात प्रत्यक्ष शांताबाईच अवतरल्याचा भास झाला.

२८ सप्टेंबरला विविध परिसंवाद, चर्चासत्रे यांनी कार्यक्रमात रंगत आणली. २९ सप्टेंबरला विविध साहित्य प्रकारांत सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांचे सादरीकरण गटशः चर्चांमधून झाले. अशा चर्चासत्रांतून विद्यार्थ्यांना विविध साहित्यिकांच्या मार्गदर्शनाचाही लाभ झाला.

ज्येष्ठ साहित्यिकांच्या मार्गदर्शनामुळे ज्ञानात भर पडली. तसेच इतर विद्यार्थ्यांचे लेखन ऐकून लेखन हाताळणीच्या विविध प्रकारांची माहिती झाली. ज्येष्ठ साहित्यिकांच्या बहुमोल मार्गदर्शनामुळे विचारांना एक वेगळी दिशा मिळाली. चांगले लेखन करण्यासाठी चांगले आणि भरपूर वाचन कसे आवश्यक आहे याची जाणीव झाली.

साहित्यलेखनात आजचा तरुण वर्गही मागे नाही. परंतु योग्य मार्गदर्शनाची, योग्य विचारांची त्याला गरज

आहे. त्याच्या विचारांना पूरक खाद्याची आवश्यकता आहे. आणि अशा कार्यक्रमांतून ते त्यांना मिळत असते. त्यामुळे असे कार्यक्रम वारंवार व्हावेत. विद्यार्थी वर्गानेही त्यांना भरभरून प्रतिसाद दिल्यास ते अनुभवसमृद्ध होतील यात शंका नाही.

'प्रतिभा संगम' मधून घेण्याजोगी आणखी एक गोष्ट म्हणजे नियोजन कौशल्य. अजिबात गोंधळ न होता अत्यंत शांतपणे आणि सुंदररीत्या प्रत्येक कार्यक्रम पार पडत होता. त्याबद्दल अ. भा. वि. प. च्या कार्यकर्त्यांचे कौतुक करावे तेवढे थोडेच !

विचारांना योग्य दिशा मिळण्यासाठी आवश्यक असते विचारांची देवाणघेवाण. 'प्रतिभा संगम' च्या निमित्ताने ठिकठिकाणांहून आलेल्या विद्यार्थी-विद्यार्थिनींशी संपर्क आला. त्यांच्याशी विविध विषयांवर चर्चा, त्यांचे अनुभव यामुळे बरेच काही शिकायला मिळाले. आणि नवे ऋणानुबंध जुळून आले.

इंद्रजित भालेराव, सतीश सोळांकूरकर, प्रतिभा रानडे, विजया राजाध्यक्ष, रेखा बैजल इ. ज्येष्ठ साहित्यिक, कवींचे मार्गदर्शन या कार्यक्रमात लाभले.

ज्येष्ठ नाट्यकर्मी चित्तरंजन कोल्हटकर यांच्या हस्ते पारितोषिक वितरण झाले. तरुणांचा अशा कार्यक्रमातील उस्फूर्त सहभाग पाहून ते भारावून गेले. त्यांच्या बहुमोल विचारांनी कार्यक्रमाची सांगता झाली.

अतिशय प्रसन्न, खेळीमेळीच्या वातावरणातील, दर्दी साहित्यिकांच्या सहवासातील, बहुमोल अनुभवांच्या सान्निध्यातील 'प्रतिभा संगम' ने मनात घर केले आहे.

★★

# शायरी

**सोनल खिंवसरा,** तृतीय वर्ष वाणिज्य

दिल दिया जिसको वो दिल्ली चली गई।
इश्क किया जिससे वो इंडियासे से चली गई ॥
इसलिए दिल ने कहा खुदखुशी कर तू
पर बिजली का हात लगाया तो बिजली भी चली गयी

★★

हमने भी प्यार किया था बडे जोश के साथ।
हमने भी प्यार किया था बडे होश के साथ।
अब हम प्यार करेंगे सोच के साथ।
कल हमने देखा उन्हें किसी और के साथ।

★★

ना उनका नाम, ना पता जानते हैं।
हम तो उन्हें बस सुरत से पहचानते हैं।
ढुंढे तो उन्हें ढुंढे कैसे ?
अब तो हर सुरत में वही नजर आते हैं।

★★

उनकी राह देखते देखते, आँखे थक गई।
जब वो सामने आए तो पलके झुक गई ॥

★★

कौन जाने कब मौत का पैगाम आजाएँ।
इसलिए तलाश करती हूँ उन लमहों की,
अपनी जिंदगी आप जैसों के काम आजाएँ।

★★

# लोकशाही आणि महाविद्यालयीन तरुण

**संदीप दत्तात्रय गवते,** द्वितीय वर्ष कला (ब)

नमस्ते विद्यार्थी मित्र-मैत्रिणींनो ! आपल्या भारतात लोकशाही शासन आहे. परंतु महाविद्यालयीन तरुण वर्ग या बाबतीत बऱ्याच प्रमाणात उदासीन दिसतो. लोकशाही, राजकारण म्हटले की, आपल्यासमोर सर्वप्रथम भ्रष्टाचाराचे चित्र उभे राहते. हे चित्र बदलण्याचे कार्य आपल्यासारख्या महाविद्यालयीन तरुणांनीच केले पाहिजे.

आज लोकशाहीची इमारत ढासळत आहे. ह्या ढासळत्या इमारतीला आपल्यासारख्या महाविद्यालयीन तरुणांनी सावरले पाहिजे. तरुणांनी स्वतः लोकशाहीत प्रवेश करणे आवश्यक आहे. तरुण वर्गाने एकत्र येऊन लोकशाहीत कार्य केल्याने लोकशाहीमध्ये यशस्वी क्रांती घडू शकते. अशा प्रकारची क्रांती झाल्यास देशाला प्रगतिपथावर नेण्यास, देशाचा विकास होण्यास वेळ लागणार नाही. तरुण वर्गाने आपली जबाबदारी यशस्वीरित्या पार पाडणे आवश्यक आहे. लोकशाहीत तरुणांची भूमिका सर्वांत महत्त्वाची असते. तरुण वर्गाने हे जाणले पाहिजे.

लोकशाहीतील निवडणुकांमध्ये प्रवेश करण्यासाठी ती व्यक्ती पदवीधर असावी तसेच गुन्हेगारी पार्श्वभूमी नसलेली असावी या अटी पूर्ण कराव्या लागतात. त्यामुळे सुशिक्षित तरुणांनी आलेली संधी घालवू नये. त्याचा देशसेवा म्हणून उपयोग करून घ्यावा. यातूनच तरुण वर्ग आपल्या भागाचा, शहराचा, राज्याचा तसेच देशाचाही विकास करण्याचे महत्कार्य करू शकतील. सुशिक्षित तरुणांनी एकत्र येऊन सरकार स्थापणे हे गरजेचे आहे. महाविद्यालयातील तरुणांनी निवडणूक, मतदान यामध्ये भाग घेणे आवश्यक आहे. मतदानाचे प्रमाण कमी झाल्याने लोकशाहीस धोका निर्माण होताना दिसत आहे. लोकशाहीत तरुण वर्गाने उतरून देशाच्या विकासाचे कार्य केले पाहिजे.

लोकशाहीच्या द्वारे कार्यक्षम सरकार निवडून देण्याची जबाबदारी आपल्यावर आहे आणि ती आपण निवडणुकीच्या रिंगणात उतरून यशस्वीपणे पूर्ण केली पाहिजे. आजच्या महाविद्यालयीन तरुणांनी निवडणूक, मतदान याविषयी जागृत होणे गरजेचे आहे. या प्रक्रियेत प्रत्यक्ष सहभाग घेऊन तरुण वर्गाने देशाला प्रगतिपथावर नेण्याचे तसेच देशाच्या विकासात क्रांती घडविण्याचे कार्य करणे आवश्यक आहे.

जय हिंद ! जय भारत !!

★★

# What Is A Life?

**Hemangi Jawale,** S. Y. B. Sc. (A)

A rich man laughed & said,
"Life is only money"
A poor man trembled with cold & said,
"Life is only a struggle.
A sadhu in his speech said,
"Life is the way to God."
A Lazy man in sleep said,
"Life is a bed of roses."
A Lover waiting for his girlfriend said,
"Life is only love."
But I say,
"Life is a unsolved example."

★★

# आजची मराठी भाषा आणि लेखन

ज्योत्स्ना दरंदळे, एम.ए., मराठी

मराठी भाषेला स्वच्छ रूप प्राप्त करून दिले ते ज्ञानेश्वरांनी. त्यांच्यामुळेच मराठी भाषेला खरे सौंदर्य प्राप्त झाले. ती आपल्यापर्यंत पोहोचली. आज मात्र मराठी भाषेचा संकोच लोकांना वाटू लागला आहे. हल्ली बऱ्याच पालकांचा कल हा मुलांना इंग्रजी शाळेत घालण्यावर आहे. मग त्या मुलांच्या पालकांना धड मराठीही नीट लिहिता-वाचता येत नसेल. तेव्हा मराठी ही आपली मातृभाषा आहे ती आधी आपण स्वच्छ लिहायला व वाचायला शिकलेच पाहिजे. तुम्ही इंग्रजीचा अभ्यास जरूर करा पण त्याबरोबरच मराठीही सुदृढ, समृद्ध करा.

आजची मराठी भाषा, विशेषतः कॉलेजमधील विद्यार्थी जी बोलतात ती, तर फारच विचित्र वाटते. मी एकदा कॉलेजमध्ये जात असताना माझ्या कानावर एक वाक्य आले, "काय भयंकर सुंदर दिसते ती." एक मुलगी शेजारच्या मुलीला म्हणत होती. भयंकर या शब्दामुळे सुंदर या शब्दाला कुरूपता आल्यासारखी वाटते. आजकाल धड मराठी नाही, धड हिंदी नाही, धड इंग्रजी नीट बोलली जाते. या तिन्ही भाषा एकत्र करून बोलण्याची फॅशनच जणूकाही आजकाल निघाली आहे. त्याचप्रमाणे कॉलेजमध्ये आता शॉर्टकट मारण्याची देखील पद्धत निघाली आहे. कवी चंद्रशेखर गोखले यांना सर्वजण 'चंगो' असे म्हणतात. निदान काही व्यक्तींबद्दल तरी असे बोलणे मला योग्य वाटत नाही.

माझा विषय मराठी आहे. तो मी जेव्हा घेतला तेव्हापासून मला मराठीचे गांभीर्य समजू लागले. आम्हाला भाषाविज्ञान शिकवायला तावरे मॅडम आहेत. त्या आम्हाला एस. वाय. पासून शिकवतात. खरे तर त्यांच्यामुळेच आम्हाला शुद्धलेखनाचे महत्त्व समजू लागले. त्यांची पुस्तकेही त्यांनी आम्हाला दिली. तावरे मॅडम आम्हाला खूप कळकळीने शुद्धलेखन शिकवत आल्या आहेत. त्यांच्या हातात जर आमची वही गेली की, ती पूर्ण शुद्ध होऊनच आम्हाला परत मिळते. आज त्यांच्यामुळे आमच्यात थोडी तरी सुधारणा झालेली दिसते. लिहिताना थोडे काळजीपूर्वक लिहितो. शंका वाटल्यास विचारतो. आमच्या तावरे मॅडम शुद्धलेखनाच्या बाबतीत नेहमीच दक्ष असतात.

आपल्या भाषेकडे आपणच लक्ष दिले पाहिजे. तिचा अभ्यास करायला पाहिजे, मग ते रस्त्यावरचे फलक असोत वा लग्नपत्रिका असोत. बऱ्याच लग्नपत्रिकांमध्ये काही शब्द हे चुकीचे लिहिले जातात. उदा. सर्वांनी वधू-वरांस आशिर्वाद देण्यास यावे. त्यातील आशीर्वाद हा शब्द बऱ्याचदा चुकीचा लिहिला जातो. हा शब्द जर बरोबर लिहिला तर आमच्यासारख्यांचा आशीर्वाद पोहोचल्याचे समाधान आम्हाला वाटेल. आमच्या घराच्या पुढे मुख्य रस्त्याला लागून एक छानशी इमारत आहे. त्या इमारतीला मोठ्या अक्षरात 'अनुसया' असे नाव दिलेले आहे. हे नाव मी जेव्हा वाचते तेव्हा मला वाटते की, त्या इमारतीत राहणारे सर्व लोक वाईट गुणांचे, मत्सर करणारे आहेत. अशा लक्षात न येणाऱ्या पण गंभीर चुका आपण टाळल्या पाहिजेत व दुसऱ्यालाही सांगितल्या पाहिजेत. (शुद्ध शब्द 'अनसूया' असा आहे)

डॉ. द. दि. पुंडेसर यांचा 'लोकसत्ता'मध्ये एक लेख आला होता. त्यात त्यांनी आपली पुणेरी भाषा

कशी आहे ते सांगितले आहे. त्यात ते म्हणतात, काही लोकांची अशी खात्री आहे की, आमची पुणेरी मराठी म्हणजे उच्च, शुद्ध व सर्वांगसुंदर आहे. उदा. पुण्यातल्या सर्व महाविद्यालयांवर विद्यार्थ्यांच्या मोर्चासंबंधी भित्तीपत्रके चिकटवलेली होती. त्यावर लिहिले होते 'प्रचंड विद्यार्थ्यांचा मोर्चा'. आता विद्यार्थी प्रचंड की मोर्चा प्रचंड हा प्रश्न कुठल्याही विद्यार्थ्याला पडलेला नव्हता. खरंच आज कोणत्याही विद्यार्थ्याला असे प्रश्न पडत नाहीत व लक्षही दिले जात नाही. पुंडेसर म्हणतात त्याप्रमाणे आपले लेखन निरर्थक होणार नाही, हास्यास्पद ठरणार नाही अन चुकीचे किंवा सदोष होणार नाही याची किमान दक्षता प्रत्येक लिहिणाऱ्याने घेतलीच पाहिजे.

मराठी ही आपली मायबोली आहे. ती आपण मायेने बोलली पाहिजे, सांभाळली पाहिजे. संत ज्ञानेश्वरमहाराज, संत तुकाराममहाराज यांसारख्या संतांनी आपल्याला मराठीचा अनमोल ठेवा दिला आहे तो आपणच जपला पाहिजे. नव्हे ते आपले कर्तव्यच आहे !

★★

---

माना के आपके काबिल नहीं हूँ मैं
आपकी नजरों मे कुछ भी नहीं हूँ मैं
मगर, ए जनाब जरा उनसे जाकर पुछिये
जिन्हे हासिल नहीं हूँ मैं ॥

**अपर्णा जाधव** , द्वितीय वर्ष कला

★★

# गणित

**हेमांगी आर. जावळे,** द्वितीय वर्ष शास्त्र (अ)

प्रत्येक मानवाचे जीवन हे गणित आहे
कुणाच्या वाट्याला भागाकार तर
कुणाच्या वाट्याला गुणाकार आहे
विशेष म्हणजे भाग जाता जात नाही
बाकी मात्र नेहमीच उरत असते
सुखाला छेद देता देता
दुःख आपले वाढतच असते
गुणाकाराचा फापटपसारा अन्
आकड्याचा गोंधळ संपत नाही
उत्तर वाढतच जाते, ताळा होत नाही.
कुणाच्या जीवनात सारखीच बेरीज
हसून हसून संख्याचा पुरवठा होतच राहतो
वजाबाकीला सर्वसामान्यांचे दार नेहमीच उघडे
आणि त्याची बाकी नेहमी शून्य असते
आता आलंय म्हणे नवीन गणित,
आली आहे नवी रीत,
एखादा अपूर्णांक झाला तर
आयुष्याचे गणित सुटेल कदाचित!

★★

+ − ÷ X
% √ ≠

# छंद हवा जीवनात !

**मनीषा गांधी, १२ वी कला**

'मन करा रे प्रसन्न। सर्व सिद्धिचे कारण ॥'

संत तुकारामांच्या या ओळीप्रमाणे प्रसन्न मन सर्व यशाची गुरुकिल्ली आहे. त्यामुळेच प्रत्येक मानव आपले मन प्रसन्न करण्यासाठी विविध चल-अचल वस्तूंचा वापर करून आपले मनोरंजन करून घेत असतो. मानवाच्या जीवनामध्ये सौंदर्य, कलात्मक दृष्टी, रसिकता असल्याने त्यातूनच छंदाची निर्मिती झाली आहे. कष्ट, मेहनत या नित्याच्या गोष्टींतून थोडासा विरंगुळा म्हणून छंद औषधासारखा उपयोगी पडतो. कुमार व किशोर वयोगटातील मुलांचा नाणी, पोस्टाची तिकिटे, वेगवेगळी चित्रे, शंख-शिंपले जमवण्याचा छंद असतो. याउलट आपल्यासारख्या महाविद्यालयीन मुला-मुलींना पर्यटन, गिर्यारोहण, चित्रकला, कविता, शेर-शायरी, नृत्य, नाटक असे कलात्मकतेने नटलेले रंगीबेरंगी छंद असतात.

अशा प्रकारे प्रत्येक जण कुठला ना कुठला तरी छंद जोपासतोच... नव्हे तो असतोच. छंदाशिवाय मनुष्य म्हणजे विरळाच. नुसतंच जगणे नीरस व कंटाळवाणे होते. नेहमीचे जीवन रणरणीत वाळवंटासारखे भासते तेव्हा एखाद्या छंदाची हिरवळ मन प्रफुल्लित करते.

'छंदाशिवाय आयुष्य
म्हणजे फक्त जगणं
कुणी साद घातली तरी
कधी वळून न बघणं

कष्ट असो किंवा ऐषाराम, नित्याचे झाले की मग त्याचाही कंटाळा येतो, मग अशा वेळी छंदाची औषधी उपयोगी पडते. हा छंद प्रत्येक जण जोपासत असतो. फक्त प्रत्येक वेळी छंदाचे प्रकार व त्याचे स्वरूप बदलत असते. पण उद्देश मात्र एकच - आनंद मिळविणे. छंद महाग असो अथवा स्वस्त, मनाची मरगळ दूर करून एक नवा रोमांच जीवनात भरतो. छंदाचं आपल्या आजच्या धकाधकीच्या जीवनातील महत्त्व पाहता, प्रत्येकानं किमान अर्धा-एक तास तरी छंद जोपासण्यासाठी द्यावा.

डायरी किंवा रोजनिशी लिहिणं हे एक कंटाळवाणे पण आत्मपरीक्षणासाठी उपयुक्त व जुन्या आठवणींना उजाळा देणारे असते. पर्यटन आणि गिर्यारोहण आपल्याला शहरापासून दूर निसर्गाच्या सान्निध्यात नेते. कविता व लेख लिहिण्याने आपले विचार, भावना प्रकट होतात, सोबतच वैचारिक पातळीही उंचावते. भजन, कीर्तन, प्रवचन हे मनःशांती देणारे सहज-सुलभ छंद आहेत. विविध ग्रंथ, कादंबरी, कथांची पुस्तके वाचनातून आपल्याला जीवनाकडे बघण्याचा नवा दृष्टिकोण लाभतो. चित्रकलेमुळे आजूबाजूच्या परिस्थितीकडे बघण्याची वृत्ती कलात्मक बनते. अशक्य गोष्टी मग रंगांद्वारे कागदावर उतरतात. तर काहींना दुसऱ्यांना हसवण्याचा अजब छंद असतो. त्यामुळे तो स्वतः आनंदी राहतो व दुसऱ्यालाही आनंदी करतो. 'छंदा' मुळे मन प्रसन्न होते आणि 'हा छंद जीवाला लावी पिसे' या ओळीप्रमाणे मन छंदाच्या बळावर आयुष्याच्या आकाशात भरारी घेतं व एखाद्या राजहंसाप्रमाणे दुःखमिश्रित दूधरूपी आयुष्यातून फक्त सुख आणि आनंद प्राशन करते. त्यामुळे प्रत्येकाने किमान एक तरी छंद (चांगला) जरूर जोपासावा.

★★



# महिलांनी महिलांसाठी चालवलेला उद्योग

**कांचन विठ्ठल शिनगारे,** द्वितीय वर्ष कला

महिलांनी महिलांसाठी चालवलेला उद्योग अशी ख्याती असणाऱ्या श्री महिला गृहोद्योग लिज्जत पापड व ससा डिटर्जंट या संस्थेस उत्सुकतेपोटी भेट दिली. या संस्थेचे संस्थापक स्वर्गीय पूज्य श्री. छगनलाल करमशी पारेख हे आहेत. सध्या संचालिका म्हणून सौ. जाधव व श्री. दीक्षित काम पाहतात.

या संस्थेत एकूण ४५,००० स्त्रिया काम करतात. ज्या स्त्रीचे वीस वर्षे वय पूर्ण असेल त्यांनाच या संस्थेत स्त्री कामगार म्हणून काम करता येते.

संस्थेतील स्त्रियांना मिळणारे वेतन प्रत्येक दिवसाला जितके काम असते त्यावरून रोजच्या रोज दिले जाते. कामामध्ये होणारा नफा संस्थेकडे न राहता सर्वांमध्ये वाटून दिला जातो. यामुळे स्त्रिया समाधानी आहेत.

संस्थेतील कामगार स्त्रियांच्या मुलींना वार्षिक परीक्षेत चांगल्या टक्क्यांनी उत्तीर्ण झाल्यावर संस्थेतर्फे शिष्यवृत्ती दिली जाते. ही शिष्यवृत्ती पहिली ते सातवी व महाविद्यालयीन मुलींनाच दिली जाते.

आरोग्याचे महत्त्व येथे चांगले जाणवले आहे. संस्थेतील या कामापासून स्त्रियांना काही शारीरिक आजार होत नाही ना हे पाहण्यासाठी त्यांची दर सहा महिन्यातून एकदा वैद्यकीय तपासणी केली जाते. परंतु संस्थेने या स्त्रियांच्या भविष्यासाठी कोणत्याही प्रकारची सुविधा केलेली नाही. स्त्रिया स्वतःला मिळणाऱ्या पैशातूनच बचत करतात.

स्त्री कामगारांना कामाव्यतिरिक्त मनोरंजन म्हणून वर्षातून एकदा सांस्कृतिक कार्यक्रम घेतले जातात. संस्थेच्या वाढदिवसाबद्दल अशा स्वरूपाचे कार्यक्रम घेतले जातात. या कार्यक्रमांमध्ये स्त्री कामगार स्वेच्छेने सहभागी होतात.

संस्थेतील कामगार स्त्रियांची जेवणाची सोय संस्थेच्या कॅन्टीनमध्येच केलेली आहे. या स्त्रियांची कामाची वेळ सकाळी ८.०० ते संध्याकाळी ७.०० पर्यंत आहे. त्यांना येण्या-जाण्यासाठी बसची सोय संस्थेने केलेली आहे.

संस्थेतील या स्त्री कामगारांमध्ये काही स्त्रिया साक्षर आहेत तर काही निरक्षर आहेत. आपण जितके काम करू तितकेच वेतन मिळणार याची जाणीव असल्यामुळे कोणीही आपला वेळ वाया घालवत नाही. वेळेचा पुरेपूर उपयोग करून घेतात. प्रत्येक गटाला नेमून दिलेले काम वेळेत पूर्ण कसे करता येईल याकडे प्रत्येकाचे लक्ष असल्याने कामात कोणत्याही प्रकारची चूक वा दिरंगाई होत नाही.

ससा डिटर्जंट तयार करताना निर्माण होणारे सांडपाणी स्वच्छ करून शेतीला पुरवले जाते. डिटर्जंट तयार करण्यासाठी लागणारा कच्चा माल बाहेरून मागवला जातो. तयार होणारा पक्का माल म्हणजेच साबणाची वडी व पावडर पॅक करण्यासाठी स्वतःच्या प्रिंटिंग प्रेसमधून रॅपर तयार केले जातात. ही प्रिंटिंग प्रेस मुंबई येथे आहे. या प्रिंटिंग प्रेसमध्ये सुद्धा फक्त स्त्रियाच काम करतात.

साबणाची वडी तयार करण्यासाठी लागणारा कच्चा माल एकत्र करण्यासाठी मशीनचा उपयोग केला जातो. पावडरच्या पॅकिंगसाठीही मशीनचा उपयोग केला जातो. परंतु या मशीनपासून कोणत्याही प्रकारचा धोका नाही.

ससा साबणाची वडी ही फक्त निळ्या रंगामध्ये

उपलब्ध आहे. हा साबण वापरण्याचे प्रमाण महाराष्ट्रामध्ये जास्त आहे. ससा पावडर पिवळ्या व हिरव्या रंगांमध्ये उपलब्ध आहे. ही पावडर वापरण्याचे प्रमाण कोकणमध्ये जास्त आहे.

आम्ही श्री. दीक्षित यांना गप्पा मारताना विचारले, "एखादा चांगला किंवा वाईट अनुभव सांगा." तेव्हा ते म्हणाले, "इच्छा तेथे मार्ग. व्यवसायात तर चढ-उतार हे येतातच. पण आपले उद्दिष्ट किंवा ध्येय निश्चित असेल तर कशी काय अडचण येईल?"

संस्थेतील स्त्री कामगारांविषयी बोलताना ते म्हणाले, "स्त्रीला तिचे कुटुंबातील स्थान मिळावे यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. आजची स्त्री दुबळी नाही. तिलादेखील तिचे स्वातंत्र्य आहे."

★★

# Behind My Compound

**Smita Mishra,** M. A., English

Behind my compound
I sowed a seed
It grew into a plant,
And afterwards a tree.
It made me joys and happy.
When the importance of life
enlightened me.

To convey everyone
Save the environment
with the message,
"Grow more trees".

★★

# नवोदित लेखक

**सारिका प्रकाशराव कांबळे,** प्रथम वर्ष कला (अ)

मी आहे नवोदित लेखक
मीच माझा समीक्षक
मीच माझा प्रेक्षक
मीच माझा परीक्षक
कारण मी आहे नवोदित लेखक
घराच्या चार भिंतीत
माझे लिखाण कुजत पडणार
दोन पुठ्ठ्यांच्या वहीत नवीन ओठ
माझे लिखाण अंतर करणार
कारण मी आहे नवोदित लेखक
जिथे मोठ्यांच्या लिखाणाला किंमत
तिथे माझी काय हैसियत
कारण मी आहे नवोदित लेखक
मनात येते मी लेखक व्हावे
पुन्हा वाटते
धुळीसाठीच का मी लिखाण करावं?
कारण मी आहे नवोदित लेखक
मोठ्यांच्या लिखाणातून
म्हणे मोती पाझरतात
आमच्या लिखाणाला
काय काटे फुटतात?
का?
तर म्हणे मी आहे नवोदित लेखक

★★

# माझा आवडता साहित्यिक

**अश्विनी ज्ञा. जाधव,** प्रथम वर्ष कला

नावाच्या केवळ आद्याक्षरांनीच लोक ज्यांना ओळखतात अशा मोजक्या साहित्यिकांपैकी असणारे दोन प्रथितयश साहित्यिक म्हणजे ग. दि. मा. आणि पु. ल.

माझे आवडते साहित्यिक पु. ल. ऊर्फ पुरुषोत्तम लक्ष्मण देशपांडे हे होत. लोकप्रियतेच्या लाटेवर आरूढ झालेले हे व्यक्तिमत्त्व तसे अघळपघळच. ढगळ खादीचा झब्बा आणि लेंगा, भरपूर बोलणं, चेहऱ्यावर भोळसट भाव आणि लहान मुलाची निरागसता. जसे बोलणे तसेच लिहिणे आणि जसे लिहिणे तसेच वागणे असणारे हे एक आगळे साहित्यिक होते.

पु. लं. नी विविध लेखनप्रकार हाताळले आहेत. त्यांनी विविध नाटके लिहिली. सुंदर मी होणार, अंमलदार, तुझे आहे तुजपाशी, तीन पैशांचा तमाशा ही त्यांची गाजलेली नाटके. या नाटकांतील त्यांच्या व्यक्तिरेखांमधून पु. लं. चा जीवनविषयक दृष्टिकोण व्यक्त होतो. चिंतनाची डूब असलेला विनोदी लेखक अशी पु. लं. ची ख्याती आहे. कारुण्याची झालर असलेला पु. लं. चा अंतू बर्वा मनाला चटका लावून जातो.

अपूर्वाई, पूर्वरंग ही पु. लं.ची गाजलेली प्रवासवर्णने वाचताना पु. लं.सोबत आपणही जगप्रवासाला गेल्याचे समाधान मिळते. पु. ल. स्वतःच्या विनोदी शैलीत एकेका स्थळाचे वर्णन, तेथील चालीरीती यांच्याशी आपला परिचय करून देत असल्याचा भास होतो.

पु. लं. च्या 'बटाट्याची चाळ' या पुस्तकातून मध्यमवर्गीय वर्गात त्यांची प्रतिभा विहार करताना दिसते. ते नव्या साहित्यिकांनाही दाद देतात. नवोदित, तरुण लेखक, दलित साहित्यिक यांना पत्राद्वारे आत्मीयतेने आपली मते कळवतात.

पु. ल. हे केवळ साहित्यिक नव्हते तर ते उत्तम नट, दिग्दर्शक, संगीतकार होते. 'गुळाचा गणपती' हा त्यांचा गाजलेला चित्रपट. कथानकाच्या क्षेत्रातही त्यांनी आपले वेगळे स्थान निर्माण केले होते. पु. लं. च्या व्यक्तिमत्त्वातला सामाजिक जाणिवेचा भागही लक्षणीय आहे. पु. लं. नी लेखनातून व कार्यक्रमांमधून मिळालेल्या पैशांतून काही रकमेचा विश्वस्तनिधी उभा केला. हा पैसा त्यांनी पुणे येथील विद्यार्थी गृह, अंधशाळा, कुष्ठकाम, रुग्णालये इत्यादी सार्वजनिक सेवाकार्याला दिला.

पु. लं.ना शाळेविषयी, छड्या मारणाऱ्या मास्तरांविषयी राग असावा. 'बालपणीचा काळ सुखाचा' या त्यांच्या लेखात ते बालपणीच्या स्वच्छंदी आणि सुखी जीवनाचे वर्णन करतात. त्यांनी 'एका मोर्चाची गोष्ट' या लेखात मास्तरांचे केविलवाणेपण रंगवले आहे. व्यक्तींच्या विविध स्वभावांचे दर्शन 'व्यक्ती आणि वल्ली' या पुस्तकातून घडते.

शब्द, सूर, भावना श्रोते आणि वाचकांपर्यंत पोचवण्यासाठी अनेक कलामाध्यमे परिणामकारकपणे हाताळणाऱ्या, साहित्यिकांमध्ये वेगळेपणाने उठून दिसणाऱ्या ह्या साहित्यिकाने आणीबाणीच्या काळात अत्यंत मोलाचे कार्य केले.

पु. लं. ची 'प्रेमाचा गुलकंद' ही कविता खूप

लोकप्रिय झाली. या कवितेमधून त्यांनी प्रेमाविषयी विनोदी भावना व्यक्त केल्या. त्यांनी सर्वोदयी नेते जयप्रकाश नारायण यांच्या डायरीचे मराठी रूपांतर करून दिले. निवडणुकांच्या वेळी आणीबाणी लादून स्वातंत्र्य हिरावून घेणाऱ्या प्रचंड शक्तीसमोर आव्हान देत त्यांनी जनजागृती केली. त्यांनी कधीही लाचारी पत्करली नाही किंवा कधीही तत्त्वांशी तडजोड केली नाही.

केवळ साहित्यिक म्हणून नव्हे तर व्यक्ती म्हणूनही त्यांचे समाजातील स्थान फार उच्च आहे. पु. ल. हे माझे आवडते साहित्यिक आहेत. त्यांच्यासारखा सर्वगुणसंपन्न साहित्यिक दुर्मिळच ! जशी कस्तुरी !

★★

## What is a Friend?

**Latika Chavan,** S. Y. B. Sc. (A)

A Friend is a person of great understanding, who shares all yours hopes & our schemes.
A Companion who listen with infinite patiences to all of your hopes & our dreams.
A true friend can make all our fears melt away with the touch of a handor a smile
And with dam occurance make everything brightes.
And life seen more worth while a friend shares so many bright moments of laughter at even the finite things.
What memorable hours of light heartest gladness. What pleasure the shareing can bring.

★★

## तुझं माझं प्रेम

**मधुरा जोशी,** तृतीय वर्ष वाणिज्य (ब)

आलात आयुष्यात आमच्या
करून प्रेमफुलांची बरसात
दिली कलाटणी जीवनाला
होऊन नवी वाट आमच्यासवे

तुमच्याकडूनच तर शिकलो आम्ही,
प्रेम करावयास आणि
झाला उलगडा या मोहमयी चीजेचा
कळून चुकले, प्रेम म्हणजे काय...
माफी असावी आम्हाला
लागला समजायला वेळ जरी,
तरी उमगले सर्व काही

न व्हावी चूक आमची
तुम्हाला समजून घेण्यात,
सार्थ ठरावा आमचा
तुमच्यावरील विश्वास

तुमच्या एका नजरेपरीस
झालो घायाळ आम्ही,
न राहिला बांध मनावर
आणि तुमचेच झालो आम्ही

नाही देऊ शकत
आयुष्यभर वचन साथीचे
देऊ निभावून साथ
असू जोपर्यंत तुमच्यासवे

★★

# सन २००२ : चमत्कारांचे वर्ष

**मिलिंद बबन कांबळे,** तृतीय वर्ष कला

सामान्यतः प्रत्येक वर्षी अनेक घटना घडत असतात. त्यातील काही चांगल्या तर काही वाईट असतात. सन २००२ मध्ये आपल्याला बऱ्याच समस्यांना तोंड द्यावे लागले असले तरी काही आश्चर्यकारक गोष्टीही घडून आल्या.

जपानी कंपनीने एक असे यंत्र शोधून काढले ज्यामुळे कुत्र्याच्या बोलीचा अनुवाद मानवी भाषेत करता येतो. या कंपनीच्या दाव्यानुसार एका कुत्र्याला घेऊन ते भुंकले असता त्या यंत्राने कुत्र्याला नाचण्याची व बागडण्याची इच्छा झाली आहे असे सांगितले आहे. त्यानुसार कृती केली असता तो कुत्रा आनंदीत झाला परंतु त्या यंत्राच्या सांगण्यानुसार कुत्रा असंच बोलला असेल की नाही हे कुत्राच सांगू शकेल नाही का?

याच वर्षी फेब्रुवारीमध्ये अमेरिकन राष्ट्राध्यक्ष बिस्कीट खाता खाता ते घशात अडकल्यामुळे बेशुद्ध पडले. पण काही काळच. त्या वेळी त्यांची दोन्ही कुत्री त्यांचे तोंड चाटत होते. त्यांना असे कसे झाले विचारले असता बुश म्हणाले, ''माणसाने कधीही बिस्कीट पूर्ण चावल्याशिवाय गिळू नये नाहीतर माझ्यासारखे बेशुद्ध होण्याची वेळ कोणावरही येऊ शकते.'' बुश यांच्याबद्दलच बोलत आहोत तर एक गोष्ट नमूद करावीशी वाटते. बऱ्याचदा चूक एक माणूस करतो व त्याची शिक्षा अनेकांना भोगावी लागते. असेच काहीसे बुश जपानमध्ये असताना झाले. बुश यांना म्हणायचे होते जपानमध्ये चलनवाढीच्या दरात घट झाली आहे. परंतु ते म्हणाले जपानी चलनाचे अवमूल्यन झाले आहे. त्यामुळे घोटाळा असा झाला की सर्व अमेरिकन व जपानी शेअरबाजार अचानक गडगडले. अमेरिकन अधिकाऱ्यांनी या चुकीची दुरुस्ती केली तरीही झालेले नुकसान भरून येईल का?

या वर्षी फक्त मानवाने चमत्कार केले असे नाही तर काही प्राण्यांनीही चमत्कार केले. केनियामध्ये एका सिंहिणीने दोन हरणांची पिल्ले दत्तक घेतली. परंतु थोड्याच दिवसांत एका सिंहाने त्यांच्यावर ताव मारला. त्या सिंहिणीला वाईट वाटले. तिने पुन्हा एक हरीण दत्तक घेतले परंतु तेथील अधिकाऱ्यांनी त्या सिंहिणीपासून त्या हरणाला सोडविले. याचे कारण त्या अधिकाऱ्यांनी असे सांगितले ती सिंहीण त्या हरणाला मांसाहार करायला लावत असे आणि सिंहापासून त्याला धोका होताच की.

आज जगात विरोध प्रकट करणाऱ्या अनेक पद्धती प्रचलित आहेत. उदा. संप, मोर्चा, उपोषण इत्यादी. परंतु व्हेनेझुएलामधील लोकांनी तेथील राष्ट्रपतींविरुद्ध निदर्शन करण्यासाठी घरातील ताटे व इतर भांडी आणून सर्वत्र वाजवण्याचा उपक्रम सुरू केला. तेथील एका निदर्शनकर्त्याला विचारले असता त्याने सांगितले की, ताटे आणि भांड्यांचा आवाज फार मोठ्याने केल्यामुळे आंदोलन सगळीकडे लवकर पसरते.

थोडक्यात, मानव आणि इतर प्राणी आपल्या विशिष्ट कृतीमुळे इतरांचे लक्ष आपल्याकडे वेधून घेत असतात यालाच आपण चमत्कार असे म्हणतो.

★★

# एक 'फास्ट' मुलाखत

मुग्धा किशोर लेले, प्रथम वर्ष कला

आजकालचा जमाना फास्ट आहे. थांबला तो संपला हे आता स्लो मोशन झाले. थांबण्याचा तर प्रश्नच नाही. हळूहळू रमत-गमत चालला तो तर मेलाच अशी हल्लीची अवस्था आहे.

जमाना फास्ट आहे म्हणजे काय हे समजून घ्यायचे असेल तर मुंबईमध्ये लोकल किंवा बसने प्रवास करावा. आपण स्टॉपवर उभे असतो. हव्या त्या नंबरची बस येताना दिसली की, कपडे-बिपडे नीट करीत, हातातली पिशवी सांभाळत, आपल्या खिशातले पाकीट सुरक्षित आहे ना याचा अंदाज घेत, पुढे व्हावे... तोपर्यंत बस निघून गेलेली असते.

बससारख्याच यशस्वी व्यक्तींच्या मुलाखतीही हल्ली फास्ट असतात. छोटे-छोटे प्रश्न, त्यांची छोटी-छोटी उत्तरे. बरं ! हे प्रश्नही काही गहन, गंभीर वगैरे नसतात. हलके-फुलके, वरवरचे प्रश्न. उदा. सुटीचा दिवस कसा घालवता? (बहुतेकांचे या प्रश्नाचे उत्तर - 'सुटी मिळतच नाही' असे असते) काय वाचता? कोणता रंग आवडतो? छंद कोणते... असे जुजबी प्रश्न असतात. अलीकडे पाहिलेला आणि आवडलेला चित्रपट कोणता? याचे उत्तर फायर बॉल किंवा रेन ट्री किंवा डार्क नून असे वाचकाला चकित करणारे असते. कारण ही नावे सामान्य वाचक प्रथमच ऐकत असतो.

आम्हीही अशीच एक फास्ट मुलाखत घ्यायचे ठरवले. ज्यांची मुलाखत घेतली ती व्यक्ती राजकारणी होती. राजकारणातील व्यक्तींबद्दल हलके-फुलके वाचायला लोकांना आवडते म्हणून ही व्यक्ती निवडली.

त्या फास्ट मुलाखतीची ही 'शॉर्ट' झलक.

आम्ही : ''आपलं संपूर्ण नाव?''

व्यक्ती : ''अमुक, अमुक, अमुक.''

आम्ही : ''काही टोपणनाव वगैरे आहे का?''

व्यक्ती : ''दादा, बाबा, आबा... कोणी काहीही म्हणतं. विरोधक तर काहीही नावं ठेवतात. पण आम्ही तिकडं लक्ष देत नाही.''

आम्ही : ''राजकारणात शिरायचं हे पहिल्यापासूनच ठरवलं होतं का?''

व्यक्ती : ''नाही, तसं आम्ही बरेच धंदे करून पाहिले, पण त्यात मन रमेना. म्हणून शेवटी राजकारणात शिरणं झालं.''

आम्ही : ''आपल्या जीवनावर कोणाचा परिणाम झाला असं वाटतं?''

व्यक्ती : ''म. गांधी, टॉलस्टॉय आणि आणखी एक आहेत पण त्यांचं नाव आता आठवत नाही.''

आम्ही : ''महात्माजींची राहणी किती साधी होती. आपण आता जिथं बसलोय ते तुमचं घर म्हणजे तर साक्षात राजवाडाच ! हे कसं काय?''

व्यक्ती : ''अहो, काळाप्रमाणं माणसानं बदलायला हवं. शिवाय गांधीजींची राहणी आम्ही सोडली असली तरी विचारसरणी सोडलेली नाही.''

आम्ही : ''लांड्या-लबाड्या कराव्या लागल्या काय?''

व्यक्ती : "(रागानं) तुम्हाला विरोधी पक्षानं आमच्या मुलाखतीसाठी पाठवलं आहे काय? भलतं-सलतं काय विचारताय?"

आम्ही : "राहिलं ! हा प्रश्न सोडून द्या. आता पुढचा प्रश्न संकटाच्या वेळी कोणाची आठवण येते?"

व्यक्ती : "दिल्लीत बसलेल्या पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांची."

आम्ही : "देव वगैरे मानता की नाही?"

व्यक्ती : "त्या, त्या वेळेच्या परिस्थितीवर अवलंबून आहे. नक्की असं काही सांगता येत नाही. कधी मानतो, कधी नाही."

आम्ही : राजकारणात आल्याबद्दल खेद वाटतो की समाधान वाटतं?

व्यक्ती : "खेद कशाला वाटेल? संतोष ! परम संतोष वाटतो. हेच तुमच्या प्रश्नाचं उत्तर आहे. नाही तर आम्ही इथं कशाला राहिलो असतो?"

आम्ही : "विशेष आवडीचा असा खाण्याचा पदार्थ कोणता?"

व्यक्ती : "राजकारणातल्या माणसांनी हे आवडतं, ते आवडत नाही असं म्हणून चालत नाही. मिळेल ते खाण्याची तयारी ठेवावी लागते."

आम्ही : "ज्यांच्याबद्दल कृतज्ञता वाटते अशा कोण व्यक्ती आहेत?"

व्यक्ती : "स्वामी XXXXX महाराज आणि पक्षातील वरिष्ठ नेते."

आम्ही : "तुमच्या जीवनातील सर्वांत आनंदाची घटना कोणती?"

व्यक्ती : "पहिल्यांदाच आमदारकी मिळाली ती."

आम्ही : "आणि सगळ्यात दुःखद घटना?"

व्यक्ती : "आम्ही निवडणुकीत पडलो ती. अर्थात पक्षानं आमची अन्यत्र सोय केल्यानं दुःख कमी झालं हा भाग वेगळा."

आम्ही : "छंद कोणकोणते आहेत?"

व्यक्ती : "तसे बरेच आहेत, पण हल्ली कशालाच वेळ मिळत नाही. तुम्हाला ऐकून आश्चर्य वाटेल, पण हल्ली मला विचार करायला सुद्धा वेळ मिळत नाही." (स्वतःच हसतात)

आम्ही : "तरुणांसाठी काही संदेश ?

व्यक्ती : "व्वा ! चांगला प्रश्न विचारलात. मी त्याचीच वाट पाहत होतो. 'शोधा म्हणजे सापडेल' हाच माझा तरुणांना संदेश आहे.

आम्ही : "काय शोधायचं?"

व्यक्ती : (जांभई देत) "सापडेल ते !"

★★

---

लिखो तो कुछ ऐसा लिखो कि
कलम रोने पर मजबूर हो जाये
हर शब्द मे वो दर्द पैदा कर दो, कि
गजल बनने पर मजबूर हो जाये।

**अपर्णा जाधव,** द्वितीय वर्ष शास्त्र

★★

# मैत्री

**ज्योत्स्ना प्रकाश देडगे**, प्रथम वर्ष कला

मैत्रीविषयी आपण आजपर्यंत बरेच काही वाचत आलो आहोत. एखादा मुलगा एखाद्या मुलीच्या किंवा एखादी मुलगी एखाद्या मुलाच्या मैत्रीचा वेगळा अर्थ घेऊन 'एकतर्फी' प्रेमाच्या जाळ्यात अडकतात. आणि योग्य तो प्रतिसाद न मिळाल्यास त्या व्यक्तीचा, मैत्रीचा जीव घेतात. खरंच, आजच्या या तरुण पिढीला मैत्री म्हणजे काय? हेच ठाऊक नाही. आजच्या चित्रपटांतही प्रथम मैत्री... प्रेम ... प्रेमविवाह अशी रचना असते. त्यामुळे आजची तरुण पिढीही असेच वागण्याचा प्रयत्न करते. मी मैत्रीविषयी स्वतःचे मत मांडत आहे.

मी असे मानते की, अतूट मैत्री ही आपल्या जीवनाचा आधार असते. मैत्री ही नेहमी निरपेक्ष असावी. सापेक्ष मैत्रीतून सूडाच्या भावना निर्माण होतात. मैत्रीमध्ये सहवासाला थोडे तरी महत्त्व असेलच. जुन्या लोणच्यासारखी जुनी मैत्री मुरत जाते. अशा या मैत्रीत एकमेकांचे स्वरूप एकमेकांना समजलेले असते. त्यामुळे आपल्या मित्रासमोर आपणांस स्वतःची प्रतिमा उभी करावी लागत नाही. आपण जसे आहोत तसे निर्भयपणे तेथे उभे राहतो.

लेखक ना. सी. फडके यांनी आपल्या 'मित्र' या पाठात खरी मैत्री कशी असते? हे विद्यार्थ्यांना समजावून सांगण्याचा प्रयत्न केला आहे. आपल्या पाठात त्यांनी असे लिहिले आहे की - 'मित्र म्हटला की तो सदैव आपली प्रशंसा करणाराच पाहिजे, अशी सामान्य कल्पना असते. परंतु, प्रशंसा आणि मित्रभाव या दोन्ही भिन्न गोष्टी आहेत. वीणेच्या तारांवरून केव्हाही बोट फिरवले तरी त्यातून आपणाला आल्हाद देणारा मधूर नादच निघतो. पण खऱ्या मित्राच्या हृदयाच्या तारा तशा नसतात. आपण सत्कृत्य केले तर त्या तारांतून गौरवाचे गोड शब्द निघतील, पण आपण चुकत असलो तर अनुशासनाचा गंभीर शब्द त्यातून निघाल्याशिवाय राहणार नाही.

खरा मित्र सूर्यासारखा असतो. त्याच्या सान्निध्यात असताना पूर्ण प्रकाशात असल्याचा भरवसा आपल्या मनाला वाटत असतो. व त्याच्या साक्षीने वावगे कृत्य करण्याची आपल्याला शरमच वाटते. त्या त्या प्रसंगी धीरगंभीर शब्द, प्रेमळ उत्तेजन, सहानुभूतीमय सांत्वन व कठोर उपदेशवाणी ज्याच्याकडून लाभते, तोच खरा मित्र. आपल्याला सुखविण्याच्या वेळी तो कुसुमाहून मृदू असतो आणि आपल्याला जागृत ठेवण्याच्या वेळी तो वज्राहून कठीण होतो'.

अशा प्रकारे लेखक ना. सी. फडके ह्यांनी खऱ्या मित्राचे वर्णन केलेले आहे. जन्मतःच आपण काही अतूट अशा नात्यांनी बांधलेलो असतो. त्यापैकीच 'मैत्री' हे एक नाते ! आणि आपल्या आयुष्यरूपी प्रवासात ते प्रत्येकालाच कोणत्यातरी वळणावर येऊन भेटते. फरक एवढाच की, काहींना ते लवकर भेटते तर काहींना उशिरा... आयुष्यरूपी प्रवासात आपणांस अनेकजण भेटतात, त्यांच्याशी ओळख होते, पण आपण केवळ अशा या तोंडओळखीलाच 'मैत्री' हे नाव देऊन टाकतो. केवळ तोंडओळख असणे आणि खरी मैत्री यात जमीन-आसमानाइतका फरक आहे.

महाविद्यालयात आपण 'फ्रेंडशिप डे' साजरा करतो. मैत्री ही अशी साजरी करण्यासारखी गोष्ट नव्हे. या 'फ्रेंडशिप डे' च्या दिवशी एखादा मुलगा एखाद्या मुलीस किंवा एखादी मुलगी एखाद्या मुलास 'फ्रेंडशिप

बँड' बांधून मैत्रीची भीक मागतात, असे म्हणायला हरकत नाही. मैत्री ही अशी एखाद्याकडून मागून मिळणारी गोष्ट खचितच नाही. मैत्री ही सहवासातून, विचारांच्या जुळणीतून निर्माण होते. आणि अशी अतूट मैत्री आपल्या जीवनातील अनेक संकटांवर मात करू शकते. मैत्रीपुढे आपली प्रतिमा उभी करावी लागत नाही. या साध्या स्वाभाविक संबंधातून आपल्याला एक स्थैर्य लाभते. भोवतालच्या अस्थिर, मतलबी जगात मैत्रीची अशी स्थाने म्हणजे आपला एक आधार असतो. मयसभेप्रमाणे जमीन समजून पाय टाकावा तर तो पाण्यात खोल जावा आणि पाणी समजून पाय टाकायला जावे तर तेथे टणक अशी जमीन असावी, असे मैत्रीत घडत नाही. म्हणून मैत्रीचे असे एखादे तरी ठिकाण माणसाला हवेच.

मैत्री ही वडाच्या झाडासारखी असते. विश्वास हे या झाडाचे मूळ असते. आणि या झाडाच्या पारंब्या, फांद्या म्हणजे सहवासातून आणि विचारांच्या जुळणीतून वाढत जाणारी मैत्री. या पारंब्या जमिनीत गेल्यावर त्यापासून दुसरे वृक्ष तयार होतात. म्हणजे त्यांची अतूट मैत्री बनते.

★★

## True Friendship

**Latika Chavan, S. Y. B. Sc.**

Friends are those, who learn to share in one another's happiness, in their deepest secrets and their fondest dreams.
A close friendship doesn't just happen, if takes time to build, the kind of trust & respect.
THANKS FOR BEING MY ALL FRIEND.

★★

## कातर वेळी

**अश्विनी सुधाकर मते,** द्वितीय वर्ष कला

सायंकाळी कातर वेळी
दिवस रात्रीच्या उंबऱ्यावरती
मन माझं काहूरतं
कातर वेळच्या वाऱ्यावरती

वाऱ्यासंगे मन माझे
सैरावैरा धावते
आठवणींमध्ये मग तुझ्याच
आठवणींशी स्पर्धा लागते

क्षितिजावरती रंग
अनेक विखुरतात
तुझ्या आठवणीही
अशाच आठवतात

तुला आठवायला
तू कधी विसरलाच नव्हतास
फक्त आता सोबत नाहीस
म्हणून आठवणीच आठवत असतात

नाही दिवस संपलेला
नाही रात्र झालेली
तू माझा, मी तुझी
गोष्ट अपूर्ण राहिलेली

कधीतरी ही गोष्ट पूर्ण कर
हीच तुला विनंती
अशाच एखाद्या कातर वेळी
मी असावे तुझ्यासंगती

★★

# विद्यार्थ्यांची गरज

**अश्विनी ज्ञा. जाधव,** प्रथम वर्ष कला

खरंच ! आज मूल दोन वर्षांचे होते न होते तोच त्याचे विद्यार्थिजीवन सुरू होते आणि ते इवलेसे मूल त्याच्या परीराज्यात रममाण होण्याच्या वयात असताना पालकांना मात्र भीषण समस्यांना सामोरे जावे लागते. त्यांच्या सत्त्वपरीक्षेला सुरुवात होते. विद्यार्थिदशा सुरू झाल्यावर मुलाची देखील सत्त्वपरीक्षा सुरू होते. शाळेविषयी, अभ्यासाविषयी, मित्रांविषयी, शिक्षकांविषयी त्याच्या मनात भीती निर्माण होते. या वेळेस मुलाला समजून घेणारे, त्याच्या समस्या सोडविणारे, त्याच्याशी विचारांची देवाण-घेवाण करणारे कोणीतरी असावे लागते. या वेळेस विद्यार्थ्याला मार्गदर्शकाची गरज असते.

मार्गदर्शक विद्यार्थ्यांच्या वेगवेगळ्या विषयांबाबत असणाऱ्या समस्या समजून घेतात व त्या सोडविण्याचा प्रयत्न करतात. ज्या वयात विद्यार्थ्याला काहीही कळत नसते अशा वयात आई-वडील मुलांना आयुष्यात मोठे बनविण्यासाठी मातृभाषा सोडून इंग्रजी माध्यमाच्या शाळेत घालतात. मूल काही दिवस हे ओझे वाहते. पुढे त्याला हे ओझे असह्य होते व ते भाषा व ज्ञान शिकण्याचे नाकारू लागते. याचे पर्यवसान मूल शाळेमध्ये मागे पडण्यात होते. शाळेत शिक्षक व घरी आई-वडिलांच्या बोलण्यामुळे त्याच्यामध्ये न्यूनगंडाची भावना निर्माण होते व त्याला काय करावे ते समजत नाही. या निराशेतून त्याला बाहेर काढण्यासाठी विद्यार्थ्याला समजून घेणाऱ्याची गरज असते. मार्गदर्शक विद्यार्थ्याची बौद्धिक कुवत लक्षात घेऊन त्याला त्याचा अभ्यासक्रम निवडण्यास स्वातंत्र्य देतात. तसेच विद्यार्थ्याला त्याच्या अभ्यास करण्याच्या पद्धतीमध्ये योग्य बदल सुचवितात. अशा रीतीने ते विद्यार्थ्यांचा मार्ग सोयीस्कर बनवतात.

शालेय विद्यार्थिदशेतील जीवन पूर्ण झाल्यावर मुलापुढे सर्वांत महत्त्वाचा प्रश्न म्हणजे दहावीनंतर कोणती शाखा निवडावी? प्रत्येक विद्यार्थ्याचे आयुष्यात कोणी मोठे बनण्याचे स्वप्न असते. पण त्याच्यामध्ये ती कुवत आहे किंवा नाही हे त्याला माहीत नसते. तसेच काही विद्यार्थी बौद्धिकदृष्ट्या उच्च असूनही त्यांना स्वतःबाबत आत्मविश्वास नसल्याने असे विद्यार्थी चुकीची शाखा निवडतात. नंतर जेव्हा त्यांना त्यांची चूक कळते तेव्हा खूप उशीर झालेला असतो. अशा वेळेस विद्यार्थ्याचे चालू वर्ष वाया जाण्याची शक्यता असते. म्हणून कोणतीही शाखा निवडण्याआधी मार्गदर्शन केंद्रामध्ये जाऊन योग्य सल्ला घ्यावा. मार्गदर्शक योग्य कुवत लक्षात घेऊन कोणती शाखा निवडावी याबाबत मार्गदर्शन करतात. तसेच एखादी विशिष्ट शाखा निवडल्यावर त्याच्या अभ्यासातून पदवी मिळवून उच्च पदापर्यंत कसे जाता येईल याबद्दल मार्गदर्शन करतात. मार्गदर्शकामुळे विद्यार्थ्याचा मार्ग निश्चित होतो व तो त्या दिशेने प्रयत्न करतो.

प्रत्येक विद्यार्थ्याच्या अंगी काही सुप्त गुण असतात. त्या सुप्त गुणांची कल्पना खुद्द त्या विद्यार्थ्यालाही नसते. उदा. एखाद्या मुलाची चित्रकला खूपच सुंदर असते व ती काही विशिष्ट प्रसंगी व्यक्त होत असते. एखादा विद्यार्थी रसायनशास्त्र शिकत असतो. पण त्याला यंत्र उत्तमरित्या हाताळता येते. त्याच्या अंगी असणाऱ्या या सुप्त क्षमतेची जाणीव त्याला करून दिली तर विद्यार्थी आपल्या गुणांचा वापर योग्य ठिकाणी करून यश मिळवू शकेल.

विद्यार्थ्याला मार्गदर्शकामुळे कोणती शाखा निवडावी? एखाद्या विषयाचा अभ्यास कसा करावा? कोणत्या गुणांचा कोणत्या क्षेत्रात उपयोग केला जाईल? ध्येय कसे प्राप्त करावे? या प्रश्नांची उत्तरे मिळाली आहेत. एखादे ध्येय निश्चित झाल्यावर, त्या ध्येयापर्यंत जाण्याचा मार्ग मिळाल्यावर विद्यार्थ्याचे मन विचलित न होता तो विशिष्ट अभ्यास करून एखाद्या क्षेत्रात यश मिळवतो हे निश्चितच आहे. यासाठी विद्यार्थ्याला योग्य वेळी मार्गदर्शकाची गरज असते. योग्य मार्गदर्शक मिळाल्यास यश हे विद्यार्थ्याचेच असते.

★★

## दिवा

**अर्चना मनगुळीकर,** प्रथम वर्ष शास्त्र (ब)

जन्म, अस्तित्व, वाढ, बदल, झीज आणि मरण अशा दिव्याच्या जन्मापासून मृत्यूपर्यंतच्या सहा अवस्था आहेत.

दिवा जन्मजात आत्मप्रकाशी असतो. दिव्याच्या जळण्यातले मौन आपण जपायचे असते. दिवा जळताना कुरकुरत नाही. अकारण चिडचिड करीत नाही. दिवा दुसऱ्यांना काही देताना रडत नाही. तो काळाला झुलवतो, वस्तूंशी बोलतो, विश्वाला आपलेसे करतो. मनामनांच्या प्रकाशगंगेत एकमेकांशी, एकमेकांच्या संगतीने वाढायचे असते. सुरांच्या संगतीतून गाणे घडते तसे, याला - दिव्याने दिवा लावणे असे म्हणतात.

हा प्रकाश नयनांच्या वाटे मनातल्या घरात राहावा नाहीतर तो आपले आत्मिक जीवन नष्ट करतो आणि खऱ्या जीवनाला आपण मुकतो.

★★

## पेराल तेच उगवेल

**दत्तात्रय आव्हाड,** प्रथम वर्ष कला (अ)

शिक्षक हा मानवी जीवनातील एक आगळा-वेगळा शिल्पकार असतो. शिल्पकार हा आपल्या कलाकौशल्यातून समाजापुढे येतो. तसा शिक्षक (गुरू) हा आपण आत्मसात केलेले ज्ञान आपल्या विद्यार्थ्यांना देतो. त्याचे स्थान हे समाजात इतरांपेक्षा वेगळे असते. ही अशीच एका शिक्षकाची कहाणी आहे.

एक व्यक्ती जीवनातील आपला शिक्षकी पेशा निवडून स्वतः ज्ञान घेऊन इतरांना देते. आपले जीवन त्या व्यवसायात रमवते. कालांतराने तो शिक्षक आपल्या व्यवसायातून निवृत्त होतो. त्याला आपल्या उत्तर काळात पत्नीला गमवावे लागते. त्याचे मुलगा व मुलगी आपापल्या संसारात गुंग असतात. वृद्धावस्थेत त्याला निराधार राहावे लागते. स्वतः स्वयंपाक करणे आणि आपला उदरनिर्वाह करणे असा त्याचा दिनक्रम चालू असतो. ह्या जीवनाला तो त्रासतो. आपली जीवनज्योत मालवण्यापूर्वी एकटे राहण्यापेक्षा काहीतरी गुन्हा करून पोलिसांनी पकडून तुरुंगात ठेवावे, असे त्याला वाटते. तेथे आपले जीवन सोयीस्कर होईल अशी आशा मनात बाळगतो. त्यानुसार तो आपले नियोजन करतो. बरेच नियोजन करून पाहतो पण त्यात त्याला यश मिळत नाही. शेवटी तो एके दिवशी गावात जाऊन गावातील बाजारात जेथे खूप गर्दी असते, तेथे एका तरुण अविवाहित तरुणीचा हात पकडतो. ती तरुणी घाबरून त्यांच्याकडे पाहते तर ते तिचे शिक्षक असल्याचे तिला आठवते. त्यांना आदराने व माणुसकीच्या भावनेने ''चक्कर आली का सर?'' असे विचारते. या नियोजनात तिरस्कार न मिळता आदर मिळतो. कोणत्याही परिस्थितीत तुरुंगात जायचा त्यांचा निर्धार

असतो. तो पूर्ण करण्यासाठी ते सरळ पोलिस स्टेशनवर जाऊन पोलिस अधिकाऱ्याच्या श्रीमुखात भडकावण्याचे ठरवतात. असे करून तरी आपण तुरुंगात जाऊ असे त्यांना वाटते. ते पोलिस स्टेशनवर जातात तेव्हा तेथील पोलिस अधिकारी खुर्चीवर बसून, पाय ताणून सिगारेट फुंकत असल्याचे दृश्य त्यांना दिसते. ते आत जाऊन अधिकाऱ्याला थप्पड मारतात. तेव्हा त्या अधिकाऱ्याला आठवते की, हे आपले शिक्षक होते. तो शिक्षकांना म्हणतो, ''मला माफ करा सर. परत तुमच्यासमोर कधीच सिगारेट ओढणार नाही अशी शपथ घेतो.''

अशा प्रकारे शिक्षकाला आपल्या आयुष्यातील शेवटच्या क्षणापर्यंत आपण दिलेल्या ज्ञानाच्या पाऊलखुणा उमटलेल्या दिसतात. म्हणून शिक्षकाचे समाजातील स्थान हे इतरांपेक्षा वेगळे असते असे जाणवते. आयुष्यात आपण जे पेरले तेच उगवले अशी जाणीव त्याला शेवटी होते. म्हणजेच, आपण आयुष्यात केलेल्या चांगल्या कृतीचा, कर्माचा लाभ आपल्यालाच होतो.

★★

---

गेले ते दिवस
राहिल्या त्या फक्त आठवणी
श्रावणात फुटलेली पालवी
गेली शिशिरात पाने गळुनी

**आकाश राणे**, तृतीय वर्ष कला

★★

# दहा दिवस शिबिराचे

**हेमलता बलकवडे**, द्वितीय वर्ष कला

''अशी पाखरे येती,
आणिक स्मृती ठेवूनी जाती...।

हा भाव सांगत होता करकळवासीयांचा चेहरा, दिनांक १५ डिसेंबर २००२ रोजी. ज्या वेळी आम्ही मॉडर्न महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे शिबिरार्थी दहा दिवस त्या गावात राहून आज परतीच्या प्रवासाला निघालो होतो.

आयुष्यात असे अनेक अनुभव, असे अनेक प्रसंग असतात की जे आयुष्यभर मनाच्या कॅनव्हासवर रंग भरत राहतात. ते एखाद्या कोरीव शिल्पाप्रमाणे मनावर कोरले जातात, आयुष्यभर रेखलेल्या मनाच्या रांगोळीत रेखाटले जातात. असाच माझा एक अनुभव म्हणजे मी केलेले 'राष्ट्रीय सेवा योजनेचे' दहा दिवसांचे शिबिर आणि त्याचे नेतृत्व करण्याची जबाबदारी.

या दहा दिवसांत प्रत्येकालाच कधीही घरात न अनुभवलेले क्षण अनुभवायला मिळाले. सुरुवात सकाळी उठल्यापासून अन् उठवण्यापासूनच होते. घरी कधीही आईच्या हाकेशिवाय न उठणाऱ्या मला शिबिराचे नेतृत्व करणारी म्हणून सगळ्यांच्या आधी उठून इतरांना उठवण्याची जबाबदारी पार पाडावी लागत होती. दिवसाची सुरुवात व्यायाम, सूर्यनमस्कार आणि प्रार्थनेने केल्यावर दिवसभर शरीर आणि मन तंदुरुस्त आणि तजेलदार राहत होते, त्यामुळे व्यायाम व प्रार्थनेचे महत्त्व पटले. तसेच प्रत्येक काम करताना सगळ्यांनी मिळूनच करायचे याचीही जाणीव झाली. 'श्रमदानाचे' म्हणण्यापेक्षा 'श्रमसंस्काराचे' महत्त्व काही आगळेच असते. शहरात कधी पाहायलाही न मिळणारी कुदळ, फावडी, टिकाव ही अवजारे हातात घेऊन दोन-दोन फुटांचे खड्डे - खडक असलेले खड्डे - खणताना जो घाम

गळतो, हाताला जे घट्टे पडतात आणि नंतर त्याचे कौतुक केले जाते तेव्हा त्या श्रमांचे सार्थक झाल्याचे समाधान मिळते.

श्रमदानानंतर भोजनाचा कार्यक्रम. तिथे प्रत्येकाच्या आवडीची काळजी घरच्यासारखी घेतली जात नसली तरी जेवणाऱ्याचा आत्मा तृप्त झालाच पाहिजे यासाठी स्वयंपाकघरातील प्रत्येक शिबिरार्थी झटत असतो. श्रमदानानंतर केलेले भोजन म्हणजे साधी पोळी-भाजी असली तरी ती पंचपक्वान्नाच्या तोडीचीच असते. तसेच भोजन करताना शिबिरातील प्रत्येकजण एकत्र बसून जेवत असतो त्यामुळे कधीही न अनुभवलेले सहभोजन अनुभवायास मिळते. तसेच प्रत्येक गोष्ट, प्रत्येक काम हे घड्याळाच्या काट्याप्रमाणे करायचे असल्याने वेळेचे आणि शिस्तीचे महत्त्व कळते.

व्यायाम, श्रमदान याबरोबरच शिबिरातील शिबिरार्थींचे बौद्धिक ज्ञान वाढवण्यासाठी विविध व्याख्याने आयोजित केली जातात. यावर्षीही अशीच व्याख्याने आयोजित केली गेली.

प्रा. उजळंबकर - प्रदूषण : एक समस्या ; प्रा. निशा भंडारे - सावित्रीबाई फुले; प्रा. सोपान शेंडे - एडस् : युवकांची भूमिका ; प्रा. प्रकाश दीक्षित - राष्ट्रीय सेवा योजना : युवकांचे योगदान; प्रा. आशा परूळेकर - व्यक्तिमत्त्व विकास; प्रा. भारती डोळे - विवाहविषयक कायदे; श्री. प्रदीप आगाशे-कीर्तन-पर्यावरण; श्री.हेमंत निखळ-पसायदान; श्री. आर.जे. पाटील - शिवचरित्र यांचा या वर्षीच्या शिबिरात समावेश होता. या प्रत्येक व्याख्यानातून नवीन विचार, नवीन माहिती मिळाली. त्याबरोबरच श्री. सुहास गुर्जर यांच्या 'आकाशदर्शन' या कार्यक्रमातून 'चंद्र' व 'शनी' हे ग्रह दुर्बिणीतून पाहायला मिळाले. तसेच इतर तारे, नक्षत्रे यांची माहिती मिळाली. ईश्वर दरक यांच्या 'माकडापासून माणसापर्यंत मानवी जीवनाचा इतिहास' या स्लाईड-शो मधून माणसाच्या प्रगतीचे टप्पे कळाले. 'दहावी-फ' हा मराठी चित्रपट शिबिरात दाखवला गेला. क्षमता असूनही केवळ परिस्थितीने यशस्वी न होणाऱ्या विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन व प्रेम मिळाले तर ते निश्चितच यशस्वी होतात हे या चित्रपटाच्या माध्यमातून पाहवयास मिळाले. त्याचबरोबर पथनाट्य प्रशिक्षण व पथनाट्य सादरीकरण याचाही कार्यक्रम घेण्यात आला. गावात सादर करण्यात आलेल्या पथनाट्यांना व समारोपाच्या दिवशी सादर करण्यात आलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमांना गावकऱ्यांनी भरभरून प्रतिसाद दिला. 'एडस्' व 'कचरा' या विषयावर पथनाट्ये सादर केली गेली. गावात घेतल्या गेलेल्या रक्तदान शिबिरालाही उत्तम प्रतिसाद मिळाला. हे शिबिर गावात प्रथमच घेतले गेले.

ग्रामसर्वेक्षणातून गावातील लोकांच्या समस्या समजू शकल्या, त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. त्याचा अभ्यास करून त्यावर उपाय सुचवले गेले. ग्रामसर्वेक्षणातून गावकऱ्यांच्या मनात डोकावता आले, त्यांच्याशी जवळीक साधता आली. त्यांचे गावाविषयी, गावातील राजकीय वातावरणाविषयी विचार आणि अपेक्षा कळाल्या.

हे शिबिर म्हणजे केवळ दहा दिवस मजा करायची, घरापासून, आई-वडिलांपासून दूर मुक्त वातावरणात कोणत्याही बंधनांशिवाय राहायचे यासाठी नसून या दहा दिवसांच्या अनुभवातून काहीतरी नवीन शिकायचे, आत्मसात करायचे यासाठी होते. शिबिरातून प्रत्येक शिबिरार्थीला जबाबदारीची जाणीव होते. इतर कोणीही केले नाही तरी तुमची जबाबदारी आहे, तुमचे कर्तव्य आहे त्यामुळे तुम्हाला दिलेले काम तुम्ही केलेच पाहिजे. इतर कोणाचीही वाट न पाहता आपले काम पूर्ण करून दुसरी जबाबदारी स्वीकारायची हेच यातून शिकायला मिळते.

राष्ट्रीय सेवा योजना म्हणजे ज्ञान, संस्कार आणि सामाजिक बांधिलकी शिकवणारा महाकुंभच आहे. ज्यातून कितीही ज्ञान मिळवत राहिले तरी ते कमीच पडणार आहे. या योजनेमुळेच मी आणि माझे सहकारी पुढे आलो. सर्व उपक्रमांमध्ये हिरीरीने भाग घ्यायला शिकलो. प्रत्येक ठिकाणी आपण पुढे असलेच पाहिजे आणि जिथे आपण असू तिथे प्रत्येक गोष्ट चांगलीच झाली पाहिजे, हे या योजनेने शिकवले. आमच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करण्यात, आम्हाला सर्वतोपरीने घडवण्यात राष्ट्रीय सेवा योजनेचा फार मोठा सहभाग आहे. आम्ही आयुष्यात खरोखरच काहीतरी करून दाखवू असा आत्मविश्वास या योजनेने दिलाय.

या लेखाचा शेवट करताना एका मराठी चित्रपटातील दोन ओळी स्मरतात.

''आई, तुझं लेकरू
येडं गं कोकरू
रानात फसलंय
रस्ता चुकलंय
सांग मी काय करू?''

आमच्यासारख्या आजच्या या जागतिकीकरणाच्या आणि धकाधकीच्या जीवनात (जंगलात) चुकलेल्या कोकरांना समाजाविषयी जागृत करण्याचे कार्य मॉडर्न महाविद्यालयाचा राष्ट्रीय सेवा योजनेचा विभाग नेहमीच करत आलाय आणि अशा या योजनेत सहभागी होण्याची संधी आम्हाला या महाविद्यालयाने, आमचे प्राचार्य गोसावीसर, कार्यक्रम अधिकारी प्रा. येनगेसर आणि प्रा. कांबळे मॅडम यांनी उपलब्ध करून दिली त्याबद्दल त्यांचे शतशः आभार.

★★

नवनवीन अनुभव घेत राहणे आणि त्यातून जीवनात येणाऱ्या अडचणी सोडवणे याची शिकवण शिबिराच्या प्रत्येक कार्यातून होते. आयुष्यासाठी लागणारी शिदोरी शिबिरातून प्राप्त होते. प्रत्येक गोष्ट करताना, कोणतीही सुधारणा करताना त्याची सुरुवात स्वतःपासून करा तरच तुम्ही समाजात काही बदल घडवून आणू शकाल याची जाणीव होते.

## नाती

स्मिता के. मिश्रा, एम. ए., इंग्रजी

नाती असतात जपायची
काही नुसतीच दाखवायची
नाती असतात बुद्धिबळासारखी,
कधी हत्ती तर कधी घोड्याच्या
रूपाने चालवायची.

नाती असतात रक्ताची
तर कधी फक्त मनांची
नाती असतात कोड्यांची
हळुवारपणे सोडवायची
नाती असतात युगायुगाची
तर कधी क्षणांची.

काही नाती असतात अतूट
जाणून ही नाती
असतात जन्मोजन्मी टिकवायची
असं आपलं नातं आहे... अतूट !

★★

## कसं करावं प्रेम?

**अपर्णा जाधव,** द्वितीय वर्ष शास्त्र (अ)

सगळं काही कळतंय
पण तरीही काही वळत नाही.
कसं करावं प्रेम तुझ्यावर
हेच मला कळत नाही.
नयन द्वंद्व वाटतं तुला
बोलणं नजरेचं
कसं टिकवावं माणसानं
हसू चेहऱ्यावरचं?
काहीही झालं तरी तुझ्या मुखावरची
शांती मात्र कधी ढळत नाही.
कसं करावं प्रेम तुझ्यावर
हेच मला कळत नाही.
एकाचे दोन म्हणजे
तुला फक्त गणितच दिसतं
मनात चालू असतं बरंच काही;
पण दाखवायचं सौजन्य नुसतं
मन तर आहे मेणाचं पण
म्हणायचं मी पाघळत नाही
कसं करावं प्रेम तुझ्यावर
हेच मला कळत नाही
हेच मला कळत नाही

★★

## व्हॅलेंटाईन डे कशासाठी?

**सुनीता ज्ञा. कांबळे,** एम. ए., मराठी

आपल्या देशात हल्ली 'डे' साजरे करण्याचे प्रस्थ खूपच वाढले आहे. त्यासाठी महागड्या भेटवस्तू, भेटकार्डे खरेदी केली जातात. अशा नाना प्रकारच्या युक्त्या तरुण मुले-मुली लढवत असतात. त्यातलाच हा एक 'व्हॅलेंटाईन डे' आहे.

हा दिवस साजरा करणे ही पाश्चात्त्य संस्कृतीची प्रथा आहे. त्यांच्या देशात तो त्यांच्या पद्धतीप्रमाणे साजरा होत असतो. पण आपल्याकडे याला निराळेच रूप येऊ लागले आहे. आपल्या देशामध्ये पाश्चात्त्यांचे अनुकरण करणे ही एक फॅशन झाली आहे. त्याला विरोध करणारे बावळट आणि बुरसटलेल्या विचारांचे म्हणून हिणवले जातात. पाश्चात्त्यांचे अनुकरण केल्याने खरंच आपण हुशार होतो का? 'व्हॅलेंटाईन डे' च्या दिवशी प्रिय व्यक्तीला भेटवस्तू दिली जाते. पण मला असे वाटते जी आपली प्रिय व्यक्ती आहे हे तिच्या आणि आपल्या मनाला माहीत असते. मग अशा प्रकारचे वेगळे सोहळे करण्याची काय गरज आहे? हे 'डे' साजरे करणे ही आपली संस्कृती नाही. मैत्री हा प्रदर्शनाचा विषय नाही. मैत्री, प्रेम ही काय एका दिवसासाठी प्रदर्शन म्हणून असते? मैत्री ही सुखदुःखात सहभागी होणाऱ्याची असते. ती प्रदर्शनाची बाब नाही. असे करून आपण आपल्या मैत्रीचा, प्रेमाचा अपमान करतो. हे आपल्या लक्षातच येत नाही.

पाश्चात्त्य लोक इतके प्रगत झालेत की आपण त्यांचे अनुकरण करतो. पण त्याच वेळी आपल्यालाही आपल्या भाषेचा, संस्कृतीचा अभिमान वाटला पाहिजे. आपण चांगल्या गोष्टींचे अनुकरण केले पाहिजे. हे 'डे' आपण जितक्या उत्साहात साजरे करतो. तितक्या

उत्साहात स्वातंत्र्यासाठी बलिदान दिलेल्या स्वातंत्र्यवीरांची पुण्यतिथी, जयंती साजरी करतो का? हा प्रश्न आपण आपल्या मनाला विचारला पाहिजे. ज्याप्रमाणे आपण पाश्चात्त्यांचे अनुकरण करतो, त्याप्रमाणे आपणही अशा काही चांगल्या गोष्टी केल्या पाहिजेत की ज्यांचे अनुकरण पाश्चात्त्यांना करावेसे वाटले पाहिजे. स्व-संस्कृतीचे पालन करणे हे सर्वांचे कर्तव्य आहे. त्याचं अनुकरण करून आपण आपली संस्कृती विसरता कामा नये.

'डे' साजरा करण्यासाठी आपण आपला वेळ आणि पैसा खर्च करत असतो. त्याचा उपयोग चांगल्या कामासाठी केला पाहिजे. ही आजच्या काळात आपली आणि देशाची गरज आहे.

★★

## अनुत्तरीत प्रश्न!

**अर्चना शिरीष देशपांडे,** एम. ए., मराठी

इवलेसे पंख
जहरीला डंख
नजर काळी काळी
अन् कोवळ्या आयुष्याची होळी

पिचलेली बांगडी
भिजलेला पदर
काळजातला सल
अन् परतलेला बहर

मालवलेल्या आशा
विरलेली स्वप्नं
जगणं कशासाठी
अनुत्तरीत प्रश्न !

★★

## मी संतप्त का आहे?

**संगीता शिवाजी पवार,** एम. ए., मराठी

कविवर्य ग. दि. माडगूळकर यांनी मानवी आयुष्याचे फार सुरेख वर्णन केले आहे. ते म्हणतात,

"जो तो आपुल्या जागी जखडे
नजर न धावे तटापलीकडे
उंबरातले किडे मकोडे
उंबरी करिती लीला."

पुरातन काळी मुलगा जन्माला आला की, वंशाचा दिवा मानला जाई, परंतु मुलगी जन्माला आली की, अशुभ मानले जाई व नाराजी व्यक्त केली जात असे. ती मोठी होते तोच आई-वडिलांना तिच्या आयुष्याची म्हणजेच लग्नाची काळजी असते . नवरा मुलगा चांगला हवा असेल तर हुंडा खूप दिला पाहिजे असा गैरसमज गरीब आई-वडिलांचा असतो. मुलगी जन्माला आली म्हटले की, आता खूप पैसा जमा करावा लागणार म्हणजेच खर्चाची तजवीज करून ठेवावी लागणार असा गैरसमज होतो. अशी ही परंपरागत समजूत आई-वडिलांची असते. अशा विचाराने ते दुःखी होतात पण आज एकूणच वधूपित्याची पिळवणूक होत आहे.

आज एकविसाव्या शतकाच्या वाटचालीत स्त्री-पुरुष समानता आहे.स्त्रियांना पुरुषाप्रमाणेच हक्क मिळतात. उदा. जसे राजकारणात स्त्री-आरक्षण प्रश्न मांडून सर्व जातींच्या स्त्रियांसाठी ३३ टक्के राखीव जागा.पूर्वी स्त्रियांसाठी फक्त चूलमूल असे सूत्र वापरले जाई.परंतु आजच्या काळात अगदी चूलमूलपासून ते संगणकासारख्या क्षेत्रातसुद्धा स्त्रियांचा सहभाग दिसून

येतो. भारत हा पुरुषप्रधान संस्कृती असलेला देश आहे. परंतु स्त्रियाही पुरुषांच्या बरोबरीने आपली पावले उचलत आहेत. तरीसुद्धा स्त्रियांना दुय्यम स्थान का दिले जाते? असे का? ह्या प्रश्नांनी मी संतप्त होत आहे.

आजच्या काळात काही लोक स्त्रियांच्या हक्कावर गदा आणत आहेत. आज समाजात बोकाळलेल्या गुंड प्रवृत्तीनेच स्त्रियांचे जीवन प्रदूषित होत आहे. आता काही दिवसांपूर्वीचेच उदाहरण घ्या. अमृता, रिंकू व नीता ह्या सारख्या उदाहरणांवरून समाजात स्त्रियांना काय स्थान आहे? हे स्पष्ट होते. आजच्या काळात स्त्रीला सामाजिक संरक्षणाची अत्यंत गरज आहे. ह्यासाठी समाजाच्या जागरूकतेची आवश्यकता आहे. त्यावर केवळ बंधने व कठोर उपाय केले पाहिजेत. पण केवळ बंधने घालून प्रश्न सुटत नाही तर त्यातूनही पळवाटा निघतात. त्यासाठी कठोर शिक्षेची गरज आहे. एकंदरीत सरकारचे व समाजाचे ह्या प्रश्नाकडे दुर्लक्ष होत आहे हे काही दिवसांपूर्वीच घडलेल्या नीता हेंद्रेच्या प्रकरणावरून दिसून येते. ह्या अक्षम्य दुर्लक्षामुळे मी संतप्त झाले आहे.

समाजाला आपल्या नैतिक जबाबदाऱ्या व सामाजिक जाणिवांचा विसर पडत चाललेला आहे. ह्याची जाणीव समाजाला करून द्यायला हवी. आज काही घडले तरी 'माझे काय जाते?' ही चुकीची भावना समाजात निर्माण झाली आहे.आज त्याच्यावर तर उद्या आपल्यावर अशी वेळ येण्याआधी आपण काहीतरी केले पाहिजे. म्हणतात ना, ''शेळी जाते जिवानिशी खाणारा म्हणतो वातड कशी'' हे बरोबर आहे. एकमेकांना साह्य करून स्त्री संरक्षण केले पाहिजे तरच त्या समाजाला अर्थ आहे नाहीतर ॲरिस्टॉटल निर्माण झाला नसता ! तरीही समाज चाललाच असता. समाज म्हणजे वाळूचा ढिगारा नाही. समाजात प्रत्येकाला एकमेकांशी संबंध ठेवायला लागतो. परंतु आज परिस्थिती वेगळीच आहे. त्यामुळे म्हणावे लागते की, माणूस समाजशील प्राणी आहे व तो समाजाशिवाय राहू शकत नाही. परंतु या विचाराला आज प्रत्येकाने बगल दिली आहे. प्रत्येकाला समाजाची गरज आहे. भ्याड, मुर्दाड व दुबळ्या प्रवृत्तीवर मी संतप्त आहे.

या गोष्टींमुळे मी संतप्त आहे. जर आपल्याला सर्वांगीण विकास हवा असेल तर औद्योगिक आणि आर्थिक प्रगतीबरोबरच सामाजिक प्रगतीही होणे नितांत आवश्यक आहे. समाज जीवनाचा गांभीर्याने विचार करणे गरजेचे आहे. ते होत नाही म्हणूनच अशा निष्क्रिय समाजाचा घटक या नात्याने मी संतप्त आणि उद्विग्न आहे.

★★

## न तुटणारी मैत्री

**दीप्ती सांडभोर,** प्रथम वर्ष वाणिज्य (क)

निळ्या गुलाबी मखमालीत
फुलपाखराच्या इवल्या पंखांनी
मारते माझे मन नाजूकशी भरारी
वाऱ्याच्या लहान झुळकेबरोबर
जाऊ पाहते ते आकाशी
या पंखांची सोबत वाटते मला
'न तुटणाऱ्या मैत्रीसारखी !'

★★

## कलावंताचा आनंद

**मुग्धा किशोर लेले,** प्रथम वर्ष कला (ब)

मराठी रंगभूमीच्या वैभवाचे एक उत्तुंग शिखर म्हणून बालगंधर्वांचा उल्लेख केला जातो, तो यथार्थच आहे. या कलावंताने आपल्या प्रतिभेचा सारा सुंदर आविष्कार रंगभूमीवर केला. सुस्वर आणि सौंदर्य ही त्यांची बलस्थाने होती. कलेवर त्यांची प्राणांतिक निष्ठा होती. सन १९११ मधील घटना. 'मानापमान' नाटकाचा पहिला प्रयोग मुंबईच्या रिपन थिएटरमध्ये ठरला. नाट्यप्रयोगाच्या तीन-चार दिवस आधीच सर्व तिकिटे विकली गेली. पण प्रयोग होण्याच्या आदल्या रात्री बालगंधर्वांची एकुलती एक लाडकी कन्या आकस्मिकपणे मरण पावली. बालगंधर्व त्या दुःखाने कोसळले. 'मानापमान'चा प्रयोग रहीत करावा असा निर्णय काही लोकांनी घेतला. पण बालगंधर्वांनी याला संमती दिली नाही. ते म्हणाले, "नाटक बंद ठेवू नका. ते झालंच पाहिजे. माझ्या वैयक्तिक दुःखासाठी हजारो रसिकांचं सुख हिरावून घेणं मला प्रशस्त वाटत नाही. नाटक हे झालंच पाहिजे." बालगंधर्वांच्या या निर्धाराने इतरांचा निरुपाय झाला.कन्यावियोगाच्या दुःखात असताना या कलावंताने हा प्रयोग करू नये असे हितचिंतकांना वाटत होते. पण नाटकाचा तो पहिलाच प्रयोग विलक्षण यशस्वी झाला. व्यक्तिगत दुःख बाजूला ठेवून बालगंधर्वांनी भामिनीची भूमिका अत्यंत तन्मयतेने रंगवली. आपल्या हृदयातील कारुण्य लपवून शृंगाररसाची ही भूमिका त्यांनी कलात्मक समरसतेने साकार केली. दुःखी मनःस्थितीत असताना हसरी खेळकर भामिनी आपल्या अभिनयातून आणि गायनातून समूर्त करण्याचा एक सुंदर चमत्कार बालगंधर्वांनी केला

## जीवनमंत्र दुःख हेच

**सुनीता ज्ञा. कांबळे,** एम.ए., मराठी

हरलास तू रडलास तू
जीवनास का कंटाळलास तू?
दुःखी नयनांनी भरलास तू
सुखास का मुकलास तू?
जीवनमंत्र विसरलास तू
आज का येथे संपलास तू?
दुःखात हसला होता तू
आज निराश होतोस तू
क्षणभर चुकलास तू
परत हसलास तू
दुःखास सामोरे जा तू
जीवनमंत्रास आठव तू
दुःखात आता हास तू
विजयी होशील पुन्हा तू
नको सोडूस धीर तू
प्रेरीत होऊन पुन्हा तू
दुःखास विसर आता तू
सुखाची वाट पहा तू

★★

मन म्हणतंय जीवनाला माझ्या
उद्या एक नवी दिशा मिळणार
तेव्हाच मरण म्हणतंय
ए माझा विचार कधी रे करणार?

**आकाश राणे,** तृतीय वर्ष कला

★★

होता. त्यांना विचारले गेले की, "मनाच्या अशा अवस्थेत हे कसं शक्य झालं?" तेव्हा बालगंधर्वांनी उत्तर दिले, "रंगभूमीवर मी भामिनी होतो. कन्येचा बाप नव्हतो. माझ्यातील भामिनी बोलत होती, गात होती. आता प्रयोग संपला. आता मी पुन्हा दुःखी बाप झालो." त्यांच्या डोळ्यांतून अश्रू ओघळत होते. एक दुःखी बाप रडत होता. पण त्यांच्यातील कलावंताने नाटक रंगवले होते.

★★

## विरह

**किरण माळशिकारे एम. ए., प्रथम**

वाट पाहतो तुझीच अजूनी
का सोडून गेलीस मज टाकूनी
तू होतीस तेव्हा
सर्व सुखांत होतो भागीदारी
पण तेव्हा तू गेलीस
तेव्हा मी एकटाच दुःखाचा वाटेकरी...
प्रेम आहे तुझ्यावरच साजणी
सांगायच्या होत्या काही आठवणी
बोलायच्या होत्या काही गोष्टी
पण तू गेलीस निघूनी...
होता आत्मविश्वास अजूनी
डोळ्यांत आसवे ठेवूनी
हातात प्रेम देऊनी
तू सोडून गेलीस मज टाकूनी
तू-तू झालीस
अन् मी-मी झालो
वाट पाहतो तुझीच अजूनी

★★

## दिवस असे की...

**आकाश राणे, तृतीय वर्ष कला**

गेले ते दिवस
राहिल्या त्या फक्त आठवणी
श्रावणात फुटलेली पालवी
गेली शिशिरात पाने गळुनी

'दिवस असे की...' या शब्दांवरून आपल्याला आलेल्या कडुगोड अनुभवांची शिदोरी आपल्यासमोर उघडली जाते. असेच आमचे कॉलेजचे दिवस आहेत. येणारा प्रत्येक दिवस हा एखाद्या अलगद, हळुवार जपून ठेवलेल्या मोरापिसासारखा आहे. एखादे सुंदर मोरपीस अलगद फिरवावे तशाच असतात कॉलेजच्या आठवणी. झालेल्या गोष्टी आठवताना मन पुन्हा त्या दिवसांच्या भोवती भटकायला लागते. काळाचे चक्र मागे फिरून पुन्हा त्याच दिवसांमध्ये जावेसे वाटते. मन हे आठवणीच्या गावाचा रस्ता पकडते आणि त्याच वाटेवर आपल्या सोबत्यांना शोधत एकटेच फिरत असते. आयुष्यात प्रत्येकजण एकटा असतो. फक्त सुखदुःख त्याची आपली असतात. दुःखाची धग कमी करण्यासाठी प्रत्येकाला हवी असते निळ्याशार पाण्यासारखी स्वच्छ, निर्मळ मैत्री.

जसजसे दिवस संपू लागले आहेत तसतसे या मित्राबरोबर घालवलेल्या जुन्या आठवणींना अधिकच बहर येऊ लागला आहे. कॉलेजच्या कट्ट्यांवर केलेली धम्माल, एकत्र बसून म्हटलेली गाणी, बस चुकेल म्हणून केलेली धावपळ, परीक्षेच्या वेळी जागून, एकत्र बसून केलेला अभ्यास या साऱ्या गोष्टी पुनः पुन्हा आठवतात. काहींच्या अनुभवावरून, काहींच्या भूतकाळावरून आपणांस आपला वर्तमानकाळ घडविता येतो. रक्ताच्या नात्यापेक्षा वेगळे आपलेपणाचे एक घट्ट नाते आम्हा प्रत्येकामध्ये तयार झाले होते. हे नाते वसले होते 'मैत्री' नावाच्या एका सुंदर गावामध्ये. गावातले प्रत्येक घर

आपलं, त्यातील माणसे, त्यांची सुखदु:खे सर्व काही आपली होती. प्रत्येकाच्या साथीने पुढे पडणारे पाऊल; ज्या पावलात अपयशाची भीती नव्हती, एकटेपणाचा आभास नव्हता. तर त्यात होती ताकद एकमेकांना सावरण्याची, एकमेकांसाठी सर्वस्व अर्पण करण्याची. यावरून मला काही ओळी सुचतात-

मृगजळात सापडणाऱ्याला
मैत्री आधार देते
वाळवंटातदेखील स्वर्ग फुलवून
सर्वांना सुखावून जाते.

या गावातले आमच्या आवडते ठिकाण म्हणजे 'कट्टा' ! हा कट्टा म्हणजे एखादा निर्जीव दगड नसून त्याची गणना मी माझ्या मित्रांमध्येच करतो. आम्ही आमचे सर्व आवडीचे-नावडीचे दिवस या कट्ट्याबरोबरच घालविले. या कट्ट्यावरच बसल्या-बसल्या काहीतरी करण्याची प्रेरणा मनात निर्माण व्हायची. अशातच कविता सुचायची, स्पर्धेत भाग घेण्याची आवड निर्माण व्हायची आणि स्पर्धेत मिळालेल्या बक्षिसाचा आनंद कट्ट्यासहित सर्व मित्रांबरोबर वाटायचो.

या गावातील वाटेवरून प्रवास करता करता काही वाटा, काही वळणे ही फुलांची तर काही काट्यांची होती. त्यातच काही जबाबदारीचे घाट तर काही अडचणींच्या खिंडीदेखील होत्या. पण सोबतीला कोणाची तरी साथ असेल तर फुलांचा सुवास मिळून काट्यांचे बोचरे दु:ख कमी होते. रक्तबंबाळ झालेल्या जखमांवर शब्दरूपी मलम मिळते आणि थकलेल्या पंखांत आकाशात नव्याने भरारी मारण्यासाठी जी शक्ती, जे चैतन्य मिळते ते या मित्रांकडूनच.

आता तुम्ही म्हणाल आज मला हे दिवस का आठवले! कारण आज माझा कॉलेजचा शेवटचा दिवस. कॉलेजचा निरोप घेण्याचा दिवस. मन वास्तवाच्या सीमारेषा ओलांडून आठवणींच्या नंदनवनात कधी जाऊन पोहोचले ते कळालेच नाही. पहिल्या पावसानंतर मातीला येणाऱ्या मृद्गंधासारखा हा स्मृतिगंधही मला भारावून सोडणारा होता. ते क्षण त्या आठवणी संपूच नयेत असे वाटते. ते क्षण म्हणजे पहाटेच्या वेळी साखरझोपेत असताना पडलेले स्वप्नच वाटते. असे स्वप्न की ज्यातून जागे व्हावेसेच वाटत नाही. पण ही सुख स्वप्नांची रात्र कधी ओंजळीतून निसटून जाते ते समजतदेखील नाही. गेली पाच वर्षे मला पाच दिवसांप्रमाणे वाटली.

आमचे वसलेले गाव आज एकाकी, उजाड वाटत होते. ते ना दुष्काळामुळे, ना पुराने, ना निसर्गनिर्मित संकटामुळे तर ते उजाड झाले होते प्रत्येकाने भविष्यासाठी निवडलेल्या वेगवेगळ्या वाटेमुळे. उद्या सर्वजण वेगवेगळ्या वाटेने आपापल्या जीवनाचा प्रवास करणार. मूळ वाट सोडून तिला आता फाटे फुटणार. ती वळणे, तो नकोसा वाटणारा क्षण येऊन ठेपला आहे. जिथे आम्हाला वेगळे व्हावे लागणार आहे.

त्याच आमच्या पाच वर्षांच्या जिवलग मित्राकडे म्हणजेच आमच्या कट्ट्यावर आम्ही जमलो. त्यावर बसूनच एकमेकांचा निरोप घेत होतो. प्रत्येकाला सांगत होतो, "पुढे कुठे भेटलास तर आवर्जून हाक मार, तसाच पुढे जाऊ नकोस." आम्ही सर्वांनी एकमेकांना भेटून झाल्यावर आपापल्या घरी जाऊ लागलो. प्रत्येकाच्या ओठांवर हसू आणि त्या हसण्यामागे डोळ्यांत लपलेले पाणी होते. सगळे घरी जाऊ लागले पण मागे मला कोणीतरी रडत असल्याचा आवाज आला. मागे पाहिले तर कोणीच नव्हते. पण मला त्या निर्जीव कट्ट्याच्या डोळ्यांतले अश्रू दिसले. शेवटी तोही आमचाच मित्र. त्यालाही आम्ही सोडून जाणार होतो. कॉलेजचे गेट पार केले. पुन्हा कधीतरी येऊ म्हणून. ज्या बसची कॉलेजला यायचे म्हणून मी आतुरतेने वाट पाहायचो त्या बसने मला घरी जावेसे वाटेना.

जीवनाच्या प्रवासात आवडीच्या रस्त्याने जाताना कधी शेवटचे वळण येते तेच कळत नाही. या वाटेवर येणारे काही सोबती चार दिवसांचे, काही चार तासांचे. पण प्रत्येकजण आपल्याला काहीतरी देत असतो आणि आपलेही काहीतरी नेतो. या कडू-गोड अनुभवांचा साठा हीच तर आपल्या पुढल्या आयुष्याच्या प्रवासाची शिदोरी असते. कॉलेजातली ही दिवसरूपी फुले कधी सुकू नयेत असे वाटते. एखाद्या रातराणीप्रमाणे मनाच्या गाभाऱ्यात खोलवर त्याचा सुवास नेहमी दरवळत राहतो. आणि एकटेपणाच्या नीरस रात्री तो प्रसन्न करून जातो.

आजच्या या शेवटच्या वळणावर येऊन मागे बघण्याचा मोह टाळताच येत नाही आणि मागे बघितल्यावर वाटते खरंच का आपण इतके अंतर चालून आलो आणि तेही एवढ्या लवकर ! प्रत्येक वळणावर केलेल्या गमतीजमती मन कुठेतरी आठवत असते आणि हे वळण सोडून न जाता याच वळणाच्या दगडावर बसून दिवस घालवावे असे वाटते. पण काळाचा ओघ कोण अडवणार?

माझ्या मनाची एक गोड आशा आहे. याच वळणावर असा एक दिवस यावा की जेथे मला माझे मित्र वाटसरू बनून भेटतील आणि नंतरचा प्रवासही आम्ही सहप्रवाशांसारखा करू. भेटू आम्ही परत आमच्या या कॉलेजमध्ये, आमच्या या कट्ट्यावर; आमच्या या आनंदी विश्वात आणि याच, याच आमच्या खुल्या निळ्या आकाशाखाली -

' या निळ्या आकाशाखाली!'

★★

---

मी 'आकाश' तू 'शशी'
मी शांत तू शीतल
शांत आकाशाशी जुळवून घेशील ना
माझ्याच आकाशात राहशील ना

माझ्या 'आकाशाचा' आज
रंग काही वेगळाच होता
तो पण जरासा लाजून
क्षितिजावर टेकला होता

**आकाश राणे**, तृतीय वर्ष कला

★★

---

## मन

**वर्षा सुरेश पवार**, द्वितीय वर्ष वाणिज्य (क)

मन माझे वेडे
न उघडती कवाडे
विचार करावा म्हटले
की इतस्ततः भरकटले

मनाचिया दारी
न शब्दच उमटती भारी
लिहावया बसले
पण काहीच नाही सुचले

मनाचिया व्यथा
सांगू कुणा कुणा
करावे म्हटले काही
पण मन देतच नाही ग्वाही

अश्वासारखे हे उधळते
कुठेही कधीही जाऊन बसते
अरे मना वागू नकोस तू असा
जीव होतो रे वेडा पिसा

देऊ नकोस असा दगा
कारण...
तूच आहेस माझा खरा
सखा, सखा, सखा !

★★

# रांझेगावची शैक्षणिक सहल

**गौरी नेरकर व प्राची गुधाटे,** द्वितीय वर्ष शास्त्र

आम्ही प्रथम वर्ष शास्त्र या वर्गात शिकत असताना नायडूसर आम्हाला प्राणिशास्त्र हा विषय शिकवायचे. ते प्रत्येक तासाला शेवटची पाच मिनिटे आमच्याशी अभ्यासाव्यतिरिक्त बोलायचे. तेव्हा आम्हाला कळले की नायडूसर 'CHYK Chapter' हा व्यक्तिमत्त्व विकासासाठी असलेला वर्ग चालवतात. यात नक्की काय घडते या उत्कंठेपोटी आम्ही या तासास जायचे ठरविले. सर्वप्रथम 'CHYK' या शब्दाचा अर्थ काय इथपासून सुरुवात होती. तर हे 'CHYK' म्हणजे 'Chinmaya Yuva Kendra'. नायडूसर हे चिन्मय युवा केंद्राचे कार्यकर्ते आहेत. बऱ्याच वर्षांपासून ते आपल्या महाविद्यालयात हा वर्ग चालवत आहेत. युवक हा राष्ट्राचा महत्त्वाचा घटक आहे. एखाद्या व्यक्तीला युवा स्थितीतच योग्य मार्गदर्शन मिळाले तर तिच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास होऊ शकतो. हाच विचार करून नायडूसरांनी १९९१ साली आपल्या महाविद्यालयात हा वर्ग सुरू केला. चिंचवडमध्ये त्यांच्या घरीही दर रविवारी काही विद्यार्थी जमून हा उपक्रम राबवतात. या वर्गात विविध धार्मिक ग्रंथांचे वाचन केले जाते, तसेच चर्चाही केली जाते. नायडूसर स्वतः ग्रंथांमधील विषयांवर बोलतात आणि आम्हालाही बोलण्यास प्रवृत्त करतात. प्रत्येकास आपले मत मांडण्याची मोकळीक असते. इथे एक प्रकारचा वादसंवाद घडतो. चिन्मय युवा केंद्रातर्फे विविध शिबिरे, उपक्रम राबविले जातात.

या वर्षातील पहिला उपक्रम म्हणजे स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्त आयोजित केलेल्या युवा सप्ताहात या वर्गातील विद्यार्थ्यांनी केलेली भाषणे होय. सरांनी जेव्हा ही कल्पना आमच्यासमोर मांडली तेव्हा आमच्या मनात 'आपल्याला हे जमेल की नाही' याबाबत साशंकता होती. स्वामी विवेकानंदांसारख्या थोर युगपुरुषाचे विचार आपल्याला समजून आपण ते लोकांसमोर मांडू शकू की नाही असा विचार मनात येत होता. परंतु सरांनी आम्हाला खूप प्रोत्साहन दिले. त्यांनी स्वामी विवेकानंदांवरील विविध पुस्तके आम्हाला वाचण्यास दिली. त्याचबरोबर आमच्याकडून पुरेशी तयारी करून घेतली. त्यामुळे आमच्यात आत्मविश्वास निर्माण झाला आणि कार्यक्रमाची पूर्ण जबाबदारी आम्ही यशस्वीपणे पार पाडली. स्वामी विवेकानंदांच्या जीवनातील विविध पैलूंचे दर्शन आमच्या भाषणांमधून झाले. एन.एस.एस. च्या तीन विद्यार्थ्यांसह आम्ही एकूण पंधरा जणांनी ही भाषणे सादर केली.

या वर्षातील दुसरा उपक्रम म्हणजे 'श्रमदान शिबिर' होय. श्रमदान शिबिराकरिता रांझे या गावातील 'आनंदाश्रम' या वृद्धाश्रमाची निवड करण्यात आली होती. रांझे हे गाव खेड-शिवापूरपासून पस्तीस कि.मी. अंतरावर आहे.

आमची बस सकाळी साडेसहा वाजता चिंचवड गावातून निघाली. वेळेत येण्याची शिस्त सर्वांनीच पाळल्यामुळे आम्ही ठरविलेल्या वेळेत निघालो. सकाळच्या त्या कोवळ्या उन्हात घाटातून प्रवास करताना डोळ्यांना सुखावणारी विलोभनीय दृष्ये म्हणजे एक निराळाच अनुभव होता. आम्ही साडेनऊ वाजता आनंदाश्रमात पोहोचलो. चहा-नाश्ता झाल्यावर आम्ही प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली. तेथील आजूबाजूचा परिसर स्वच्छ करून तेथे फुलझाडे व फळझाडे लावणे

हा आमचा उद्देश होता. त्यासाठी आम्ही सर्वांनी फुलझाडांच्या फांद्या, बिया, फळझाडांची रोपे व बागकामासाठी लागणारी अवजारे बरोबर आणली होती. प्रथम नायडूसरांनी आमचे गट पाडले व प्रत्येक गटास निरनिराळी कामे व जागा नेमून दिल्या. त्याप्रमाणे प्रत्येक गटाने काम सुरू केले. काही मुलींनी स्वयंपाक घरात मदत सुरू केली, काहींनी तेथील आजी-आजोबांच्या खोल्या आवरून दिल्या, तर काहींनी स्वच्छतेची कामे केली. एका गटाने एका ओसाड जमिनीच्या तुकड्यावर काम सुरू केले. तेथील जागा खणून, जमीन भुसभुशीत करून वाफे तयार केले. तेथे सर्व फुलझाडे व शोभेची झाडे लावली. दुसऱ्या गटाने एका भूभागावर वाफे करून फळझाडे लावली. आणखी एका गटाने सांडपाणी जाण्यासाठी नीट व्यवस्था केली. तिथे काम करताना आम्हाला श्रम होत असल्याची यत्किंचितही जाणीव झाली नाही. श्रमदानामुळे आमचा उत्साह वाढला. अशा प्रकारे सर्वांनी कसून काम केल्यावर तेथील प्रमुख व्यक्तींतील एक श्री. सुकुमार रांझेकर (रांझेकरकाका) यांनी आम्हाला तो पुरातन वाडा दाखवण्यास सुरुवात केली. तेथील जुने विठ्ठल-रखुमाईचे मंदिर दाखविले. दर्शनानंतर तेथेच सावलीत बसून त्यांनी वाड्याबद्दल माहिती देण्यास सुरुवात केली.

तो वाडा अडीचशे वर्षांपूर्वीचा आहे. श्री. रांझेकर यांच्या पूर्वजांनी तो बांधला होता. ते अहिल्यादेवी होळकरांकडे दिवाण म्हणून काम पाहत. मध्यंतरीच्या काळात तो वाडा गाडला गेला होता. मुंबईच्या एशियाटीक लायब्ररीमध्ये या वाड्याच्या नोंदी आढळल्या आणि उत्खननानंतर नोंदीप्रमाणे सर्व काही सापडत गेले. उत्खनन १९४८ च्या सुमारास करण्यात आले होते. त्यानंतर हा वाडा रांझेकरांच्याच ताब्यात होता.

एकदा पुण्यात एका लग्नप्रसंगी एक अतिशय श्रीमंत बाई आल्या होत्या. त्या उंची कपडे व दागिन्यांनी मढलेल्या होत्या. परंतु त्यांचा चेहरा त्यांच्या मनात दडलेल्या दुःखाची साक्ष देत होता. विचारपूस केली असता त्यांना अश्रू आवरले नाहीत. त्यांचे त्यांच्या मुलाशी नीट पटत नसल्याचे कळाले. या प्रसंगानंतर श्री. रांझेकर व त्यांचे काही मित्र यांच्या मनात वृद्धाश्रमाची कल्पना आली आणि तिथे अशा उपेक्षित वृद्धांना आश्रय मिळावा म्हणून त्यांनी वाड्यात वृद्धाश्रम सुरू केला. त्याला 'आनंदाश्रम' असे नाव देण्यात आले. सात नोव्हेंबर १९७९ रोजी आनंदाश्रमाची स्थापना झाली. त्यानंतर काही काळातच श्री. रांझेकर यांचे निधन झाले आणि मग सर्व कार्यभार त्यांच्या पत्नी, रांझेकरमामी, यांनी आपल्या खांद्यावर घेतला. तेव्हापासून आजपर्यंत मामी सर्व पाहत आहेत. आता त्या थकल्या असल्या तरी त्यांचा उत्साह अजूनही कायम आहे. त्यांचे सुपुत्र श्री. सुकुमार रांझेकर व त्यांची सून त्याचबरोबर श्री. दीक्षित असे काहीजण त्यांना मदत करत आहेत. या आश्रमात सध्या अकरा वृद्ध व्यक्ती राहत आहेत.

दुपारी आम्ही आश्रमातील सर्व आजी-आजोबांसह भोजनाचा आनंद घेतला. इतकेच नव्हे तर स्वावलंबी वृत्तीने सेवाही केली. विरंगुळ्यासाठी विविध गुणदर्शनपर कार्यक्रम सादर केला. आमच्या कार्यक्रमात सर्व आजी-आजोबा रमले. त्यानंतर आम्हाला रांझेकरमामींनी महाभारतातील अर्जुनाच्या अहंकाराची कथा सांगितली. या कथेवरून 'आपल्या कर्तृत्वाविषयी अभिमान जरूर असावा मात्र अहंकाराचा वारा लागू नये' हा विचार मनात ठसला.

सकाळपासून सायंकाळपर्यंत एका नवीन वातावरणात राहून ज्येष्ठांच्या सहवासाचा आनंद घेत,

श्रम आणि स्वावलंबनाचा देखील आविष्कार करत निसर्गाच्या सान्निध्यात आम्ही परतीच्या प्रवासाला निघालो आणि जड अंतःकरणाने सर्व ज्येष्ठांचा निरोप घेतला.

'रांझे' गावातील सहल ही इतर सहलींसारखी सहल नसून जीवनानुभवाच्या पुस्तकातले एक महत्त्वाचे पान म्हणून नोंदविता येईल. समाज जीवनात वावरताना उपेक्षित वृद्धांना समाधान देणे, त्यांना समजावून घेणे आवश्यक असल्याचे आम्हाला कळले. रोजच्या जीवनात श्रम, स्वावलंबन व संस्कारातून जीवनाची जडणघडण होते याची जाणीव झाली. पुस्तकी शिक्षणाबरोबर अनुभव शिक्षणाचे हे जसे कळले, तसेच निसर्गाच्या सान्निध्यात आनंद घ्यावा याची जाणीव झाली. माणसांची मने जोपासावी, मतापेक्षा मनाचा आदर करावा हा विचार रुजला. म्हणूनच 'रांझे' गाव श्रमदान शिबिर नुसतेच यशस्वी ठरले नाही तर खऱ्या अर्थाने संस्मरणीय ठरले.

★★

---

स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्त आयोजित केलेल्या युवा सप्ताहात चिन्मय युवा केंद्र व एन. एस. एस. यांच्या संयुक्त कार्यक्रमात खालील विद्यार्थ्यांनी स्वामी विवेकानंदांच्या जीवनावर आधारित भाषणे केली.

| | नाव | विषय |
|---|---|---|
| १. | विभिषा विश्वनाथन | बालपण |
| २. | प्राची गुधाटे | श्रद्धा आणि बल |
| ३. | अमर वाबळे | शिक्षण, बल आणि धर्म |
| ४. | प्रियदर्शनी माने | Struggles & hardships in youth |
| ५. | गौरी नेरकर | नरेंद्रनाथ विवेकानंद झाले |
| ६. | तृष्णा चिंचवडे | My Master |
| ७. | काळुराम गोपाळे | आचार्य विवेकानंद |
| ८. | अभिजीत गुलाबराव | विद्यार्थी कसा असावा? |
| ९. | वीणा यादव | Faith |
| १०. | दिनेश | सामाजिक कार्य |
| ११. | चैतन्य कुलकर्णी | परिव्राजक विवेकानंद |
| १२. | हेमलता | भारतातील कार्याची रूपरेषा |
| १३. | शीतल महाजन | हिंदू धर्माची मूलतत्त्वे |
| १४. | रोशनी सगणे | स्वामीजींच्या जीवनातील काही प्रसंग |

दीप्ती ओसवाल हिने या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

★★



# जीवन जगण्याची कला

प्रा. एस. आर. आढाव, रसायनशास्त्र विभाग

आपणा सर्वांनाच आनंदी जगायचे असते. पण ते बहुतेक वेळा आपल्याला जमत नाही. हा आनंद नेमका कसा मिळतो? तो कशावर अवलंबून असतो? तो कसा टिकवून ठेवावा? तो कसा द्विगुणीत करावा? स्वतःला व दुसऱ्याला आनंदी कसे ठेवावे? या आणि अशा अनेक प्रश्नांच्या शोधात निघाल्यावर लक्षात येते की, बऱ्याच गोष्टी या आपल्या दृष्टिकोणावर अवलंबून असतात आणि तो दृष्टिकोण आपणास बदलता येतो. यासाठी 'जीवन जगण्याची कला' शिकणे आवश्यक आहे. तुम्ही म्हणाल, आजपर्यंत मी एवढं शिकलो, पैसा मिळविला, मोठा झालो आणि ही आणखी एक नवी कला कसली शिकायची? पण खरोखरच आपण हा अभ्यासक्रम पूर्ण केल्याशिवाय आपणांस सत्याची प्रचिती येऊ शकणार नाही. तेव्हा निदान यापुढील आपले जीवन आनंदी व आरोग्यसंपन्न राहण्यासाठी 'जीवन जगण्याची कला' हा अभ्यासक्रम पूर्ण करा आणि आनंदी व्हा. या अभ्यासक्रमासंबंधीची थोडक्यात माहिती व स्वानुभव सादर करीत आहे.

प्राचार्य गोसावीसर यांच्या स्फूर्तीने प्राध्यापक व विद्यार्थ्यांसाठी 'जीवन जगण्याची कला' हा अभ्यासक्रम आपल्या महाविद्यालयात मंगळवार दि. २६ जानेवारी ते रविवार दि. २ फेब्रुवारी असा फक्त सहा दिवस आयोजित करण्यात आला होता. या कोर्समध्ये मला नवीन काय शिकण्यास मिळणार याबद्दल मनात उत्सुकता होतीच. ठरल्याप्रमाणे ठीक ३.०० वाजता आम्ही सर्वजण ग्रंथालयातील अभ्यासिकेमध्ये एकत्र जमलो. प्राचार्य गोसावीसरांनी प्रास्ताविक करून सद्गुरू श्री श्री रविशंकरजी (गुरुमहाराज) यांच्या प्रतिमेस हार घालून, गुरुमहाराजांना वंदन करून डॉ. भावसार यांनी अभ्यासक्रमाची सुरुवात केली.

या अभ्यासक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे आमच्या बरोबर अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी सौ. अंजली ठाकर, वय वर्षे शहात्तर या देखील सामील झाल्या होत्या आणि त्यांनी हा अभ्यासक्रम अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने पूर्ण केला. हे वाचून निश्चितच आपल्या मनात विचार आला असेल, खरोखरच मी हा अभ्यासक्रम पूर्ण केला असता तर बरे झाले असते.

हा अभ्यासक्रम शिकविण्यासाठी डॉ. दिलीप भावसार व सहायक शिक्षक अशोक रोडे यांनी मनापासून कष्ट घेतले. आम्ही फक्त अठराच विद्यार्थी या अभ्यासक्रमात असूनदेखील अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात दोघाही गुरुजनांनी अत्यंत परिश्रमपूर्वक हा अभ्यासक्रम आमच्याकडून पूर्ण करून घेतला.

अभ्यासक्रमाची सुरुवात प्रत्येकाने स्वतःची ओळख करून देऊन शेवटी 'मी तुमचाच आहे' (I belong to you) या वाक्याने संपली. खरोखरच या वाक्यात किती अर्थ भरलेला आहे. येथे येण्यापूर्वी आपण कोणालाच ओळखत नव्हतो आणि दोन मिनिटांतच आपण एकमेकांचे झालोत.

गुरुजींनी आनंदी राहण्याचे तीन प्रमुख प्रकार सांगितले. १) सुख २) मानसिक समाधान आणि ३) आध्यात्मिक आनंद. या तिन्हीचे सतत एकत्रीकरण करत राहणे महत्त्वाचे असते.

१) **सुख :** सुख म्हणजे शारीरिक पातळीवरचे सुख. खूप भूक असताना जे वाटते ते सुख. पण दर वेळी खाल्ल्यावर सुख मिळतेच असे नाही. त्यासाठी क्षमता निर्माण व्हावी लागते. म्हणजे भूक असेल

तरच खाण्यातले सुख मिळेल. तहान लागली असेल तरच पाणी चाखण्याची मजा कळेल. ज्ञान प्राप्त करून घेण्याची इच्छा असेल तरच ज्ञान प्राप्त करून घेण्यात आनंद वाटेल. वर्ग चालू असताना खिडकीतून बाहेर पाहत राहिल्यास ज्ञानप्राप्तीचा आनंद कसा मिळेल? दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे आपले आयुष्य जर नियमांनी करकचून बांधले असेल तर? म्हणजे सुख गेलेच समजा उदाहरणार्थ- सकाळी ८ वा. न्याहारी झालीच पाहिजे. या नियमानुसार भूक नसताना खाणे तसेच तहान नसताना पाणी पिणे, असे केले की त्यातून जे सुख मिळते ते गेले. याचा अर्थ अनियमित किंवा बेताल वागावे असा नाही. तेव्हा वरून नियम लादण्यापेक्षा शरीराचे नियम ओळखावेत. जे केल्याने सुख जाते ते नियम मानू नयेत. ज्या गोष्टींमुळे वेदना, दुःख होते त्या सोडून द्याव्यात. इथे तारतम्य वापरणे फार महत्त्वाचे आहे.

२) **मानसिक समाधान :-** मानसिक समाधान नष्ट करणारे आपले सहा शत्रू आहेत - काम, क्रोध, लोभ, मद, मोह व मत्सर. यांपैकी -

i) **काम :-** म्हणजे इच्छा. इच्छा उत्पन्न होते आणि ती भागली तर समाधान मिळते. पण सारखी इच्छा उत्पन्न झाली आणि ती भागली नाही तर दुःख होते. इच्छेबाबत 'सबुरीने घ्या' हे धोरण अवलंबले पाहिजे.

ii) **क्रोध :** -राग अनावर झाला तर ते दुसऱ्याला फार त्रासदायक ठरते आणि राग दाबला तर ते स्वतःलाच अत्यंत घातक ठरते. राग येताना जागरूक रहा. श्वासोच्छ्वास नीट ठेवण्याचा प्रयत्न करा. राग निर्माण झाला तर तो तुम्ही कसा 'मॅनेज' करता ते महत्त्वाचे आहे.

iii) **लोभ :-** लोभात अनेक गोष्टी धरून ठेवायचा हव्यास असतो. पण आपण जे घट्ट धरलेय तेच बदलतेय. तेव्हा एखादी गोष्ट हातून गेली तर ध्यानात ठेवा की, ते जायचेच होते, त्याविषयी हळहळ नको.

iv) **मद :-** आपण इतरांपेक्षा वेगळे, काही विशेष आहोत ही भावना निर्माण होणे म्हणजे मद. उदाहरणार्थ - आम्ही आमच्याकडे भांडी, स्वयंपाक, घर पुसण्यासाठी स्वतंत्र मोलकरणी ठेवलेल्या आहेत. आम्ही फक्त कोट-टायच वापरतो इत्यादी. अशा अनेक गोष्टींमुळे आपण इतर लोकांशी स्वतःला जोडून न घेता तोडून टाकत असतो. त्यामुळेच आपल्या जीवनात दुःख निर्माण होते. मद टाकायचा असेल तर स्वतः कोणीतरी विशेष आहोत हे विसरायला हवे.

v) **मोह :-** मोहात आपल्याला जे वाटते ते चुकीचे आहे, हे माहीत असते पण ते करावेसे वाटते. उदाहरणार्थ - परीक्षेत कॉपी करणे चुकीचे आहे हे माहीत असूनदेखील कॉपी करावीशी वाटते. तासांना उपस्थित न राहिल्यामुळे आपलेच नुकसान होणार आहे हे कळत असूनदेखील मित्रांच्या आग्रहाखातर तासांना दांडी मारली जाते. तेव्हा कुठलाही मोह टाळण्यासाठी स्वतःच्या मनावर ताबा ठेवणे आवश्यक आहे.

vi) **मत्सर :-** मत्सरात सतत दुसऱ्याशी तुलना केली जाते. माझ्या शेजाऱ्याकडे मारुती कार आहे तेव्हा मीदेखील मारुती कार विकत घेतलीच पाहिजे त्यापायी कर्जबाजारी झालो तरी चालेल. मत्सरात माणूस कधीही सुखी नसतो.

अशा या सहा शत्रूंमुळेच माणसाचा मानसिक आनंद व समाधान बिघडते. आनंदी जीवन जगावयाचे असेल तर चांगल्या कृती, ध्यानसाधना, प्राणायाम,

श्वसनाचे व्यायाम यांच्या मदतीने मनावरचे ताण नष्ट करून अंतर्बाह्य आनंदी होता येईल आणि कृतज्ञता मनात भरून जाईल. यासाठी डॉ. दिलीप भावसार यांनी श्वसनाचे व्यायाम कसे करावयाचे हे शिकवले.

श्वसनाच्या व्यायाम प्रकारात - उज्जयी श्वास, भस्त्रिका, ओमूकार तसेच संथ, मध्यम व दीर्घ श्वसनाचे विविध प्रकार शिकविण्यात आले. शिस्तबद्ध श्वसनाच्या व्यायाम पद्धतीमुळे आपल्या फुफ्फुसामध्ये प्राणवायू (ऑक्सिजन) बराच वेळ मिसळला गेल्यामुळे आपले रक्त शुद्ध होते व रक्ताभिसरणाची क्रिया जलद झाल्यामुळे आपल्याला तरतरी येते व उत्साह वाढून मन आनंदी होते. तसेच श्वास बाहेर सोडल्यावर आपल्या शरीरातील विषारी वायू, जंतू, वाईट विचार शरीराबाहेर टाकले जातात व अंगात शक्ती निर्माण होते. ज्यामुळे आपण कुठलेही काम त्वरित व आनंदाने पार पाडू शकतो.

श्वसनाच्या व्यायामाबरोबरच, मानेचे, खांद्याचे, कमरेचे, गुडघ्याचे, घोट्याचे व्यायाम कसे करावयाचे हे या अभ्यासक्रमात शिकविण्यात आले. वरील सर्व प्रकारचे व्यायाम करण्यास ३०-४० मिनिटे लागतात आणि एवढा वेळ आपण आपल्या आरोग्यासाठी दररोज नक्कीच देऊ शकतो. शक्यतो व्यायाम सकाळी करावा. फिरल्यानंतर व्यायाम केला तरी चालेल. सकाळी वेळ न मिळाल्यास संध्याकाळी व्यायाम केला तरी चालेल. बाहेरगावी गेल्यावर देखील व्यायामात खंड पडू देऊ नका.

आनंदी जीवन जगण्यासाठी आणखी काही गोष्टी आपणहून कराव्या लागतात.

i) **शिका व शिकवा :-** ज्याला एखादी गोष्ट माहीत आहे त्याने ती इतरांना जरूर सांगावी, शिकवावी, वाटून घ्यावी. शिकण्याला तर अंतच नाही. स्वत:चा श्वास नीट निरखणे, जागरूक राहणे हेही शिकणेच आहे.

ii) **प्रयत्न शैथिल्य :-** प्रयत्न करताना अजिबात ताण न घेणे. ताण आला की गोष्टी बिघडतात. तेव्हा ताण न घेता प्रयत्न केला तर गोष्टी आपोआप घडत आहेत असे वाटेल.

iii) **आताच्या क्षणात जगा :-** आताच्या क्षणात काय करावयाचे ते बघा. लोक काय म्हणतील याचा विचार करत बसलात तर तो क्षण गेला आणि आनंदही गेला. शेजारचा वर्ग चालू असताना आवाज न करणे, तसेच देवळात जाताना बूट/चप्पल बाहेर ठेवणे या सारखे तारतम्य बाळगले तर गोष्टी सोप्या होतील. तुम्ही आनंदी व्हाल, त्याचबरोबर दुसऱ्यालाही आनंद देऊ शकाल.

iv) **स्वत:ची जबाबदारी जाणणे :-** आपल्या सुखाला किंवा दुःखाला आपणच जबाबदार असतो. आपण चोख वागलो तर दुःख टळतील असे नाही. कारण दुसरे लोक खोड्या काढणारच. अशा वेळी शांत राहणे हीच आपली जबाबदारी ठरते. सध्याच्या जगात दुसरा आपल्यासाठी काही चांगले काम करेल असा विचारदेखील मनात आणू नका. तेव्हा आपण आपला दृष्टिकोण बदलला की आध्यात्मिक आनंदाच्या जवळ जाता येईल.

सुखदुःखाच्या पलीकडे जो असतो तो खरा आनंद. सध्याच्या धावपळीच्या जीवनात ऑफिसमध्ये, कॉलेजमध्ये, हॉस्पिटलमध्ये, घरी, रस्त्याने जाताना-येताना प्रचंड मानसिक ताणतणावास सामोरे जावे लागते. हा सर्व ताणतणाव सहन करण्यासाठी आपले मन, चित्त व शरीर तंदुरूस्त असणे आवश्यक आहे. यासाठीच आपण वरील अभ्यासक्रम पूर्ण करणे अत्यंत आवश्यक आहे.

★★

# कै. वि. त्र्यं. ताटके - सव्यसाची संस्थाचालक

प. स. चिरपुटकर, माजी प्राचार्य, मॉडर्न महाविद्यालय, पुणे-५

कै. ताटकेसर व माझा परिचय १९७० सालच्या जानेवारीत झाला. त्याची पार्श्वभूमी अशी आहे, प्रो. ए. सोसायटी ह्या नामवंत शिक्षण संस्थेचे त्या वर्षीच्या जूनपासून नव्याने कॉलेज सुरू होणार होते. नव्याने सुरू होणाऱ्या त्या कॉलेजमध्ये नोकरी करण्याची माझी इच्छा होती. त्यानिमित्त आमच्या काही भेटीगाठी झाल्या. लवकरच माझी गणित व संख्याशास्त्र विभागप्रमुख म्हणून नियुक्ती झाली. माझ्याप्रमाणेच इतर काही विभागप्रमुखांच्या नियुक्त्या झाल्या. जूनमध्ये कॉलेज रीतसरपणे सुरू झाले.

जानेवारी ते जून १९७० ह्या सहा महिन्यांच्या काळात आमच्या मीटिंग्ज होत असत. कॉलेज सुरू होण्यापूर्वीचे आवश्यक ते काम म्हणजे शास्त्र विभागासाठी लागणारी उपकरणे, ग्रंथालयासाठी पुस्तके, वेळापत्रके इत्यादी कामे आम्ही त्या पाच-सहा महिन्यांच्या काळात केली. कै. ताटकेसर प्रो. ए. सोसायटीचे कार्यवाह होते. ते सर्व मीटिंगजला हजर असत. शिवाय कॉलेज सुरू झाल्यावरही काही वर्षे ते संस्थेचे कार्यवाह होते. त्या काळात कॉलेजमध्ये वेगवेगळ्या कार्यक्रमांना ते उपस्थित राहत असत.

त्या सर्व काळात संस्थाचालक म्हणून त्यांचे जे दर्शन झाले ते मी या लेखात मांडणार आहे.

मॉडर्न कॉलेज जून १९७० मध्ये सुरू झाले. त्या वेळी ताटकेसर वयाच्या सत्तरीला आले होते. डेक्कन जिमखान्यावर फर्ग्युसन कॉलेज व गरवारे कॉलेज ही दोन नामवंत कॉलेजेस् होती. त्यामुळे आणखी एक कॉलेज काढणे मोठ्या धाडसाचे काम होते. प्रो. ए. सोसायटीच्या मॉडर्न हायस्कूलमध्ये शिक्षण घेऊन व एस. एस. सी. परीक्षेत उत्तुंग यश मिळवून उच्च शिक्षणासाठी विद्यार्थी अन्य शिक्षण संस्थांच्या कॉलेजेस् मध्ये जात असत. तसे होऊ नये म्हणून मॉडर्न कॉलेजची स्थापना करत आहोत असे ताटकेसर म्हणत असत. म्हणजे प्री डिग्री आणि एफ. वाय. सुरू करत आहोत. साधारण किती विद्यार्थी येतील असा तुमचा अंदाज आहे?''

यावर कुणी काही, कुणी काही आकडे सांगितले. सर्वांचे बोलून झाल्यावर ताटकेसर म्हणाले, ''मला वाटते ७०० ते ७२५ विद्यार्थी प्रवेश घेतील.'' आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे त्यांचा अंदाज तंतोतंत खरा ठरला.

१५ जून १९७० रोजी रीतसरपणे कॉलेज सुरू झाले. त्या दिवशी प्राचार्यांच्या चेंबरमध्ये आम्ही प्राध्यापक मंडळी आणि अन्य कर्मचारी वर्ग जमलो होतो. ताटकेसरांच्या सूचनेनुसार श्री. पाठकगुरुजी यांनी काही वैदिक प्रार्थना म्हटल्या. ताटकेसरांनी छोटेखानी भाषण केले. ''आपण नव्याने कॉलेज सुरू करत आहोत. आपापल्या विषयाची जबरदस्त तयारी करून विद्यार्थ्यांना शिकवा. एकोप्याने काम करा. विसंवाद होऊ देऊ नका. टीमवर्कने उत्तम प्रकारे काम करा.'' एवढे बोलून ते पुढे म्हणाले, ''ग्रंथालय, प्रयोगशाळा अद्ययावत ठेवा. कॉलेज नवीन आहे म्हणून आमच्याकडे 'हे नाही, ते नाही' असे दीनवाणेपणाने म्हणू नका. तुम्हाला जी पुस्तके, उपकरणे हवी असतील ती आम्हाला सांगा. सर्वांची पूर्तता केली जाईल. आपली प्रो. ए. सोसायटी १९३४ साली स्थापन झाली आहे. तुमच्यामागे संस्थेची तीन तपांची पुण्याई उभी आहे.''

ताटकेसरांची अशी सर्व भाषणे आत्मविश्वासाने भरलेली असत. अत्यंत तडफदारपणे ते बोलत असत.

या संस्थेत नव्यानेच आलेल्या आमच्यावर त्याचे शुभसंस्कार होत असत.

मॉडर्न कॉलेज नव्यानेच स्थापन झालेले असल्यामुळे आम्हाला तेथे सर्वच गोष्टी नव्याने करावयाच्या होत्या. अगदी महाविद्यालयाचा प्रवेश अर्ज, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांची निवड या कामापासून सुरुवात करावयाची होती. प्रत्यक्ष कॉलेज सुरू झाल्यावर कला, विज्ञान, वाणिज्य ह्या तीनही शाखांची असोसिएशन्स, 'मॉम' हे भित्तिपत्रक, एन. एस. एस., एन. सी. सी., स्टाफ अकॅडमी असे अनेकविध उपक्रम आम्ही त्या काळात सुरू केले. अकॅडमी असे अनेकविध उपक्रम आम्ही त्या काळात सुरू केले. अशा सर्व उपक्रमांच्या उद्घाटनप्रसंगी आणि नंतरही काही सभांना ताटकेसर जातीने उपस्थित राहत असत. एवढेच नव्हे तर चर्चेतही भाग घेत असत.

स्टाफ अकॅडमीच्या अशाच एका सभेमधली ही आठवण आहे. प्राध्यापकांनी भरावयाचा इन्कम टॅक्स हा विषय होता. त्यासाठी ज्येष्ठ इन्कम टॅक्स अधिकाऱ्यांना निमंत्रित करण्यात आले होते. मुख्य व्याख्यान झाल्यावर प्रश्नोत्तरे, चर्चा हा भाग सुरू झाला. मला अजूनही स्पष्टपणे आठवते की ताटकेसर प्रश्न विचारावयास उठले. ते म्हणाले, "आपण आयकर भरण्यासंबंधी उपयुक्त माहिती दिली त्याबद्दल धन्यवाद. आयकर भरण्यासंबंधी वर्तमानपत्रात येणारी जाहिरात व व्यक्तींना येणारी पत्रे यातील भाषा फार कठोर असते. ...... असे न झाल्यास दंड होईल, तुरुंगवासाची शिक्षा होईल इ, इ." एवढे बोलून ताटकेसर पुढे म्हणाले, "माझ्यासारख्या शिक्षकाला तर अशी नोटीस अगर पत्र वाचून छातीत धडकी भरते. जो देय आयकर असेल तो आमच्याकडून अवश्य घ्या. पण ही दमदाटीची भाषा कशाला?"

यानंतर ताटकेसरांनी एक नितान्त उपयुक्त विचार मांडला. ते म्हणाले, "You should suck honey without damaging the flower, अशी आपली वृत्ती व भाषा असावी."

अशा काही निमित्ताने त्यांच्यातील कुशल संस्थाचालक दिसत असे. शाळा-कॉलेजचे प्रशासन चालवत असताना असे जाणवते की सर्व शिक्षक, प्राध्यापक, कर्मचारी यांच्या आवडी-निवडी व क्षमता सारख्या नसतात. कुणाला विद्यार्थ्यांना अधिक शिकवून त्यांचे गुण वाढावेत यामध्ये आनंद वाटतो, कुणाला विद्यार्थ्यांच्या क्रीडाप्रावीण्यात गती असते, तर दुसऱ्या कुणाला विद्यार्थ्यांमधील कलागुण विकसित करावे असे वाटते. संस्थेचा कारभार चालवताना अशा सर्व प्रकारच्या लोकांची गरज असते. त्यांच्या आवडी-निवडी व क्षमता लक्षात घेऊन त्यांच्याकडून संस्थेला उपयुक्त काम करून घेणे यामध्ये उत्तम संस्थाचालकाचे कौशल्य असते.

मॉडर्न कॉलेज ताटकेसरांनी स्थापन केले. अवघ्या ७०० ते ७२५ विद्यार्थिसंख्येवरून सुरुवात झालेल्या ह्या कॉलेजची विलक्षण वेगाने प्रगती झाली. ताटकेसरांचे १९८० साली निधन झाले. कधी कधी असे वाटते की ताटकेसरांना अजून काही वर्षांचे आयुष्य लाभले असते तर त्यांचे स्वप्न साकार झाल्याचे त्यांना पाहवयास मिळाले असते. पण असे तरी कसे म्हणावे? शिक्षणक्षेत्रातील व संस्थाचालकांपैकी ते एक सव्यसाची व्यक्तिमत्त्व होते. त्यांनी मॉडर्न महाविद्यालय व प्रो. ए. सोसायटीची विलक्षण वेगाने झालेली वाढ व विकास मनःचक्षूंनी पाहिली असणार. म्हणूनच ते स्वप्न प्रत्यक्षात उतरले.

पुण्याची म्हणून काही खास वैशिष्ट्ये आहेत. त्यापैकी एक आहे विविध संस्था व त्या संस्था नावारूपाला आणणाऱ्या व्यक्ती. अशा संस्था साहित्य, संगीत, शिक्षण, क्रीडा अशा अनेकविध क्षेत्रात काम

करणाऱ्या आहेत. काही लोकांनी अपार श्रम करून, कष्ट करून, त्याग करून अशा संस्था मोठ्या केल्या आणि अशा संस्था मोठ्या करता करता त्या व्यक्तींना मोठेपण प्राप्त झाले. काही ठळक नावे घ्यावयाची झाल्यास इतिहास संशोधन मंडळ आणि कै. दत्तो वामन पोतदार, नू. म. विद्यालय व प्रिं. नारळकर, भांडारकर प्राच्य विद्या संशोधन मंदिर व डॉ. रा. ना. दांडेकर अशी नावे घेता येतील. तसेच प्रो. ए. सोसायटी व मॉडर्न हायस्कूलशी ताटकेसरांचे नाव निगडित आहे. त्यांच्या आगेमागे कै. शंकररावजी कानिटकर व कै. चाफेकरसर ह्यांची नावे घेता येतील.

ताटकेसरांच्या छोट्या-मोठ्या भाषणांतून व इतर वेळच्या बोलण्यातून प्रो.ए.सोसायटीत नव्यानेच आलेल्या आमच्यावर शुभसंस्कार होत असत हे वरती एके ठिकाणी लिहिले आहे. योगायोगाची गोष्ट अशी की मॉडर्न कॉलेजच्या स्थापनेला १९९५ च्या जूनमध्ये पंचवीस वर्षे पूर्ण झाली. त्यामुळे १९९४-९५ हे शैक्षणिक वर्ष आम्ही रौप्यमहोत्सवी वर्ष म्हणून साजरे केले. मी त्या वेळी कॉलेजचा प्राचार्य होतो. १९७० साली कॉलेज सुरू होताना काही वैदिक मंत्र व प्रार्थना म्हणून कॉलेजच्या कामकाजाला सुरुवात झाली होती. रौप्यमहोत्सवी वर्षाचा समारंभ सुरू करताना वैदिक पाठशाळेच्या वेदमूर्ती घैसासगुरुजी यांच्या वैदिक मंत्रांच्या पठणाने आम्ही शुभारंभ केला.

मॉडर्न कॉलेज स्थापन केले तेव्हा ताटकेसर वयाच्या सत्तरीला आले होते. तरीही मोठ्या उमेदीने व उत्साहाने कॉलेज उभारणीचे काम ते करत होते. एकदा कुणीतरी त्यांना विचारले, "मॉडर्न हायस्कूलचे काम करत होता तेव्हा तुम्ही तरुण होता, वर्गात जाऊन स्वतः शिकवत होता. आता या वयात हे कॉलेज कसे नावारूपाला आणणार?

त्यावर ताटकेसर म्हणाले, "कॉलेजमध्ये मी वर्गात जाऊन शिकवू शकणार नाही हे खरे आहे. पण तरुणपणीचा उत्साह व जिद्द अजूनही माझ्यात आहे. या कॉलेजमध्ये जे प्राध्यापक आम्ही नेमू त्यांना संस्थाचालक व शिक्षक म्हणून असलेल्या माझ्या प्रदीर्घ अनुभवाच्या आधारे मी प्रेरणा देत राहीन. I will inspire my young professors to build up the new college."

त्यांचे ते म्हणणे त्यांनी अक्षरशः खरे केले. मला असे आठवते की काही काळ प्रो. ए. सोसायटीचे ऑफिस आमच्या कॉलेजच्या प्राचार्यांच्या चेंबर शेजारील खोलीत होते. सोसायटीचे कार्यवाह या नात्याने ताटकेसर तेथे रोज येत असत. रोज दुपारी दीड ते दोनच्या सुमारास शनिवार पेठेतील त्यांच्या राहत्या घरापासून चालत-चालत ते मॉडर्न कॉलेजमध्ये येत असत. पांढरेशुभ्र धोतर, काळा कोट, काळी टोपी, पायात वहाणा, हातात एखादे पुस्तक असे साध्या वेषातले त्यांचे व्यक्तिमत्त्व अजूनही डोळ्यांपुढे येते.

बरेच वेळा असे वाटते की कुठल्याही प्रकारचा लाभ नसताना त्यांनी आणि त्यांच्या पिढीतील लोकांनी ज्या शिक्षण संस्था आणि अन्य संस्था उभ्या केल्या त्या मागच्या प्रेरणा काय असतील? काही शिक्षकांनी वा निस्वार्थी लोकांनी एकत्र येऊन, वेळप्रसंगी अर्धपोटी राहून महाराष्ट्रातल्या शिक्षण संस्था स्थापन केल्या. त्या नावारूपाला आणल्या. स्वातंत्र्यपूर्व काळातील ही पिढी. देशाला स्वातंत्र्य मिळविण्यासाठी जसे लोकमान्य टिळक, महात्मा गांधी अशा लोकोत्तर विभूती झाल्या, तशाच प्रकारचे काम करणाऱ्या व स्वतःला झोकून देणाऱ्या व्यक्ती विविध क्षेत्रांत झाल्या. अशा काही व्यक्ती बघण्याचे भाग्य आम्हाला लाभले. अशाच व्यक्तींपैकी ताटकेसर एक होते. त्यांच्या जन्मशताब्दीनिमित्त त्यांना विनम्र अभिवादन.

★★

## राम नाम सत्य है

अहमद एस. बेग, प्रथम वर्ष वाणिज्य (ब)

राम नाम सत्य है।
दिन रात तो सत्य है।
गरिबों के आँसू
बच्चों की चीख
अबला की पुकार
बूढ़िया की ललकार।
देखो यार
सब कुछ सत्य है।
राम नाम सत्य है॥ १॥
जान के बदले जान
खून के बदले खून
राम का दुश्मन अल्लाह।
वल्लाह
सब कुछ सत्य है।
राम नाम सत्य है॥ २॥
लढ़ो यारो मरो
नफरतवालो
इन्सानियत कूचल डालो
आबादी कम करने का
एक नेक काम कर डालों!
अरे प्यारें।
सब कुछ सत्य है।
राम नाम सत्य है॥३॥
रहीम के बंदे
नही राम के भक्त हो
तुम तो भडके शैतान हो
अरे धर्मांधो
तुमने तो हद कर दी
कुछ ने मंदिरे तो
कुछ ने मस्जिदे वीरान कर दी
समाज के ठेकेदार बने फिरते हो
रुपयों के बदले भगवान को बेचते हो
फिर उसी के सामने हात जोडते हो
कितने नादान हो।
फिर अंजाम से डरते हो।
फिर होने वाले हवन, यज्ञ सत्य है।
राम नाम सत्य है।।४॥

★★



सत्यमेव जयते

# BILL GATES

**Varsha Jadhav,** F. Y. B. Sc. (A)

Bill at the Gates of Barbarians.

The hype and hoopla surrounding the visit at Bill Gates to India has drawn divergent reactions, from euphoric applause to cynical dismissiveness, of the man and his motivations, methods and mission. What was his trip business or charity? valid question, except that it separates sweet charity from hard business and does not recognise that charity is not only good for business itself. Both charity and business are about money.

Microsoft 'Head of State' has been received and feted including by Prime Minister Atal Behari Vajpayee with his $100 million for AIDS Awareness almost as much as that pledged by Washington and promised investment at $400 million besides the $41 million given in grants earlier. Bill Gates is the cargo cult come true for any Indians.

Within days of taking over as health minister Shatrughan Sinha dashed off to Barcelona to attend a mega AIDS meet. His eloquence on the challenges India faced from the growing AIDS threat won him many admirers. Yet when cyber tycoon Bill Gates expresses the same concerns Mr. Sinha sharply told him where to get off. The message was clear give us your money to fight AIDS but don't raise any uncomfortable questions. One apparent reason of Indian official dorris grouse is that Mr. Gates relied on UNAIDS figures to say. India could have heaped up to 25 million HIV positive people by 2010. At present by the government's own admission, four million Indians have been injected already.

The other is the crumbling health system which cannot cope with present galloping disease. One of the thing is that of lack of awareness of modes of transmission burden. Mr. Gates fear that a HIV epidemic, given its impact on India's burgeoning population of young people, could destabilise the country both socially and economically are well-founded. Yet our political establishment's response has been to slam Mr. Gates instead of coming up with strategies to tackle the problem.

Look at the contrast with China with Mr. Gates and his mega funds in the region. The Chinese are going out of their way to discuss the growing AIDS challenge in that country, literally inviting foreign donors to come and fund programme to contain the virus. Adding to the Indian Government's Geno-phobia are a slew of NGO who have come with absurd conspiracy theories. One is that Mr. Gates has a vested interest creating a scure scenario so that the million he has invested in pharma companies will grow. But this is the missing point. Granted that Mr. Gates is a savvy businessman who is looking to enhance his assets. The fact still remains that HIV/AIDS is posing a challenge to India today and we have not really begun to address it seriously. Our attitude should be that irrespective of Mr. Gates motives his foundations money will go a long way in the fight against the HIV virus. In addition when someone like the Microsoft chief focuses, on the issue, our own policy makers cannot help but follow suit. In the end, it is a win-win situation far all concerned and Mr. Sinha should seize on this rather than

be such a spoilsport.

Bill Gates has ever been won over by India. Now it is for India to win him over to our cause.

★★

## Make Hay While The Sun Shines

**Amrita Maitra,** XI, C

Hay is mown and dried grass. The drying can take place only in sunny weather. Therefore, hay must be made while the sun shines. The implication of this apparently simple advice is that we must seize the opportunity before us and take the maximum advantage of it. A chance lost may never come again. We must avail ourselves of our favourable circumstances and provide for the future. Our youth is our opportunity to take risks, work hard, make an all-round progress, and lay by enough to be carefree and comfortable in our old age. A mis-spent youth means a miserable old age. The grasshopper sings out its summer, and comes to grief; the ant is busy storing up food, and has a happy winter. Time and tide waits for no man. Health and strength do not last for ever. Fat days are followed by lean ones. Therefore, let us make hay while the sun shines. Idling and dawdling will do us no good. Let us remember and act up to the famous passage in 'Juliues Caesar' by Shakespeare. "There is a tide in the affairs of men."

Which, taken at the flood leads on to fortune;

Omitted, all the voyage of their life,

is found in shallows and miseries."

★★

## 'The Polar Star' And 'The Native of Universe' - KALPANA CHAWLA

**Richa Kale,** XI, C

A star was born on the earth with the birth of the great astronomer Kalpana Chawla in 1961. She was born in Karnal in northern Haryana. She was the first Indian lady to fly the us space shuttle.

She was a very ambitious child from her early age. She completed her primary education from 'Tagore Balniketan' school. She achieved her engineering degree from 'Punjab Technical Aeronautical Engineering College', Thus, excelling at academics she topped off her career with a Ph.D. in aerospace engineering from the university of Colorado in 1984. After that in 1988 she joined NASA's Amais Research Centre. Thus, through this centre and the subject 'Fluid Dynamics' she began her extra ordinary golden career. She made up for her 'tomboyishness !'

"I was not born for one corner", said Kalpana quoting philosopher seneca. "The whole universe is my native land". Chawla made it to the headlines in 1997 when she became the first Indian lady to fly the US

space shuttle Columbia. Kalpana has worked very hard to fulfil her glittering dream of flying high in the sky. On her first mission. She travelled 6.5 million miles in 252 orbits of the Earth and logged 376 hours and 34 minutes in space.

In the year 1993, she worked as a head in California's Everest Methods Incorporation.' She worked as a scientist for the future space-missions. She was selected as a co-operative member in NASA in the year 1994. In March 1995, she entered the 15th division of NASA as an astronaut.

After a training of one year she was selected as a 'crew representative' in a section of NASA. Then she played a vital role in 'Space Avionics Integration Laboratory' to develop the 'Space control software'. After this, taking into account her intelligence she was selected as 'Mission Specialist' by NASA. She worked as a prime robotic arm operater in 'STS-107'. After this she actually started working as an astronaut in 1997.

This year, on 16th January 2003, she began her second mission through the space shuttle 'Columbia'. To find cures and medicines for different incurable and fatal diseases was the motive of this mission. But before landing on the Kennedy space centre, Columbia crew was charred in the mid-air & the shuttle was exploded.

Thus, was the end of her glittering golden career. As a tribute to Kalpana Chawla the next Indian Satellite is named 'Kalpana-1'. She will thus remain in the memory of not only India but of the whole world forever and forever.

The former director of NCRA i.e. National Centre for Radio Astrophysics, Prof. Govind Swaroop, while expressing sorrow at the demise of astronaut Kalpana Chawla, rightly said,

"She was such a spirited girl. It is a great loss to humanity, a greater loss to India & the greatest loss to the whole world. But she has become a Polar Star in the Universe."

★★



## The Legend of Dhirubhai Ambani

**Gajanan Arvind Nerkar,** F. Y. B. Com.

Dhirajlal Hirachand Ambani popularly known as Dhirubhai, was born on 28th December 1932 at Chorwad in Gujrat. After matric exam he attempted a job of a station attendant at a Petrol Pump in Yemen.

He had a big dream to own a Petrochemical Industry one day. At 25, Dhirubhai started Reliance Commercial Corporation which flowrished like anything. Today, Reliance is the largest company in the private sector.

Modern Dalal Street is Dhirubhai's history. Reliance exports its products to 100 countries around the world. Dhirubhai gave millions of investors the reason for living as a source of inspiration.

Dhirubhai was a 'Market Messiah' who captured investor's imagination and rewrote management theories. Reliance Group's revenue is Rs. 75,000 crores and the Net profit is Rs. 4,500 crores per year.

Ambani can never talk in thousands and lacs but only in crores. So there will be many Tatas, Bajajs, but there will be only one Dhirubhai. Nobody can forget the world record of Reliance to give 44% divident to its shareholders in the year 2001.

**Dhirubhai strongly believed that :**

* For those who dare to dream, there is a whole world to vein.

* Ideas are no man's monopoly. Don't give up. Courage is your convicotion.

* Hardwork, dedication and the 'can-do' spirit can even climb an Everest.

* Dreams should be bigger, ambitions higher, commitments deeper and efforts greater.

* Work is worship.

* Think Big, Think fast, Think ahead...

* Actions are expressions for others. This proves to be true for Dhirubhai.

* The word 'Impossible' itself say that 'I-am-possible.

**Dhirubhai was :-**

* A man who achieved what he dreamt.

* A man who led by example.

* A man who shaped the futures of millions of people.

* A man who revolutionised the plastic industry.

* A man who always thought big.

Dhirubhai is regarded as 'The Icon of All Times', 'Businessman of the Century', 'Father of Indian industry,' 'Polyster Prince.'

At last, when Dhirubhai was about to leave this world, he said,

"I'll never retire. I'll work till my last breath. There is only one place where I'll retire and i.e. on the Cremation Ground."

Today, India thinks that the visionary has gone but left behind is his fragrance.

★★

# २००२-०३ मधील कामगिरी

गजानन अरविंद नेरकर, प्रथम वर्ष वाणिज्य (अ)

★ महाराष्ट्र नशाबंदी परिषद आयोजित राज्यस्तरीय निबंध स्पर्धेत सर्वप्रथम.
विषय : दारू, अमली पदार्थांचे मानवी शरीरावर होणारे दुष्परिणाम.

★ राजीव गांधी सोशल ग्रुप आयोजित क्रांतिकारक निबंध स्पर्धेत राज्यात सर्वप्रथम.
विषय : स्वा. विनायक दामोदर सावरकर

★ प्रा. गं. बा. सरदार निबंध स्पर्धेत राज्यात दुसरा क्रमांक
विषय : संत नामदेवांच्या अभंगांतील सौंदर्य.

★ एस. एफ. आय. आयोजित वक्तृत्व व निबंध स्पर्धेत राज्यात प्रथम क्रमांक.
विषय : स्पर्धा... झाला जीव अर्धा.

★ चित्रपट 'वीर सावरकर' प्रश्नमंजुषा स्पर्धेत महाराष्ट्रात दुसरा क्रमांक.

★ वॉर ऑफ विट्स निबंध स्पर्धेत दुसरे बक्षिस.
विषय : लाईफ इज ब्युटिफूल

★ संध्यानंद लेख स्पर्धा-तृतीय क्रमांक
दि. २६/१/२००३ च्या अंकात लेख.

★ सांगली सांस्कृतिक प्रतिष्ठान आयोजित राज्यस्तरीय निबंध स्पर्धेत उत्तेजनार्थ पारितोषिक...

★ सेवा प्रबोधिनी आयोजित निबंध स्पर्धेत पारितोषिक
विषय : लोकसंख्येचा विस्फोट

★ 'वॉल स्ट्रीट २००३' स्पर्धेत सहभाग.

★ राष्ट्रीय सेवा योजना युवा सप्ताह निबंध स्पर्धेत सहभाग.
विषय : आपला समाज चंगळवादी...

★ वालचंद हिराचंद वक्तृत्व स्पर्धेत सहभाग
विषय : जागतिकीतरण

★ मॉडर्न मराठी विभाग आयोजित वक्तृत्व स्पर्धेत सहभाग.
विषय : गणेशोत्सव

★ 'कजरी' दिवाळी अंकात लेख
विषय : दारूबंदी

★ 'स्वयंभू' दिवाळी अंकात लेख
विषय : क्रांतिसूर्य स्वा. वि. दा. सावरकर

★★



## मॉडर्नच्या माजी विद्यार्थ्यांचे यश



**सौ. स्मिता चिरपुटकर-मेहता**

१९९० ची विद्यार्थिनी. एम. एस्सी. विशेष प्रावीण्यासह उत्तीर्ण, डी. बी. एफ. (हैद्राबाद) परीक्षेत भारतातून प्रथम क्रमांक आणि सुवर्णपदक विजेती.



**कु. सुमेधा सत्यदेव देव**

२००२ मधील बी. एस्सी. च्या परीक्षेत विशेष प्रावीण्यासह उत्तीर्ण. संख्याशास्त्र विषयात विद्यार्थ्यांमध्ये सर्वप्रथम.

श्री. प्रसाद कुलकर्णी या आपल्या माजी विद्यार्थ्याने डॉ. पाध्ये यांच्या मार्गदर्शनाखाली पुणे विद्यापीठाची रसायन शास्त्र शाखेमधील पीएच. डी. पदवी प्राप्त केली.

याच विषयातील प्रगत संशोधनासाठी त्याची टोरँटो (अमेरिका) येथील The Hospital for Sick Children, Research Institute या संस्थेत मानक संशोधक म्हणून निवड झाली आहे.

**या विद्यार्थ्यांचे मॉडर्न महाविद्यालयातर्फे**
**हार्दिक अभिनंदन व**
**पुढील प्रगतीसाठी शुभेच्छा !**

**श्री. योगेश राघव महाजन**



महाविद्यालयातील कालावधी : जून १९९३-एप्रिल १९९६. आय. आय. टी. (पवई) ने आयोजित केलेल्या 'केमिस्ट्री क्वीझ-१९९६' मध्ये ३४ संघांमध्ये प्रथम क्रमांक.

१९९८ : पुणे विद्यापीठात एम. एस्सी. परीक्षेत तिसरा गुणानुक्रम व पुणे विद्यापीठात एम. एस्सी. (केमिस्ट्री) परीक्षेत प्रथम क्रमांक व GATE परीक्षेत भारतात तेरावा व महाराष्ट्रात पहिला क्रमांक.

२००३ : स्वित्झर्लंड मधील झूरिच येथील इ.टी.एच या प्रसिद्ध प्रयोगशाळेत प्रा. डॉ. डी. सीबाख यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधन करून पीएच.डी. साठी प्रबंध सादर व अमेरिकेतील पेनसिल्व्हानिया स्टेट युनिव्हर्सिटी मध्ये प्रा. डॉ. एस.एम.वाइनरेब यांच्याकडे पोस्ट-डॉक्टरल संशोधनकार्य करण्यासाठी बोलावणे.

★★

---

**कु. प्राची लाळे,**



महाविद्यालयातील कालावधी १९९६-१९९९

बी.कॉम परीक्षा विशेष प्रावीण्यासह उत्तीर्ण-२००१

२००२ मध्ये सी. ए. पदवी प्रथम प्रयत्नात उत्तीर्ण.

नवीन अभ्यासक्रमान्तर्गत पुण्यातून एकमेव विद्यार्थी उत्तीर्ण.

★★

---

**या विद्यार्थ्यांचे मॉडर्न महाविद्यालयातर्फे**
**हार्दिक अभिनंदन व**
**पुढील प्रगतीसाठी शुभेच्छा !**

# वार्षिक अहवाल २००२-२००३
## कनिष्ठ विभाग

राष्ट्रीय शैक्षणिक आकृतिबंधानुसार उच्च माध्यमिक (+२) स्तर, म्हणजेच अकरावी व बारावी, १९७६ पासून सुरू झाला. कनिष्ठ महाविद्यालय ही संकल्पना अस्तित्वात येऊन पंचवीस वर्ष होत आहेत. म्हणून २००३-२००४ हे शैक्षणिक वर्ष 'कनिष्ठ महाविद्यालय संकल्पनेचे रौप्यमहोत्सवी वर्ष' म्हणून साजरे केले जाणार आहे. महाविद्यालयाच्या कनिष्ठ विभागाने सर्व क्षेत्रात खूप प्रगती केली आहे. तज्ज्ञ शिक्षकवर्ग, शैक्षणिक आणि अभ्यासेतर उपक्रमात दरवर्षी प्रचंड यश मिळविणारे विद्यार्थी यामुळे कनिष्ठ महाविद्यालयीन क्षेत्रात मॉडर्न महाविद्यालयाचा कनिष्ठ विभाग एक स्वतंत्र आणि कर्तृत्वसंपन्न ठसा उमटविण्यात यशस्वी झाला आहे.

२००२-२००३ हे शैक्षणिक वर्ष ही प्रतिवर्षाप्रमाणे शैक्षणिक व अभ्यासेतर उपक्रमात महत्त्वाची कामगिरी बजावणारे ठरले आहे. या वर्षातील सर्व तपशील या अहवालाद्वारे आपल्यासमोर मांडताना मनास विलक्षण आनंद होतो आहे.

१) बारावी बोर्ड परीक्षा २००२-२००३ मध्ये प्रचंड, उत्तुंग व घवघवीत यश मिळविणारे विद्यार्थी -

| बारावी शास्त्र - | गुणवत्ता यादीतील क्रमांक |
|---|---|
| १. श्रोती शशांक रघुपती | ९ |
| --"-- (व्होकेशनल) | ९ |
| २. गर्गे अनुपम संजय | १० |
| --"-- (व्होकेशनल) | |
| ३. कोलते धवल संजीव | ११ |
| --"-- (व्होकेशनल) | ११ |
| ४. देशमुख मीनाक्षी हरीब | १४ |
| --"-- (व्होकेशनल) | १४ |

**शास्त्र शाखेच्या विविध विषयांत १००पैकी १०० गुण मिळविणारे विद्यार्थी :**

| | | |
|---|---|---|
| १. बालघरे सुचेता जयसिंग | - भूगोल | ९३/१०० |
| २. देशमुख मीनाक्षी हरीब | - भौतिकशास्त्र | |
| ३. कोलते धवल संजीव | - भौतिकशास्त्र | |
| ४. सिन्हा शक्ती धीरेंद्र | - भौतिकशास्त्र | |
| ५. चौधरी सुरजित सुभाषचंद्र | - भौतिकशास्त्र | |
| ६. कोलते धवल संजीव | - रसायनशास्त्र | |
| ७. मेहेंदळे मुक्ता मुकुंद | - रसायनशास्त्र | |

| **बारावी कॉमर्स** | **गुणवत्ता यादीतील क्रमांक** |
|---|---|
| १. डोळे दीप्ती शिरीष | ६ |
| २. पाटील सोनाली विश्वासराव | ७ |
| ३. काळे प्राची उदयकुमार | १४ |

**वाणिज्य शाखेतील 'बुक कीपिंग ॲण्ड अकौंटन्सी' या विषयात १०० पैकी १०० गुण मिळविणारे विद्यार्थी**

१. डोळे दीप्ती शिरीष
२. काळे प्राची उदयकुमार
३. गुजराथी शीतल नंदकुमार
४. धारवाडकर नेहा सतीश
५. बापट मिलिंद अनिल
६. नायर अंजू गोपीनाथ
७. आपटे अर्चना श्रीरंग
८. पाटील सोनाली विश्वासराव
९. नारकर स्नेहा चंद्रकांत
१०. कडलग मृदुला तुकाराम

वरील सर्व गुणवंत आणि यशवंत विद्यार्थ्यांचा सत्कार शनिवार दि. ६ जुलै २००२ रोजी महाविद्यालयातर्फे करण्यात आला. या समारंभात या विद्यार्थ्यांना विशेष पारितोषिके म्हणून भेटवस्तू देण्यात आल्या. मुलांच्या बरोबर त्यांच्या यशात महत्त्वाचा वाटा

असलेल्या पालकांचा सत्कार करण्यात आला.

या समारंभाचे प्रमुख अतिथी म्हणून महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी मा. श्री. सुनील घाटे (आय. ए. एस.) डायरेक्टर ऑडिट, डिफेन्स सर्व्हिस, सदर्न कमांड, पुणे यांना निमंत्रित केले होते. मा. डॉ. गजानन एकबोटे-कार्याध्यक्ष, नियामक मंडळ - प्रो. ए. सो., पुणे हे समारंभाच्या अध्यक्षस्थानी होते. केंद्र सरकारच्या सेवेत उच्च पदावर काम करणाऱ्या महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात झाल्याने या समारंभास वेगळे महत्त्व प्राप्त झाले होते.

**स्कॉलर बॅच :** महाविद्यालयाच्या कनिष्ठ विभागातील विद्यार्थी इतके अभिनंदनीय यश संपादन करतात याचे एक मुख्य कारण म्हणजे गेल्या अनेक वर्षांपासून महाविद्यालयाकडून स्कॉलरबॅच नावाचा राबविला जाणारा उपक्रम !

शास्त्र आणि वाणिज्य अशा दोन्ही विद्याशाखांसाठी ही स्कॉलरबॅच असते. दहावी व अकरावीमधील गुणवत्तेच्या आधारे काही निवडक विद्यार्थ्यांना या स्कॉलरबॅचमध्ये प्रवेश देण्यात येतात. वार्षिक परीक्षेनंतर येणाऱ्या सुट्टीतच ह्या स्कॉलर बॅचला प्रारंभ होतो. शिक्षक वर्ग सुट्टीतही महाविद्यालयात येऊन या विद्यार्थ्यांना शिकवितात. वर्षभर भरपूर चाचण्या, परीक्षा आणि उपक्रम यामुळे स्कॉलर बॅचमधील विद्यार्थ्यांना एक नवीन व्यक्तिमत्त्व प्राप्त होते आणि ते घवघवीत यश मिळवतात.

यंदाही २० एप्रिलपासून स्कॉलर बॅचला प्रारंभ झाला. शास्त्र शाखेतील खालील शिक्षकांनी शास्त्र स्कॉलर बॅचसाठी मेहनत घेतली.

- **शास्त्र शाखा :**

प्रा. रामचंद्र लिमये - उपप्राचार्य, (वरिष्ठ विभाग), प्रा. जयश्री कुलकर्णी, मा. खंडागळे, प्रा. भालचंद्र भोमे, प्रा. जयप्रकाश दशपुत्रे, प्रा. कांचन राजाध्यक्ष, प्रा. राठोड, प्रा. मंगला शिंदे, प्रा. रंजना देव, प्रा. अरुण इंगोळे, प्रा. अमृता सातभाई, प्रा. चारुशीला बुटाला, प्रा. अरविंद रायरीकर - वरिष्ठ विभाग, प्रा. निवेदिता महाजन - वरिष्ठ विभाग

**समन्वयक - प्रा. सौ. मंगला शिंदे**

**प्रा. महेंद्र गोहेल**

- **वाणिज्य शाखा :**

प्रा. आर. व्ही. कुलकर्णी, प्रा. बीना मुत्तलगिरी, प्रा.रेखा आगाशे, प्रा. दत्ता लिमये, प्रा. सुधा ढोनसळे, प्रा. सुनीता गोसावी, प्रा. वीणा नरगुंद, प्रा. कांचन राजाध्यक्ष, प्रा. सुजाता गायतोंडे, प्रा. डॉ. स्वाती कर्वे, प्रा. डोईफोडे, प्रा. विद्या शर्मा, प्रा. संजीवनी कुवळेकर

**समन्वयक -** प्रा. संजीवनी कुवळेकर

**कार्यालयीन कर्मचारी -**

श्री. विनायक खोले, श्री. दीपक शहा, श्री. राऊत

- **मार्गदर्शन :**

  प्रा. अ. गो. गोसावी - प्राचार्य

  प्रा. जगदीश चिंचोरे - उपप्राचार्य, कनिष्ठ विभाग

- स्कॉलर बॅचमधील मुलांच्या पालकांसाठी दोन पालकसभा घेण्यात आल्या. या सभांना पालकांनी अतिशय उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

**राष्ट्रीय सेवा योजना :**

या वर्षी राष्ट्रीय सेवा योजना (कनिष्ठ विभाग) द्वारा वर्षभर अनेक उपक्रम संपन्न झाले. प्रा. सौ. वीणा नरगुंद, प्रा. सौ. सुधा ढोनसळे व प्रा. पी. एम. सांबारे या कार्यक्रमाधिकाऱ्यांनी व रा. से. यो.

समिती सदस्यांनी खूप काम केले आहे. सर्वांचे मनःपूर्वक अभिनंदन ! (रा. से. यो. चा स्वतंत्र अहवाल अधिक माहितीसाठी पाहावा.)

**एन. सी. सी.**

या वर्षी एन. सी. सी. च्या तीनही युनिटसूनी उत्तम काम केले आहे. आर्मी, नेव्हल आणि एअर युनिटस्मधील विद्यार्थ्यांनी अनेक उपक्रम केले. प्रा. विलास आल्हाट व इतर सहकारी यांचे अभिनंदन ! (एन. सी. सी. चा स्वतंत्र अहवाल पाहावा.)

**कला मंडळ :**

महाविद्यालयाच्या कला मंडळाने प्रतिवर्षाप्रमाणे कला प्रांतात जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय पातळीवर पुरस्कार मिळविले. आंतरमहाविद्यालयीन आणि महाविद्यालयांतर्गत पातळीवर अनेक विद्यार्थ्यांनी भाग घेतला. कला मंडळाचे कार्याध्यक्ष प्रा. जयंत जोर्वेकर, (कनिष्ठ वाणिज्य विभाग) आणि कला मंडळाचे सर्व सदस्य यांचे अभिनंदन ! कला मंडळाचा स्वतंत्र अहवाल पाहावा.

**क्रीडा :**

क्रीडा क्षेत्रात कनिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थी खेळाडूंनी असाधारण यश संपादन केले आहे. प्रा. विनोद छाब्रा व प्रा. विनय शेरीकर यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी संघांनी सांघिक विजेतेपदे मिळविली आहेत. त्याबद्दल दोघांचे अभिनंदन ! (क्रीडा विभागाचा स्वतंत्र अहवाल पाहावा.)

**ठळक नोंदी :**

(१) कनिष्ठ महाविद्यालयाच्या स्थापनेला २५ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल एक शिबिर घेण्यात आले. पुणे जिल्ह्यातील कनिष्ठ महाविद्यालयांच्या उपप्राचार्य व पर्यवेक्षकांना निमंत्रित करण्यात आले. शिक्षण संचालक - मा. श्री. देशमुखसाहेब, सहायक शिक्षण संचालक श्री. परबसाहेब आणि कर्मचारी वर्ग या शिबिरास उपस्थित होते. कनिष्ठ महाविद्यालयीन स्तरावर आलेल्या व येणाऱ्या अनेक समस्यांचा ऊहापोह या उपक्रमात झाला. कनिष्ठ महाविद्यालयासमोर अनेक समस्या आहेत. बऱ्याच वेळी प्रशासकीय पातळी व शासकीय पातळी यामध्ये कार्यकारण भावाचा विचार करता पुरेसा मेळ बसत नाही. उदाहरणार्थ - शिक्षक नेमणूक मान्यता - आता कित्येक वेळा वर्षाप्रारंभी नियुक्त झालेल्या शिक्षकाला सात आठ महिन्यानंतर मान्यता मिळते. असा विलंब का होतो? तो शासकीय यंत्रणेमुळे होतो की शाळा महाविद्यालयाकडून शासनाकडे जाणारी कागदपत्रे पुरेशी नसतात किंवा त्यात त्रुटी असतात म्हणून होतो?

रजेचे नियम कसे असतात? शिक्षकाला रजा कशा पद्धतीने घेता येते? कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेशाच्या वेळी प्रशासकीय पातळीवर कोणत्या अडचणी येतात? एखाद्या शिक्षकाची खंडित सेवा असेल तर तो खंड समाचित करण्याची प्रक्रिया कशी असते? - असे अनेक प्रश्न या चर्चासत्रात उपस्थित झाले. शिक्षण संचालक मा. श्री. देशमुखसाहेब व शिक्षण सहसंचालक मा. श्री. परबसाहेब आणि शासकीय कर्मचारी यांनी अगदी सविस्तर पद्धतीने या प्रश्नांना उत्तरे दिली.

समारोपाच्या वेळी तर त्यांनी आवर्जून सांगितले की, अशा पद्धतीची चर्चासत्रे प्रतिवर्षी भरली पाहिजेत. त्यामुळे गेल्या २५ वर्षांत ज्या अडचणी या ना त्या कारणामुळे सुटू शकलेल्या नाहीत, त्या मार्गी कशा लावायच्या ते ठरविता येईल. मा.प्राचार्य श्री. गोसावी

सर यांनीही त्यांचे चिंतन चर्चासत्रात मांडले. हे चर्चासत्र संपन्न होण्यासाठी कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांनी खूप मदत केली.

(२) यंदाच्या वर्षापासून इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी हा विषय महाविद्यालयात कनिष्ठ विभागासाठी सुरू करण्यात आला.

(३) बारावी बोर्ड परीक्षा २००२-२००३ मध्ये वाणिज्य विभागातील 'बुक कीपिंग अॅण्ड अकौंटन्सी' या विषयात एकूण १० विद्यार्थी १००/१०० मार्कस मिळवून उत्तम यशाचे मानकरी झाले. या विद्यार्थ्यांना स्कॉलर बॅचला (कॉमर्स) शिकविणाऱ्या प्रा. सौ. रेखा आगाशे यांना प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीद्वारे बालगंधर्व रंगमंदिरात संपन्न झालेल्या कै. शंकरराव कानिटकर स्मृतिदिनाच्या दिवशी 'आदर्श शिक्षिका' हा पुरस्कार मिळाला. गेली अनेक वर्षे प्रा. सौ. आगाशे हा विषय शिकवत आहेत आणि त्यांच्या मार्गदर्शनामुळे अनेक विद्यार्थ्यांना अकौंटन्सी विषयात उत्तम यश मिळाले आहे.

(४) अनुताई भागवत यांच्या स्नेहप्रकाश परिवारातर्फे अंध विद्यार्थ्यांसाठी बारावीच्या विविध विषयांवर शैक्षणिक ध्वनिफिती (कॅसेटस्) प्रसिद्ध करण्यात आल्या. या सेवाभावी कार्यात आपल्या महाविद्यालयातील प्रा. सौ. वीणा नरगुंद यांनी समन्वयक म्हणून जबाबदारी सांभाळली. प्रा. डॉ. सौ. स्वाती कर्वे (मराठी), प्रा. सूर्यवंशी (हिंदी), प्रा. बीना मुत्तलगिरी (इंग्रजी), प्रा. वंदना जोशी (इंग्रजी) यांनी कोणतेही मानधन न घेता संहितालेखन केले.

(५) यंदाच्या एन. एस. ई. पी. या आय. ए. पी. टी. (मुंबई) द्वारा आयोजित राज्यस्तरीय परीक्षेत आपल्या महाविद्यालयातील आदित्य गोडसे व ओंकार दलाल या विद्यार्थ्यांना उत्तम यश मिळाले.

नॅशनल सायन्स ऑलिंपियाड (NSO) ही परीक्षा सायन्स ऑलिंपियाड फाऊंडेशन (SOF) नवी दिल्ली यांच्यातर्फे घेतली जाते. सन २००२-२००३ या शैक्षणिक वर्षात आपल्या महाविद्यालयातील अकरावी व बारावी शास्त्र वर्गातील विद्यार्थ्यांनी फेब्रु. २००३ मध्ये ही परीक्षा दिली. भौतिकशास्त्र, वनस्पतीशास्त्र आणि रसायनशास्त्रातील उच्च बौद्धिक पातळी मापन करणारे वस्तुनिष्ठ प्रश्न विचारले जातात. संपूर्ण भारतात ही परीक्षा दोन स्तरांवर घेतली जाते. पहिल्या स्तरात प्रत्येक वर्गातून ५०० विद्यार्थी गुणवत्तेच्या तत्त्वावर निवडले जातात आणि या ५०० विद्यार्थ्यांतून दुसऱ्या स्तरासाठी १०० विद्यार्थी निवडले जातात. यातील विद्यार्थ्यांना रोख पारितोषिके, शिष्यवृत्ती, सुवर्ण-रौप्य-ब्राँझ पदके दिली जातात. ही परीक्षा अतिशय कठीण अशी असते आय. आय. टी. दिल्ली मधील तज्ज्ञ नामवंत प्राध्यापक या स्पर्धेचे परीक्षक असतात. अशा सर्वोत्तम परीक्षेत ओंकार दलाल (अकरावी-क) हा मुलगा पहिल्या स्तरातल्या परीक्षेत महाराष्ट्रात दुसरा आला आणि दुसऱ्या राष्ट्रीय स्तरात संपूर्ण भारतात ६४ वा आला. त्याला रोख पारितोषिक, घड्याळ, देणगी धनादेश रु. ३०००/- (पुस्तक खरेदीसाठी) मिळाला.

मोहित मित्रा हा (अकरावी-फ) आपला विद्यार्थी महाराष्ट्रात पहिल्या स्तरात ११ वा आला.

दुसऱ्या स्पर्धा म्हणजे इंडियन फिजिक्स ऑलिंपियाड (Inpho) इंडियन केमिस्ट्री ऑलिंपियाड (Incho) इंडियन बायॉलॉजी ऑलिंपियाड (Inbio). या परीक्षांचे आयोजन भाभा अॅटोमिक रिसर्च सेंटर मुंबई, टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्च मुंबई, आणि इंडियन असोसिएशन ऑफ फिजिक्स टीचर्स यांनी केले होते.

ओंकार दलाल आणि मोहित मित्रा यांच्याबरोबर आदित्य गोडसे (बारावी फ) महाराष्ट्र राज्यात जे १% विद्यार्थी पात्रता फेरीत निवडतात त्यात निवडला गेला.

रोहन जोशी (अकरावी फ) हा रिजनल मॅथॅमेटिक्स ऑलिंपियाड - महाराष्ट्र आणि गोवा रिजनमध्ये पहिला आला.

सागर भट (बारावी फ) हा विद्यार्थी याच परीक्षेत नववा आला.

सायली लिमये (बारावी फ) ही विद्यार्थिनी मॅथॅमेटिक्स ऑलिंपियाड - आय आय टी पवई - या परीक्षेत पहिली आली आणि तिला सुवर्णपदक मिळाले. सायलीला इंडियन मॅथॅमेटिकल ऑलिंपियाडसाठीही निवडले गेले.

स्नेहल घोणे (अकरावी फ) रोहन जोशी यांना नॅशनल टॅलेंट सर्च स्कॉलरशिप मिळाली. सौदामिनी नाईक, क्षितिजा देशपांडे, सुहास महाजन यांनाही स्कॉलरशिप मिळाली आहे.

या स्पर्धांसाठी प्राचार्य प्रा. अ. गो. गोसावी, उपप्राचार्य प्रा. जगदीश चिंचोरे यांनी प्रशासकीय पातळीवरील सर्व मदत, सहकार्य, मार्गदर्शन दिले.

प्रा. बी. डब्ल्यू. भोमे (पर्यवेक्षक), प्रा. एस.आर. पोखरकर, प्रा.सौ. एम. बी. शिंदे, प्रा. सौ. सी. व्ही. बुटाला, प्रा. सौ. कांचन राजाध्यक्ष, प्रा. एम. जी गोहेल या शिक्षक वर्गाने या परीक्षांसाठी अतिशय मेहनत घेऊन मुलांना मार्गदर्शन केले.

प्रा. सौ. शुभांगी बर्वे यांनी परिश्रमपूर्वक समन्वयकाची जबाबदारी पार पाडली.

(६) स्कॉलर बॅच कॉमर्समधील विद्यार्थ्यांनी प्रा. सुनीता गोसावी व प्रा. वीणा नरगुंद यांच्या मार्गदर्शनाखाली 'स्टडी ऑफ इंडियन इंडस्ट्रियालिस्ट ॲण्ड हिज इंडस्ट्रीज' या विषयावर शोधनिबंध सादर केले. इतर वर्गातील विद्यार्थ्यांनीही उत्सुकतेने या प्रकल्पात भाग घेतला. स्कॉलर बॅचमधील विद्यार्थी-विद्यार्थिनींच्या गटाने सादर केलेल्या 'डॉ. कुरियन व अमूल' या प्रकल्पाला सर्वोत्कृष्ट प्रकल्पाचे पारितोषिक देण्यात आले. या स्पर्धेत एकूण सोळा गटांनी भाग घेतला. प्रा. डॉ. माधवी मित्र, प्रा. मीना गोयल व प्रा. जीविता गुजर यांनी परीक्षणाची जबाबदारी सांभाळली.

(७) प्रा. भोमे यांची एच. एस. सी. बोर्डाच्या अभ्यास मंडळावर निवड झाली. तसेच प्रा. शेरखाने यांनी MH-CIT चा कोर्स पूर्ण केला.

(८) प्रसाद पसरणीकर (बारावी ग) ह्या विद्यार्थ्याची कनिष्ठ महाविद्यालयातील 'सर्वोत्तम विद्यार्थी' म्हणून निवड करण्यात आली.

**सर्वांचेच मन:पूर्वक अभिनंदन !**

कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व शिक्षकांनी मन:पूर्वक काम केल्यामुळेच असे यश संपादन करता येते. तथापि या यशामागे मा. प्राचार्य श्री. अ. गो. गोसावीसर यांचे मार्गदर्शन व सक्रिय सहकार्य सदोदित मिळत असते हे विशेष नमूद केले पाहिजे. त्याचप्रमाणे कार्यालयातील रजिस्टार श्री. दिलीप खोपकर, इतर कर्मचारी, ग्रंथालयातील कर्मचारी सेवक वर्ग यांचीही हार्दिक मदत नेहमी मिळते.

एवढेच नव्हे तर वरिष्ठ विभागातील - प्रा. आर. जी. लिमये (उपप्राचार्य), प्रा. डॉ. यशवंत वाघमारे (उपप्राचार्य) - प्रा. जी. एम. बनसुडे (उपप्राचार्य - पदव्युत्तर विभाग) आणि वरिष्ठ विभागातील अनेक प्राध्यापक यांचेही सहकार्य लाभते हे कृतज्ञतेने नमूद करीत आहोत.

| | |
|---|---|
| **प्रा. भालचंद्र भोमे** | **प्रा. जगदीश चिंचोरे** |
| पर्यवेक्षक | उपप्राचार्य |
| कनिष्ठ विभाग | कनिष्ठ विभाग |

★★

## कला मंडळ

महाविद्यालयीन कला प्रांतात सदैव, जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय पातळीवर सणसणीत यश मिळविणाऱ्या कलाकार विद्यार्थ्यांचे महाविद्यालय म्हणजे 'मॉडर्न महाविद्यालय-पुणे ५' असे कुणी म्हटले तर त्यात वावगे असे काहीच नाही. उलट हे विधान शंभर टक्के खरे आहे असेच म्हणावे लागेल.

शैक्षणिक वर्ष २००२-२००३ चा 'कला मंडळ वार्षिक अहवाल' आपल्या हाती देतांना कला मंडळाचा कार्याध्यक्ष या नात्याने मला अतिशय आनंद होत आहे. अर्थात कला मंडळातील माझे सहकारी प्राध्यापक सदस्य, विद्यार्थी कलाकार यांच्या अथक प्रयत्नांमुळे असे सुयश मिळते आहे हे नम्रपणे नमूद केले पाहिजे.

**१) कला मंडळ २००२-२००३**

मा. प्राचार्य श्री. अ. गो. गोसावी-प्रेसिडेंट, प्रा. जयंत ल. जोर्वेकर-चेअरमन, इतर सदस्य पुढीलप्रमाणे-प्रा. डॉ. सौ. सुषमा जोग, प्रा. सौ. संजीवनी कुवळेकर, प्रा. सौ. सुनीता गोसावी, प्रा. सौ. कांचन राजाध्यक्ष, प्रा. डॉ. सौ. स्वाती कर्वे, प्रा. सौ. निशा भंडारे, प्रा. श्रीमती जीविता गुजर, प्रा. सौ. अमृता सातभाई, प्रा. विजय गायकवाड, प्रा.विनोद सूर्यवंशी, प्रा. आर. डब्ल्यू. कुलकर्णी, प्रा. शाम देशमुख, प्रा. नम्रता अवसरीकर, प्रा. अशोक कांबळे, प्रा. ए. व्ही. ठाकूर.

कला मंडळाला सातत्याने सक्रिय मदत करणारा प्राध्यापक वर्ग - प्रा. राजीव कुलकर्णी, प्रा. नरेंद्र नायडू, प्रा. सौ. पुरोहित, प्रा. सौ. विनिता कुलकर्णी, प्रा. सौ. सुरेखा आगाशे, प्रा. लाळे, प्रा. सौ. वीणा नरगुंद, प्रा. यशराज बोरसे, प्रा. शेरीकर, प्रा. छाबरा.

कला मंडळाचे कार्यालयीन सदस्य -श्री. दीपक शहा, सौ. स्वाती पटवर्धन.

**★ कलाकार विद्यार्थ्यांनी गाजविलेल्या विविध आंतरमहाविद्यालयीन स्पर्धा :**

**१) पुरुषोत्तम करंडक एकांकिता स्पर्धा -**

या वर्षी पुरुषोत्तम करंडक एकांकिका स्पर्धेत सुजय भडकमकर (द्वितीय वर्ष वाणिज्य) लिखित 'विभवांतर' या एकांकिकेचा देखणा प्रयोग सादर करण्यात आला. प्राथमिक फेरीत कु. मैत्रेयी बिनीवाले (प्रथम वर्ष वाणिज्य) या विद्यार्थिनीला अभिनयाचे विशेष पारितोषिक मिळाले. सुश्रुत भागवत (द्वितीय वर्ष वाणिज्य) या विद्यार्थ्याने संघप्रमुखाची जबाबदारी पार पाडली. सुजय भडकमकरने दिग्दर्शन व प्रकाश योजना तर श्रद्धा पंडित (तृतीय वर्ष कला) हिने पार्श्वसंगीताची जबाबदारी पार पाडली.

संघातील कलाकार - सुश्रुत भागवत, सुजाता पाटील, सुकीर्त गुमास्ते, मैत्रेयी बिनिवाले, मयुरी पाटील, श्रद्धा जोशी, निखिल राऊत, समीर हंपी, पल्लवी उमराणी, अनुप कुलकर्णी, अमोघ, योगेश, सुजय भडकमकर, श्रद्धा पंडित, महन्तेश्वर भोसले.

**(२) भारत विकास परिषदद्वारा आयोजित 'राष्ट्रीय समूहगान स्पर्धा'** - यंदाच्या या स्पर्धेत आपल्या संघाला जिल्हा स्तरावर प्रथम क्रमांक, राज्य स्तरावर प्रथम क्रमांक मिळाला आणि संघ अंबाला (हरियाना) येथे झालेल्या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत दाखल झाला. मराठी, हिंदी आणि संस्कृत अशा तीन भाषांमधील गीते मुलांनी सादर केली. प्रा. डॉ. सौ. सुषमा जोग यांनी अपार मेहनतीने ही गीते बसवून घेतली होती. मनोज चव्हाण या माजी विद्यार्थ्यांनेही खूप मदत केली. प्रा. सौ. कांचन राजाध्यक्ष व प्रा. सौ. पुरोहित यांच्या मार्गदर्शक व्यवस्थापनाखाली हा संघ अंबाला येथे रवाना झाला.

संघातील गायक कलाकार -प्रज्ञा वैज्ञ, गौरी अत्रे, रश्मी सरदेसाई, सिद्धा डोंगरे, वृंदा बेल्हेकर, दीप्ती जाधव, रश्मी यादव, प्रज्ञा कोरपे, श्रद्धा वाळके.

वादक कलाकार - प्रणव कुलकर्णी, निलेश कुलकर्णी, अनिरुद्ध देशपांडे.

**(३) 'मिलाप' - आंतरमहाविद्यालयीन नृत्य स्पर्धा -** जय महाराष्ट्र ग्रुप या स्पर्धेत आपल्या संघाला प्रथम पारितोषिक मिळाले. संघातील कलाकार - सचिन धुमाळ, सचिन शिंदे, श्रीकांत सावंत, मंगेश भोसले, आलोक औंधकर, संतोष सोनवणे, राम पायाळ, प्राजक्ता इनामदार, आरती मलवेदी, अश्विनी घळसासी, आदिती जोशी. प्रा. जीविता गुजर व प्रा. निशा भंडारे - मार्गदर्शिका

**(४) अल्फा करंडक आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धा - (राज्यस्तरीय) -** या वर्षी नवीनच सुरू झालेल्या या स्पर्धेत आपण 'सखी' नावाची एकांकिका सादर केली. ख्यातनाम लेखक कै. श्री. व. पु. काळे यांच्या कथेचे सुश्रुत भागवत याने रूपांतर केले होते. सुश्रुतनेच या एकांकिकेचे दिग्दर्शन केले. पुणे विभागात ज्या पस्तीस एकांकिता सादर झाल्या त्यात 'सखी' चा तिसरा नंबर आला.

कलाकार - सुश्रुत भागवत, मयुरी आपटे, अतुल पवार. रंगमंच प्रकाश योजना - ध्वनि संयोजन -सुजय भडकमकर, सुकीर्त गुमास्ते, निखिल पवार, श्रद्धा पंडित, श्रद्धा जोशी आणि इतर.

**(५) सिंबायोसिस कल्चरल ग्रुप आयोजित आंतरमहाविद्यालयीन नृत्य स्पर्धा 'न्हिदम' संघातील विद्यार्थी -** सपना चोळके, श्वेता परांजपे, मयुरी रानडे, उर्मिला बोलदेरा, दीप्ती बिबीकर, रीमा चित्रे, उर्वेश शर्मा, अश्विनी मराठे.

**(६) लायन्स क्लब अहमदनगर सुगम संगीत स्पर्धा -**गायक कलाकार - आरती नाईक, गायत्री पाठक. वादक - क्लबचेच. मार्गदर्शिका - सौ. संजीवनी कुवळेकर. या स्पर्धेत आरती नाईक या विद्यार्थिनीस चतुर्थ क्रमांक मिळाला.

**(७) दादर - माटुंगा कल्चरल क्लब आयोजित सुगम संगीत स्पर्धा - पुणे शहर विभाग**

कलाकार - श्रद्धा वाळके, केतकी आडकर

**(८) मॉडर्न करंडक आंतरमहाविद्यालयीन द्वंद्वगीत स्पर्धा -**ही स्पर्धा पूर्वी 'मॉम करंडक आंतरमहाविद्यालयीन द्वंद्वगीत स्पर्धा' म्हणून सतत आठ वर्षे ओळखली जात होती. या वर्षीपासून महाविद्यालयाने ही स्पर्धा कुणाचेही प्रायोजकत्व न घेता स्वबळावर आयोजित करण्याचा निर्णय घेतला. पुणे-मुंबई महाविद्यालयीन क्षेत्रात लोकप्रिय झालेल्या या स्पर्धेसाठी श्री. राहुल घोरपडे, सौ. माधुरी जोशी व श्री. संजय पंडित यांनी परीक्षणाची जबाबदारी पार पाडली. स्पर्धेचा निकाल खालीलप्रमाणे:

**सांघिक पारितोषिके -** प्रथम क्रमांक-(मॉडर्न करंडक विजेता संघ) - अरुंधती कोटस्थाने, आशुतोष जोशी (गरवारे कॉलेज ऑफ कॉमर्स, पुणे)

द्वितीय क्रमांक- सचिन सुर्वे, विनोद सुर्वे (नेस वाडिया कॉलेज ऑफ कॉमर्स, पुणे)

तृतीय क्रमांक-प्रिया गोपाल, तुषार रिठे (मॉडर्न महाविद्यालय, गणेशखिंड, पुणे-५३)

**वैयक्तिक पारितोषिके -**

**गायिका-**प्रथम क्र. -प्रिया गोपाल-मॉडर्न कॉलेज, गणेशखिंड, द्वितीय क्र.-केतकी आडकर-मॉडर्न कॉलेज,पुणे

**गायक-** प्रथम क्र.-आशुतोष जोशी-गरवारे कॉमर्स, सुधन्वा पानसे - मॉडर्न महाविद्यालय, गणेशखिंड

या स्पर्धेसाठी स्पर्धा प्रमुख म्हणून प्रा. सौ. अमृता सातभाई यांनी काम केले. प्रा. सौ. रेखा आगाशे, प्रा. सौ. वीणा नरगुंद, प्रा. सौ. पुरोहित, प्रा. नरेंद्र नायडू, प्रा. डॉ. सौ. जोग. प्रा. राजीव कुलकर्णी, प्रा. शेरीकर, प्रा. छाबरा, प्रा. सौ. विनिता कुलकर्णी यांची खूप मदत झाली. संगीत संयोजनाची जबाबदारी महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी आणि नवोदित उभरता संगीतकार श्री. जितेंद्र कुलकर्णी याने सांभाळली.

या स्पर्धेचा पारितोषिक वितरण सभारंभ सुप्रसिद्ध गायक श्री. श्रीकांत पारगावकर यांच्या हस्ते संपन्न झाला. स्पर्धेचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. सौ. स्वाती कर्वे व प्रा. डॉ. सौ. सुषमा जोग यांनी केले. ही स्पर्धा तीन फेऱ्यांत घेतली गेली. मराठी गीत-संगीत क्षेत्रातील दोन दिग्गज, महाराष्ट्राचे लाडके गायक कै. सुधीर फडके व कै. शांताबाई शेळके यांना ही स्पर्धा अर्पण केली. बाबूजींनी गायलेली मराठी गीते, शांताबाई शेळके यांची गीते स्पर्धकांनी सादर केली. या स्पर्धेत चौदा महाविद्यालयांच्या संघांनी भाग घेतला.

**(९) विविध आंतरमहाविद्यालयातील नृत्य स्पर्धेतील विद्यार्थी** -श्रीकांत शेट्टी, सचिन गायकवाड, प्राजक्ता अणेराव, अभिजित गायकवाड, सागर तकिर, गिरीश यादव, नीता, वेदश्री, तेजस्विनी, ललित, वैभव महाडिक, अमित पवार, पराग जोशी, संग्राम, आशिष, वरुण शाह, संदीप, स्नेहल, कादिर शेख.

बीटस् ॲण्ड बूटस् २००२ - प्रथम क्रमांक, युवा महोत्सव - बेस्ट कोरियोग्राफी प्रथम क्रमांक.

## महाविद्यालयांतर्गत स्पर्धा

महाविद्यालयात अनेक विद्यार्थी कलाकार असतात. परंतु सर्वांनाच आंतरमहाविद्यालयीन स्पर्धांमध्ये सहभाग घेता येत नाही कारण आंतरमहाविद्यालयीन स्तरावर निवडीचा निकष असतो. तथापि या विद्यार्थ्यांनाही व्यासपीठ मिळावे या उद्देशाने गेली वीस वर्षे अव्याहतपणे आपले महाविद्यालय महाविद्यालयांतर्गत स्पर्धेचे आयोजन करते. नृत्य, संगीत, वक्तृत्व, वादविवाद, मेंदी, रांगोळी, पोस्टर्स, अशा अनेक पातळ्यांवर ह्या स्पर्धा घेतल्या जातात. या स्पर्धेचे वृत्त खालीलप्रमाणे :

**१) महाविद्यालयांतर्गत संगीत स्पर्धा** - दि. ३० ऑगस्ट २००२.

स्पर्धाप्रमुख - प्रा. डॉ. स्वाती कर्वे.

**वरिष्ठ गट-मराठी गीत**-प्रथम क्र.- श्रद्धा पंडित, द्वितीय क्र.- प्रणव कुलकर्णी, तृतीय क्र. - अमरजा आफळे, **हिंदी गीत**- प्रथम क्र.- श्रद्धा वाळके, द्वितीय क्र.- प्रशांत जाधव, तृतीय क्र.-प्रज्ञा वैज्ञ.

**उपशास्त्रीय गायन**- प्रथम क्र.-श्रद्धा पंडित, द्वितीय क्र.-गायत्री पाठक, तृतीय क्र.-केतकी आडकर, **द्वंद्वगीत**- प्रथम क्र.-सिद्धा डोंगरे, गौरी अत्रे, द्वितीय क्र.- प्रशांत जाधव, अमरजा आफळे, तृतीय क्र. मीनल खानापूरकर, ज्योती वाळिंबे, **समूहगीत**-प्रथम क्र.- प्रज्ञा वैद्या व इतर, द्वितीय क्र. गौरी अत्रे व इतर, तृतीय क्र. -श्वेता परांजपे व इतर.

**कनिष्ठ गट - मराठी गीत**-प्रथम क्र.- अनुराधा देशमुख, द्वितीय क्र.- मनिषा गुरव, तृतीय क्र. - नीता वैद्य.

**हिंदी गीत** - प्रथम क्र.- आरती नाईक, द्वितीय क्र.- केतन महामुनी, तृतीय क्र. - जेम्स पॉल.

**उपशास्त्रीय गायन**-प्रथम क्र.- आरती नाईक, द्वितीय क्र.- नीता वैद्य, तृतीय क्र. धनश्री यार्दी

या स्पर्धेसाठी सौ. प्रेमा फाटक, सौ. संगीता गद्रे व श्री. समीर पुणतांबेकर यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. वरिष्ठ महाविद्यालयातून चौऱ्याण्णव व कनिष्ठ महाविद्यालयातून तेहतीस स्पर्धकांनी भाग घेतला. स्पर्धा संयोजनात प्रा. सौ. सुनीता गोसावी, प्रा. सौ. संजीवनी कुवळेकर, प्रा. विनोद सूर्यवंशी यांनी खूप मदत केली.

## महाविद्यालयांतर्गत नृत्यस्पर्धा

**वैयक्तिक-वरिष्ठ गट** - प्रथम क्र.- स्वरूपा घोरपडे, द्वितीय क्र.-सोनाली बेल्हे, तृतीय क्र.-सुषमा पवार, विशेष पारितोषिक - कृष्णा आगरवाल.

**कनिष्ठ गट** - प्रथम क्र.-हरिना सिरेशा, द्वितीय क्र.-कीर्ती बन्सल, तृतीय क्र.-मानसी वाठारकर, उत्तेजनार्थ-प्रणाली जोर्वेकर.

या स्पर्धेचे परीक्षक म्हणून प्रा. सौ. सुनीता पुरोहित व प्रा. नरेंद्र नायडू यांनी काम पाहिले.

**सांघिक**-प्रथम क्र.- शीतल शिंदे व इतर, द्वितीय क्र.-श्रीजित नायर व इतर, तृतीय क्र.-ज्योती वाळिंबे व इतर, उत्तेजनार्थ-श्वेता परांजपे व इतर.

सांघिक स्पर्धेसाठी प्रा. सौ. सुनीता पुरोहित व प्रा. सौ. विद्या शर्मा यांनी काम पाहिले. स्पर्धाप्रमुख म्हणून प्रा. सौ. संजीवनी कुवळेकर यांनी काम पाहिले.

## महाविद्यालयांतर्गत मेंदी स्पर्धा

**वरिष्ठ महाविद्यालय** - प्रथम क्र.- सपना चोळके, द्वितीय क्र.- किरण गेहलोत, तृतीय क्र.(विभागून) - वृषाली खळदकर, कविता पडवळ.

**कनिष्ठ महाविद्यालय** - प्रथम क्र.- अर्चना परदेशी, द्वितीय क्र.- अमृता जोशी, तृतीय क्र. (विभागून)-रोशनी लोणारकर, सोनल तांबे.

या स्पर्धेचे परीक्षक म्हणून सौ. शीला चावरिया यांना निमंत्रित केले होते. प्रा. सौ. निशा भंडारे यांनी स्पर्धाप्रमुख म्हणून काम पाहिले.

## वर्गवार विविध गुणदर्शन - स्नेहसंमेलन

यंदाच्या वार्षिक स्नेहसंमेलनात कनिष्ठ गटात अकरावी ब या वर्गाने तर वरिष्ठ गटात द्वितीय वर्ष वाणिज्य (क) या वर्गाने सांघिक विजेतेपदाचे करंडक मिळविले. प्रा. डॉ. सौ. सुषमा जोग या निमंत्रक होत्या.

कला मंडळाचा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ सुप्रसिद्ध अभिनेते श्री. राहुल सोलापूरकर यांच्या हस्ते संपन्न झाला.

मॉडर्न महाविद्यालयाचे प्राचार्य मा. अ. गो. गोसावीसर, उपप्राचार्य प्रा. आर. जी. लिमयेसर (प्रमुख अभ्यासेतर उपक्रम), उपप्राचार्य मा. डॉ. यशवंत वाघमारेसर, उपप्राचार्य प्रा. बनसुडेसर, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा. जगदीश चिंचोरेसर, रजिस्टार श्री. दिलीप खोपकर, कार्यालयीन कर्मचारी वर्ग, ग्रंथपाल सौ. दात्रेमॅडम व ग्रंथालयातील कर्मचारी व सेवक वर्ग, सर्व शिपाई वर्ग या सर्वांच्या सहकार्याने, मदतीनेच कलामंडळाचे सर्व उपक्रम संपन्न होतात. त्यांच्या पाठिंब्याशिवाय तर कोणतीही गोष्ट शक्य नाही. म्हणून कोरडे आभार मानण्यापेक्षा या सर्वांच्या ऋणातच राहणे योग्य आहे.

**प्रा. जयंत जोर्वेकर**
कार्याध्यक्ष, कला मंडळ

★★

## नॅशनल सायन्स ऑलिंपियाड स्पर्धा

मॉडर्न महाविद्यालय, शिवाजीनगर, पुणे-५ येथील इयत्ता अकरावी व बारावी शास्त्र शाखेतील खालील विद्यार्थ्यांनी नॅशनल सायन्स ऑलिंपियाड (5th NSO) या शास्त्रीय स्पर्धात्मक परीक्षेच्या प्रथम फेरीत उल्लेखनीय यश मिळविले आहे. रोहन शिरीष जोशी (इ. ११ वी), क्षितिजा भरत देशपांडे (इ. १२ वी) व ओंकार अनंत दलाल (इ. १२ वी) यांनी महाराष्ट्रात अनुक्रमे प्रथम, तृतीय व चतुर्थ क्रमांकाने उत्तीर्ण होण्याचा मान संपादला आहे. हे विद्यार्थी या परीक्षेच्या दुसऱ्या फेरीसाठी पात्र ठरले आहेत. या वर्षी ३१ जानेवारी २००३ रोजी झालेल्या या परीक्षेच्या प्रथम पात्रता फेरीत मॉडर्न महाविद्यालयाच्या इतर अकरा विद्यार्थ्यांनी उत्तेजनार्थ प्रशस्तिपत्रके मिळविली आहेत. राजुरकर मिहीर, चुणेकर अलकनंदा, तेजसकुमार, यादव गिरीश महाजन, सुहास घोणे स्नेहल, लेखवानी आशिष, भावे आदित्य, केतकर अखिल (इ. ११ वी) तसेच, तोंडे चेतन व भट सागर (इ. १२ वी) नॅशनल सायन्स ऑलिंपियाड ही परीक्षा सायन्स ऑलिंपियाड फाउंडेशन (SOF) नवी दिल्लीतर्फे आयोजन केली जाते.

या विद्यार्थ्यांना पुढील शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले. श्री. भोमे, श्री. दशपुत्र, सौ. राजाध्यक्ष, सौ. शिंदे, सौ. बुटाला, सौ. बर्वे, श्री. गोहेल, श्री. पोखरकर

★★

## राष्ट्रीय सेवा योजना समिती

कनिष्ठ महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय सेवा योजना १९९६-९७ या वर्षापासून सुरू करण्यात आली. २००२-०३ हे या योजनेचे सातवे वर्ष. सुरुवातीपासूनच आपल्या महाविद्यालयाने या योजनेअंतर्गत एडस् निर्मूलन, उत्तम आरोग्य संवर्धन शिबिर, व्यक्तिमत्त्व विकास शिबिर, व्यवसाय मार्गदर्शन व यासारखे अनेक उपक्रम राबवत पाच वर्षांच्या आतच राज्य शासनाच्या राज्यस्तरीय उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्काराच्या रांगेत स्थान पटकाविले.

या योजनेअंतर्गत कनिष्ठ महाविद्यालयाचे दोनशे विद्यार्थी स्वयंसेवक आहेत. समिती सदस्य - सल्लागार - प्रा. मानसिंग साळुंके हे आहेत. कार्यक्रम अधिकारी - प्रा. सौ. वीणा नरगुंद, प्रा. सौ. सुधा ढोनसळे व प्रा. पोपटराव सांबारे. सदस्य - प्रा. गवळी, प्रा. सूर्यवंशी, प्रा. डोईफोडे, प्रा. खंडाळे, प्रा. सौ. निघोट, प्रा. सौ. शिंदे, प्रा. सौ. बर्वे, सौ. वैद्य (कार्यालय)

या वर्षीच्या कार्यक्रमांची सुरुवात मा. मिलिंद एकबोटे (नगरसेवक) यांच्या हस्ते उद्घाटनाने आली. 'छत्रपती संभाजीमहाराज - एक राष्ट्रपुरुष' या व्याख्यानाने त्यांनी विद्यार्थ्यांचे राष्ट्रप्रेम जागृत केले.

राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत वर्षभरात खालील नियमित कार्यक्रम आयोजित केले होते.

- ★ स्वातंत्र्य दिनानिमित्त कॉलेज परिसर स्वच्छता
- ★ १५ ऑगस्ट रोजी ब्रिगेडियर पित्रे यांचे 'स्वातंत्र्य संग्रामातील अनुभव' हे व्याख्यान
- ★ राखी पौर्णिमेनिमित्त सासवड येथील सिंधूताई सकपाळ यांच्या 'ममता-बालसदनास' भेट.
- ★ मरकळ येथील विपश्यना केंद्रामध्ये श्रमदान शिबिर

★ मराठी व इंग्रजी हस्ताक्षर स्पर्धा
यांतील पारितोषिक विजेते खालीलप्रमाणे -

मराठी : प्रथम : इनामदार प्राजक्ता - १२ वी शास्त्र
द्वितीय: तापकीर शरद - ११ वी वाणिज्य
तृतीय : वारणकर दीपक - ११ वी वाणिज्य

इंग्रजी : प्रथम : साळुंके विशाखा - ११ वी शास्त्र
द्वितीय: कलापुरे युवराज - १२ वी वाणिज्य
तृतीय : शिंदे विजय - ११ वी कला

★ नारी समता मंचातर्फे विद्यार्थिनींकरिता आरोग्य शिबिर

★ ८ सप्टेंबर 'जागतिक साक्षरता दिन' रॅलीमध्ये सहभाग

★ पर्वती - चतुःश्रुंगी ट्रेकिंग. पन्नास विद्यार्थ्यांचा सहभाग

★ ५ सप्टेंबर शिक्षक दिनानिमित्त विद्यार्थ्यांना वर्गात शिकविले.

★ आदर्श शिक्षक पुरस्कारप्राप्त प्राध्यापकांचा सत्कार- डॉ. उजळंबकर, प्रा. आढाव (महानगर पालिका पुरस्कार); प्रा. भोमे - इंडियन फिजिक्स असोसिएशन, डॉ. एम. आर. भिडे पुरस्कार, प्रा. सौ. रेखा आगाशे (पी. ई. सोसायटी आदर्श शिक्षिका पुरस्कार)

★ २४ सप्टेंबर राष्ट्रीय सेवा योजना दिनानिमित्त प्रा. दीक्षित यांचे 'राष्ट्रीय सेवा योजनेतून व्यक्तिमत्त्व विकास' व्याख्यान व प्रमोद बेहेरे यांचे 'स्वदेशी' या विषयावर व्याख्यान.

★ ३० सप्टेंबर रोजी डॉ. उजळंबकर यांचे 'गणेश दर्शन' यावर सचित्र व्याख्यान आणि प्रा. गवळी यांचे 'कर्मवीर भाऊराव पाटील यांचे शिक्षणातील योगदान' यावर व्याख्यान तसेच प्रा. साळुंके यांनी 'राष्ट्रीय सेवा योजना - उद्दिष्ट्ये व महत्त्व' या विषयावर व्याख्यान दिले.

★ ६ ऑक्टोबर रोजी नारी समता मंचातर्फे विद्यार्थिनींसाठी पहिल्याच कार्यक्रमाचा उर्वरित भाग पूर्ण केला.

★ फर्ग्युसन महाविद्यालयाने आयोजित केलेल्या व्यक्तिमत्त्व विकास कार्यशाळेत आपल्या सात विद्यार्थ्यांचा सहभाग.

★ १ डिसेंबर रोजी जागतिक एडस् - जनजागृती दिनानिमित्त आयोजित केलेल्या पदयात्रेत पंचेचाळीस विद्यार्थ्यांचा सहभाग.

★ पल्स पोलिओ अभियानामध्ये बावन्न विद्यार्थ्यांचा सहभाग.

★ प्रजासत्ताक दिनानिमित्त डॉ. यशवंत सुमंत यांचे 'सद्यःस्थिती व भारतीय प्रजासत्ताकापुढील आव्हाने' या विषयावर व्याख्यान.

● विशेष नोंदी ●

- फेब्रुवारीमध्ये औरंगाबाद येथे आयोजित केलेल्या राज्यस्तरीय 'जलसंवर्धन दिंडी' मध्ये आपल्या खालील चार विद्यार्थ्यांचा समावेश.

  साबळे सुरेन्द्र-११ वी कला, कुऱ्हाडे आशिश-११ वी शास्त्र, पुजारी योगेश-११ वी वाणिज्य, साबळे विशाल-११ वी वाणिज्य.

  या दिंडीचे नेतृत्व कार्यक्रम अधिकारी प्रा. सांबारे यांनी केले.

- फेब्रुवारी महिन्यात कोंढापुरी येथील प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांची रक्तगट तपासणी - १७० विद्यार्थी व अनेक ग्रामस्थांचा रक्तगट काढून देण्यात आला. 'कॉलेज ऑफ फार्मसी' - शिरूरचे विद्यार्थी व त्यांचे शिक्षक श्री. तारे व श्री. काळदाते

यांच्या मदतीने ही रक्तगट तपासणी झाली.

- स्वामी विवेकानंद केंद्रातर्फे घेतल्या जाणाऱ्या 'भारतीय संस्कृती' परीक्षेसाठी पंधरा विद्यार्थी बसले होते.
- 'चारित्र्य प्रतिष्ठान' तर्फे दरवर्षी दिला जाणारा चारित्र्यसंपन्न छात्र पुरस्कार या वर्षी कु. यशवंती पाटील (१२ वी वाणिज्य) हिने मिळविला.
- कै. बाळनाथ पाठक पारितोषिक - राष्ट्रीय सेवा योजना कनिष्ठ महाविद्यालय सर्वोत्कृष्ट विद्यार्थी - स्नेहल गोरे (१२ वी कला) हिला देण्यात आले.
- कै. सदाशिव पांडुरंग साळुंके पारितोषिक - राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरातील सर्वोत्कृष्ट विद्यार्थी म्हणून आशिष कुऱ्हाडे (११ वी शास्त्र) ह्याची निवड.

**विशेष हिवाळी शिबिर** - कोंढापुरी, ता. शिरूर, जिल्हा-पुणे. या वर्षीचे विशेष हिवाळी शिबिर २० ते २९ डिसेंबर २००२ या कालावधीत 'कोंढापुरी' या दत्तक गावी संपन्न झाले.

शिबिर घेण्यापूर्वी ऑक्टोबर व डिसेंबर महिन्यात दोनदा कोंढापुरी येथे एक दिवसाचे प्राथमिक शिबिर घेऊन मुख्य शिबिराची संपूर्ण पूर्वतयारी करण्यात आली.

'जलसंवर्धन व वृक्षारोपण' या मुख्य उद्देशाने हे शिबिर घेण्यात आले. शिबिराचे उद्घाटन मा. डॉ. माधवराव सानप, पोलीस अधीक्षक पुणे ग्रामीण, यांच्या हस्ते करण्यात आले. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. गजानन एकबोटे (अध्यक्ष, नियामक मंडळ, पी. ई. सोसायटी) तसेच श्री. शामराव लोखंडे (सरपंच, कोंढापुरी) हे उपस्थित होते.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्रा. जगदीश चिंचोरे (उपप्राचार्य, मॉडर्न महाविद्यालय) यांनी भूषविले. प्रा. भोमे (पर्यवेक्षक, मॉडर्न महाविद्यालय, कनिष्ठ विभाग), मा. अर्जुनदादा गायकवाड (उपसरपंच, कोंढापुरी), मा. अरुण आबा गायकवाड (अध्यक्ष, पी. डी. सी. सी. बँक), मा. श्री. शिंदेसर (मुख्याध्यापक, प्राथमिक शाळा, कोंढापुरी), शाळेतील विद्यार्थी, कोंढापुरी ग्रामस्थ व मॉडर्न महाविद्यालयाचे प्राध्यापक कार्यक्रमासाठी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संयोजन कार्यक्रम अधिकारी प्रा. सांबारे व समिती सदस्य प्रा. गवळी यांनी केले. राष्ट्रीय सेवा योजना समिती सल्लागार प्रा. मानसिंग साळुंके यांनी सूत्रसंचालन केले व कार्यक्रम अधिकारी प्रा. वीणा नरगुंद यांनी आभार प्रदर्शन केले.

कोंढापुरी ग्रामस्थ व मॉडर्न महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने समारोप समारंभ साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास मा. श्री. अ. ज. ठाकरे (सहायक शिक्षण संचालक, पुणे विभाग), मा. श्री. विजयसिंह जाधव (पोलीस उपायुक्त, परिमंडल-२) हे उपस्थित होते. तसेच सरपंच, उपसरपंच, गावातील प्रतिष्ठित व्यक्ती, चासकमान - प्रकल्प अधिकारी श्री. गाडेकर, श्री. खाडे, श्री. म्हस्के, श्री. संकपाळ उपस्थित होते. ग्रामस्थांनी प्रमुख अतिथींचा फेटे बांधून सत्कार करून आपल्या भावना व्यक्त केल्या.

**शिबिरातील विविध उपक्रम**

★ वृक्षारोपण - जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व कोंढापुरी गावातील मुख्य रस्ता या दोन्हीही ठिकाणी सुरुची झाडे लावण्यात आली.

★ जलसंवर्धन - चासकमान कालवा सफाई करून बंधारा बांधण्यात आला. या कालव्यामुळे कोंढापुरी व परिसरातील निमगाव - म्हाळुंगी, खंडाळे, कवठीमळा या ठिकाणच्या पाण्याचा प्रश्न सुटण्यास मदत झाली.

★ नेत्रचिकित्सा शिबिर - डॉ. विश्वास देशपांडे, पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली नेत्रचिकित्सा शिबिर घेण्यात आले. यामध्ये सुमारे ऐंशी ग्रामस्थांची नेत्रतपासणी करण्यात आली.

★ व्याख्याने - आपल्याच महाविद्यालयातील प्रा. गीताराम गायकवाड, डॉ. उजळंबकर, प्रा. दीक्षित, प्रा. लीना पाटणकर, डॉ. स्वाती कर्वे, डॉ. भारती डोळे, प्रा. संजीवनी रहाणे, प्रा. जयंत जोर्वेकर यांनी विविध विषयांवर व्याख्याने देऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच मॉडर्न महाविद्यालय, गणेशखिंड येथील प्रा. श्रृती भातखंडे यांनीही व्याख्यान दिले.

- प्रा. राजेन्द्र धावटे व मा. श्री. बी. टी. बधान (आयुक्त, साखर संचलनालय, महाराष्ट्र राज्य) यांची शेतीविषयक व्याख्याने ग्रामस्थांसाठी खूपच उपयुक्त ठरले.
- सारिका सासवडे व तिचे सहकारी, यांनी शिबिरातील विद्यार्थ्यांना पथनाट्य शिकविले.
- सौ. कल्पना रायरीकर यांनी पुरातनकाळी पाण्याचे नियोजन कसे केले जात होते याची साद्यंत माहिती दिली.
- माजी प्राचार्य गंभीरसरांनी 'विज्ञान आणि तंत्रज्ञान' सारखा अवघड विषय दैनंदिन उदाहरणांनी अतिशय सोपा करून सांगितला.

★ सांस्कृतिक कार्यक्रम - महिलांसाठी हळदीकुंकू समारंभ आयोजित केला. त्यातून कोंढापुरी महिला व विद्यार्थिनी यांच्यात उत्तम प्रकारे संवाद निर्माण झाला. शिबिरार्थी व ग्रामस्थांच्या सहभागातून सामाजिक प्रश्नांची जाणीव करून देणारे विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले.

राष्ट्रीय सेवा योजनेच्या उपक्रमांचा समारोप समारंभ मा.प्राचार्य गोसावीसर व उपप्राचार्य चिंचोरेसर यांच्या मार्गदर्शनाने संपन्न झाला.

राष्ट्रीय सेवा योजनेच्या विविध कार्यक्रमांसाठी शिक्षण संचालक, उपसंचालक, सहायक शिक्षण संचालक या सर्वांचे नेहमीच सहकार्य लाभले.

मा. प्राचार्य गोसावी, उपप्राचार्य डॉ. वाघमारे, पर्यवेक्षक प्रा. भोमे, प्रबंधक श्री. दिलीप खोपकर, सल्लागार प्रा. मानसिंग साळुंके यांचे सहकार्य लाभले.

मा. उपप्राचार्य चिंचोरे सरांकडून वेळोवेळी मिळालेले अचूक मार्गदर्शन, सहकार्य व सक्रिय सहभाग यामुळेच समितीचे वर्षभराचे कामकाज यशस्वीरित्या पार पडले. समिती सदस्य प्रा. गवळी, प्रा. सूर्यवंशी, प्रा. सौ. निघोट यांनी मनापासून सर्व कार्यक्रमांत सक्रिय सहभाग घेतला. प्रा. जयंत जोर्वेकर यांच्या ओघवत्या लेखणीने चोख काम बजावल्यानेच आम्ही आपणापर्यंत वेळोवेळी पोहोचू शकलो. प्रा. वंदना जोशी यांचेही वर्षभर सर्व कार्यक्रमांना सहकार्य लाभले. सौ. मंगला साळुंके यांच्या शिबिरातील वास्तव्यामुळे शिबिर उत्तमरित्या संपन्न होण्यास मोलाची मदत झाली.

सर्वांचे मनःपूर्वक आभार !

**प्रा. सौ. वीणा नरगुंद,**
**प्रा. पोपटराव सांबारे,**
**प्रा. सौ. सुधा ढोनसळे.**
**कार्यक्रम अधिकारी**

## क्रीडा विभाग

दरवर्षीप्रमाणे आपल्या खेळाडूंनी बहुविध क्रीडा परिषदेतर्फे घेण्यात येणाऱ्या विविध क्रीडा स्पर्धामध्ये भाग घेतला. उल्लेखनीय कामगिरी व यश संपादले.

निनाद निजसुरे, ११ वी शास्त्र : आंतरशालेय (महाविद्यालयीन गट) शहरगट २०० मी. बँक स्ट्रोक जलतरण स्पर्धेत तृतीय क्रमांक.

दत्तात्रय पवार, १२ वी वाणिज्य : आंतरशालेय वजन उचलणे या क्रीडा प्रकारात जिल्हा स्तरावर प्रथम क्रमांक व विभागीय स्तरावर द्वितीय क्रमांक.

रोहन शिरोडे, ११ वी शास्त्र : आंतरशालेय जिल्हा स्तर रोलर स्केटिंग स्पर्धेत प्रथम. विभागीय स्पर्धेत प्रथम. राज्य संघात निवड.

भाग्यश्री मुनोत, ११ वी : मुलींच्या हॉकी क्रीडा प्रकारात महाराष्ट्र राज्याच्या मुलींच्या संघात आंतरराज्य स्पर्धेसाठी निवड.

स्नेहल प्रधान, ११ वी शास्त्र : महाराष्ट्र राज्य मुलींच्या क्रिकेट स्पर्धेसाठी (ज्युनि.) महाराष्ट्र राज्याच्या संघात निवड.

प्राजक्ता हरदळे, १२ वी वाणिज्य : ९ व्या किकबॉक्सिंग (वेस्ट बंगाल) येथे झालेल्या नॅशनल चॅम्पियन स्पर्धेत सिल्व्हर मेडल प्राप्त. (वयोगट १५ ते १६)

प्रियांका थोरात, १२ वी कला : नवव्या किकबॉक्सिंग (वेस्ट बंगाल) येथे झालेल्या नॅशनल चॅम्पियन स्पर्धेत ५६ ते ६० किलो वजन गटात सिल्व्हर मेडल.

प्रियांका पारसवार, १२ वी वाणिज्य : आंतरशालेय जिल्हा स्तर, विभागीय स्तर व आंतरराज्य स्तरावर रोलर स्केटिंग स्पर्धेतील क्रीडा प्रकारात सहा गोल्ड मेडल, ६ सिल्व्हर व २ ब्राँझ पदके मिळविली. नॅशनल स्पर्धेसाठी निवड.

नेहमीप्रमाणे आंतरवर्गीय स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धा विद्यार्थ्यांनी स्वतः आयोजित करून उत्साहाच्या वातावरणात पार पाडल्या.

आंतरवर्गीय स्पर्धेचे निकाल : सांघिक खेळ

(खेळाचे नाव, विजयी संघ, उपविजयी संघ याप्रमाणे)

**बास्केटबॉल**-११ वी शास्त्र 'फ'-१२ वी कला 'अ'

**व्हॉलिबॉल**-११ वी कला 'ब'-१२ वी कला 'अ'

**कबड्डी**-११ वी कला 'ब'-११ वी कला 'अ'

सांघिक खेळाचे सर्वसाधारण विजेतेपद ११ वी कला 'ब' या वर्गास मिळाले.

११ वी व १२ वी च्या विद्यार्थ्यांच्या शारिरीक शिक्षणाच्या कसोट्यांच्या परीक्षा प्रथम सत्राच्या शेवटी व द्वितीय सत्राच्या शेवटी अशा दोन वेळा घेण्यात आल्या. या परीक्षा सर्व विद्यार्थी-विद्यार्थिनींना सक्तीच्या असतात.

विविध खेळातील तज्ज्ञ, शिक्षक, मा. प्राचार्य, मा. उपप्राचार्य, सहकारी शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी व सेवक वर्ग यांचे विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या मार्गदर्शन, प्रोत्साहन व सहकार्यामुळे खेळाडूंना यश संपादन करण्यास मदत झाली. क्रीडा मंडळातर्फे सर्वांचे हार्दिक आभार.

**प्रा. विनोद छाब्रा, विनय शेरीकर**

**क्रीडा शिक्षक**

★★

## पारितोषिक वितरण समिती

२० जाने २००३ रोजी नवीन नेमणुका झाल्यावर पारितोषिक वितरण समिती कार्यान्वित झाली व दि. १८ फेब्रु. २००३ रोजी महाविद्यालयाचा शैक्षणिक-गुणवत्ता- दिन समारंभ यशस्वीरित्या संपन्न झाला. यंदा महाविद्यालयातील शिक्षकांच्या सहकार्याने तीन नवीन पारितोषिके सुरू झाली.

(१) कै. प्रल्हाद निंबराज सातभाई पारितोषिक : देणगीदार : प्रा. अमृता सातभाई, निकष : (अ) उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेत 'संस्कृत' विषयात सर्वाधिक गुण, (ब) तृतीय वर्ष शास्त्र (गणित) परीक्षेत सर्वाधिक गुण.

(२) नारायण चेपे पारितोषिक : देणगीदार : प्रा. निशा भंडारे, निकष : तृतीय वर्ष कला (मराठी) परीक्षेत सर्वाधिक गुण.

**शैक्षणिक- गुणवत्ता- दिन समारंभ :**

यंदाचा ' शैक्षणिक- गुणवत्ता- दिन' समारंभ मंगळवार दि. १८ फेब्रु. २००२ रोजी संपन्न झाला. बारावीची लेखी परीक्षा दोन दिवसांवर आलेली असूनही पारितोषिकपात्र १०५ विद्यार्थ्यांपैकी ८० विद्यार्थी समारंभास प्रत्यक्ष उपस्थित होते ह्याचा विशेष उल्लेख केला पाहिजे. कार्यक्रमाची सुरुवात विद्यार्थिवृंदाने गायलेल्या कवी मंगेश पाडगावकररचित 'पुणे विद्यापीठ गीता'ने झाली. त्यानंतर याच विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत सादर केलेली डॉ. सुषमा जोग रचित 'राष्ट्रप्रेमाची लावणी' सादर केली. शैक्षणिक यश प्राप्त करणाऱ्या बुद्धिमान विद्यार्थ्यांनी ज्ञानसाधना चालू ठेवताना करुणा व मातृभूमीबद्दल कृतज्ञता बाळगली पाहिजे असा या गीतातून मिळालेला संदेश फार महत्त्वाचा आहे. महाविद्यालयाचे एक बुद्धिमान माजी विद्यार्थी डॉ. योगेश वाडदेकर या समारंभासाठी 'प्रमुख अतिथी' म्हणून उपस्थित होते. मॉडर्न महाविद्यालयातून बारावी शास्त्र परीक्षा उत्तम प्रकारे उत्तीर्ण होऊन डॉ. योगेश यांनी मुंबई आय. आय. टी. मधून बी. टेक. ही पदवी मिळवली व त्यानंतर पुणे येथील आंतरविद्यापीठ खगोलशास्त्र व ज्योतिर्विज्ञान केंद्रातून (IUCAA) पीएच. डी. पदवी प्राप्त केली असून आता त्यांची अमेरिकेतील बाल्टिमोर येथील नासाच्या संशोधन केंद्रात हबल स्पेस टेलिस्कोपमार्फत मिळालेल्या माहितीचे विश्लेषण करणाऱ्या कामावर नियुक्ती झालेली आहे. सर्वसामान्य प्रवाहापेक्षा वेगळी वाट चोखाळणाऱ्या डॉ. योगेश वाडदेकर यांनी यशस्वी विद्यार्थी व त्यांचे पालक यांना उद्देशून बोलताना आपण या वेगळ्या वाटेवरून जाताना अतिशय समाधानी असल्याचे सांगितले. विद्यार्जनाची व कार्याची दिशा निवडताना विद्यार्थ्यांचा कल व आवड यांना महत्त्व देण्याची आवश्यकता त्यांनी प्रतिपादन केली. तसेच स्वत: आवडीने निवडलेल्या खगोलशास्त्राविषयी रोचक व उद्बोधक माहितीही त्यांनी आपल्या भाषणातून दिली.

**कृतज्ञता :** मा. प्राचार्य, मा. उपप्राचार्य व मा. पर्यवेक्षक यांच्या सक्रिय पाठिंब्यामुळे समितीचे काम थोडक्या कालावधीत पार पाडण्यास मोलाची मदत झाली. तसेच विविध विभागप्रमुख, समितीप्रमुख यांचेही सहकार्य समितीला मिळाले. प्रा. शरद पोखरकर, प्रा. शिल्पा पुंड, प्रा. सुनीता गोसावी, प्रा. संजीवनी कुवळेकर, प्रा. कांचन राजाध्यक्ष, डॉ. नीता पाटील, सौ. विदुला काळे, श्री. काळे, प्रा. ए. ए. खंडागळे, प्रा. सुनीता निघोट, प्रा. कारेकर, प्रा. इंगोले या समिती सदस्यांबरोबरच प्रा. रेखा आगाशे, प्रा. विद्या शर्मा, प्रा. मंगला शिंदे, प्रा. आढाव, प्रा. लाळे आणि डॉ. के. एस. काळे तसेच श्री. पाटेकर व श्री. पिनगे यांनी समितीच्या कामकाजात बहुमोलाची मदत केली. कार्यालय अधीक्षक व कार्यालयीन तसेच अनेक विद्यार्थी स्वयंसेवक यांच्या सहकार्यामुळे समितीचे कामकाज सुकर झाले.

**डॉ. सुषमा जोग**
कार्याध्यक्षा

# शैक्षणिक पारितोषिके २००२-२००३

| | | |
|---|---|---|
| १) डोंगरे सुजितकुमार | मॉडर्न हायस्कूल पुणे-५ येथून शालान्त परीक्षा उत्तीर्ण व मॉडर्न महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्यांत सर्वप्रथम | कै. गोविंद निरगुडकर शिष्यवृत्ती |
| २) गायकवाड चैत्राली | पी.ई.एस. गर्ल्स हायस्कूल पुणे-५ येथून शालान्त परीक्षा उत्तीर्ण व मॉडर्न महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्यांत सर्वप्रथम | कै. सीताबाई गोविंद निरगुडकर शिष्यवृत्ती |
| ३) माळी जितेंद्र | पी.ई. सोसायटीच्या शाळेतून शालान्त परीक्षा उत्तीर्ण व मॉडर्न महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्यांत सर्वप्रथम | द्वारिका संगमनेरकर पारितोषिक |
| ४) चव्हाण मोनाली | ११ वी कला परीक्षेत सर्वप्रथम | प्राध्यापक निधी पारितोषिक |
| ५) पाटील मिलिंद | ११ वी शास्त्र परीक्षेत सर्वप्रथम | प्राध्यापक निधी पारितोषिक |
| ६) नाईक नेहा | ११ वी शास्त्र परीक्षेत पदार्थविज्ञान विषयात सर्वाधिक गुण | द्वारकाबाई पारसनीस पारितोषिक |
| ७. परदेशी अर्चना | i) १२ वी कला परीक्षेत सर्वप्रथम<br>ii) १२ वी कला परीक्षेत सर्वप्रथम व याच महाविद्यालयात प्र. व. कला वर्गात प्रवेश | i) प्राध्यापक निधी पारितोषिक<br>ii) कै. बाळकृष्ण सावळाराम रासने पारितोषिक<br>iii) कै. वासुदेवराव ताटके पारितोषिक |

| | | |
|---|---|---|
| ८) श्रौती शशांक | i) उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेत गुणवत्तायादीत नववा क्रमांक | i) रा.राजोपाध्ये पारितोषिक<br>ii) प्राध्यापक निधी पारितोषिक<br>iii) स्कॉलरबॅच पारितोषिक |
| | ii) उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेत कला, शास्त्र व वाणिज्य शाखांमध्ये महाविद्यालयात सर्वप्रथम | iv) कै. बाळकृष्ण सावळाराम रासने पारितोषिक<br>v) कै. यशवंतराव सुकथनकर पारितोषिक |
| | iii) १२ वी परीक्षेत महाविद्यालयात सर्वप्रथम | vi)स्कॉलरबॅच पारितोषिक विभागून |
| | iv) १२ वी शास्त्र परीक्षेत गणित विषयात सर्वाधिक गुण | vii) कै. प्रा.ए.पी.फडके पारितोषिक विभागून |
| | v) उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेत गणित विषयात महाविद्यालयात सर्वाधिक गुण | viii) कै. कमलाबाई पानसे.. पारितोषिक विभागून |
| ९) पाटील स्नेहलता | १२ वी शास्त्र परीक्षा उत्तीर्ण होऊन याच महाविद्यालयात पुढील शिक्षण घेणाऱ्यांत सर्वप्रथम | i) कै. निर्मला एकनाथ पोतनीस पारितोषिक<br>ii) कै. वासुदेवराव ताटके पारितोषिक |
| १०) गर्गे अनुपम | i) उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेत गुणवत्ता यादीत दहावा क्रमांक | i) स्कॉलरबॅच पारितोषिक विभागून |
| | ii) १२ वी शास्त्र परीक्षेत गणित विषयात सर्वाधिक गुण | ii) कै. प्रा. ए. पी फडके पारितोषिक विभागून |
| | iii) उच्च माध्यमिक परीक्षेत गणित विषयात सर्वाधिक गुण | iii) कै. कमलाबाई पानसे पारितोषिक विभागून |
| | iv) १२ वी शास्त्र परीक्षेत सर्वाधिक गुण मिळवून अभियांत्रिकी महाविद्यालयात गुणवत्ता-प्रवेश घेणारा पी. ई. सोसायटीच्या शाळेतून आलेला विद्यार्थी | iv) कै. रावबहादूर वागळे स्मृती पारितोषिक |

| | | |
|---|---|---|
| ११. शाळीग्राम जुइली | i) NCL शाळेतून आलेल्या विद्यार्थ्यांमध्ये १२ वी शास्त्र परीक्षेत गणित विषयात सर्वाधिक गुण | i) पायलट ऑफिसर कै. गणेश चंदिराम माटे पारितोषिक |
| १२. मेहेंदळे मुक्ता | १२ वी शास्त्र परीक्षेत रसायनशास्त्र विषयात सर्वाधिंक १०० गुण मिळवून परीक्षा मंडळाचे पारि. | i) न्यू स्कॉलरबॅच पारितोषिक |
| १३. देशमुख मीनाक्षी | i) १२ वी शास्त्र परीक्षेत पदार्थविज्ञान विषयात सर्वाधिक१०० गुण मिळवून परीक्षामंडळाचे पारि. | i) न्यू स्कॉलरबॅच पारितोषिक |
| १४) चौधरी सुरजित | i) १२ वी शास्त्र परीक्षेत पदार्थविज्ञान विषयात सर्वाधिक १०० गुण मिळवून परीक्षा मंडळाचे पारितोषिक | i) न्यू स्कॉलरबॅच पारितोषिक |
| १५) सिन्हा शक्ती | i) १२ वी शास्त्र परीक्षेत पदार्थविज्ञान विषयात सर्वाधिक १०० गुण मिळवून परीक्षामंडळाचे पारितोषिक | i) न्यू स्कॉलरबॅच पारितोषिक |
| १६) कोलते धवल | i) उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेत शास्त्र गुणवत्ता यादीत ११ वा क्रमांक | i) स्कॉलरबॅच पारितोषिक विभागून |
| | ii) १२ वी शास्त्र परीक्षेत जीवशास्त्र विषयात सर्वाधिक गुण | ii) रावबहादूर वागळे स्मृती |
| | iii) १२ वी शास्त्र परीक्षेत सर्वाधिक गुण मिळवून वैद्यकीय महाविद्यालयात गुणवत्ता-प्रवेश घेणारा पी.ई.सोसायटीच्या शाळेतून आलेला विद्यार्थी | iii) स्कॉलरबॅच पारितोषिक |
| | iv) १२ वी शास्त्र परीक्षेत पदार्थविज्ञान व रसायनशास्त्र या दोन्ही विषयांत सर्वाधिक १०० गुण मिळवून परीक्षा मडंळाचे पारितोषिक | iv) स्कॉलरबॅच पारितोषिक |
| | v) १२ वी शास्त्र परीक्षेत PCM ग्रुपमध्ये सर्वाधिक गुण | v) डी. के. अत्रे पारितोषिक |

| | | |
|---|---|---|
| १७. भोकरे स्नेहल | i) १२ वी परीक्षेत जीवशास्त्र विषयात सर्वाधिक गुण | i) स्कॉलरबॅच पारितोषिक विभागून |
| १८) बॅनर्जी स्नेहल | i) १२ वी शास्त्र परीक्षेत संगणकशास्त्र विषयात सर्वाधिक गुण | i) न्यू स्कॉलरबॅच पारितोषिक |
| १९) देशपांडे श्रीरूपा | i) १२ वी शास्त्र परीक्षेत इलेक्ट्रॉनिक शास्त्र विषयात सर्वाधिक गुण | i) न्यू स्कॉलरबॅच पारितोषिक |
| २०) डोळे दीप्ती | i) उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेत वाणिज्य गुणवत्ता यादीत सहावा क्रमांक | i) प्राध्यापक निधी पारितोषिक |
| | ii) १२ वी वाणिज्य परीक्षेत महाविद्यालयात सर्वप्रथम | ii) कै. बाळकृष्ण सावळाराम रासने पारितोषिक |
| | iii) १२ वी वाणिज्य परीक्षा उत्तीर्ण होऊन याच महाविद्यालयात पुढील शिक्षण घेणाऱ्यांत सर्वप्रथम | iii) कै. वासुदेवराव ताटके पारितोषिक |
| | iv) १२ वी वाणिज्य परीक्षेत विद्यार्थिनींमध्ये सर्वप्रथम | iv) कै. प्राध्यापिका ज्योत्स्ना गोडबोले पारितोषिक |
| | v) १२ वी वाणिज्य परीक्षेत बुककीपिंग अकौंटन्सी विषयात सर्वाधिक १०० गुण मिळवून परीक्षा मंडळाचे पारितोषिक व याच महाविद्यालयात पुढील शिक्षण | v) न्यू स्कॉलरबॅच पारितोषिक<br>vi) कै . प्राध्यापिका ज्योत्स्ना गोडबोले पारितोषिक विभागून |
| | vi) १२ वी वाणिज्य परीक्षेत O. C. विषयात सर्वाधिक गुण | vii) न्यू स्कॉलरबॅच पारितोषिक |
| २१) बापट मिलिंद | i) १२ वी वाणिज्य परीक्षेत विद्यार्थ्यांमध्ये सर्वप्रथम | i) कै. ज्योत्स्ना गोडबोले पारितोषिक |
| | ii) १२ वी वाणिज्य परीक्षेत बुककीपिंग व अकौंटन्सी विषयात सर्वाधिक १०० गुण मिळवून परीक्षा मंडळाचे पारि. व याच महाविद्यालयात पुढील शिक्षण | ii) न्यू स्कॉलरबॅच पारितोषिक<br>iii) कै. ज्योत्स्ना गोडबोले |

| | | |
|---|---|---|
| | | पारितोषिक विभागून |
| | iii) उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेत अर्थशास्त्र विषयात सर्वाधिक गुण | iv) न्यू स्कॉलरबॅच पारितोषिक<br>v) प्रा. दत्ता लिमये पुरस्कृत पारितोषिक |
| २२) पाटील सोनाली | i) उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेत वाणिज्य गुणवत्ता यादीत सातवा क्रमांक | |
| | ii) १२ वी वाणिज्य परीक्षेत बुककीपिंग अकौंटन्सी विषयात सर्वाधिक १०० गुण मिळवून परीक्षा मंडळाचे पारितोषिक व याच महाविद्यालयात पुढील शिक्षण | i) न्यू स्कॉलरबॅच पारितोषिक<br>ii) कै. ज्योत्स्ना गोडबोले पारितोषिक विभागून |
| | iii) १२ वी वाणिज्य परीक्षेत गणित विषयात सर्वाधिक गुण | iii) न्यू स्कॉलरबॅच पारितोषिक<br>iv) कै. प्रा. ए. पी. फडके पारितोषिक. |
| | iv) उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेत जर्मन विषयात सर्वाधिक गुण | v) न्यू स्कॉलरबॅच पारितोषिक<br>vi) कै. श्रीपाद मल्हार जोशी पारितोषिक |
| २३) काळे प्राची | i) उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेत वाणिज्य गुणवत्ता यादीत चौदावा क्रमांक | i) न्यू स्कॉलरबॅच पारितोषिक |
| | ii) १२ वी वाणिज्य परीक्षेत बुककीपिंग अकौंटन्सी विषयात सर्वाधिक १००गुण मिळवून परीक्षा मंडळाचे पारितोषिक व याच महाविद्यालयात पुढील शिक्षण | ii) कै. ज्योत्स्ना गोडबोले पारितोषिक विभागून |
| २४) कडलग एम. टी. | i) १२ वी वाणिज्य परीक्षेत बुककीपिंग अकौंटन्सी विषयात सर्वाधिक १००गुण मिळवून परीक्षा मंडळाचे पारितोषिक व याच महाविद्यालयात पुढील शिक्षण | i) न्यू स्कॉलरबॅच पारितोषिक<br>ii) कै. ज्योत्स्ना गोडबोले पारितोषिक विभागून |
| २५) गुजराती एस. एन | i) १२ वी वाणिज्य परीक्षेत बुककीपींग अकौंटन्सी विषयात सर्वाधिक १०० गुण मिळवून परीक्षा मडंळाचे पारितोषिक | i) न्यू स्कॉलरबॅच पारितोषिक |

| | | |
|---|---|---|
| २६) नारकर स्नेहा | i) १२ वी वाणिज्य परीक्षेत बुककीपिंग अकौंटन्सी विषयात सर्वाधिक १०० गुण मिळवून परीक्षा मंडळाचे पारितोषिक व याच महाविद्यालयात पुढील शिक्षण | i) न्यू स्कॉलरबॅच पारितोषिक<br>ii) कै. ज्योत्स्ना गोडबोले पारितोषिक विभागून |
| २७) धारवाडकर नेहा | i) १२ वी वाणिज्य परीक्षेत बुककीपिंग अकौंटन्सी विषयात सर्वाधिक १००/१०० गुण मिळवून परीक्षा मडंळाचे पारितोषिक | i) न्यू स्कॉलरबॅच पारितोषिक |
| २८)आपटे धनश्री | i) १२ वी वाणिज्य परीक्षेत बुककीपिंग अकौंटन्सी विषयात सर्वाधिक १०० गुण मिळवून परीक्षा मंडळाचे पारितोषिक व याच महाविद्यालयात पुढील शिक्षण | i) न्यू स्कॉलरबॅच पारितोषिक<br>ii) कै. ज्योत्स्ना गोडबोले पारितोषिक विभागून |
| २९) नायर रंजू | i) १२ वी वाणिज्य परीक्षेत बुककीपिंग अकौंटन्सी विषयात सर्वाधिक १०० गुण मिळवून परीक्षा मडंळाचे पारितोषिक व याच महाविद्यालयात पुढील शिक्षण | i) न्यू स्कॉलरबॅच पारितोषिक<br>ii) कै. ज्योत्स्ना गोडबोले पारितोषिक विभागून |
| ३०) जॉर्ज सिल्व्हिना | i) १२ वी वाणिज्य परीक्षेत S. P. विषयात सर्वाधिक गुण | i) न्यू स्कॉलरबॅच पारितोषिक विभागून |
| ३१) गेहलोत किरण | i) १२ वी वाणिज्य परीक्षेत S. P. विषयात सर्वाधिक गुण | i) न्यू स्कॉलरबॅच पारितोषिक विभागून |
| ३२) गायकवाड मिलिंद | i) उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेत मराठी विषयात सर्वाधिक गुण | i) न्यू स्कॉलरबॅच पारितोषिक<br>ii) कै. गौरीबाई महादेव सिधये पारितोषिक |
| ३३) मंगरूळकर गौरी | i) उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेत इंग्लिश विषयात सर्वाधिक गुण | i) न्यू स्कॉलरबॅच पारितोषिक |
| ३४) चांदेरे मनीषा | i) उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेत हिंदी विषयात सर्वाधिक गुण | i) न्यू स्कॉलरबॅच पारितोषिक विभागून |

| | | |
|---|---|---|
| ३५) तिबिले संजय<br>१२ वी शास्त्र | i) उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेत हिंदी विषयात सर्वाधिक गुण<br>ii) कै. श्रीपाद मल्हार जोशी पारितोषिक<br>iii) कै. प्रल्हाद निंबराज सातभाई पारितोषिक | i) न्यू स्कॉलरबॅच पारितोषिक विभागून |
| ३६) पारूंडेकर गौरी<br>१२ वी शास्त्र | उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेत संस्कृत विषयात सर्वाधिक गुण | न्यू स्कॉलरबॅच पारितोषिक |
| ३७) बालघरे सुचेता<br>१२ वी शास्त्र | उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेत भूगोल विषयात सर्वाधिक९३ गुण मिळवून परीक्षा मंडळाचे पारि | न्यू स्कॉलरबॅच पारितोषिक |
| ३८) बलकवडे हेमलता | i) प्र. व. कला परीक्षेत सर्वप्रथम<br>ii) प्र. व. कला परीक्षेत इंग्लिश विषयात सर्वाधिक गुण मिळवून याच महाविद्यालयात स्पेशल इंग्लिश द्वि. व कला वर्गात प्रवेश<br>iii) राष्ट्रीय सेवा योजना-वरिष्ठ कक्षात उत्कृष्ट काम करणारी होतकरू विद्यार्थिनी | i) प्राध्यापक निधी पारि.<br>ii) कै. गोपाळ यशवंत परब पारितोषिक<br>iii) कै. बापुराव काशिनाथ सातपुते पारितोषिक विभागून |
| ३९) खळदकर वृषाली | i) प्र. व. शास्त्र परीक्षेत महाविद्यालयात सर्वप्रथम<br>ii) प्र. व. शास्त्र परीक्षेत 'ए' ग्रुपमध्ये सर्वप्रथम<br>iii) प्र. व. शास्त्र परीक्षेत गणित विषयात सर्वाधिक गुण | i) प्राध्यापक निधी पारितोषिक<br>ii) नारायणराव भागवत पारितोषिक<br>iii) सौ. लक्ष्मीबाई ताटके पारितोषिक |

| | | |
|---|---|---|
| ४०) सोनावणे पद्मिनी | i) प्र. व. वाणिज्य परीक्षेत सर्वप्रथम | i) प्राध्यापक निधी पारितोषिक |
| | ii) प्र. व. वाणिज्य परीक्षेत गणित विषयात सर्वाधिक गुण | ii) विश्वनाथ जाधव रायरीकर पारितोषिक |
| ४१) पायाळ राम | i) द्वि. व. कला परीक्षेत सर्वप्रथम | i) प्राध्यापक निधी पारितोषिक |
| ४२) झांजरे हनुमंत | i) द्वि. व. कला परीक्षेत इतिहास विषयात सर्वाधिक गुण व याच महाविद्यालयात पुढील शिक्षण | i) कै. सुमित्राबाई हरिरामजी भिवगडे पारितोषिक |
| ४३) टोकेकर संहिता | i) द्वि. व. शास्त्र परीक्षेत सर्वप्रथम | i) प्राध्यापक निधी पारितोषिक |
| | ii) द्वि. व. शास्त्र परीक्षेत सर्वप्रथम व ११ वी पासून गेली ५ वर्षे याच महाविद्यालयात शिक्षण | ii) मातु:श्री यशोदाबाई गाडगीळ पलुस्कर शिष्यवृत्ती |
| | iii) द्वि. व. शास्त्र परीक्षेत पदार्थविज्ञान विषयात सर्वाधिक गुण | iii) रविशंकर बाळकृष्ण रासने पारितोषिक |
| | iv) द्वि. व. शास्त्र परीक्षेत संख्याशास्त्र विषयात सर्वाधिक गुण | iv) कै. इंदिराबाई चिरपुटकर पारितोषिक |
| ४४) उपाध्ये विक्रम | i) द्वि. व. शास्त्र परीक्षेत इलेक्ट्रॉनिक शास्त्र विषयात सर्वाधिक गुण | i) बाळकृष्ण सावळाराम रासने पारितोषिक |
| ४५) चिंधे आशा | i) द्वि. व. शास्त्र परीक्षेत रसायनशास्त्र विषयात सर्वाधिक गुण आणि याच महाविद्यालयात पुढील शिक्षण | i) सदाशिव विश्वनाथ जोग पारितोषिक |

| | | |
|---|---|---|
| ४६) खरे स्वानंद | i) द्वि. व. शास्त्र परीक्षेत गणित विषयात सर्वाधिक गुण व याच महाविद्यालयात पुढील शिक्षण | i) प्रा. चिकटे पुरस्कृत पारितोषिक विभागून |
| ४७) शिरोळकर देवेंद्र | i) द्वि. व. शास्त्र परीक्षेत 'गणित' विषयात सर्वाधिक गुण व याच महाविद्यालयात पुढील शिक्षण | i) प्रा. चिकटे पुरस्कृत पारितोषिक विभागून |
| ४८) कोलते चैताली | i) द्वि. व. वाणिज्य परीक्षेत सर्वप्रथम | i) प्राध्यापक निधी पारितोषिक |
| ४९) जानोरकर सागर | i) द्वि. व. वाणिज्य परीक्षेत संख्याशास्त्र विषयात सर्वाधिक गुण | i) कै. इंदिराबाई चिरपुटकर पारितोषिक |
| ५०) बाबर पंचफुला | i) तृ. व. कला परीक्षेत महाविद्यालयात सर्वप्रथम | i) महाविद्यालयाचे स्मृतिचिन्ह<br>ii) प्राध्यापक निधी पारितोषिक<br>iii) माजी विद्यार्थी पारितोषिक<br>iv) कै. वासुदेव व्यंकटेश पंडित पारितोषिक |
| ५१) दौंडकर भाऊसाहेब | तृ. व. कला परीक्षेत इंग्लिश विषयात सर्वाधिक गुण | बाळकृष्ण सावळाराम रासने पारितोषिक |
| ५२) लांडे स्वाती | तृ. व. कला परीक्षेत स्पेशल मराठी विषयात सर्वाधिक गुण | i) कै. बाळनाथ शंकर पाठक पारितोषिक<br>ii) कै. नारायण चेपे पारितोषिक |
| ५३) यादव सुनीता | i) तृ. व. शास्त्र (रसायनशास्त्र) परीक्षेत महाविद्यालयात सर्वप्रथम | i) प्राचार्य बी. व्ही. भिडे पारिपारितोषिक<br>ii) कै. भाई भिडे पारितोषिक<br>iii) सदाशिव विश्वनाथ जोग पारि. |

| | | |
|---|---|---|
| ५४) यादव योगेंद्रकुमार | i) तृ. व. शास्त्र (पदार्थविज्ञान) परीक्षेत महाविद्यालयात सर्वप्रथम | i) कै. प्रकाश भागवत पारि.<br>ii) कै. रविशंकर बाळकृष्ण रासने पारितोषिक<br>iii) फिजिक्स क्लब पारितोषिक |
| ५५) शेषाद्रि कविता | i) तृ. व. शास्त्र (इलेक्ट्रॉनिक शास्त्र) परीक्षेत महाविद्यालयात सर्वप्रथम | i) कै. बाळकृष्ण सावळाराम रासने पारितोषिक |
| ५६)देव सुमेधा | i) तृ. व. शास्त्र (संख्या शास्त्र) परीक्षेत महाविद्यालयात सर्वप्रथम | i) कै. निर्मला एकनाथ पोतनीस पारितोषिक |
| ५७) मुल्हेरकर अमृता | i) तृ. व. शास्त्र (प्राणिशास्त्र) परीक्षेत महाविद्यालयात सर्वप्रथम | i) प्रा. मोरा तेजा चौहान स्मृती प्राणिशास्त्र पारितोषिक |
| ५८)नाखे कांचन | i) तृ. व. वाणिज्य परीक्षेत महाविद्यालयात सर्वप्रथम | i) महाविद्यालयाचे स्मृतिचिन्ह<br>ii) प्राध्यापक निधी पारितोषिक<br>iii) माजी विद्यार्थी पारितोषिक<br>iv)कै. वासुदेव व्यंकटेश पंडित पारितोषिक<br>v) कै. निर्मला एकनाथ पोतनीस पारितोषिक<br>vi)त्रिंबक पुरुषोत्तम गोंधळेकर पारितोषिक |
| ५९) जाधव नितीन | i) तृ. व. वाणिज्य परीक्षेत ॲडव्हान्स्ट कॉस्टिंग विषयात सर्वाधिक गुण | i) कै. बाळकृष्ण सावळाराम रासने पारितोषिक |
| ६०) कोठारी अतुल | i) तृ. व. वाणिज्य परीक्षेत M. Law विषयात सर्वाधिक गुण | i) कै. रविशंकर बाळकृष्ण रासने पारितोषिक |
| ६१) फालक लीना | i) तृ. व. वाणिज्य परीक्षेत बँकिंग विषयात सर्वाधिक गुण व विद्यापीठाचे पारितोषिक | i) विश्वनाथ माधव रायरीकर पारितोषिक<br>ii) कै. रविशंकर बाळकृष्ण रासने पारितोषिक |

| | | |
|---|---|---|
| ६२) छत्रवाल महेंद्र | i) तृ. व. वाणिज्य परीक्षेत संख्याशास्त्र विषयात सर्वाधिक गुण | i) चंद्रकांत मोरेश्वर शिंदे पारितोषिक |
| ६३) टिकेकर अभिजीत | तृ. व. वाणिज्य परीक्षेत 'अकौंटन्सी व ऑडिटिंग विषयात सर्वाधिक गुण | मातुःश्री मुळाबाई कर्नावट पारितोषिक |
| ६४) मौर्य पूनम | तृ. व. संगणकशास्त्र परीक्षेत महाविद्यालयात सर्वप्रथम | महाविद्यालयाचे स्मृतिचिन्ह |
| ६५) कुलाल भानुदास | i) M. A. परीक्षेत महाविद्यालयात सर्वप्रथम | महाविद्यालयाचे स्मृतिचिन्ह |
| ६६) सय्यद साजिद | i) M. SC. (इलेक्ट्रॉनिक शास्त्र) प्रथम वर्ष परीक्षेत महाविद्यालयात सर्वप्रथम | i) लक्ष्मण देउस्कर पारितोषिक |
| ६७) खान शगुफ्ता | i) M. SC. परीक्षेत महाविद्यालयात सर्वप्रथम | i) महाविद्यालयाचे स्मृतिचिन्ह |
| | i) M. SC. (इलेक्ट्रॉनिकशास्त्र) द्वि. व. परीक्षेत महाविद्यालयात सर्वप्रथम | i) लक्ष्मण देउस्कर पारितोषिक |
| ६८) पोटे मधुरा | i) M. com., प्र. व. परीक्षेत महाविद्यालयात सर्वप्रथम | i) प्राध्यापक निधी पारितोषिक |
| ६९) जिरगळे विश्वेश | i) M. C.S. परीक्षेत महाविद्यालयात सर्वप्रथम | i) महाविद्यालयाचे स्मृतिचिन्ह |
| ७०) पुरोहित केदार | i) पी. ई. सोसायटीच्या शाळेतून शालान्त परीक्षा, मॉडर्न महाविद्यालयातून १२ वी शास्त्र परीक्षा उत्तीर्ण होऊन अभियांत्रिकी अभ्यासक्रम उत्तम प्रकारे चालू ठेवणारा हुशार व होतकरू विद्यार्थी | i) कै. दत्तात्रय कृष्ण शेणोलीकर शिष्यवृत्ती वर्ष चौथे |

| | | |
|---|---|---|
| ७१) पागार नीता | i) १२ वी शास्त्र परीक्षा मॉडर्न महाविद्यालयातून उत्तीर्ण होऊन वैद्यकीय अभ्यासक्रम उत्तम प्रकारे चालू ठेवणारी हुशार व होतकरू विद्यार्थिनी | i) कै. आनंदीबाई दत्तात्रय शेणोलीकर शिष्यवृत्ती वर्ष ५ वे |
| ७२) दोशी मेहुल B. Com. | i) महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पाल्यांमध्ये सर्वाधिक गुण मिळवून पदवी परीक्षा उत्तीर्ण होणारा विद्यार्थी | i) कै. रविशंकर बाळकृष्ण रासने पारितोषिक |
| ७३) अहिरराव अभिषेक B. C. S | i) महाविद्यालयातील शिक्षकांच्या पाल्यांमध्ये सर्वाधिक गुण मिळवून पदवी परीक्षा उत्तीर्ण | i) कै. रविशंकर बाळकृष्ण रासने पारितोषिक |
| ७४) पारखी अभिजित | i) तृ. व. शास्त्र (पदार्थविज्ञान) वर्गातून सर्वोत्कृष्ट प्रकल्प सादर करणारा विद्यार्थी | i) एच. बी. जोशी पारितोषिक विभागून |
| ७५) काकडे श्रद्धा | i) तृ. व. शास्त्र (पदार्थविज्ञान) वर्गातून सर्वोत्कृष्ट प्रकल्प सादर करणारी विद्यार्थिनी | i) एच. बी. जोशी पारितोषिक विभागून |
| ७६) क्षीरसागर अभिजित | i) तृ. व. शास्त्र (इलेक्ट्रॅनिकशास्त्र) वर्गातून सर्वोत्कृष्ट प्रकल्प सादर करणारा विद्यार्थी | i) अन्नपूर्णाबाई गोंधळेकर पारितोषिक |
| ७७) शेलार हेमंत | i) संगणकीय भाषेत सर्वोत्कृष्ट प्रोग्रॅम लिहिणारा विद्यार्थी म्हणून निवड | i) आर. एम. मराठे पारितोषिक |
| ७८) रणदिवे सोनाली | i) तृ. व. शास्त्र (रसायनशास्त्र) वर्गातील सर्वोत्तम विद्यार्थिनी | i) मालती मधुसूदन गोखले पारितोषिक |
| ७९) पाटील विशाल | i) तृ. व. शास्त्र (पदार्थविज्ञान) वर्गातील हुशार व होतकरू विद्यार्थी | i) कै. यशवंत पंढरीनाथ गंभीर पारितोषिक |

| | | |
|---|---|---|
| ८०) शर्मा कविता | i) तृ. व. शास्त्र (इलेक्ट्रॅनिकशास्त्र) वर्गातील हुशार व होतकरू विद्यार्थिनी | i) कै. देवकी यशवंत गंभीर पारितोषिक |
| ८१) बैरागी दीपाली | i) राष्ट्रीय सेवा योजनेत दोन वर्षे उत्तम काम करणारी तृ. व. कला वर्गातील होतकरू विद्यार्थिनी | i) कै. शंकर शेलार सेवा पारितोषिक |
| ८२) राठोड प्रदीप | i) राष्ट्रीय सेवा योजना- वरिष्ठ कक्षात उत्कृष्ट काम करणारा होतकरू विद्यार्थी | i) कै.बापुराव कशिनाथ सातपुते पारितोषिक विभागून |
| ८३) गोरे स्नेहल | i) राष्ट्रीय सेवा योजना- कनिष्ठ कक्षात उत्कृष्ट काम करणारी होतकरू विद्यार्थिनी | i) कै.बाळनाथ शंकर पाठक पारितोषिक |
| ८४) धोत्रे लक्ष्मण | i) राष्ट्रीय सेवा योजना- कनिष्ठ कक्ष- शिबिरात उत्कृष्ट काम करणारा विद्यार्थी | i) कै.सदाशिव साळुंके पारितोषिक |
| ८५) कमते संगीता | i) महाविद्यालयात वरिष्ठ कक्षातील अभ्यासू व होतकरू विद्यार्थिनी | i) कै. कमलाबाई जगन्नाथ काळे पारितोषिक |
| ८६) वारणकर दीपक | i) महाविद्यालयाच्या कनिष्ठ कक्षातील होतकरू विद्यार्थी | i) सुवर्णमहोत्सव निधी पारितोषिक |
| ८७) तांबीटकर स्वाती | i) महाविद्यालयाच्या वरिष्ठ कक्षातील अभ्यासू व होतकरू विद्यार्थिनी | i) सुवर्णमहोत्सव निधी पारितोषिक |
| ८८) जाधव तेजस्वी | i) १२ वी मधील अभ्यासू होतकरू विद्यार्थिनी | i) कै. शंकर रामचंद्र कानिटकर पारितोषिक |
| ८९) जाधव आशा | i) १२ वी मधील अभ्यासू व होतकरू विद्यार्थिनी | i) कै. विष्णू त्र्यंबक ताटके पारितोषिक |

| | | |
|---|---|---|
| १०) पारस्वार प्रियांका | i) राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धांमध्ये रोलर स्केटिंग प्रकारात अनेक सुवर्ण व रौप्यपदकांची मानकरी | i) कै. पांडुरंग विष्णू महाडकर क्रीडा पारितोषिक (कनिष्ठ) |
| ११) किबिले आनंद | i) आशियाची मैदानी स्पर्धेत ४०० मी. साखळी स्पर्धेत रौप्यपदकाचा मानकरी | i) कै. पांडुरंग विष्णू महाडकर क्रीडा पारितोषिक (वरिष्ठ) |
| १२) देशमुख अनुराधा | i) संगीत स्पर्धेत उत्तम यश मिळवणारी विद्यार्थिनी | i) कै. पांडुरंग विष्णू महाडकर सांस्कृतिक पारितोषिक विभागून (कनिष्ठ कक्ष) |
| १३) नाईक आरती | i) महाविद्यालयीन व आंतरमहाविद्यालयीन स्तरावर संगीत स्पर्धांमध्ये लक्षणीय यश मिळवणारी विद्यार्थिनी | i) कै. पांडुरंग विष्णू महाडकर सांस्कृतिक पारितोषिक (कनिष्ठ कक्ष) विभागून |
| १४) कुलकर्णी प्रणव | i) महाविद्यालयीन व आंतरमहाविद्यालयीन स्तरावर गायनात यश तसेच राज्य व राष्ट्रीय स्तरावर महाविद्यालयाच्या संघाला उत्कृष्ट संवादिनी साथ करणारा विद्यार्थी | i) कै. पांडुरंग विष्णू महाडकर सांस्कृतिक पारितोषिक (वरिष्ठ कक्ष) |
| १५) ओंकार दलाल | i)RMO व IN- MOपरीक्षांतील यशामुळे इंटरनॅशनल मॅथेमेटिक्स ऑलिंपियाडच्या च्या प्रशिक्षण वर्गासाठी निवड, चौथ्या राष्ट्रीय सायन्स ऑलिंपियाड परीक्षेत पारितोषिक, फिजिक्स ऑलिंपियाड परीक्षेत महाराष्ट्रात वरच्या १% | i) महाविद्यालयाचे स्मृतिचिन्ह<br>ii) महाविद्यालयीचे रोख पारितोषिक<br>iii)कै. पांडुरंग विष्णू महाडकर |

| | | |
|---|---|---|
| | विद्यार्थ्यांमध्ये येण्याचा मान, असे अष्टपैलू शैक्षणिक यश प्राप्त करणारा विद्यार्थी | शैक्षणिक पारितोषिक (कनिष्ठ कक्ष) |
| ९६) मंदार कुलकर्णी | i) प्र. व. शास्त्र परीक्षेत 'बी' ग्रुपमध्ये सर्वप्रथम | i) नारायणराव भागवत पारितोषिक |
| | ii) प्र. व. शास्त्र परीक्षेत 'रसायनशास्त्र' विषयात सर्वाधिक गुण | ii) डॉ. के. एस. काळे पुरस्कृत पारितोषिक |
| | iii) 'विज्ञान संशोधिका' या संस्थेने घेतलेल्या आंतरमहाविद्यालयीन विज्ञान प्रज्ञा शोध परीक्षेत तिसरा क्रमांक असे उत्तम शैक्षणिक यश | iii) कै. पांडुरंग विष्णू महाडकर शैक्षणिक पारितोषिक (वरिष्ठ कक्ष) |
| ९७) मित्रा मोहित | i) चौथ्या नॅशनल सायन्स ऑलिंपियाड परीक्षेत महाविद्यालयात दुसरा क्रमांक व दुसऱ्या फेरीसाठी निवड | i) महाविद्यालयाचे पारितोषिक |
| ९८) भोसले सुप्रिया | i) चौथ्या नॅशनल सायन्स ऑलिंपियाड परीक्षेत महाविद्यालयात तिसरा क्रमांक | i) महाविद्यालयाचे पारितोषिक |
| ९९) गोडसे आदित्य | i) फिजिक्स ऑलिंपियाड परीक्षेत महाराष्ट्रात वरच्या १% विद्यार्थ्यांमध्ये येण्याचा मान | i) महाविद्यालयाचे स्मृतिचिन्ह<br>ii) महाविद्यालयाचे पारितोषिक |
| १००) लिमये सायली | i) RMO मध्ये चौथा क्रमांक IN-MO मध्ये अकरावा क्रमांक आंतरराष्ट्रीय गणित परीक्षेच्या प्रशिक्षण वर्गासाठी निवड. आय. आय. टी. पवईतर्फे घेतल्या गेलेल्या गणित ऑलिंपियाड परीक्षेत सुवर्णपदक मिळवणारी विद्यार्थिनी | i) महाविद्यालयाचे स्मृतिचिन्ह |

| | | |
|---|---|---|
| १०१) भट सागर | i) रिजनल मॅथेमॅटिक्स ऑलिंपियाड परीक्षेत नववा क्रमांक मिळवणारा महाविद्यालयाचा विद्यार्थी | i) महाविद्यालयाचे स्मृतिचिन्ह |
| १०२) जोशी रोहन | i) रिजनल मॅथेमॅटिक्स ऑलिंपियाड परीक्षेत प्रथम क्रमांक मिळवणारा महाविद्यालयाचा विद्यार्थी | i) महाविद्यालयाचे स्मृतिचिन्ह |
| १०३) थेटे माधवी | i) तृ. व. शास्त्र परीक्षेत महाविद्यालयात सर्वप्रथम<br>ii) तृ. व. शास्त्र (गणित) परीक्षेत महाविद्यालयात सर्वप्रथम<br>iii) महाविद्यालयातून सर्वाधिक<br>vi) प्राचार्य विश्वनाथ केशव<br>१०५४ गुणांनी पदवी परीक्षा उत्तीर्ण होणारी विद्यार्थिनी | i) प्राध्यापक निधी पारितोषिक<br>ii) माजी विद्यार्थी पारितोषिक<br>iii) वासुदेव व्यंकटेश पंडित पारि.<br>iv) कै. एस. के. अरगडे पारितोषिक<br>v) कै. प्रल्हाद निंबाजी सालभाई पारितोषिक<br>जोग सर्वोत्तम पदवीधर पुरस्काराची मानकरी<br>vii) महाविद्यालयाचे सर्वोत्तम पदवीधर स्मृतिचिन्ह |
| १०४) पसरणीकर प्रसाद | i) अकरावी वाणिज्य परीक्षेत महाविद्यालयात सर्वप्रथम<br>ii) अकरावी वाणिज्य परीक्षेत एस. पी. विषयात सर्वाधिक गुण<br>iii) अकरावी वाणिज्य परीक्षेत बुककीपिंग अकौंटन्सी विषयात सर्वाधिक गुण व येथेच पुढील शिक्षण चालू<br>iv) शैक्षणिक वक्तृत्व या क्षेत्रात उत्तम यश मिळवणारा विद्यार्थी<br>महाविद्यालयाच्या कनिष्ठ कक्षातील सर्वोत्तम विद्यार्थी म्हणून निवड | i) प्राध्यापक निधी पारितोषिक<br>ii) कै. गणेश धोंडोपंत नरगुंद पारितोषिक<br>iii) कै. ज्योत्स्ना गोडबोले पारितोषिक<br>iv) महाविद्यालयाचे स्मृतिचिन्ह<br>v) फिरता करंडक |

| | | |
|---|---|---|
| १०५) कारिवडेकर स्मिता | i) प्रथम वर्गात शैक्षणिक यश मिळवीत हॉकी ह्या क्रीडाप्रकारात राष्ट्रीय स्तरावर निवड झालेली बालेवाडी क्रीडा प्रबोधिनीत प्रशिक्षण घेणारी, महाविद्यालयाची Ladies ICSR, महाविद्यालयाच्या वरिष्ठ कक्षातील सर्वोत्तम विद्यार्थिनी म्हणून निवड | i) फिरता करंडक 'दामोदर शील्ड' ची मानकरी<br>ii) महाविद्यालयाचे स्मृतिचिन्ह<br>iii)स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर पुरस्काराची मानकरी |



**एकाग्रता**

# वरिष्ठ महाविद्यालय

## क्रीडा विभाग

महाविद्यालय स्तरावर दरवर्षी विविध क्रीडा स्पर्धा होत असतात. ह्या स्पर्धांमध्ये भाग घेण्यासाठी विद्यार्थ्यांची पूर्वतयारी करून घेणे आवश्यक असते. विद्यार्थ्यांच्या गुणांना चालना मिळावी व त्यामध्ये त्यांनी कौशल्य प्राप्त करून घ्यावे यासाठी महाविद्यालयाची क्रीडा समिती कार्यरत असते.

या समितीमध्ये प्राध्यापक व विद्यार्थी प्रतिनिधी यांचा समावेश असतो. सन २००२-२००३ साठी प्रा. टी. पी. लाळे यांनी कार्याध्यक्ष म्हणून काम पाहिले. या समितीत प्रा. लागू, प्रा. शेरीकर, प्रा. छाब्रा, प्रा.डॉ.सौ. डोळे, प्रा. सुनीता गोसावी, प्रा. मानसिंग साळुंके आणि उपप्राचार्य, कनिष्ठ विभाग-प्रा. जगदीश चिंचोरे यांचा समावेश होता. ह्या प्राध्यापकांकडे विशिष्ट क्रीडा संयोजनाचे काम सोपविण्यात आले होते.

या समितीमध्ये विद्यार्थी क्रीडा प्रतिनिधी म्हणून खालील विद्यार्थ्यांचा सहभाग होता.

कु. स्मिता करीवडेकर I.C.S.R.; तुषार सुतार I.C.S.R.; कु. मधुरा जोशी U. R.; कु. दीपाली सन्मुख-जलतरण; कु. भाग्यश्री निंबाळकर-महिला हॉकी; कु. सुप्रिया चव्हाण-महिला फूटबॉल; कु. विजया मोगल-महिला मैदानी स्पर्धा; विकास माळी-टेबल टेनिस; श्रीकांत वाघोले-कबड्डी, खो-खो; निनाद खाडे-बॅडमिंटन; आनंद किबिले-ज्युडो; सुरेश बेडगे-वजन उचलणे; जे.रंगनाथ-हॉकी(मुले); नारायण शिंदे-फूटबॉल.

आंतरमहाविद्यालयीन स्तरावर होणाऱ्या विविध क्रीडास्पर्धांत आमचे विद्यार्थी सहभागी झाले. फूटबॉल, हॉकी, बास्केट बॉल, व्हॉलिबॉल, कबड्डी, खो-खो, बुद्धिबळ, बॅडमिंटन, टेबल टेनिस, कुस्ती, वजन उचलणे, मैदानी स्पर्धा या स्पर्धांमध्ये चांगले यश प्राप्त केले.

★ व्हॉलिबॉल संघाने आंतरमहाविद्यालयीन व्हॉलिबॉल स्पर्धेत अजिंक्यपदाचा मान मिळविला.

★ विद्यार्थ्यांप्रमाणे आमच्या विद्यार्थिनीदेखील आंतरमहाविद्यालयीन हॉकी संघाने प्रथम अजिंक्यपद मिळविले. त्याचप्रमाणे सिंबायोसिस महाविद्यालयाने आयोजित केलेल्या आंतर महाविद्यालयीन हॉकी स्पर्धेत विजेतेपद मिळविले.

★ आंतरमहाविद्यालयीन मैदानी स्पर्धेत पुरुष संघाने उपविजेतेपद मिळविले. आंतरमहाविद्यालयीन मैदानी स्पर्धा-

★ राहुल माळवे - प्रथम वर्ष वाणिज्य, याने भालाफेक, थाळीफेक आणि हातोडाफेकीत सुवर्णपदक संपादून फेकीचा राजा हा किताब मिळविला.

★ प्रफुल्ल गुरव - प्रथम वर्ष वाणिज्य, याने लांब उडी आणि लंगडझाप उडी या प्रकारात सुवर्णपदक मिळविले.

★ हेमंत थोरात-तृतीय वर्ष वाणिज्य, २०० मी. धावणे स्पर्धेत रौप्यपदक मिळविले.

★ १२० मुले व ५० मुली यांचा I.S.C. मध्ये सहभाग.

★ विकास माळी-तृतीय वर्ष वाणिज्य, ४०० मी. धावणे स्पर्धेत रौप्यपदक मिळविले. आंतरमहाविद्यालयीन साखळी धावणे स्पर्धेत प्रफुल्ल गुरव, सचिन काडीले, हेमंत थोरात, विकास माळी आणि जितेश पांचाळ या खेळाडूंच्या संघाने ४ x १०० मी. मध्ये रौप्यपदक मिळविले. तर ४ x ४०० मी. धावणे स्पर्धेत कास्यपदक मिळविले.

★ दीपाली सन्मुख हिने राष्ट्रीय रोईंग स्पर्धेत (कोलकाता) कास्यपदक मिळविले.

★ भाग्यश्री निंबाळकर-हैद्राबाद येथे भरलेल्या बत्तीसाव्या राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्राच्या महिला हॉकी संघाला रौप्यपदक मिळवून दिले.

★ आराधना सिंग हिने ग्वाल्हेर येथे नेमबाजी स्पर्धेत

पिस्तूल गटात कास्यपदक मिळविले.

★ राहुल माळवे याने कनिष्ठ राष्ट्रीय मैदानी स्पर्धेत गोळाफेकीत कास्यपदक मिळविले.

या विद्यार्थ्यांचा आम्हाला अभिमान आहे !

विशेष उल्लेखनीय व अभिमानास्पद बाब

★ दहाव्या कुमार आशियाई मैदानी स्पर्धेत २८ ऑक्टोबर २००२ मध्ये संपन्न झाल्या. त्यात आमच्या आनंद किबिले याने भारताकडून ४ x ४०० साखळी स्पर्धेत भाग घेऊन संघास रौप्यपदक मिळवून दिले. त्याबद्दल त्याचे मन:पूर्वक अभिनंदन.

★ राम पायल, तृतीय कला-राष्ट्रीय किक बॉक्सिंग स्पर्धेत कास्यपदक विजेता. आमच्या महाविद्यालयातील पुढील विद्यार्थ्यांनी आंतरविभागीय क्रीडा स्पर्धेत पुणे शहराकडून भाग घेतला. तसेच आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धेत पुणे विद्यापीठाकडून भाग घेतला.

| नाव | वर्ग | आंतरविभागीय | विद्यापीठ |
|---|---|---|---|
| १. आनंद किबिले | तृ. वर्ष वाणिज्य | --- | मैदानी स्पर्धा |
| २. प्रफुल्ल गुरव | द्वि. वर्ष वाणिज्य | मैदानी स्पर्धा | मैदानी स्पर्धा |
| ३. राहुल माळवे | द्वि. वर्ष वाणिज्य | मैदानी स्पर्धा | मैदानी स्पर्धा |
| ४. मोहन खोत | द्वि. वर्ष वाणिज्य | व्हॉलिबॉल | व्हॉलिबॉल |
| ५. सचिन शिंदे | द्वि. वर्ष कला | व्हॉलिबॉल | व्हॉलिबॉल |
| ६. सचिन गायकवाड | एम.ए. | व्हॉलिबॉल | व्हॉलिबॉल |
| ७. सचिन होडगे | एम.ए. | व्हॉलिबॉल | ----- |
| ८. नीलेश देसाई | द्वि. वर्ष कला | व्हॉलिबॉल | ----- |
| ९. मधुरा जोशी | तृ. वर्ष वाणिज्य | व्हॉलिबॉल | ----- |
| १०. स्मिता कारिवडेकर | तृ. वर्ष वाणिज्य | हॉकी | हॉकी |
| ११. सुप्रिया चव्हाण | तृ. वर्ष वाणिज्य | हॉकी | हॉकी |
| १२. विजया मोगल | द्वि. वर्ष. वाणिज्य | हॉकी | हॉकी |
| १३. भाग्यश्री निंबाळकर | तृ. वर्ष वाणिज्य | हॉकी | हॉकी |
| १४. आराधना सिंग | द्वि. वर्ष वाणिज्य | हॉकी | हॉकी |
| १५. नीता करपे | द्वि. वर्ष वाणिज्य | फूटबॉल | फूटबॉल |
| १६. उज्ज्वला जाधव | एम.सी.एस. | क्रिकेट | क्रिकेट |

२००२-२००३ या वर्षासाठी कै. महाडक पुरस्कार उत्तम खेळाडू श्री. आनंद किबिले याने मिळविला, तर कै. रंगराव दाते महिला खेळाडूचा मान कु. दीपाली सन्मुख हिने मिळविला.

द्वितीय सत्रात आंतरवर्गीय क्रीडा सामने भरविण्यात आले.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **व्हॉलिबॉल** | विजेता संघ | द्वि. वर्ष कला | उपविजेता | प्रथम वर्ष वाणिज्य |
| **कबड्डी** | विजेता संघ | प्र. वर्ष कला | उपविजेता | द्वि. वर्ष कला |
| **बास्केटबॉल** | विजेता संघ | प्र. वर्ष संगणक शास्त्र | उपविजेता | द्वि. वर्ष संगणक शास्त्र |
| **बॅडमिंटन** | एकेरी विजेता | निनाद खाडे, टी.वाय.बी.कॉम. | | |
| **बॅडमिंटन** | उपविजेता | समीर भागवत, टी.वाय.बी.कॉम. | | |
| **बॅडमिंटन** | दुहेरी विजेता | निनाद खाडे व समीर भागवत, टी.वाय.बी.कॉम. | | |
| **बॅडमिंटन** | दुहेरी उपविजेता | रोहन मंत्री व सिद्धार्थ काकडे, एस.वाय.बी.एस.सी. | | |
| **बॅडमिंटन** | महिला एकेरी विजेती | मीनल खानापूरकर, एस.वाय.बी.एस्सी. | | |
| **बॅडमिंटन** | महिला एकेरी विजेती | श्वेता गांधी, टी.वाय.बी.कॉम. | | |
| **बॅडमिंटन** | मिक्स डबल्स विजेता | समीर भागवत व गिरिजा शिरूर, टी.वाय.बी.कॉम. | | |
| **बॅडमिंटन** | मिक्स डबल्स उपविजेता | निनाद खाडे व प्रिया भागवत, टी.वाय.बी.कॉम. | | |
| **बुद्धिबळ** | विजेता | शंतनु चिंचोरे, एस.वाय.बी.कॉम | | |
| **बुद्धिबळ** | उपविजेता | मिलिंद कांबळे, टी.वाय.बी.ए. | | |
| **टेबल टेनिस** | एकेरी विजेता | सागर खंडेलवाल, एफ.वाय.बी.सी.एस. | | |
| **टेबल टेनिस** | एकेरी उपविजेता | सागर कुलकर्णी, एस.वाय.बी.कॉम. | | |
| **टेबल टेनिस** | दुहेरी विजेता | संदीप राठोड व विनायक इंगुलकर, एफ.वाय.बी.सी.एस. | | |
| **टेबल टेनिस** | दुहेरी उपविजेता | जयेश गुजर व सागर खंडेलवाल, एफ.वाय.बी.सी.एस. | | |

**शरीर सौष्ठव स्पर्धा**-प्रथम क्र.-संग्राम चौगुले, एफ.वाय.बी.ए., मॉडर्न श्री २००२-२००३.

**शरीर सौष्ठव स्पर्धा**-द्वितीय क्र.-सुरेश बेडगे, टी.वाय.बी.कॉम.

**शरीर सौष्ठव स्पर्धा**-तृतीय क्र.-अमोल वाघ, टी.वाय.बी.कॉम.

---

परंपरेला अनुसरून वरील स्पर्धेचे नियोजन व संयोजन विद्यार्थी क्रीडा मंडळाने नेटके केले होते. क्रीडा शिक्षकांनी मार्गदर्शन केले.

श्रीमती नम्रता शहा, भारताच्या माजी हॉकी कर्णधार, यांच्या शुभहस्ते क्रीडा पारितोषिक वितरण समारंभ साजरा केला.

विशेष :- आमचे क्रीडा शिक्षक श्री. किरण लागू मागील दोन वर्षे पुणे शहर विभागीय क्रीडा समितीवर उपाध्यक्ष म्हणून काम करीत आहेत. त्याचप्रमाणे त्यांनी २००२-२००३ या वर्षासाठी पुणे शहर विभागाच्या संघनिवड समितीवर पुढीलप्रमाणे काम केले आहे.

जलतरण, बास्केटबॉल, बुद्धिबळ, महिला क्रिकेट, टेनिस. आमच्या महाविद्यालयाने ऑगस्ट २००२ मध्ये आंतरमहाविद्यालयीन वॉटर पोलोचे संयोजन टिळक तलाव येथे केले होते.

विविध क्रीडा स्पर्धांसाठी आम्हास प्राचार्य, उपप्राचार्य, प्राध्यापक वर्ग, कार्यालयीन कर्मचारी यांची मोलाची मदत होत असते. त्यांचा ऋणनिर्देश आम्ही करू इच्छितो.

| **श्री. किरण लागू** | **तुषार सुतार, स्मिता कारिवडेकर** | **मधुरा जोशी** | **श्री. त्र्यंबक लाळे** |
|---|---|---|---|
| क्रीडा संचालक | क्रीडा प्रतिनिधी | विद्यार्थी प्रतिनिधी | कार्याध्यक्ष |

## राष्ट्रीय सेवा योजना समिती

विशेष हिवाळी शिबिर

शिबिर स्थळ : मरकळ, श्री. केशवराज शिक्षण संस्थेचे नवीन माध्यमिक विद्यालय, ता. खेड, जि.पुणे

शिबिर काळ : ६ डिसेंबर २००२ ते १५ डिसेंबर २००२ (दहा दिवस)

विद्यार्थी संख्या : २७ विद्यार्थी आणि ३३ विद्यार्थिनी असे एकूण ६० पूर्णवेळ निवासी शिबिरार्थी होते.

पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यमाने मॉडर्न महाविद्यालय, पुणे-५. चे राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विशेष हिवाळी शिबिर दि. ६ डिसेंबर २००२ ते १५ डिसेंबर २००२ ह्या कालावधीत नवीन माध्यमिक विद्यालय, मरकळ, ता. खेड, जि. पुणे येथे संपन्न झाले.

आमचे शिबिर हे दहा दिवस निवासी स्वरूपाचे होते. शिबिरात वरिष्ठ महाविद्यालयातील ६० विद्यार्थ्यांनी भाग घेतला. या दहा दिवसाच्या शिबिरात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी श्रमदान, विविध विषयावर व्याख्याने, चर्चासत्रे, स्लाईड शो, कार्यशाळा असे अनेक कार्यक्रम आयोजित केले गेले.

विशेष हिवाळी शिबिराचे उद्‌घाटन प्रसिद्ध उद्योगपती मा. श्री. इंदरकुमार जैन, व्यवस्थापकीय संचालक, कुमार प्रॉपर्टीज्, पुणे यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य अ. गो. गोसावी होते. प्रमुख पाहुणे मा. तानाजी कोहिनकर, गट विकास अधिकारी, खेड तालुका यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमास मरकळच्या सरपंच सौ. कविता लोखंडे, उपसरपंच श्री. राजाराम लोखंडे, इतर ग्रामपंचायत सदस्य उपस्थित होते. तसेच श्री. केशवराज शिक्षण संस्थेचे सचिव श्री. गोरक्षनाथ वरपे, सदस्य श्री. शंकरराव लोखंडे, विकास सहकारी सोसायटीचे उपाध्यक्ष व संत तुकाराम सहकारी साखर कारखान्याचे व्हाइस चेअरमन मा. श्री. अनिल लोखंडे हे होते.

समारोप सभारंभास प्रमुख पाहुणे उद्योगपती मा. श्री. रायसोनी, श्री. शंकरराव लोखंडे, अध्यक्ष, श्री केशवराज शिक्षण संस्था, मरकळ, सरपंच सौ. कविता लोखंडे, उपसरपंच श्री. राजाराम लोखंडे, संस्थेचे संचालक श्री. घेनंद, मा. अनिल लोखंडे, तसेच आमच्या विद्यार्थ्यांचे प्रमुख मार्गदर्शक आणि मान्यवर ग्रामस्थ उपस्थित होते.

प्रा. डॉ. उजळंबकर, तसेच शाळेचे मुख्याध्यापक श्री. जगतापसर व सर्व सहकारी वर्ग व राष्ट्रीय सेवा योजनेचे सर्व शिबीरार्थी उपस्थित होते. कार्यक्रम अधिकारी प्रा. येनगे यांनी शिबिराचा वृत्तान्त थोडक्यात सांगितला. मुख्याध्यापक श्री. जगतापसरांनी मनोगत व्यक्त केले व विद्यार्थ्यांनी केलेल्या कामाचे कौतुक केले.

शिबिर काळात विद्यार्थ्यांनी दोन दिवस शाळेच्या रस्त्याचे सपाटीकरण, दोन दिवस रस्त्याच्या कडेने व शाळेच्या मागच्या बाजूस वृक्ष लागवडीसाठी खड्डे खोदण्याचे काम केले. एक दिवस विपश्यना केंद्रात बांबू वृक्ष लागवड करण्यात आली. दोन दिवस कचरा निर्मूलन अंतर्गत गावातील रस्त्याच्या कडेला पडलेला प्लॅस्टिकचा कचरा गोळा केला. 'कचरा निर्मूलन' व 'एडस् जनजागृती' या विषयावर पथनाट्ये सादर केली. दोन दिवस ग्राम सर्वेक्षण व एक दिवस रक्तदान शिबिर असे वेगवेगळ्या प्रकारचे कार्य केले.

सदिच्छा भेट : प्रा. बैरागी, कार्यक्रम समन्वयक, पुणे विद्यापीठ व मुख्य राज्य जनसंपर्क अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना यांनी शिबिराला भेट दिली.

क्षेत्रीय कार्यालय, राष्ट्रीय सेवा योजना, भारत सरकार, पुणे येथील श्री. डी. एम. गडवाल, युवा अधिकारी व श्री. ए. बी. शिंदे, युवक संघटक यांनी शिबिरास भेट दिली व विद्यार्थ्यांशी शिबिर काळात केलेल्या व करावयाच्या कार्याविषयी चर्चा केली.

तसेच प्रा. मोरे, जिल्हा कार्यक्रम समन्वयक, रा.से.यो. यांनी भेट दिली.

गावातील तरुण तडफदार नेतृत्व श्री. अनिल लोखंडे यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरास ग्रामस्थांचा चांगला प्रतिसाद मिळाला व फक्त दोन तासांत ८१ बॅगा रक्त संकलित झाले. या शिबिरात केशवराज शिक्षण संस्थेचे सचिव मा. श्री. गोरक्षनाथ वरपे यांनी फार मोलाची मदत केली व शिबिर यशस्वी पार पाडले. अशा प्रकारचे शिबिर गावात पहिल्यांदाच घेण्यात आले व त्यास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

**व्याख्यानमालेतील प्रमुख कार्यक्रमाचा तपशील:**

१. व्याख्यानमालेचे उद्‌घाटन प्रा. डॉ. उजळंबकर याच्या 'प्रदूषण : एक समस्या' या विषयावरील व्याख्यानाने झाले. त्यांनी रशियातील चेर्नोबेल येथे अणुउर्जाप्रकल्पात झालेल्या अपघाताविषयी विद्यार्थ्यांना सखोल माहिती दिली.

२. स. प. महाविद्यालयाचे कार्यक्रम अधिकारी प्रा. सोपान शेंडे, यांचे 'एडस्' या विषयावर व्याख्यान झाले. आपल्या भाषणात त्यांनी एडस्ला रोखण्यासाठी प्रभावीपणे प्रयत्न व उपाययोजना करावी असे आव्हान केले.

३. प्रा. सौ. निशा भंडारे यांनी 'सावित्रीबाई फुले' या विषयावर व्याख्यान दिले. सावित्रीबाई फुले यांच्या कार्याविषयी माहिती अतिशय प्रभावीपणे सांगितली व नंतर विद्यार्थ्यांशी चर्चा केली.

४. विद्यार्थ्यांनी स्वतः लिहिलेल्या कविता वाचनाचा कार्यक्रम भंडारे मॅडम यांनी घेतला. या कार्यक्रमात जवळजवळ सर्व विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे भाग घेतला.

५. श्री. सुहास गुर्जर व श्री. मिलिंद फणसळकर यांनी आकाश दर्शनाचा आनंद विद्यार्थ्यांना दिला. या कार्यक्रमात सर्व विद्यार्थी समरस झाले होते. आकाशात सध्या शनिग्रहावरील कंकण स्पष्ट दिसत असल्यामुळे सर्व विद्यार्थ्यांना दुर्बिणीतून शनिग्रहावरील कडे दाखविण्यात आले. बहुसंख्य विद्यार्थ्यांचा हा पहिलाच अनुभव होता.

रात्री कार्यक्रम अधिकारी, प्रा. येनगे यांनी विद्यार्थ्यांना 'जलसंधारणा' विषयी माहिती दिली व त्यावरील उपाय योजना कशा प्रकारे राबवाव्यात यावर चर्चात्मक कार्यक्रम घेतला.

६. प्रा. अशोक कांबळे यांनी 'जलसंधारणासाठी युवक' या कार्यक्रमाअंतर्गत ग्राम सर्वेक्षण कसे करावे यासंबंधी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व काही सूचना दिल्या आणि विद्यार्थ्यांच्या शंकाचे निरसन केले. त्यांनी विद्यार्थ्यांना सर्वेक्षण करण्यासाठी लागणाऱ्या प्रश्नावलीवर चर्चा केली.

७. महाविद्यालयाचे माजी कार्यक्रम अधिकारी व संख्याशास्त्र विभागाचे प्रमुख मा. दीक्षित यांनी

'राष्ट्रीय सेवा योजना : युवकांचे योगदान' या विषयातून त्यांनी रा. से. योजनेचा हेतू महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना सांगितला. त्यांच्या सर्वांगीण वाढीसाठी होणारे फायदे व समाजाशी असलेली बांधिलकी आणि करावयाचे कार्य यावर चर्चा केली.

८. मानसशास्त्र विभागातील प्रा. आशा परुळेकर यांनी 'व्यक्तिमत्त्व विकास' या विषयावर आपले विचार मांडले. आपले व्यक्तिमत्त्व आपणच घडविले पाहिजे. त्यासाठी कुठल्याही क्लासची किंवा एखाद्या संस्थेत शिक्षण घेण्याची गरज नाही. जीवनात येणाऱ्या प्रत्येक अनुभवावरून आपले व्यक्तिमत्त्व घडत जाते.

९. पथनाट्य प्रशिक्षण कार्यशाळा: वंचित विकासच्या सारिका सासवडे यांनी पथनाट्य सादरीकरणावर विद्यार्थ्यांची कार्यशाळा घेतली. या कार्यशाळेत सर्व विद्यार्थी सहभागी झाले होते. त्यांनी विद्यार्थ्यांकडून 'एड्स जनजागृती' या विषयावर पथनाट्य तयार करून घेतले. विद्यार्थ्यांनी हे पथनाट्य दोन दिवस ग्रामस्थांसाठी सादर केले.

१०. प्रा. डॉ. सौ. भारती डोळे यांचे 'विवाहविषयक कायदे' या विषयावर व्याख्यान झाले. त्यांनी विद्यार्थ्यांना विवाहविषयक कायद्यांची व्यवस्थित माहिती दिली व विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन केले. विद्यालयातील १० वी व ११ वीच्या विद्यार्थ्यांनी याचा लाभ घेतला.

११. डॉ. प्रदिप आगाशे यांचे पर्यावरण या विषयावर कीर्तन झाले. त्यांनी पर्यावरण म्हणजे काय व त्याचे संरक्षण कसे करावे या विषयी सखोल माहिती आपल्या कीर्तनातून दिली. या कार्यक्रमास विद्यालयातील सर्व शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

१२. प्राणिशास्त्र विभागातील प्रा. नरेन्द्र नायडू यांचे 'बाबा आमटे व आनंदवन' या विषयावर व्याख्यान झाले. नायडूसरांनी बाबा आमटे यांच्या कार्याविषयी व आनंदवनची स्थापना याची माहिती विद्यार्थ्यांना दिली.

१३. विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. उत्तमराव जगतापसर यांनी 'विद्यार्थ्यांचे आचरण व कर्तव्य' या विषयावर विद्यार्थ्यांबरोबर चर्चा केली.

१४. भारतीय ज्ञान विज्ञान संस्थेचे श्री. किशोर दरक यांचा 'माकड ते मानव' या विषयावर स्लाईड शो चा कार्यक्रम झाला. यामध्ये माकडापासून मानवापर्यंतचा इतिहास त्यांनी स्लाईडच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना व्यवस्थित समजेल या पद्धतीने मांडला.

१५. डॉ. माधवी महाजन यांचे 'दैनंदिन जीवनात दासबोधाचे महत्त्व' या विषयावर व्याख्यान झाले. त्यांनी विद्यार्थ्यांना गोष्टींमधून मार्गदर्शन केले.

१६. रात्री विद्यार्थ्यांना सध्या चर्चिला जात असलेला '१० वी फ' हा चित्रपट दाखविण्यात आला.

१७. मा. श्री. आर. जे. पाटील, मुख्याध्यापक, जुन्नर विद्यालय, जुन्नर, पुणे. यांचे 'शिवाजीमहाराज यांचे चरित्र' या विषयावर व्याख्यान झाले. त्यांचे व्याख्यान विद्यार्थी एकाग्रचित्ताने ऐकत होते. त्यांचा आवाज व प्रसंगाचे स्पष्टीकरण फारच गंभीर व शाश्वत असे वाटत होते. त्यांनी काही प्रसंग जिवंत वाटावेत असे विद्यार्थ्यांसमोर उभे केले.

१८. सायंकाळी ग्रामस्थांसाठी सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केला होता. संपूर्ण कार्यक्रम हा शिबीरार्थीनी तयार केलेला होता. या सांस्कृतिक कार्यक्रमास ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

विशेष हिवाळी शिबीर काळात खालील सर्व माझ्या सहकारी प्राध्यापकांनी शिबीरास भेट दिली व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्रा.डॉ. सुधीर उजळंबकर,प्रा. मानसिंग साळुंके, प्रा. दीक्षित, प्रा. सौ. वीणा नरगुंद, प्रा. आर. डब्ल्यू. कुलकर्णी, प्रा. ए. व्ही. कांबळे, प्रा. डी. एल. खोकले, प्रा. एस. आर वाघ, प्रा. व्ही. टी. शेळके, प्रा. सौ. अहिवाळे, प्रा. संजय ठेंगडी, प्रा. सौ. सुधा ढोनसळे, प्रा. रघु विडप, प्रा. योगेश ठिपसे, प्रा. सौ. निघोट, प्रा. सौ. विजया जगताप, प्रा. सौ. आदमाने, विद्यार्थी प्रतिनिधी-प्रदिप राठोड व हेमलता बलकवडे.

★★

## नियमित कार्यक्रम

राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत सन २००२-२००३ या शैक्षणिक वर्षामध्ये विविध कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडले. या सर्व कार्यक्रमांचा थोडक्यात वृत्तान्त खाली देत आहे.

जुलै : विद्यार्थ्यांची राष्ट्रीय सेवा योजनेसाठी नावनोंदणी केली. यास विद्यार्थ्यांनी चांगला प्रतिसाद दिला. २४ जुलै २००२ : राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थ्यांना मार्गदर्शनाचा कार्यक्रम. रा. से. यो. ची माहिती व उद्दिष्टे विद्यार्थ्यांना करून दिली. या कार्यक्रमात महाविद्यालयातील प्राध्यापकांचा सहभाग होता व त्यांनी मुलांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमास एकूण ३०० विद्यार्थी उपस्थित होते.

२ ऑगस्ट २००२ : रा. से योजना समितीची सभा प्राध्यापक कक्षामध्ये सकाळी ११.३० वा. आयोजित करण्यात आली होती. या सभेत प्रथम सत्रात घेण्यात येणाऱ्या कार्यक्रमांचा तपशील ठरविण्यात आला.

६ ऑगस्ट २००२ : हिरोशिमा दिवस स्मरण निमित्ताने अणुबॉम्बचे विनाशकारी परिणाम यावर एक फिल्म शोचे आयोजन केले.

९ ऑगस्ट २००२ : क्रांतिदिनानिमित्त श्री. मिलिंद एकबोटे, नगरसेवक, पुणे महानगरपालिका यांचे हस्ते रा. से. योजनेच्या नियमित कार्यक्रमाचे औपचारिक उद्घाटन व विद्यार्थ्यांना मार्गदर्शनपर व्याख्यान आणि क्रांतिकारकांनी केलेल्या कार्याची माहिती करून दिली.

२. १६ एप्रिल २००२ ते १८ एप्रिल २००२ पर्यंत दिघी येथे इयत्ता ८वी ते १० वी च्या विद्यार्थ्यांसाठी विज्ञानछंद वर्ग घेण्यात आले. यामध्ये मुलांसाठी शास्त्र विषयीच्या जिज्ञासूवृत्ती निर्माण करण्याच्या दृष्टीने वेगवेगळी प्रात्यक्षिके आयोजित केली गेली.

३. साधना महाविद्यालय, हडपसर व पेमराज सारडा महाविद्यालय, अहमदनगर येथे तृतीय वर्ष शास्त्र विषयाच्या अभ्यासक्रम सुधारणाअंतर्गत कार्यशाळा आयोजित केल्या.

४. दि. २१ ते २५ जून २००२ या पाच दिवसांमध्ये प्रथमवर्ष शास्त्र पुनर्रचित अभ्यासक्रम राबविण्याच्या दृष्टीने थिअरी व प्रॅक्टिकल्स विषयी मार्गदर्शन वर्ग शिक्षकांसाठी आयोजित केले.

५.इलेक्ट्रॉनिक सायन्स, द्वितीय वर्ष विज्ञानच्या अभ्यासक्रम पुनर्रचनेसाठी कार्यशाळा आयोजित करण्यात आली.

६. प्रा. एस. आर. चौधरी, प्रा. डी. बी. गायकवाड यांनी कोईंबतूर, तामिळनाडू येथे NSI-27 या राष्ट्रीय चर्चासत्रात 'Design and Development of soil maisture sensor for its use in idengeneausly developed automated drip irrgation system' हा शोधनिबंध सादर केला असून सदर निबंध 'Instrument Society of India' या मॅगेझिनमध्ये प्रसिद्ध होणार आहे.

दि. ३/१२/०२, ४/१२/०२, ५/१२/०२ रोजी

NAAC (नॅशनल ऑक्रिडिशन अॅण्ड अॅसेसमेंट कौन्सिलतर्फे महाविद्यालयाचे मूल्यांकन करण्यासाठीची समिती आली होती. तत्पूर्वी NAAC कडे पाठविण्यासाठी मागील ५ वर्षांचा अहवाल आमच्या विभागात डॉ. सौ. सुलभा देऊस्कर यांच्या मार्गदर्शनाखाली तयार करण्यात आला. हे काम जवळजवळ दोन वर्षे, महाविद्यालयातील इतर कामे सांभाळून, अविरत कष्ट घेऊन पार पाडण्यात आले. प्रत्येक विभागातील विद्यार्थी संख्या, त्यांची शैक्षणिक प्रगती, शिक्षकांची अध्यापनाव्यतिरिक्त कामगिरी व यासारख्या असंख्य गोष्टी, त्यांची सत्यता पडताळून अहवालात नमूद करणे हे अत्यंत जिकिरीचे काम होते. ही सर्व माहिती प्रथम फॉर्ममध्ये भरून घेणे व नंतर त्याचे संगणकीकरण करणे व त्याचा रिपोर्ट तयार करणे ही कामे विभागात करण्यात आली. त्यासाठी अनेक प्राध्यापकांचे मोलाचे सहकार्य लाभले.

विभागप्रमुख डॉ. सुलभा देऊस्कर यांना इलेक्ट्रॉनिक सायन्स या विषयावर राहुरी, जुन्नर येथील महाविद्यालयात व्याख्याने देण्यासाठी आमंत्रित केले होते. तसेच NAAC विषयीच्या कार्यशाळेसाठी Resource Person म्हणून टी. जे. कॉलेज, खडकी; मॉडर्न महा., गणेशखिंड; बी. एम. सी. सी. महाविद्यालय येथे काम केले. त्यांना राज्य पातळीवरील कार्यशाळेसाठी सोनई ता. नेवासा येथेही बोलावले होते.

II National Convention of Accredited Institutions Mumbai येथेही डॉ. देऊस्कर यांनी सहभाग घेतला. डॉ. सुलभा देऊस्कर यांची महा. राज्य माध्यमिक व उच्च माध्य. शिक्षक मंडळाच्या तंत्रज्ञान विषय अभ्यास मंडळावर निमंत्रक म्हणून नियुक्ती झाली आहे. त्याबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन.

आमच्या विभागातील प्रा. बी. बी. येनगे यांच्या 'डिझाईन अॅण्ड डेव्हलपमेंट ऑफ लो कॉस्ट इलेक्ट्रॉनिक इंस्ट्रूमेंट फॉर बायोकेमिकल अॅण्ड केमिकल मेझरमेंटस् इन कॉलेज लॅबोरेटरीज' या संशोधन प्रकल्पाचे काम या वर्ष अखेर पूर्ण होईल. तसेच महाविद्यालयाचे NSS चे १० दिवसांचे शिबिर मरकळ येथे यशस्वीपणे प्रा. येनगे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले.

जून २००२ मध्ये गरवारे कॉलेजमध्ये 'मायक्रोकंट्रोलर' या विषयावर झालेल्या कार्यशाळेमध्ये प्रा. गायकवाड यांनी विषयतज्ज्ञ म्हणून काम केले. तसेच ICICI पुणे येथे प्रा. गायकवाड यांची व्याख्याने आयोजित करण्यात आली होती. टी. सी. कॉलेज, बारामती येथील विद्यार्थी व शिक्षक यांना 'मायक्रोकंट्रोलर' या विषयावर मार्गदर्शन केले गेले. प्रा. गायकवाड यांनी पुणे येथे आयोजित केलेल्या राष्ट्रीय परिषदेमध्ये 'सिम्युलेशन' या विषयावर शोधनिबंध सादर केला.

S. Y. B. Sc. व T. Y. B. Sc. साठी या विषयातील अभ्यासक्रमाचा मसुदा ठरविण्यासाठी सौ. देऊस्कर, प्रा. गायकवाड, प्रा. कांबळे, प्रा. क्षीरसागर, प्रा. चौधरी यांनी सहभाग घेतला.

प्रा. सौ. अर्चना आपटे यांनी डिसेंबर २००२ पुण्यात आयोजित केलेल्या राष्ट्रीय कार्यशाळेमध्ये शोधनिबंध सादर केला.

प्रा. वऱ्हाडे यांची या वर्षी आमच्या विभागात नव्याने नेमणूक झाली. विभागातील सर्व प्राध्यापकांनी त्यांचे स्वागत केले.

मा. प्राचार्य गोसावीसरांचे वेळोवेळी मार्गदर्शन आणि सहकार्य लाभले.

**डॉ. सुलभा देऊस्कर**
**इलेक्ट्रॉनिक विभागप्रमुख**

## संगणकशास्त्र विभाग

संस्थेने व महाविद्यालयाने विभागास नुकतीच प्रशस्त जागा दिल्याने, महाविद्यालयातील सर्व सोयींनी सज्ज व अत्याधुनिक प्रयोगशाळा उभारण्यात आली आहे. या प्रयोगशाळेचा नामकरण सोहळा दि. १५फेब्रुवारी २००३ रोजी पार पडला. प्रयोगशाळेचे उद्‌घाटन श्री. किशोर पाटील (Managing Director, KPIT, Infosystem Pvt. Ltd. Pune) यांच्या हस्ते झाले. प्रयोगशाळेचे गुरुवर्य कै. व्ही. टी. ताटके प्रयोगशाळा असे नामकरण करण्यात आले. याप्रसंगी संस्थेचे पदाधिकार, आजीव सदस्य, समाजातील अनेक मान्यवर, महाविद्यालयाचे प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी वर्ग आवर्जून उपस्थित होते. नॅकच्या पिअर टिमने देखिल विभागाची पाहणी करून प्रशंसा केली.

**शिक्षक /कर्मचाऱ्यांची विशेष कामगिरी**

प्रा. ए. व्ही.देशपांडे, प्रा. शामकांत देशमुख, प्रा. मनिषा जाधव, प्रा. ए. व्ही. साठे, श्री. समीर बडमनजी, प्रा. यशराज बोरसे व विभागातील सर्व शिक्षकेतर कर्मचारी यांचा प्लेसमेंट कक्ष व कॅम्पस मुलाखती हे कार्यक्रम राबविण्यात सक्रिय सहभाग.

प्रा. एम्. एस्. घाणेकर यांच्या अध्यक्षतेखाली प्रा. मराठे यांनी पुरस्कृत केलेली व 'R. M. Marathe Best programe Award 2002- 2003' स्पर्धा विभागात संपन्न झाली. स्पर्धेचे पारितोषिक श्री. शेलार हेमंत, तृतीय वर्ष संगणकशास्त्र यांस मिळाले.

श्री. समीर बडमनजी व प्रा. रघू विडप यांनी यंदाच्या वर्षी कॉम्प्युटर मेन्टेनन्स्चे काम इलेक्ट्रॉनिक विभागातील विद्यार्थ्यांच्या मदतीने पार पाडले.

आमच्या विभागातील प्रा. शामकांत देशमुख व प्रा. माधुरी घाणेकर यांनी पुणे विद्यापीठात आयोजित करण्यात आलेला संगणक शास्त्रातील रिफ्रेशर कोर्स 'अ' श्रेणी प्राप्त करून यशस्वी रित्या पूर्ण केला. विभागातर्फे त्यांचे हार्दिक अभिनंदन !

प्रा. संजय डाफ यांचा एच. एस. सी. बोर्डाने आयोजित करण्यात आलेल्या अकरावी व बारावी व्यावसायिक अभ्यासक्रमाविषयीच्या कार्यशाळेत सक्रिय सहभाग प्रा. डाफ यांनी सांगली येथे झालेल्या कार्यशाळेत व्याख्यान दिले.

एम्. सी. एस् द्वितीय वर्षातील चौथ्या सेमिस्टर मध्ये विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष कंपनीमध्ये पूर्णवेळ प्रोजेक्ट करावयाचे असते. यावर्षी अनेक कंपन्यांनी महाविद्यालयास भेट देऊन आमच्या विद्यार्थ्यांची निवड केलीच पण त्याचप्रमाणे त्यांना जूनपासून नोकरीदेखील देऊ केली आहे. संगणकशास्त्र विभाग ह्या सर्व कंपन्याचा आभारी आहे.

तृतीय वर्षातील 'Object oriented programming & Vishal programming' या विषयासाठी प्रा. मनीषा सूर्यवंशी यांचेपुस्तक प्रकाशित झाले.

प्रा. अभिजीत साठे यांचा तृतीय वर्ष व द्वितीय वर्ष संगणकशास्त्र या वर्गाच्या 'Syllabus Restonching' मध्ये सक्रिय सहभाग.

प्रा. अंजली सरदेसाई यांचा बी. सी. एस्. अभ्यासक्रमातील 'युनिट' विषयाच्या कार्यशाळेत सक्रिय सहभाग.

इयत्ता १२ वी शास्त्रसाठी 'Information Technology' या विषयाचे प्रा. अे. व्ही. देशपांडे यांचे पुस्तक प्रकाशित झाले.

**प्रा. अे. व्ही. देशपांडे**
**विभाग प्रमुख**

## COMMERCE ASSOCIATION

The commerce association conducts various extra curricular activities for the commerce students. The aims and objectives behind organising these activities is to provide a platform to the students to express their view and openions, to enhance their personality, to make them more viable for the job market, to provide them, an opportunity to express their creativity.

This year the association conducted following activities -

1) Inaugurate Function : A Tribute to Shri Dhirubhai Ambani.

Chief Guest : Principal A. G. Gosavi

Students presented the theme in the form of charts, magazines prepared on the life i.e. personal / Professional of Shri. Dhirubhai Ambani. Two group of students also presented the information, with the help of OHP and Power Point Presentation.

2) The association conducted a debate competition in October 2002, The topic for discussion was 'Has The Super Power become valuable after 9/11' Students enthusiastically participated. About 35 entries were received. The judges for the competition were Prof. Sanjeevani Rahane, Prof. Surekha Parab & Prof. Madhusudan.

3) An Audio - Visual Competition was organized and held for the student on 17th Jan. 2003. The objective being to bring out the active qualities of the students as well as covering the practical aspect of the theory paper that students study at T. Y. B. Com. related to Advertising. This competition also received a very enthusiastic response from the students. The judges for the competitions were Prof. A. V. Kamble, Prof. Sujata Sardesai, Prof. Surekha Parab & Prof. Sunita Purohit.

4) The association held Prize Distribution function on 20th Feb. 03. Chief Guest for this function was Shri. S. P. Ranade who is actively involved. He guided and encouraged the students.

5) This year our junior college students also enthusiastically participated in a project report competition conducted under the able guidance of Prof. Sunita Gosavi.

The Students who actively participated in the associations activities throughout the year were.

F. Y. B. Com. _ Varun Nagpal, Saurabh Dutt, Swanand Mokashi, Sarika More, Komal Dave, Cilvina George, Sumitra Nair, Gajanan Nerkar, Lavina Salvi.

S. Y. B. Com. - Gauri Chandorkar, Ramchandra Samak, Denny Charan, Surjeet, Kapil Kamat, Meenal Khanapurkar, Jyoti Rishikesh, Hasabnis, Rahul Kulkarni.

T. Y. B. Com. - Manoj Parte, Swaroop Ghorpade, Reeya Thorve, Abhijit Salvi, Suraj Harchekar.

The associations Guides & Philosophers were Prin. A. G. Gosavi, Vice Principal Y. R. Waghmare. We received continuous encouragement from our collegues Dr. Bharati Dole and Prof. Sanjeevani Rahane.

All the members of the association are Prof. A. V. Kamble, Prof. R. W. Kulkarni, Prof. Swati Ahiwale, Prof. Vijay Gaikwad, Prof. Narendra Parchure, Prof. Rupesh Bansode actively worked for the success of the associations activities. We were also helped in our activities by Prof. Deepali Thakur of English Dept.

**Jiveeta Gujar**
**Chairperson**

## DEPARTMENT OF GEOGRAPHY

Miss. Sucheta Balghare stood 1st in Pune Division H. S. C. Board Examination, March 2002 in Geography subject. Prof. Malusare L. R. (SNDT College, Pune) delivered guiding lecture for XIIth standard students. Prof. Kelkar delivered lecture on Earthquake Activity for 11th & 12th Std. students. Prof. M. S. Salunke delivered guiding lecture for XIIth std. students at Awate College Manchar.

Following Village Surveys & Excursions Were carried out during the academic year 2002-2003

| Class | Village/Places | Excursion/Survey in Charge |
|---|---|---|
| XI Arts | Pachgani, Mahabaleshwar, Sudhagad, Pali, Unhesre | V. B. Alhat<br>M. S. Salunke |
| XII Arts | Varale (Tal. Baramati)<br>Choronde (Alibag) | R. V. Zagade |
| XII Sc. | Sangvi (Baramati) | |
| S. Y. B. A. | Revdanda, Kashid | W. R. Ahirrao |
| T. Y. B. A. | Pratapgad, Panchgani, Mahabaleshwar | N. J. Kulkarni |
| S. Y. B.Sc. | Karla, Pale<br>Unhere | |

**W. R. Ahirrao**
**Head of the Dept.**

# हिंदी विभाग

पिछले दो सालों से हिंदी विभाग की जिम्मेदारी कनिष्ठ विभाग के अध्यापक श्री. डोईफोडेजी के कंधेपर थी। इस वर्ष नवनियुक्त अध्यापिका श्रीमती सुनीता पुरोहितजीने अगस्त २००२ से विभाग के सूत्र हाथ में लिए। १४ सितंबर २००२ को हिंदी दिवस बडे उत्साह से मनाया गया। कार्यक्रम के प्रमुख अतिथी रहे राष्ट्रभाषा सभा के प्राधानाचार्य सु. मो. शाह और कार्यक्रम की अध्यक्षता की महाविद्यालय के प्राधानाचार्य ए. जी. गोसावीजी ने। उन्होंने बहुत ही बढिया हिंदी में बढिया भाषण दिया और छात्रों का उत्साह बढाया। प्रा. पुरोहितने प्रमुख अतिथी महोदय का परिचय कराया। प्रा. डोईफोडेजी ने सूत्रसंचालन किया और प्रा. सूर्यवंशीजीने आभार प्रदर्शित किए। महाविद्यालय के ११ वी कक्षा से लेकर तृतीय वर्ष साहित्यतक के हिंदी प्रेमी छात्र बडी संख्या में उपस्थित थे। विशेष उपस्थिती रही प्रा. अमृता ओक और प्रा. जीविता गुजरजी की।

इस वर्ष द्वितीय वर्ष साहित्य के छात्रों को विज्ञापन-लेखन के लिए प्रोत्साहित किया गया और छात्रों ने अपनी प्रतिभा से अच्छे विज्ञापन लिखे। मार्च में तृतीय वर्ष के हिंदी के छात्रों का बिंदाई समारोह संपन्न हुआ और वर्ष के कार्यक्रमों का समापन किया गया।

इस वर्ष इस तरह से हिंदी विभाग थोडी गती पा रहा है। आशा है कि आनेवाले वर्ष में छात्र और प्रगति कर दिखाएँगे।

**प्रा. सुनीता पुरोहित**
हिंदी विभाग

★★

# मानसशास्त्र विभाग

मानसशास्त्र विभागातर्फे विद्यार्थ्यांसाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. मानसशास्त्र विषयातील विद्यार्थ्यांची रुची वाढावी, या विषयातील मान्यवरांचे विचार ऐकण्याची संधी मिळावी, या विषयातील भविष्य काळातील व्यवसाय संधींची माहिती मिळावी या हेतूने काही विशेष उपक्रमही राबविण्यात आले.

१) २४ जुलै २००२ रोजी गुरुपौर्णिमेनिमित्त माजी विद्यार्थ्यांचा मेळावा आयोजित केला गेला. काही यशस्वी माजी विद्यार्थ्यांनी आपापले अनुभव सांगून नवीन विद्यार्थ्यांना प्रेरणा दिली. त्याच दिवशी हा विषय नव्याने घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी स्वागत समारंभ, गतवर्षी उत्तम शैक्षणिक कामगिरी केलेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव समारंभही आयोजित करण्यात आला.

२) २ ऑगस्ट २००२ रोजी गरवारे महाविद्यालयाच्या मानसशास्त्र विभागाला तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी भेट दिली. तेथील विद्यार्थ्यांनी केलेले प्रकल्प समजावून घेतले. विभागप्रमुख प्रा. भरत देसाई यांच्याशी चर्चा केली.

३) १७ ऑगस्ट २००२ रोजी श्री. मुळे यांचे 'मानसशास्त्राच्या विद्यार्थ्यांसाठी स्वयंरोजगार' या विषयावर उद्‌बोधक व्याख्यान झाले.

४) २८ ऑगस्ट २००२ रोजी प्रा. नारायण परब या माजी विद्यार्थ्याचे 'संमोहनशास्त्र-एक कला' या विषयावर व्याख्यान झाले. या कार्यक्रमाला विद्यार्थ्यांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला.

५) फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मानसशास्त्र विभागाने

आयोजित केलेल्या विविध व्याख्याने, पोस्टर्स प्रदर्शने यांना विद्यार्थ्यांनी भेटी दिल्या.

६) डिसेंबर महिन्यात अहमदनगर येथे भरलेल्या मराठी मानसशास्त्र परिषदेच्या अधिवेशनात सहा विद्यार्थिनी सहभागी झाल्या. त्यापैकी कु. शिल्पा सोंडकर व कु. कविता कदम या तृतीय वर्षाच्या विद्यार्थिनींनी 'स्वमग्न बालके' या विषयावर शोधनिबंध सादर केला.

७) ४ फेब्रुवारी २००३ रोजी श्री. शैलेंद्र देशपांडे यांचे 'हस्ताक्षरावरून व्यक्तिमत्त्व परीक्षा' या विषयावर प्रात्यक्षिकासह व्याख्यान झाले.

८) ५ फेब्रुवारी २००३ रोजी बाल कल्याण संस्था, पुणे येथे शैक्षणिक भेट आयोजित करण्यात आली.

९) १५ जानेवारी २००३ रोजी सिंबायोसिस महाविद्यालयाच्या सुमारे ४० विद्यार्थ्यांनी आमच्या विभागाला शैक्षणिक भेट दिली. विविध मानसशास्त्रीय चाचण्या, उपकरणे याची माहिती त्यांनी करून घेतली.

१०) १८ व २० जानेवारी रोजी 'मानसविश्व' नावाचे एक प्रदर्शन विभागातर्फे आयोजित करण्यात आले. या प्रदर्शनाला सुमारे ३५० व्यक्तींनी भेट दिली. महाविद्यालयाचे प्राचार्य, उपप्राचार्य, विभागप्रमुख, शिक्षकेतर कर्मचारी, सहकारी प्राध्यापक, अन्य विभागातील विद्यार्थी, अन्य महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक, पालक अशा अनेकांनी या प्रदर्शनाला भेट देऊन विद्यार्थ्यांची प्रशंसा केली. अशी माहितीपर प्रदर्शने वारंवार भरविली जावीत अशी प्रतिक्रिया अनेकांनी व्यक्त केली.

मानसशास्त्र विभागातील प्राध्यापकांनीही यंदा काही उल्लेखनीय कामगिरी केली. विविध ठिकाणी जाऊन व्याख्याने दिली. प्राध्यापकांसाठी असणाऱ्या चर्चासत्रांत सहभाग घेतला.

प्रा. सौ. आशा परुळेकर यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या हिवाळी शिबिरात 'व्यक्तिमत्त्व विकास' या विषयावर व्याख्यान दिले. त्यांचे 'वनिता कोश' नावाचे माहितीपूर्ण पुस्तक प्रकाशित झाले.

प्रा. सौ. विजया जगताप, एस. एन. डी. टी. महाविद्यालयाने आयोजित केलेल्या 'महिलांचे शारीरिक व मानसिक आरोग्य' या चर्चासत्रात सहभागी झाल्या.

प्रा. सौ. अमृता ओक या आकाशवाणी व दूरचित्रवाणीवरील कार्यक्रमात सहभागी झाल्या. शाहू मंदिर महाविद्यालय, पुणे येथील विद्यार्थ्यांना 'प्रात्यक्षिक परीक्षेची तयारी' या विषयावर त्यांनी विशेष मार्गदर्शनपर व्याख्यान दिले.

सर परशुरामभाऊ महाविद्यालय व एस. एन. डी. टी. महाविद्यालय, पुणे यांनी प्रा. अमृता ओक यांना पदव्युत्तर वर्गांना अध्यापन करण्यासाठी आमंत्रित केले. मॉडर्न महाविद्यालयाच्या इलेक्ट्रॉनिक्स विभागाने आयोजित केलेल्या राष्ट्रीय पातळीवरील चर्चासत्रात प्रा. सौ. अमृता ओक यांनी 'अभ्यासक्रम निवडीतील पालकांची भूमिका' या विषयावर शोधनिबंध सादर केला.

मानसशास्त्र विभागातर्फे चालविल्या जाणाऱ्या विद्यार्थी मार्गदर्शन केंद्राचा लाभ बऱ्याच आजी तसेच माजी विद्यार्थी, पालक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी घेतला. यंदा ह्या केंद्राच्या कामकाजात तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांची मदत घेण्यात आली

मानसोपचारांबरोबरच पुष्पौषधींचाही वापर करण्यात आला.

मानसशास्त्र विभागाच्या कामकाजामध्ये सहकारी प्राध्यापक सौ. परुळेकर व सौ. जगताप यांचे उत्तम सहकार्य लाभले. तसेच शिक्षकेतर कर्मचारी श्री. सुरेश जाधव व 'कमवा-शिका' योजनेअंतर्गत काम करणारा विद्यार्थी अजय बाराथे याचेही सहकार्य मिळाले.

**प्रा. सौ. अमृता ओक**
**मानसशास्त्र विभागप्रमुख**

## इतिहास विभाग

शैक्षणिक वर्ष २००२-२००३ मध्ये इतिहास विभागातर्फे काही कार्यक्रम आयोजित करण्यात आले. इतिहास विषयाबद्दल आवड निर्माण व्हावी यासाठी काही प्रयत्न केले गेले.

१) या वर्षी प्र. वर्ष कला शाखेत इतिहास विषयात ६७ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला.

२) कला शाखेत इतिहास विषय एकूण १३१ विद्यार्थ्यांनी घेतलेला आहे.

३) विषयाबाबत विद्यार्थ्यांमध्ये आत्मीयता निर्माण करण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात आले. वृत्तपत्रांमध्ये येणाऱ्या ऐतिहासिक बातम्यांचे कात्रण काढून ते सर्वांना वाचण्यासाठी फलकावर वेळोवेळी लावण्यात येऊ लागले. कात्रणांचे संकलन करून त्याची माहिती इतिहासाच्या विद्यार्थ्यांना लिहून घेण्यास सांगून ऐतिहासिक संशोधनाचे महत्त्व जाणून घेणाचा प्रयत्न करून देण्यात आला. तसेच ऐतिहासिक स्थळांना भेटी देण्यात आल्या. सिंहगड, भुलेश्वर, महाबळेश्वर, पुण्यातील ऐतिहासिक स्थळे, पेशवे दप्तर, शिंदे छत्री अशा अनेक ठिकाणी अधूनमधून भेटी देण्यात आल्या.

४) २६ ऑगस्ट २००२ रोजी सकाळी ८ ते १० च्या दरम्यान डॉ. यशवंत सुमंत रीडर, पुणे विद्यापीठ यांचे 'समाज प्रबोधन आणि राष्ट्रवाद' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. त्या वेळी प्रा. गायकवाडसर अध्यक्ष लाभले.

५) प्रा. अविनाश कोष्टी यांचे एम. पी. एस. सी., यु. पी. एस. सी. च्या परिक्षांबाबत माहितीपर व्याख्यान विद्यार्थ्यांसाठी १ डिसें. २००२ आणि ५ जाने. २००३ च्या काळात आयोजित करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

★★

## साहित्य संघटना

मॉडर्न महाविद्यालयाच्या कला शाखेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी साहित्य संघटनेमार्फत अभ्यासविषयांना पूरक अशी व्याख्याने आयोजित केली जातात. या विद्यार्थ्यांमध्ये विविध कौशल्ये विकसित व्हावीत म्हणून निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, प्रदर्शने, शैक्षणिक भेटी यांचेही आयोजन केले जाते.

यंदाच्या शैक्षणिक वर्षात इतिहास, मराठी, मानसशास्त्र व हिंदी विभागातर्फे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

गणेशोत्सवानिमित्त मराठी विभागाने वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन केले. डॉ. नीलिमा गुंडी, श्री. प्रकाश चितळे, डॉ. वि. वि. घाणेकर, सौ. आसावरी काकडे, डॉ. कमलेश या मान्यवरांची व्याख्याने आयोजित केली.

इतिहास विभागाने डॉ. यशवंत सुमंत यांचे व्याख्यान आयोजित केले.

मानसशास्त्र विभागाने 'संमोहनशास्त्र-एक कला' या विषयावर प्रा. नारायण परब यांचे व्याख्यान आयोजित केले होते.

हिंदी दिनानिमित्त हिंदी विभागाने प्रा. सु. मो. शहा यांचे हिंदी भाषेचे महत्त्व सांगणारे व्याख्यान आयोजित केले.

वरील सर्व उपक्रमांमध्ये प्रा. डॉ. सौ. स्नेहल तावरे, सौ. पुरोहित, सौ. आदमाणे, सौ. जगताप, प्रा. श्री. डोईफोडे, श्री. सूर्यवंशी यांचे उत्तम सहकार्य लाभले.

**प्रा. सौ. अमृता ओक**
**अध्यक्ष, साहित्य संघटना**

★★

## राष्ट्रीय छात्र सेना

या शैक्षणिक वर्षात महाविद्यालयातील १०९ विद्यार्थी आणि ३२ विद्यार्थिनी राष्ट्रीय छात्र सेनेच्या विविध युनिट्समध्ये दाखल झाल्या होत्या. त्यांची युनिटनुसार विभागणी पुढीलप्रमाणे :

| Name of NCC Unit | No. of Cadets |
|---|---|
| 36 MAH BN NCC (Army) | 53 |
| 3 MAH Naval Unit | 42 |
| 3 MAH AIR SQN | 18 |
| 2 MAH Girls BN (Army) | 22 |
| 3 MAH ARMD SQN | 03 |
| 1 MAH SIGNAL COY | 03 |
| | 141 |

**विशेष उल्लेखनीय :**

★ सार्जन्ट विजयालक्ष्मी नन्नम व सार्जन्ट सुचित्रा नवले यांची (आर्मी) बटालियन, ग्रुप व राज्य स्तरावर निवड, राष्ट्रीय स्तरावर दिल्ली येथे स्थलसैनिक कॅम्पमध्ये सहभागी. सार्जन्ट विजयालक्ष्मी नन्नमला राज्य स्तरावर नेमबाजीत सुवर्णपदक.

★ सिनिअर अंडर ऑफिसर विकास नायकवडी व सार्जन्ट काळुराम गोपालेची (आर्मी) गुजरात दंगलीच्या पार्श्वभूमीवर अहमदाबाद येथे विशेष राष्ट्रीय एकात्मता शिबिरासाठी निवड. शिबिरात संरक्षण मंत्री श्री. जॉर्ज फर्नांडीस व मुख्यमंत्री श्री. नरेंद्र मोदी यांच्याशी संवाद साधण्यात सहभागी. कॅम्प कमांडंटकडून राष्ट्रीय एकात्मतेवरील वक्तृत्वासाठी सार्जन्ट गोपालेचे विशेष कौतुक.

★ सार्जन्ट कासीम शेख (आर्मी) यास मुख्यमंत्री शिष्यवृत्ती.

★ कॅडेट विशाल आव्हाडची राष्ट्रीय स्तरावर कर्नाटक-गोवा दरम्यान Ocean to sky शिबिरासाठी निवड व सहभाग.

★ कॅडेट कॅप्टन विशाल पवारची (नौदल) पुणे येथे राज्य स्तरावर झालेल्या एकत्रित वार्षिक प्रशिक्षण शिबिरात उत्कृष्ट छात्र म्हणून निवड.

★ सिनिअर अंडर ऑफीसर गोपालसिंग पतियालची (आर्मी) Indian Military Academy (IMA) डेहराडूनसाठी निवड व प्रशिक्षणात सहभाग.

★ National Accreditation and Assessment Council ने मॉडर्न महाविद्यालयाचे मूल्यांकन

करण्यासाठी ३ डिसेंबर रोजी पाठविलेल्या राष्ट्रीय मूल्यांकन समितीचे राष्ट्रीय छात्र सेनेने गार्ड ऑफ ऑनर देऊन विशेष स्वागत केले. समितीकडून राष्ट्रीय छात्र सेनेच्या उपक्रमांची विशेष नोंद. मॉडर्न महाविद्यालयाला पंचतारांकित दर्जा प्राप्त करून देण्यात सहभाग.

**३६ महाराष्ट्र बटालियन (आर्मी)**

३६ महाराष्ट्र बटालियनचे वार्षिक प्रशिक्षण शिबिर पुणे येथे बालेवाडी क्रीडासंकुलात भरले होते. शिबिरात कॅडेट मयूर पांडे, कॅडेट निखिल उत्तेकर व कॅडेट दिनेश चौंडणकर यांनी मॉडर्न महाविद्यालयाचे प्रतिनिधित्व केले.

ज्युनिअर अंडर ऑफीसर अमोल पवारची हडपसर पुणे येथे झालेल्या स्थलसैनिक शिबिरात ३६ महाराष्ट्र बटालियनचा सिनिअर म्हणून निवड.

कार्पोरल अतुल राऊतची राज्य स्तरापर्यंत व कॅडेट अनिल सहानी, कॅडेट गणेश सुर्यवंशी व कॅडेट चंद्रशेखर निंबाळकरची ग्रुप स्तरापर्यंत स्थलसैनिक कॅम्पसाठी निवड व सहभाग.

कॅडेट राहुल कोंडे याची राष्ट्रीय स्तरावर रांची-झारखंड येथे झालेल्या ॲडव्हान्स लीडरशीप कॅम्पसाठी निवड व सहभाग.

सार्जन्ट गणेश घोंगटे, कॅडेट प्रसाद थोपटे व कॅडेट जेम्स पॉल यांची मुंबई येथे झालेल्या राष्ट्रीय एकात्मता शिबिरासाठी निवड व सहभाग. शिबिरात गणेश घोंगटेची गार्ड ऑफ ऑनरसाठी निवड.

कॅडेट शैलेश काळभोर, कॅडेट उत्तम भोइटे, कॅडेट मुळे व कॅडेट माडवळेकर राकेश यांचा ग्रुप स्तरापर्यंत प्रजासत्ताक दिन शिबिरासाठीच्या निवड कॅम्पमध्ये सहभाग.

विद्यापीठ अनुदान आयोगाचे अध्यक्ष डॉ. अरुण निगवेकर यांच्या हस्ते मॉडर्न कॉलेजच्या ऑडिटोरियमचे भूमीपूजन व महाराष्ट्राचे उप मुख्यमंत्री श्री. छगन भुजबळ त्यांच्या हस्ते जैवतंत्रज्ञान प्रयोगशाळेचे उद्‌घाटन झाले. त्यांच्या स्वागतासाठी सिनिअर अंडर ऑफिसर विकास नायकवडी, ज्युनिअर अंडर ऑफिसर अमोल पवार, ज्युनिअर अंडर ऑफिसर अमेय परब, सार्जन्ट शिशिर धारगळकर, कॅडेट संतोष वडतीले, कॅडेट संतोष चौंडणकर, कॅडेट विकास साळुंखे याची पायलट म्हणून निवड व सहभाग.

पुणे वुमेन्स कौन्सिलतर्फे शेतकी महाविद्यालयाच्या प्रांगणात झालेल्या पुष्प प्रदर्शनासाठी २८ छात्रांचा स्वयंसेवक म्हणून सहभाग.

National Defence Academy (N. D. A.) च्या पासिंग आउट परेड विटनेसाठी ३० छात्रांचा सहभाग.

एन. सी. सी. 'B' Certificate व 'C' Certificate परीक्षेचा निकाल १००%.

आर्मी विंगच्या छात्रांना कॅप्टन टी. डी. निकम यांनी मार्गदर्शन केले.

**३ महाराष्ट्र नेव्हल युनिट**

३ महाराष्ट्र नेव्हल युनिटचे वार्षिक प्रशिक्षण शिबिर पुणे येथे A. S. P. T. च्या प्रांगणात भरले होते. शिबिरात CDT CPT विशाल पवार व CDT गुरुप्रित वालियाची उत्कृष्ट छात्र म्हणून निवड.

CDT हृषीकेश गुप्ता व CDT मयूर गायकवाड यांची युनिट स्तरावरील नौसैनिक व राज्य स्तरावरील वार्षिक प्रशिक्षण शिबिरासाठी निवड व सहभाग.

L. CDT शीतल महाजनची पुणे येथील राज्य स्तरावरील वार्षिक प्रशिक्षण शिबिरासाठी निवड व सहभाग.

L. CDT स्वाती मोकाशी व CDT अश्विनी तुपेची औरंगाबाद येथील राष्ट्रीय एकात्मता शिबिरासाठी निवड व सहभाग.

नेव्हल विंगच्या छात्रांना प्रा. अशोक कांबळे यांनी मार्गदर्शन केले.

**३ महाराष्ट्र एअर स्क्वाड्रन**

CDT स्नेहा कांबळेची चित्तोडगड, राजस्थान व CDT आरती कांबळेंची भुसावळ येथे झालेल्या राष्ट्रीय एकात्मता शिबिरासाठी निवड व सहभाग.

सिनिअर अंडर ऑफीसर स्वरूप घोरपडेची वायुसैनिक कॅम्पसाठी निवड व सहभाग.

CDT स्नेहल भदानेची राष्ट्रीय एकात्मता शिबिर, औरंगाबादसाठी निवड व सहभाग.

फ्लाइट लेफ्टनंट प्रा. व्ही. बी. आल्हाट यांनी एअर विंगच्या छात्रांना मार्गदर्शन केले.

**२ महाराष्ट्र गर्ल्स बटालियन**

CDT स्वाती पवार आणि CDT शिल्पा नाईकची राष्ट्रीय एकात्मता शिबिर, चेन्नई, तामिळनाडूसाठी निवड व सहभाग.

CDT स्मिता पाटीलची राष्ट्रीय स्तरावर जोधपूर, राजस्थान व CDT सुशिला राणाची बालेवाडी, पुणे येथे झालेल्या स्थलसैनिक कॅम्पसाठी निवड व सहभाग.

CDT मधुरा पांगारकर व CDT प्राजक्ता अनेराव यांची प्रजासत्ताक दिन, राष्ट्रीय छात्र सेना दिन व प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचा स्पोर्टस् दिनसाठी पायलट म्हणून निवड.

स्वातंत्र्य दिन, १५ ऑगस्ट २००२ रोजी प्राचार्य अ. गो. गोसावी यांनी छात्रांना शपथ दिली व मार्गदर्शन केले. महाविद्यालयात याही वर्षी राष्ट्रीय छात्र सेनेने राष्ट्रीय सेवा योजना बरोबर प्रथम व द्वितीय सत्रात असे दोन वेळा रक्तदान शिबिर आयोजित केले होते. इतर विद्यार्थ्यांबरोबर ३८ छात्रांनी रक्तदान केले.

महाविद्यालयात छात्रांचा वार्षिक स्नेहसंमेलनासाठी स्वयंसेवक म्हणून सहभाग.

महाविद्यालयात बुधवार, दिनांक १२ मार्च रोजी राष्ट्रीय छात्र सेना दिवस साजरा करण्यात आला. या प्रसंगी लेफ्टनंट संग्राम शिंदे यांच्या हस्ते यशस्वी छात्रांचे मेडल व सर्टिफिकेट देऊन कौतुक करण्यात आले. अध्यक्षस्थानी उपप्राचार्य आर. जी. लिमये व उपप्राचार्य जी. एम. बनसुडे होते.

राष्ट्रीय छात्र सेनेच्या उपक्रमांना माननीय प्राचार्य, उपप्राचार्य, रजिस्टार, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, सेवक विद्यापीठ प्रतिनिधी, जिमखाना विभाग, ३६ महाराष्ट्र बटालियनचे कमांडिंग ऑफिसर कर्नल बक्शी, मेजर गुप्ता, परेड इन्स्ट्रक्टर व कार्यालयीन कर्मचारी यांचे उत्तम सहकार्य लाभले. सर्वांचे मनःपूर्वक आभार !

**कॅप्टन डॉ. टी. डी. निकम**
ऑफिसर इन्चार्ज

## वार्षिक स्नेहसंमेलन

दरवर्षीप्रमाणेच यंदाचे स्नेहसंमेलनही थाटामाटात पार पडले. स्नेहसंमेलन ही फक्त आमच्याच महाविद्यालयाची खासियत आहे. यंदाच्या संमेलनाच्या कार्याध्यक्षपदाची धुरा प्रा. एन. जी. शिंदे यांनी सांभाळली. त्यांना प्रा. श्री. कांबळे व प्रा.सौ. कुवळेकर यांचे उत्तम सहकार्य मिळाले. स्नेहसंमेलनाच्या नियोजनासाठी विविध समित्या स्थापन करण्यात आल्या. प्रा.डॉ.गंधे यांच्याकडे अल्पोपाहार समितीचे व्यवस्थापन, प्रा. डॉ. सौ. सुषमा जोग यांच्याकडे वर्गवार विविध गुणदर्शन समितीचे तर प्रा. सौ. मधु साटम यांच्याकडे समन्वय समितीची जबाबदारी सोपवण्यात आली होती.

मा. प्राचार्य, उपप्राचार्य, रजिस्टार यांचे मार्गदर्शन खूपच मोलाचे होते.

विद्यार्थी प्रतिनिधी कु. स्मिता करिवडेकर, कु. मधुरा जोशी व तुषार सुतार यांनी त्यांच्या विद्यार्थी सहकाऱ्यांसह स्नेहसंमेलन यशस्वी करण्यासाठी खूपच परिश्रम घेतले.

स्नेहसंमेलनाचे उद्घाटन मा. महापौर सौ. दीप्ती चौधरी यांच्या शुभहस्ते झाले. विविध गुणदर्शनाचा कार्यक्रम उत्तम व अभिरुचीपूर्ण असा सादर केला गेला. याचा दर्जा कुठल्याही व्यावसायिक कार्यक्रमापेक्षा कमी नव्हता. शिस्त पालन हे आमचे वैशिष्ट्य यावेळीही जाणवत होते.

यंदाच्या स्नेहसंमेलनाचे आणखी वैशिष्ट्य म्हणजे निवृत्त सहकाऱ्यांचा स्नेहमेळावा. प्रा. श्री. चौधरी यांनी या मेळाव्याचे उत्कृष्ट नियोजन केले. या मेळाव्यास भरघोस प्रतिसाद मिळाला.

इतर सहकारी प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी कार्यालयीन कर्मचारी यांच्या सहभागाशिवाय संमेलन यशस्वी होणे केवळ अशक्य होते. मी. प्रा. एन.जी.शिंदे व्यक्तिश: या सर्वांचा आभारी आहे.

एक चांगले संमेलन पार पाडल्याचा आनंद आज आम्ही उपभोगतो आहोत.

**परिसर स्वच्छता समिती :**

मॉडर्न महाविद्यालय १९७० साली सुरू झाले. साधारण हजार विद्यार्थ्यांसाठी असणारे हे महाविद्यालय २००३ पर्यंतच्या बत्तीस वर्षांच्या कालावधीत मोठ्या प्रमाणावर वाढत गेले, आज येथे जवळजवळ सात ते आठ हजार विद्यार्थी आणि जवळपास पाचशे कर्मचारी यांचा वावर असतो. विविध प्रकारची बांधकामे झाली, नवीन काही सुरू होत आहेत. या महाविद्यालयाच्या परिसरात इतक्या संख्येने वावर असल्यामुळे त्याची देखभाल असणे अत्यंत गरजेचे आहे. यासाठी पदार्थविज्ञान विभागातील जेष्ठ प्रा.एन्.जी.शिंदे यांची निवड करून परिसर स्वच्छता समितीचे अध्यक्षपद त्यांच्याकडे सोपविण्यात आले. त्यांच्या समितीमध्ये आणखी पाच-सहा सहकाऱ्यांची निवड करण्यात आली.

या समितीने वर्षभर मेहनत घेऊन परिसर स्वच्छ राहील याची काळजी तर घेतलीच त्याच बरोबर असणाऱ्या त्रुटींचीही दखल घेऊन आपला अहवाल प्राचार्यांना सादर केला.

त्यांनी केलेल्या महत्त्वाच्या कामामध्ये पाण्याचे नियोजन हे महत्त्वाचे म्हणता येईल. आज आमच्याकडे १,००,०० लिटर पाण्याची उपलब्धता असूनही पाणीटंचाई जाणवत होती. त्याचा शोध घेऊन ती कशी दूर करता येईल हे त्यांनी सूचवले आहे. सध्या चुकीच्या पद्धतीने जोडल्या गेलेल्या टाक्या, जमिनीत मुरणारे पाणी, स्वच्छता गृहांना होणारा अपुरा पाणीपुरवठा या सर्वांवर या अहवालामध्ये प्रकाश टाकण्यात आला आहे.

राष्ट्रीय मूल्यांकन समितीच्या भेटी दरम्यान विशेष परिश्रम घेऊन त्यांनी महाविद्यालयाचे स्वरूप बदलून टाकले. आवश्यक तेथे रंगरंगोटी, जुने वायरिंग बदलून सुरक्षेत केलेली वाढ, योग्य प्रकाश योजनेसाठी पुरेसे लाइटचे पॉइंट, खेळत्या हवेसाठी पंख्यांची सोय इ.

या समितीच्या कामामध्ये प्रा.श्री.चौधरी यांनी मोलाची मदत केली.

उपप्राचार्य प्रा. आर.जी.लिमये प्रत्येक सभेस उपस्थित राहिले. त्यांच्या सुयोग्य मार्गदर्शनामुळे प्रचलित प्रश्न मार्गी लागले.

अपुऱ्या वीजपुरवठ्यामुळे होणाऱ्या पाणी पुरवठ्याचा मारा कमी व्हावा यासाठी जनरेटरची व्यवस्था करण्यात यावी असा आग्रह या समितीने धरला. मा. प्राचार्यांनी या गोष्टीला सहमती दर्शवली व खरेदी समितीमध्ये हा विषय मांडून या कामासाठी निधीची तरतूद करावी असा ठरावही संमत करून घेतला आहे. पुरेसा निधी उपलब्ध होताच हे ही काम हाती घेतले जाईल.

**प्रा. एन. जी. शिंदे,** अध्यक्ष

★★

## प्राध्यापक अभ्यास मंडळ

प्राध्यापकांनी आपल्या विषयाबद्दल काही नवीन माहितीपर अथवा शोध निबंधावर सहकाऱ्यांना व्याख्यान द्यावे अशी स्टाफ अकादमीच्या स्थापनेमागील कल्पना आहे. काही वेळा आपण बाहेरील नामवंत व्यक्तींना त्यांच्या विषयावर व्याख्यान देण्यास बोलविले.

२००२-२००३ या वर्षाच्या पहिल्या सत्रात डॉ. दिलीप भावसार यांचे 'जीवन जगण्याची कला' या विषयावर व्याख्यान झाले. ते श्री. श्री. रविशंकर यांचे शिष्य असून त्यांनी महाराष्ट्रात अनेक सत्रे आयोजित केलेली आहेत. रोजच्या जीवनातील ताणतणाव, काळज्या यांचे निराकरण कसे करावे, तसेच प्रार्थनेचे महत्त्व इ. गोष्टी त्यांनी सविस्तरपणे सांगितल्या.

त्यांच्या व्याख्यानानंतर प्रश्नोत्तराचा कार्यक्रम झाला. प्राध्यापकांच्या प्रश्नांना डॉ. भावसार यांनी समर्पक उत्तरे दिली.

दुसऱ्या सत्रात दि. ४ एप्रिल २००३ रोजी प्राध्यापकांच्या स्व-रचित काव्य वाचनाचा कार्यक्रम आयोजित केला होता. प्राध्यापक अभ्यास मंडळात अशा प्रकारचा कार्यक्रम प्रथमच होत असल्याने त्याबद्दल बरेच कुतूहल व अपेक्षा होत्या. बारा प्राध्यापकांनी आपल्या कवितांचे वाचन केले. कवितांचा दर्जा उच्च होता. आपल्या सर्जनशील बंधू-भगिनींना सहकारी प्राध्यापकांनी उत्तम प्रतिसाद दिला.

तिसऱ्या सत्रात प्राचार्य गोसावी यांनी 'उच्च शिक्षणापुढील आव्हाने' या विषयावर व्याख्यान दिले.

येणाऱ्या काळात होणाऱ्या बदलांची त्यांनी श्रोत्यांना कल्पना दिली व (नुकताच मिळालेला) पंचतारांकित दर्जा टिकविण्यासाठी प्राध्यापकांनी कोणती काळजी घ्यावयास हवी व अध्यापनाचा दर्जा सतत उच्च कसा राहील याबद्दल काही सूचना केल्या.

सर्व कार्यक्रमांना समितीच्या सर्व सभासदांचे बहुमोल सहकार्य लाभले.

**प्रा. अरविंद रायरीकर**

## Science Association

Science Association of our college aims at increasing scientific awareness among students besides the regular education imparted in the classrooms. With a view to make students abreast with up to date knowledge in the scientific world, several programs were conducted throughout the year. The activities of science association were inaugurated on 17th Aug 2002 at the hands of Shri Deenanath Manohar, environmentalist, social reformer and an author of science fictions and books. A slide show on 'Hiroshima not again !' by Bharatiya Dnyan Vidnyan Samuday was also organised on this occasion.

Motivating students to ponder on a topic, collect relevant material and express thoughts; are the objectives achieved through essay contests. Essay contest was organised on topics ranging from 'Ethics in Scientific Experiments' to 'Life on Mars'. In all twenty students participated. The first prize was bagged by Gauri Nerkar (S.Y.B.Sc.) for her essay on 'Ethics in Scientific Experiments.' The second and third prizes were won by Ashwini Sakunde and Sanhita Tokekar respectively for their essays on 'statistics in Finance' and 'Population Census : 2001'. In order to motivate students to gather information on current trends in science, a wall paper activity was conducted throughout the year, in which students participated by writing articles, compiling interesting puzzles, news items etc.

Students get inspiration from interacting with distinguished personalities in specialised fields. Guest lectures by Dr. M. B. Rajarshi, Professor in Dept. of Statistics, University of Pune and Dr. Satish Ogale were arranged. A study tour to Surya Shibir was planned on 13th Jan. in which about 20 students participated. Students took a nature trail while Prof. Ajgaonkar gave detailed information about plants and their medicinal values.

In the second term, a poster competition was organised on 14th December, The National Energy Conservation Day. Mr. Gajanan Sunnapwar, Chief Engineer, MSEB delivered a thought provoking lecture on 'Electricity conservation'. The winners of the poster competition were Prize I : Swati Khole & Neeta Jain T. Y. B. Sc. (Zoo), Prize II :

Pranali Bandare (T.Y.B.Sc. Chem) and prize III : Kavita Kadam and Shilpa Sondkar (T.Y.B.A. (Psychology).

One more slide show was arranged on the topic 'From Ape to Human !' Mr. Kishor Darak gave a very live and interesting presentation.

In today's competitive world, it is essential for students to equip themselves with accurate knowledge, promptness and boldness. With this view, it was decided to



Students participation in Science Quiz.




Dr. Deepti Deobagkar giving away prizes at the Valedictory function of Science Association.

hold a science quiz. In all 40 students participated in the quiz forming 10 leans of 4 each. Objective questions, multiple choice questions as well as visual questions were asked on nine science subjects. Four teams were qualified for the finals. The winning teams were

Prize I : Chandrashekhar Team

| | | |
|---|---|---|
| i) | Subha Sarkar | S.Y.B.Sc. (B) |
| ii) | Mandar Kulkarni | S.Y.B.Sc. (B) |
| iii) | Nikhil Randive | S.Y.B.Sc. (A) |
| iv) | Ashwini Aphale | S.Y.B.Sc. (A) |

Prize II : Kalam Team

| | | |
|---|---|---|
| i) | Jesna Raj | F.Y.B.Sc. (A) |
| ii) | Pranali Kulkarni | F.Y.B.Sc. (B) |
| iii) | Suhas Mahajan | XI (E) |
| iv) | Trupti Kad | F.Y.B.Sc. (B) |

All India Radio, Pune conducted a Science Quiz on Science Day, 28th February, in which Suhas Mahajan, Ashwini Aphale and Nikhil Randive participated and bagged the prize.

With the end of the second term approaching, it was a time for the valedictory function. Dr. Deepti Deobagkar, Director, Dept. of Bioinformetics, University of Pune was invited as the Chief guest who also gave away prices to all winners in various contest. She gave a very inspiring and interesting talk on 'Cloning : Myth and Reality'. The interaction our students has with an eminent scientist like her would definitely help in

shaping their future career.

All in all, it was quite an interesting year full of a variety of activities. The students involvement was satisfactory. All the members of Science Association took keen interest in all the programms and extended co-operation.

**Dr. V. R. Prayag**
**Chairperson**

## The Best Student Trophy Committee

Members :-
Dr. B. S. Dole - Chairperson
Junior Wing - Prof. B. W. Bhome, Prof. R. V. Kulkarni, Prof. V. K. Chabra and Prof. Mrs. L. R. Patankar.
Senior Wing - Prof. Dr. T. D. Nikam
Prof. K. S. Lagoo
Office Assistant - Shri Inamdar

Every year the Best Student Trophy is awarded to the deserving students, on the basis of his or her academic achievements, participation in sports and other activities and performance in the interview.

This year the committee received twenty six applications from senior college students and thirteen applications from junior college students. Twelve students from the senior wing and thirteen students from the junior wing were short listed form interview. The interview panel consisted of the committee members and Vice-Principal Prof. J. P. Chinchore, Prof. G. J. Ghaisas and Prof. J. L. Jorwekar for junior wing and Prof. T. P. Lale and Prof. S. K. Rahane for the senior wing. Following students were declared as the Best Students, for the junior and senior wing respectively.

Prasad Pasarankir - XII G

Smita Kariwadekar - T.Y.B.Com., C

The committee received excellent co-operation from the staff members students and the office staff.

**Bharati Dole,** Chairperson

★★

## 'Exploratory' Co - ordination cum Guidence Cell

Under the anspices of 'Bhartiya Vidya Bhavan' Prof. V. G. Bhide, renouned scientist and Ex-Vice chancellar of the Pune University started on innovative activity 'Exploratory' in 1992 for promotion of career in basic sciences amongst students. The 'Science Promotion Programme' run by Exploratory for college students, comprises lecture series by scientists, viewing of science films, vacational research projects and scholarships during M.Sc. course. College students are selected for this S.S.P. through 'Science Talent Search Examination' conducted every year for F.Y.B.Sc. & S.Y.B.Sc. students.

The Exploratory Co-ordination cum Guidance cell of this college works to promote the science students of this college

to participate in the activities of Exploratory and avail themselves of the opportunities to have encounter with top scientists to enter the career in basic sciences.

**Work done by the Cell during current year :**

1) The Co-ordinator Dr. Sushama Joag contributed the paper-setting & assessment work of the Science Talent Search Examination.

2) Guidence Lectures : Four guidence lectures were arranged for the aspirant students as shown below :

i) Chemistry : Dr. Sushama Joag

ii) Physics : Prof. Utturkar

iii) Biology : Dr. Neeta Patil

iv) Mathematics : Prof. Rayarikar

**Achievements of the Students :**

15 Students from S.Y.B.Sc. & F.Y.B.Sc. appeared for the Science Talent Search Exam conducted on 19th Jan 2003. The results were as shown below :

i) Kulkarni Mandar, S.Y.B.Sc. 3rd rank in the 1st Merit List

ii) Mokashi Swati, S.Y.B.Sc., selected for the S.P.P. through 2nd Merit List

iii) Pawar Aruna , S.Y.B.Sc., selected for the S.P.P. through 2nd merit List.

**Dr. S. D. Joag**
**Co-ordinator**

★★

## ग्रंथालय

चालू शैक्षणिक वर्षात ३१ डिसेंबर २००२ पर्यन्त ग्रंथालयात एकूण २८१७ नवीन पुस्तके विकत घेण्यात आली. आता ग्रंथालयातील पुस्तकांची एकूण संख्या ६८,५५० इतकी झाली आहे.

महाविद्यालयातील विविध अभ्यासक्रमांशी संबंधित व इतर एकूण ८५ मासिके ग्रंथालयात नियमित येतात. इंग्रजी, हिंदी व मराठी मिळून एकूण १४ वर्तमानपत्रे ग्रंथालयात येतात. विद्यार्थी व प्राध्यापक यांना ती उपलब्ध करून देण्यात येतात.

जानेवारी २००२ पासून मुख्य ग्रंथालय व वाचनकक्ष विभागाची वेळ वाढविण्यात आली असून आता सकाळी ८ ते संध्याकाळी ६ वाजेपर्यंत दोन्ही विभाग चालू असतात. परीक्षेच्या काळात विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी मार्च, एप्रिल व मे हे तीन महिने ग्रंथालयाचा वाचनकक्ष रविवारी १० ते ५ या वेळेत सुरू ठेवण्यात येतो. त्यामुळे रविवारी सुट्टीच्या दिवशी विद्यार्थ्यांची अभ्यासाची सोय झालेली आहे.

दरवर्षीप्रमाणे या वर्षी दि. १२.१०.२००२ रोजी ग्रंथालयात मा. प्राचार्यांच्या हस्ते सरस्वती पूजनाचा कार्यक्रम झाला. त्यानिमित्ताने ग्रंथालयात वर्षभरात घेतलेल्या नवीन पुस्तकांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते.

वेगवेगळ्या संस्था, विभाग व व्यक्तींकडून ग्रंथालयासाठी एकूण ६६४ पुस्तके भेट मिळाली. त्यामध्ये प्रा. एम. ए. कुलकर्णी, श्री. खरे व प्रा. व्ही. जी. जोशी यांच्या भेटीदाखल दिलेल्या पुस्तकांचा अमुल्य ठेवा आहे. ही सर्व पुस्तके वाचकांच्या दृष्टीने

अत्यंत उपयुक्त आहेत. या वर्षी श्री. कवडे एस. बी., कनिष्ठ ग्रंथालय सहायक यांना एप्रिल २००२ पासून सहायक ग्रंथपाल या पदावर पदोन्नती मिळाली. तसेच श्री. गुट्टे बी. डी. ग्रंथपाल परिचर यांना फेब्रुवारी २००२ पासून ग्रंथपाल लेखनिक या पदावर पदोन्नती मिळाली.

या वर्षात सत्र १ व सत्र २ मध्ये ग्रंथालय समितीची प्रत्येकी १ सभा घेण्यात आली. समितीच्या शिफारशी मान्यतेसाठी माननीय प्राचार्यांकडे पाठविण्यात आल्या.

या वर्षी ग्रंथालयातील ग्रंथालय परिचर श्री. निवंगुणे जी. पी. हे ३० वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर दि. ३१ मार्च २००२ रोजी सेवानिवृत्त झाले.

विद्यापीठ अनुदान मंडळ पुस्तक पेढी (U. G. C. T. B. B.) योजनेअंतर्गत सर्व शाखांतील एकूण ११४ विद्यार्थ्यांनी ४५६ पुस्तकांचा उपयोग करून घेतला.

ग्रंथालयात आत्तापर्यंत सुमारे २२,१३२ पुस्तकांचे संगणकीकरण झाले असून ते काम शीघ्रगतीने चालू आहे. विद्यापीठाच्या 'कमवा आणि शिका' योजनेअंतर्गत या वर्षी ३ विद्यार्थी ग्रंथालयात पाठविण्यात आले. त्यांनी तालिकीकरणाची कार्डस् Index करणे, Write-off करावयाच्या पुस्तकांच्या याद्या तयार करणे, इत्यादी ग्रंथालयातील कामात मदत केली.

ग्रंथालयातील अभ्यासक्रम बदलल्याने, ग्रंथबांधणीस उपयुक्त नसल्याने, पुस्तकांची पाने फाटल्याने अशा एकूण २८५९ ग्रंथ ग्रंथालय समितीच्या शिफारशीनुसार रद्दबातल करण्यात आले.

ग्रंथालयास दि. ३, ४, ५ डिसेंबर २००२ रोजी NAAC समितीने भेट दिली.

श्रीमती दातरे
ग्रंथपाल

## सेवक सहकारी पतपेढी

३१ मार्च २००२ अखेर संस्थेची सभासद संख्या २२८ असून संस्थेचे अधिकृत भाग भांडवल रु. १,००,००,०००/- असून या आर्थिक वर्षात संस्थेकडे जमा भाग भांडवल रु. ५१,५९,९६०/- आहे. सभासदांच्या आर्थिक गरजा भागविण्यासाठी दीर्घ मुदत कर्ज आणि तातडी कर्जापोटी एकूण रु. १०,१२,३२५/- कर्जवाटप १२ टक्के दराने केले आहे.

या आर्थिक वर्षात पतपेढीने पी. डी. सी. सी. बँकेत पुढीलप्रमाणे गुंतवणूक केली आहे.

| | |
|---|---|
| गंगाजळी गुंतवणूक | रु. ८,५५,७८०/- |
| बँक भाग | रू. ३,०५,५००/- |

या आर्थिक वर्षात एकूण आर्थिक उलाढाल रु. १,४५,३७,६१८ झाली आहे. सन २००१-२००२ या वर्षाकरिता निव्वळ नफा ८४४११९.६० इतका झाला आहे. गंगाजळी वजा जाता सभासदांना १५ टक्के लाभांश वाटप करण्यात आले.

सन २००१-२००२ या वर्षाचे शासकीय लेखापरीक्षण माननीय सौ. अु. रा. साळुंके, प्रथम अप्पर लेखापरीक्षक, सहकारी संस्था, पुणे यांनी केले. त्यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले. त्यांनी संस्थेचे कामकाज पाहून संस्थेला 'अ' दर्जा दिला. विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे गेली २० वर्षे संस्थेला 'अ' दर्जा मिळत आहे. याचे सर्व श्रेय आपल्या सर्व सभासद बंधू भगिनींना द्यावे लागेल. कारण सर्वांचे नेहमी सहकार्य लाभत असते.

**श्री. जगताप के. एस.** **श्री. कवडे एस. बी.**
**प्रा. शेळके व्ही. टी.** **अध्यक्ष**
**सचिव**

★★

# कार्यालय अहवाल

गतसालाप्रमाणे यंदाच्या वर्षास विविध विषय/वर्गांचे निकाल व त्या अनुषंगाने प्रवेशाच्या कामकाजाने कार्यालयीन कामकाजास सुरुवात झाली. जूनमध्ये पूर्णत्वाने महाविद्यालयाचे कामकाज सुरू झाले.

प्रवेशाच्या अनुषंगाने येणाऱ्या प्रवेशाच्या कामकाजास साधारण सप्टेंबर, ऑक्टोबरमध्ये सुरूवात झाली व पाठोपाठ पहिल्या सत्रातील सत्रान्त तसेच विद्यापीठ परीक्षादेखील सर्वांच्या सहकार्याने यशस्वीरित्या पार पडल्या. तसेच बारावीच्या बोर्डाच्या परीक्षादेखील नव्याने अमलात आणल्या गेलेल्या पद्धतीनुसार यशस्वीरित्या पार पडल्या.

दिवाळीच्या सुट्टीनंतर दुसऱ्या सत्रात सर्व विद्यार्थ्यांचा आवडता विषय म्हणजेच स्नेहसंमेलन. त्यासाठी आवश्यक असणाऱ्या विविध विभागांच्या समित्यांवर कामाच्या विभागणीनुसार सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची नेमणूक करून वर्गवार विविध गुणदर्शन व अल्पोपाहार यासारखे कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडले.

कला मंडळ, स्नेहसंमेलन, विविध महाविद्यालयीन व आंतरमहाविद्यालयीन स्पर्धा, विद्यापीठ अनुदान मंडळ तसेच महाविद्यालयातील विविध संघटनांची कामे, बक्षीस समारंभ व अन्य विशेष समारंभांचे आयोजन/नियोजनाचे काम सर्व शिक्षकेतर कर्मचारी, सेवक व प्राध्यापकांच्या सहकार्याने पार पाडण्यात आले. या बाबतीत विशेषत्वाने नोंद करावीशी वाटते, ती म्हणजे कार्यालयीन सेवक वर्गाने अतिशय मेहनतीची/शारीरिक कष्टाची कामे करून वर्षभरातील सर्व उपक्रम यशस्वीरित्या पार पाडले, त्याबद्दल त्यांचे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे.

काही खास गोष्टींचा कर्मचाऱ्यांसाठी आयोजित केलेल्या महात्मा फुले महाविद्यालय, पिंपरी व ॲड. एम. एन. देशमुख महाविद्यालय, राजुर येथील चर्चासत्र/शिबिरात महाविद्यालयातील कर्मचारी सहभागी झाले. त्याचा लाभ प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे महाविद्यालयास झाला.

डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात आयोजित केलेल्या राष्ट्रीय मूल्यांकनाच्या दृष्टीने तर सर्व शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी सर्व तऱ्हेच्या कामात आपले महाविद्यालय आदर्श व स्वच्छ दिसण्याच्या दृष्टीने आपाआपल्या परीने अहोरात्र प्रयत्नशील दिसून आले. अगदी शेवटच्या क्षणापर्यंत हे दृश्य पाहवयास दिसून आले. त्याबद्दल सर्वांचे आभार मानावेत तेवढे थोडेच आहेत. त्याचेच फळ म्हणून महाविद्यालयास B ++ दर्जा प्राप्त झाला.

महाविद्यालयास मिळालेला B ++ दर्जा हे आपण आजपर्यंत केलेल्या कार्याचे, श्रमाचे चीजच आहे. या संदर्भात श्रमपरिहार म्हणून स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी स्नेहभोजनाची तयारी कार्यालयीन कमचाऱ्यांनी अतिशय वेगळ्या पद्धतीने केली. निरनिराळ्या कामात प्रत्यक्ष सहभागी होऊन या स्नेहभोजनाचे आयोजन चोखपणे पार पाडले. त्याची कार्यक्रमास आलेल्या सर्व पाहुण्यांकडून पावती मिळाली. सदर कार्यक्रमाची उपस्थित असलेल्या आजी-माजी प्राचार्य, प्राध्यापक, विद्यार्थी व विविध क्षेत्रांतील सर्व पदाधिकाऱ्यांनी प्रशंसा केली. कार्यक्रम उत्तम रीतीने पार पडला.

दिवसेंदिवस कामाचा वाढता व्याप, वाढती विद्यार्थिसंख्या व शासनाची सर्व पातळीवरील बदलती धोरणे पाहता आपापल्या क्षमतेनुसार कामात समतोल राखण्याच्या दृष्टीने सर्व कर्मचारी प्रयत्नशील आहेत.

अर्ध वेळ काम करणाऱ्या प्राध्यापकांच्या पाचव्या वेतन आयोगाच्या फरकाचे प्रलंबित काम या वर्षी मार्गी लावण्यात आले व सर्वांना प्रत्यक्ष फरकाची रक्कम देण्यात आली.

या वर्षीचाआदर्श शिक्षकेतर कर्मचारी म्हणून संस्थेतर्फे श्री. एस. एस. कामठे यांची निवड करण्यात आली. तसेच सौ. आर. आर. आगाशे (कनिष्ठ महाविद्यालय शिक्षिका) व श्री. ए. व्ही. देशपांडे (वरिष्ठ महाविद्यालय प्राध्यापक) यांची आदर्श शिक्षक म्हणून निवड करण्यात आली. कै. शंकरराव कानिटकर स्मृतिदिनी त्यांना मानचिन्ह व प्रशस्तिपत्र देऊन गौरविण्यात आले. त्याबद्दल त्यांचे अभिनंदन.

वर्षभरातील कार्यक्रमांचा आढावा घेतल्यानंतर सर्वसाधारणपणे असे निदर्शनास आले की सर्व प्रकारचे उपक्रम महाविद्यालयातील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी यशस्वी योगदान दिल्याने उत्तम रीतीने पार पडले, त्याबद्दल सर्वांचे हार्दिक आभार.

**श्री. दि. शं. खोपकर**
रजिस्टार

## सेवानिवृत्ती

यंदाच्या वर्षी पुढील प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी निवृत्त/स्वेच्छानिवृत्त झाले.

प्रा. ए. एल. पाथरे, वरिष्ठ महाविद्यालय; सौ.आर. व्ही. देव, कनिष्ठ महाविद्यालय; श्री. जी. पी.निवंगुणे (ग्रंथालय परिचर), शिक्षकेतर कर्मचारी-श्री. एस. वाय. कुलकर्णी (रजिस्टार), श्रीमती जी.जी. चाफेकर.

या आमच्या सेवानिवृत्त सहकार्यांना उर्वरीत आयुष्य सुख-समृद्धीचे व आनंदाचे जावो, ही सदिच्छा.

## पदोन्नती

यंदाच्या वर्षी महाविद्यालयातील खालील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यात आली.

श्री. कवडे एस. बी. - सहा. ग्रंथपाल
श्री. आव्हाड व्ही. एल. - वरिष्ठ लिपीक
श्री. हजारे एस. एम. - कनिष्ठ लिपीक
श्री. गुट्टे बी. डी. - कनिष्ठ ग्रंथपाल सहायक.

## रौप्यमहोत्सवी सेवा

खालील प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी महाविद्यालयातील सेवेची सलग २५ वर्षे सेवा केली त्याबद्दल त्यांचे अभिनंदन !

प्राध्यापक (वरिष्ठ महाविद्यालय)-श्री. ए. एम. भालेराव, श्री. एम. जे. फरास, श्री. डब्ल्यू. आर. अहिरराव

शिक्षक (कनिष्ठ महाविद्यालय)- श्री. जे. बी. दशपुत्रे, श्री. एस. एन. घैसास, श्री. बी. डब्ल्यू. भोमे, श्रीमती जे. ए. कुलकर्णी, श्री. जे. एल.जोर्वेकर, सौ. एम. बी. शिंदे, सौ. व्ही. एस. नरगुंद.

शिक्षकेतर कर्मचारी-श्री. एस. बी. कवडे, श्री. व्ही. सी. भिडे, श्री. एस. डी. पिनगे, श्री. ए. पी. शिंदेकर, श्री. पी. एम. नलावडे, श्री. बी. व्ही. माळी.




मॉडर्न महाविद्यालयाच्या इमारतीचा दर्शनी भाग



श्री. सु. बा. कवडे, सहायक ग्रंथपाल यांची हस्तकला निर्मिती



सरस्वती पूजन करताना प्राचार्य अ. गो. गोसावी




नॅक समितीचे सदस्य आणि विद्यार्थी प्रतिनिधी.




राष्ट्रीय परिषदेच्या उद्‌घाटन समारंभ प्रसंगी अध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे, उद्‌घाटक डॉ. एस.एफ. पाटील, कुलगुरू भारती अभिमत विद्यापीठ, प्राचार्य अ.गो. गोसावी, डॉ. सुलभा देऊस्कर